गांधींचा अहिंसावाद

त्र्यं. र. देवगिरीकर

गांधींचा अहिंसावाद

लेखक :

त्र्यं. र. देवगिरीकर.

१९४२

किंमत २॥ रु.

मुद्रक व प्रकाशकः—
शंकर नरहर जोशी,
' चित्रशाळा प्रेस, '
१०२६ सदाशिव पेठ,
पुणें २.

चित्रशाळा प्रेस, पुणें २.

निवेदन.

हिंसेच्या जगांत अहिंसेचा, यंत्राच्या जगांत हस्तव्यवसायाचा, भांडवलशाही जगांत अर्थत्यागाचा, आसक्तीच्या जगांत अनासक्तीचा, तर्कबुद्धिप्रधान जगांत श्रद्धेचा, आचार, विचार व प्रचार करणारा गांधींचा अहिंसावाद हिंदुस्थानांत तरी नवा नाहीं. स्वतः म. गांधी हे दर आठवड्याला या वादाचें इतकें विवरण करतात कीं, त्यांच्याशिवाय इतर कोणींहि कांहींहि लिहिलें तरी तें लिखाण फिकेंच पडणार. ही अपूर्णत्वाची जाणीव ठेवूनच मीं हा प्रयत्न केला आहे. माझ्या बुद्धीप्रमाणें मीं या वादाचें विवरण या पुस्तकांत केलें आहे.

निःशस्त्र हिंदुस्थानला म. गांधींनीं प्रतिकाराचें शस्त्र २३ वर्षांपूर्वी दिलें. गेल्या महायुद्धाच्या शेवटीं त्यांनीं अहिंसेचें बीजारोपण केलें. वर्ष दोन वर्षांत त्या बीजाला अंकुर फुटला. ह्या अंकुराचा वृक्ष हां हां म्हणतां फोफावूं लागला. त्या वृक्षाला विधायक कार्यक्रमाचें खत त्यांनीं घातलें आणि सत्याग्रहाच्या अनेक लढ्यांचें पाणी या वृक्षाला दिलें. आज हा वृक्ष चांगला डौलदार झाला असून त्याच्या शाखा सर्वत्र पसरल्या आहेत. संपूर्ण स्वातंत्र्याचें फळ या वृक्षाला येणार असें आज निश्चित दिसत आहे. वसंत ऋतूंतील उष्णता मिळाल्या-शिवाय आम्रवृक्ष हा जसा पुष्पफलान्वित होत नाहीं, त्याप्रमाणें विशिष्ट वाता-वरणाशिवाय राजकीय ध्येयहि पुरें होत नाहीं. गांधींच्या नेतृत्वाशिवाय हिंदु-स्थान स्वातंत्र्य मिळवूं शकला नसता हें आतां सांगावयास पाहिजे असें नाहीं.

राजकारणांत अल्प प्रमाणांत प्रविष्ट झालेल्या अहिंसावादानें जी कामगिरी केली ती खरोखर कौतुकास्पद आहे. पण गांधींचा हा अहिंसावाद संपूर्णतः हिंदुस्थाननें घेतलेला नाहीं. तो वाद जीवनाचा भाग झाला नाहीं. त्यामुळें व्यक्तींच्या व त्याच्या मागोमाग राष्ट्राच्या जीवनांत जी क्रांति व्हावयास पाहिजे ती होत नाहीं. याचें कारणहि उघड आहे. गांधीवादाचें आचरण हें सामान्य माणसाच्या शक्तीबाहेरचें आहे. म्हणून एकटे गांधीच या तत्त्वज्ञानाचें खरे अनुयायी आहेत. या पुस्तकांत श्री. कनू देसाई यांचें जें चित्र दिलें आहे तें व रवींद्रबाबूंची जी कविता दिली आहे ती अर्थबोधक आहे. चहूकडे अंधारच अंधार पसरला आहे, निराशेचें काहूर मनांत उठलें आहे, बरोबर एकहि मित्र नाहीं, पुढें काय आहे याची माहिती नाहीं अशा स्थितींत श्रद्धेचा लुकलुकणारा प्रकाश बरोबर घेऊन तत्त्वनिष्ठ मनुष्य ईश्वराची आराधना करीत एक एक

पाऊल पुढें टाकीत असतो. या रात्रीच्या अंधःकारांत 'तुझा कारुण्य-पूर्ण प्रकाश पडूं दे आणि एकेक पाऊल पडण्याइतका प्रकाश मला दिसूं दे; मला लांबचें दृश्य पहावयास नको आहे' असें 'आपल्या घराकडे' जाणारा साधक म्हणत असतो. ह्या मार्गानें जाणारा कोट्यवधि लोकांत एखादाच असतो. गांधी हे त्यांपैकीं एक आहेत. ते या भयानक अंधःकारांतून श्रद्धेची काठी टेकीत टेकीत पुढें चालले आहेत. त्यामुळें त्यांच्या तत्त्वज्ञानाचे तेच एकटे सच्चे अनुयायी आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं.

धर्मराजाचें उदाहरण नेहमीं आपण घेतों. महाप्रस्थानाला पांच पांडव व द्रौपदी निघाली. प्रथम द्रौपदी गतप्राण झाली. नंतर सहदेव, नकुल, अर्जुन व भीम पडले. युधिष्ठिराला धर्मानें त्यांच्या मृत्यूचें कारण विचारलें. द्रौपदी अर्जुनाच्या पक्षपातामुळें, सहदेव बुद्धीच्या घमेंडीनें, नकुल रूपाच्या गर्वानें, अर्जुन पराक्रमाच्या अभिमानानें व खोट्या प्रतिज्ञेमुळें आणि भीम खादाडपणा व शारीरिक बलाच्या गर्वानें मेला. धर्मराज शेवटीं राहिले. त्यांना न्यायला इंद्र विमानासह आला व बरोबरच्या कुत्र्याला टाकून द्या म्हणाला. कुत्र्याला घेऊन येणारा अशुची असतो, त्याला स्वर्गांत स्थान नाहीं असें इंद्र म्हणाला. पण धर्मानें आग्रह धरला. हा माझा भक्त आहे व भक्ताचा त्याग स्वर्गलोभानें मी करूं शकत नाहीं असें त्यांनीं उत्तर दिलें. ही त्याची निष्ठा पाहून इंद्रानें त्यांना जीवंतावस्थेंत स्वर्गलोकीं नेलें वगैरे वर्णन महाभारतांत आहे.

स्वातंत्र्याकरतां आपल्या तत्त्वाचा त्याग न करणारे एखादेच गांधीजी असतात. त्यामुळें तत्त्व हें अमर रहातें. अशीं अलौकिक तत्त्वज्ञांचीं उदाहरणें हींच खरीं दीपस्तंभाप्रमाणें मार्गदर्शक असतात. कदाचित् गांधी हे एकटेच आपल्या तत्त्वाचें आचरण करणारे राहतील. त्यांना कोणीहि अनुयायी मिळणार नाहीं. कांहींजण विशिष्ट मर्यादेपर्यंतच त्यांच्या बरोबर जाऊं शकतील. गांधीवादाला हिंदुस्थानांत यश मिळालें असें वर म्हटलें. पण सर्वच प्रसंगीं असें यश मिळेल अशी कोणीं अपेक्षा करूं नये. व्यावहारिक यशानें तत्त्वाचें मोजमाप होत नाहीं, उलट अपयशाचेच प्रसंग अधिक येत असतात. तेव्हां गांधीवाद ऐहिक जगांत यशस्वी झाला नाहीं तर ती त्या वादाची न्यूनता नसून तो मानवी शक्तीचा कमकुवतपणा समजावा.

असें हें तत्त्वज्ञान माझ्या दृष्टीनें मीं या पुस्तकांत चर्चेला घेतलें आहे. त्यांत जर अपुरेपणा किंवा चुका असल्या तर त्या माझ्या आहेत, वादाच्या नाहींत.

'युद्धाच्या काळांत हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें मी धाडस करीत आहे.' कागद, छपाइ वगैरे सर्व साधनें अत्यंत महाग झालीं असतांना हें प्रकाशन होत आहे. पण चित्रशाळेचे मॅनेजर श्री. शंकरराव जोशी व मालक श्री. वासुकाका जोशी यांनीं हें पुस्तक प्रकाशित करण्याचे कबूल केले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या पुस्तकाची किंमत युद्धामुळेंच इतकी जास्त ठेवावी लागली, त्याबद्दल नाइलाज आहे. पुस्तक प्रकाशित करण्यापूर्वी माझ्या कांहीं स्नेह्यांना मीं तें दाखविलें व त्यांनीं केलेल्या सूचना मी ग्राह्य केल्या. त्यांचा नामनिर्देश मी केला असता, पण माझ्यावर टीका झाल्यास त्यांत त्यांनाहि सहभागी व्हावें लागेल म्हणून मी तो निर्देश करीत नाहीं. या सर्व मित्रमंडळींचा मी आभारी आहें.

श्री. काकासाहेब कालेलकरांकडून रवींद्रबाबूंच्या कवितेचा व भाषांतरांचा उपयोग करण्याची संधि मिळाली या बद्दल मी त्यांचे आभार मानतों.


पुणें,
राष्ट्रीय सप्ताह
६।४।१९४२

— त्र्यं. र. देवगिरीकर.

अनुक्रमणिका.

प्रकरण	विषय	पृष्ठ
१	प्रास्ताविक	१
२	हिंदुस्थान व जग	१६
३	गांधीतत्त्वज्ञान	२५
४	अहिंसा व प्रेम	४२
५	सत्य व अहिंसा	५४
६	व्यवहारांतील सत्य	६४
७	सत्याग्रह व सत्याग्रही	८४
८	गांधीवादांतील विधिनिषेध	१०९
९	सामाजिक क्रांति	१२०
१०	आर्थिक क्रांति	१२८
११	संस्कृति	१५७
१२	समाजसत्ता व गांधीवाद	१९१
१३	अहिंसेचें स्वातंत्र्य	२००
१४	युयुत्सु गांधीवाद	२०७
१५	गुण व दोष	२२१
१६	उपसंहार	२३३

गांधींचा अहिंसावाद.



श्री. कनू देसाई यांच्या चित्रावरून साभार.

ऐकाकी पौरुषं कुर्यात्

जदि तोर डाक शुने केऊ ना आसे
तबे ऐक् ला चलो रे ।
ऐक् ला चलो, अक् ला चलो,
अक् ला चलो रे ॥
जदि केउ कथा ना कय--
(ओरे ओरे ओ अभागा !)
जदि सबाअि थाके मुख फिराये,
सबाअि करे भय- -
तबे पराण खुले ',
ओ तुअि मुख फुटे ' तोर मनेर कथा,
ऐक् ला बोलो रे ॥
जदि सबाअि फिरे ' जाय—
(ओरे ओरे ओ अभागा !)
जदि गहन पथे जाबार काले
केउ फिरे ना चाय—
तबे पथेर काँटा
ओ तुअि रक्तमाखा चरणतले
एक् ला दलो रे ॥
जदि आलो ना धरे ॥
(ओरे ओरे ओ अभागा !)
जदि झड बादले आँधार राते
दुयार देय धरे—
तबे वज्रानले

आपन बुकेर पाँजर ज्वालिये निये
अक् ला ज्वलो रे ॥
जदि तोर डाक शुने केउ ना आसे,
तबे अक् ला चलो रे ॥
अक् ला चलो, अक् ला चलो,
अक् ला चलो रे ॥

—**रवींद्रनाथ ठाकुर.**

'जर तुझी हांक ऐकून तिला ओ देण्यासाठीं कोणीच आलें नाहीं तरी थांबूं नकोस एकटाच चालूं लाग, एकटाच चालूं लाग, हिम्मतपूर्वक पुढेंच चल.

तुझ्या बरोबर रहाण्यांतील संकट ओळखल्यामुळें लोक जेव्हां मौन धारण करतील आणि हे बिचाऱ्या अभाग्या! कोणीच तुझेशीं बोलणार नाहींत, सगळेच तुला भिऊन तुझे पासून तोंड फिरवितील तेव्हां तूं मुक्तकंठानें आणि हृदयाच्या प्राणानें तुझा संदेश ललकारूं लाग. एकटाच तूं तुझ्या सत्याला मुखरित कर आणि एकटाच चालूं लाग.

आणि जर हे दुर्भाग्या तुला कोणीच साथी न मिळाला आणि असलेले साथी परत फिरले, सगळेच परत फिरले, गहन मार्गांत प्रवेश करण्याचे वेळीं जर कोणीच तोंड फिरवून तुझेकडे पाहूं धजला नाहीं तर तूं अनवाणी त्या कांटेरी मार्गांतून एकटाच चाल! रक्तबंबाळ उघड्या पायांनीं एकटाच कांटे तुडवीत मार्गक्रमण कर.

आणि दुर्दिन समयीं जर वारा आणि पाऊस यांची झड लागली असतांना अंधाऱ्या रात्रीं तुला कोणी दिवा दाखविला नाहीं, लोक आपआपल्या घरांत दरवाजे लावून बसले तर तूं आपल्या हृदयरूपी कंदिलांत वज्रानलाचा विजेचा दिवा पेटवून तोच कंदील हातांत घेवून एकटा एकटा प्रकाशूं लाग.

हे दुर्दैवी प्राण्या, आपल्या दैवाला शरण न जातां, हिम्मत पूर्वक पुढें जा. दैवाला मागें टाकणें हाच तुझा खरा पुरुषार्थ आहे.

—**काका कालेलकर.**

प्रास्ताविक : : : १

येरवड्याच्या तुरुंगांत असतां एका मित्राचें पत्र मला पहावयास मिळालें. त्यानें लिहिलें होतें कीं, आम्ही सत्याग्रही म्हणून तुरुंगांत येतों, राजकीय चळवळी करतों, पण या चळवळीमागील जी प्रेरक शक्ति, जें तत्त्वज्ञान त्याविषयीं शास्त्रीय आणि सुसंबद्ध अशी बाजू मांडणें आम्हांला कठीण जातें. तो मित्र अर्थात् गांधीवादाबद्दल म्हणजेच अहिंसावादाबद्दल लिहीत होता. मी विचार केला, आपल्याला तरी गांधीवाद कितपत कळतो, आपण त्यावर कितपत लिहूं शकतों हें पाहूं या. म्हणून स्वतःची परीक्षा घेण्याकरतां मी हा प्रयत्न करीत आहे. स्वतःजवळ जितकी ग्राहक शक्ति असेल तितकेंच मला गांधीवादाचें आकलन झालें असें मी समजेन. ज्याची जितकी शक्ति असते तितकेंच आकलन त्याला होतें. आकाश अनंत आहे, म्हणून सर्वच पक्ष्यांना त्या आकाशांत उड्डाण करतां येत नाहीं. आजकालचीं विमानेंहि ठराविक उंचीच्या वर जाऊं शकत नाहींत. मी हें गांधीवादाच्या अमर्याद स्वरूपाविषयीं लिहीत आहे याची मला जाणीव आहे.

गांधी हीहि एक मर्त्य व्यक्ति आहे, व त्या व्यक्तीकडूनहि कदाचित् गांधीवादाचें पूर्ण आचरण व आविष्करण झालें नसेल. म. गांधी स्वतः गांधीवाद हा शब्द वापरूं नका असें म्हणत असतात. पण गांधींच्या अहिंसावादाचें आकलन होण्यास हा शब्द उपयोगी आहे. तो आतां रूढहि झाला आहे. म. गांधींनीं अहिंसावादांत प्रत्यक्ष प्रतिकाराची भर घातली असल्यामुळें गांधीवाद व अहिंसावाद हे स्वरूपतः भिन्न आहेत.

गांधीवाद हा जीवनशास्त्राचा अर्थप्रतिपादक शब्द आहे. ज्याला विशिष्ट तत्त्वज्ञानानें जगावयाचें असेल त्याला गांधीवाद समजून घेणें अवश्य आहे. आपलें जीवन हें बरेंचसें पराधीन व कांहींसेंच स्वाधीन असतें. निरनिराळ्या व्यक्ति, निरनिराळ्या संस्था, निरनिराळे विचार, यांच्याबरोबर टकरा देत देत आपल्याला जीवन व्यतीत करावें लागतें. या भिन्नभिन्न प्रवृत्तींमध्यें आपण आपली शांति ढळूं न देतां कसें वावरूं शकूं, हा मुख्य प्रश्न असतो. ज्या समाजामध्यें आपण रहातों, त्या समाजाचे नियम, त्याची रचना हीं सर्व कशीं आंखून–रेखून तयार झालेली असते, त्या समाजरचनेवर हजारों वर्षांचे संस्कार झालेले असतात. आपण त्या समाजामध्यें जर नवें कांहीं सांगूं लागलों तर समाज कावराबावरा होतो. आपल्या शरीरांत जसा एखादा बाहेरचा पदार्थ आला म्हणजे शरीरांतील द्रव्यें त्या पदार्थावर तुटून पडतात तसें समाजाचें असतें. गतानुगतिक जे असतात व जे त्यांतच आपलें बुद्धि-वैभव प्रकट करतात त्यांची थोरवी वर्णन केली जाते. याचा अर्थ नव्या विचारांचें आरोपण समाजांत होत नाहीं असें नाहीं. गौतमाचा बुद्धधर्म, महंमदाचा इस्लाम धर्म किंवा रशियांतील विश्वकुटुंबवाद यांना समाजाबरोबर झगडावें लागलें. क्वचित् रक्तपातहि करावा लागला. त्याचें कारण एकच आहे. नव्या विचारांना होणारा विरोध.

पण व्यवहारांतहि हीच स्थिति दिसते. तुम्ही एखाद्या कारखान्यांत गेलांत तर तुम्हाला नवी मोटार करूं देणार नाहींत, अमुक नंबरचे स्क्रू दिवसांत तुम्ही किती बसवतां, हें कारखानदार पहात असतो. युनिव्हर्सिटीचा अभ्यासक्रम बदलण्याची शक्ति एखाद्या महान् विद्वानांत नसते.

तो फार तर एखादा ठराविक विषय विद्वत्तापूर्वक शिकवूं शकेल. एखाद्या डॉक्टरला पुस्तकांत न योजिलेलें व अनुभव न घेतलेलें औषध देतां येणार नाहीं किंवा एखाद्या वकिलाला विवाहित हिंदु स्त्रीचा नवरा अत्यंत दुर्वर्तनी आहे हें सिद्ध करतां येत असूनहि ब्रिटिश कोर्टांत घटस्फोट मिळणार नाहीं. समाजांत बुद्धिमान ठरलेल्या लोकांनीं जे जे नियम घालून ठेवले असतील ते ते आपण पाळले पाहिजेत, अशीच समाजाची अपेक्षा असते. राजकारण हाहि सामाजिक जीवनाचाच एक भाग आहे. म्हणून इतर बाबतींत जशी रुळलेली वाट चालावयाची असते, तशीच राजकारणांतहि आक्रमावयाची असते असें अनुभवी सांगतात.

पण समाज जसा स्थितिमान असतो, तसा तो गतिमानहि असतो. आपण समाजांत रहाणारे लोक सर्वच बाबतींत गतानुगतिक नसतों. बंडखोरी करण्याची वृत्ति ही थोड्या फार प्रमाणांत सर्वांच्यांतच असते. बुद्धीचा व मनाचा झगडा सतत सुरू असतो. कधीं कधीं बुद्धि बंड करते व मनाला आपल्या मागें खेंचते तर कधीं मन बुद्धीला वेसण घालून शिस्तीच्या कचाटींत धरतें. यामुळेंच जुन्या परंपरेच्या विरुद्ध बंड करण्याचे विचार ज्याला आले नसतील असा अपवादहि सांपडणें कठीण जाईल. अर्थात् विचारानुरूप आचार होत नसल्यास तो मनाचा व शरीराचा कमकुवतपणा आहे असें समजावें. तथापि एकच विचार अनेकजण अनेक वेळां म्हणूं लागले म्हणजे तोच समाजाचा नवा धर्म होतो आणि समाजांतील जुनी परंपरा न सोडणारे भित्रे लोक नवी भाषा बोलूं लागतात व नंतर ते विचार कृतींतहि आणतात.

प्रत्येक समाजांत प्रत्येक वेळीं बंडखोरीचे विचार उद्‌भूत होत असतात; पण ते सर्वच विकास पावत नाहींत. सरीचा पाऊस पडला म्हणजे, त्या पावसाच्या थेंबांचा ओहोळ होतो. त्या ओहोळांतून पुढें पाट निघतो आणि यांत्र क्रमानें मोठाले प्रवाह फोफावतात. ज्याला सामाजिक, राजकीय, शैक्षणिक किंवा आर्थिक घडामोडी म्हणतात, त्या घडामोडींचा उगम असाच एखाद्या बंडखोर व्यक्तीच्या डोक्यांत झालेला असतो. या स्थित्यंतरामुळें नवी समाजरचना निर्माण होते, पण कांहीं

काळानंतर ती समाजरचना त्याज्य, जुलमी, अन्यायी व अपुरी वाटूं लागते आणि जुन्या समाजरचनेंत केलेल्या क्रांतीच्या यशस्वितेंत नव्या क्रांतीचें बीजारोपण होतें. ज्याला आपण सामाजिक परिपूर्णावस्था म्हणतों, अशी परिपूर्णावस्था त्या त्या काळची स्थितिदर्शक असते. सापेक्षता हा मनुष्यस्वभावाचा विशेष आहे; तसेंच असंतुष्टता ही त्याची वृत्ति आहे. या स्थित्यंतराचा सर्वच इतिहास देणें येथें शक्य नाहीं. पण कांहीं कांहीं विचारांच्या टप्प्यांचा परामर्ष घेणें शक्य आहे. राजसंस्थेंत पाश्चात्य समाजांत झालेल्या घडामोडी विशेष स्पष्ट रीतीनें दिसतात.

* * *

एकेकाळीं राजाला ईश्वर मानीत असत. साऱ्या जगांत राजाला असा मान मिळे. राजा हा अन्याय करूंच शकत नाहीं असें मानण्याची सर्व जगांतच प्रवृत्ति होती. राजनिष्ठ नसणाऱ्या माणसाला देहांताची शिक्षा दिली तरी लोक मान डोलावीत. त्यांतील पुष्कळांना हेंहि ठाऊक असें कीं, ज्या राजाविषयीं अप्रीति दाखवली तो राजा देवाचा अवतार नसून राक्षसाचा अवतार आहे. पण त्यांनीं कधींहि आपला विरोध प्रकट केला नाहीं व स्वतःवर अरिष्ट ओढवून घेतलें नाहीं. राजेलोकहि समजत, आपण राजघराण्यांत जन्माला आलों, आतां काय वाटेल तें करण्याची आपल्याला सत्ता मिळाली आहे. अशा क्रूर व दुर्वर्तनी राजांचा प्रजेला राग येई; पण तो राग विशिष्ट राजापुरताच होता. 'क्ष' राजा मेला तर आपण सुखी होऊं एवढेंच जनतेला वाटे. राजसंस्था नष्ट व्हावी असे अभद्र विचार त्या प्रजेच्या डोक्यांत येत ना. तो राजा मरावा म्हणून प्रजा जळफळे आणि परमेश्वरालाहि तशी प्रार्थना करी. पण पुढला राजाहि तसाच दुष्ट दिसूं लागल्यावर त्या राजाचा वध करून दुसऱ्या घराण्यांतील राजा तेथें बसवावा असा विचार सुरूं झाला. पण हे दुसऱ्या घराण्यांतील राजे एकाच माळेचे मणी दिसूं लागल्यामुळें प्रजा कावरीबावरी झाली व तिच्या मनांत असे विचार येऊं लागले कीं, "अरेरे, आपण व आपले पूर्वज काय वेडे होते! त्यांना एवढेंहि सुचूं नये कीं, एक व्यक्ति सर्वसत्तासंपन्न होणें ही चूक आहे, ही

गुलामी आहे. छे, एकतंत्री राजसत्ता नष्ट झाली तरच सौख्याच्या शिखरावर आपण चढूं. काय आम्ही प्रजाजन म्हणजे मुकीं मेंढरें आहों. आम्हांलाहि हक्क आहेत, आम्हींहि जबाबदार आहों, आम्हालाहि कर्तव्याची जाणीव आहे. आम्ही सत्ता हातीं घेणार, प्रजासत्ताक लोकशाहीचें राज्य आम्ही स्थापणार, माणसामाणसांत आम्हीं उच्चनीच भेद करणार नाहीं. कोणी राजा म्हणून सत्ता गाजवूं लागला तर त्याला जुमानणार नाहीं. अशा प्रकारचें राज्य होणें म्हणजेच ईश्वराचें राज्य जगावर होणें होय." पण इतक्यांत कांहींजण म्हणूं लागले, "तुम्ही फार घाई करतां, फार पुढें जातां. अशी घाई करूं नका; जरा दमानें घ्या. आम्हाला राजा का हवा आहे! पण राजा असला—आपला नांवापुरता असला—म्हणून काय बिघडतें. देवळांत देवाची प्रतिमा असते. मानलींत तर ती देव नाहींतर दगड. तसेंच राजाचें. तुम्ही त्याच्या हातीं सत्ता ठेवूं नका म्हणजे झालें. या युक्तीनें तुम्ही सुंदर सुवर्णमध्य साधाल. जुन्या व नव्याचा सांधा बेमालूम बसेल यानें. जुन्या काळची राजसंस्था व नव्या काळची लोकसंस्था यांचें जिवंत स्वरूप तुम्हांला मर्यादित राजसत्तेंत सांपडेल."

कोणाला हाहि युक्तिवाद पटला. त्यामुळें कांहीं देशांत शुद्ध लोकशाही आली तर कांहीं देशांत मर्यादित राजशाही राहिली. लोकशाही म्हणजे समाजाचें पूर्णत्व असें वाटण्याच्या काळाच्या ओहोटीला लवकरच सुरवात झाली. लोक म्हणूं लागले, "लोकसत्ता जरी चांगली असली तरी ती कार्यक्षम होण्यास फार अडचणी येतात. त्याच्या ऐवजीं एका व्यक्तीच्या किंवा एका पक्षाच्या हातांत सर्व सत्ता दिली आणि त्याला किंवा त्या पक्षाला सर्वाधिकारी नेमले तर काय बिघडणार आहे!" आतां वारा तसा वाहूं लागला आहे. हिटलरनंतर हुकूमशाही ही जर का प्रभावी आणि प्रजेला सुख देते, असें ठरलें तर लोकशाही नको असेंच लोक म्हणूं लागतील. राजसत्तेंत राजे जुलमी, अन्यायी, चैनी, नालायक जसे निपजतात, तसें लोकसत्तेंत पैशानें मतें विकत घेतां येतात, अगर जातीचें, धर्माचें, वर्गाचें किंवा विशिष्ट प्रादेशिकत्वाचें प्रलोभन दाखवून निवडून येतां येतें.

कांहीं कांहीं संस्थांत तर लायक लोकांच्यापेक्षां नालायक लोकांचीच अधिक गर्दी होते आणि राज्यकारभार किंवा संस्थांचा कारभार हा लांच-लुचपतीनें लुळा पडतो. त्यामुळें राज्यसंस्था ही जुलमी असली तरी चालेल, पण नालायक राज्यसंस्था नको असे विचार येऊं लागतात.

राजसत्तेकडून लोकसत्तेकडे आणि लोकसत्तेकडून सर्वाधिकारित्वाकडे समाज अशा प्रकारें ओढला जाऊं लागतो. त्याला विद्यमान व्यवस्था अपुरी वाटूं लागतांच तो क्रांतीच्या मागें लागतो. हा मनुष्यस्वभावाचा विशेष आहे. पूर्णत्वाला एखादा समाज गेला आहे असें आपण वाचतों किंवा पहातों, तेव्हां त्या समाजाची त्या वेळची ती परिस्थिति असते, हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. मनुष्यसमाज हा उन्नत व सुसंस्कृत होत जात असतो, हें प्रमेय आपण मान्य केलें पाहिजे. मधून मधून ही उन्नति खंडित झाल्यासारखी वाटली तरी ती संक्रमणावस्था असते. पण समाज हा सापेक्षतः पूर्णावस्थेला जाण्याकडेच कललेला असतो हें निर्विवाद आहे.

* * *

राजसत्तेच्या बाबतींत परिपूर्णावस्था गांठावयाचे जसे अन्य देशांत प्रयत्न झाले, तसे याहि देशांत झाले. मनुष्यसमाज हा परिपूर्णावस्थेकडे मृगजळाप्रमाणें धांवत आहे. क्षितिज जसें कधींच सांपडत नाहीं तशी स्थिति परिपूर्णावस्था प्राप्त करून घेणाराची असते. ह्याच असंतोषाच्या पोटीं प्रगतीचा जन्म होतो.

हिंदुस्थानच्या पांचसात हजार वर्षांच्या इतिहासाचीं जीं स्पष्ट व अस्पष्ट अवशिष्ट चिन्हें आहेत त्यांवरून येथेंहि अशीच धडपड सुरू होती असें दिसते. हा पांच सात हजार वर्षांचा चित्रपट आपल्याला सहज अवलोकन करतां येतो. मला अमुक पाहिजे, मला तमुक पाहिजे अशी प्रार्थना करणाऱ्या आपल्या वैदिक पूर्वजांची आपल्याला कधीं विस्मृति होईल कां ? पंचमहाभूतांना देव मानणाऱ्या आणि ते संतुष्ट व्हावेत म्हणून यज्ञयाग करणाऱ्या आपल्या पूर्वजांचे विचार आपण कधीं समजून घेतले आहेत काय ? ते आजच्या अर्थानें भौतिक व उपयुक्ततावादी होते. स्वर्गाच्या पलीकडे त्यांची दृष्टि जाऊं शकली नाहीं. पण ऐहिक

जग त्याज्य मानून ते परलोकाकरतां कधीं उतावीळ झाले नाहींत. कदाचित् ती समाजाची पूर्णावस्था नाहीं असे विचार तेव्हांच्या सुधारकांच्या डोक्यांत आले असले पाहिजेत व क्रांतीची भाषा त्यांनीं सुरू केली असली पाहिजे. यज्ञयागांत होणाऱ्या पशुहननाला उद्वेगून अरण्यांत जाऊन बसणारांचा सांप्रदाय उदयास आला. त्यांना सर्वच जग मायामय व असत्य भासूं लागले. ब्रह्म सत्य आहे व जगत् मिथ्या आहे, अशी विचारसरणी तेव्हां प्रभावी होऊं लागली. समाजांतील श्रेष्ठ जसा विचार व आचार करतात, तसा इतरेजनहि करूं लागतात. तेव्हां प्रवृत्तिमार्गाकडून घड्याळाचा लंबक निवृत्ति मार्गाकडे वळला. आज आपण वेदकालाकडे काय किंवा उपनिषद् कालाकडे काय, दृष्टी फेकली तर त्या त्या वेळचे समाज त्या त्या काळच्या समजुतीप्रमाणें परिपूर्णच होते असें म्हणावें लागतें. आपण जर असें म्हणालों कीं, वैदिक काळ परिपूर्ण नव्हता अगर उपनिषद् काळ परिपूर्णावस्थेला गेला नव्हता तर एखादा पंडित हें विधान खोडून काढील. जो प्रवृत्तिमार्गी आहे तो वैदिक काळांतील सुखी समाजाचें चित्र रेखाटील आणि निवृत्तिमार्गी वेदांतकालीन परिस्थिति ही आदर्श समाजस्थिति होती असें म्हणेल. त्यावेळीं पापपुण्याच्या आणि कर्मविपाकादिकांच्या कल्पना इतक्या तीव्र झाल्या होत्या कीं, दुसऱ्याला पीडा देणें, दुसऱ्याच्या दुःखाला कारणीभूत होणें म्हणजे आपल्या पारलौकिक कल्याणाला आंचवणें होय असें मानलें जात असे. समाजप्रमुख हे संन्यस्त वृत्तीचे बनत गेल्यामुळें बाकीचा समाजाहि बराचसा सत्प्रवृत्त असला पाहिजे यांत वाद नाहीं. आजकालची आर्थिक स्पर्धा त्यावेळीं नव्हती, आणि अर्थात जीवनकलहहि नव्हता. तेव्हांचे प्रश्न निराळे होते. अहिंसा मार्गाचा उद्भव याच कालांत झाला. वैदिक धर्मांत आलेल्या सांप्रदायिकत्वाला व अत्याचाराला कंटाळून जसा अरण्यांत जाऊन बसणारा एक पंथ निघाला तसा दुसरा पंथ जैन–बुद्धांचा निर्माण झाला. हाहि विरक्तांचाच पंथ होता. अहिंसेला परमधर्म मानणारे हे धर्म झाले.

पण ही विरक्ति समाजाला कायमची लाभावी असें वाटलें नसावें. वास्तविकपणें आत्मचिंतनाचें अत्युच्च शिखर जर जगाच्या इतिहासांत

कोठें व कोणी गांठलें असेल तर तें आरण्यक व उपनिषत्कालीन द्रष्ट्यांनीं. अजूनहि वेदांताचें अध्ययन करणारे वेडावतात, आणि हे अभ्यासक–पाश्चात्य असले तरी–आमच्या प्राचीन ऋषींपुढें आपलीं मस्तकें विनम्र करतात.

तेव्हांचा समाज कसा असला पाहिजे, याची फक्त कल्पनाच करणें शक्य आहे. कारण त्या काळच्या समाजाचा इतिहास आपल्याला कोठें वाचावयास मिळणार नाहीं. आपण समाजाची जी कल्पना करणार ती त्या वेळच्या प्रवृत्तीवरूनच करणार. त्या काळचा सर्वच समाज संन्याशांचा होता असें मानलें तर अनवस्था प्रसंग येतो. तेव्हां विवाह होत असत व प्रजाहि वाढत असे. पण बऱ्याचजणांचें जीवितध्येय आपण संसारांतून मुक्त व्हावें व मोक्षाच्या मार्गे लागावें असें असलें पाहिजे. बुद्धीची साम्यावस्था झाल्याशिवाय विरक्तीकडे माणूस वळत नाहीं. साम्यावस्थेला आसक्तीचें वावडें असतें आणि आसक्ति नसेल तर अन्याय किंवा जुलूम तरी कोण कोणावर करणार ? त्या काळांत पिळवणूक करणारे सरकार आजच्याप्रमाणें खास नसेल. आपसांतील झगडे, अगर राष्ट्राराष्ट्रांमध्यें दिसून येणारीं आजकालचीं भीषणयुद्धें यांना तेव्हांचा समाज पारखा असावा. आत्मा, बुद्धि, मन शुद्ध ठेवावें अशी तेव्हांची सर्वसाधारण प्रवृत्ति असल्यामुळें मानव्याच्या दृष्टीनें तेव्हांचा समाज बराच पूर्णावस्थेला गेला असला पाहिजे. पण जर या मनोवृत्तींत बदल झाला नाहीं तर सर्वच समाज विरक्त स्त्रीपुरुषांचा होऊन जगाचें चक्र थांबेल अशी कांहीं क्रांतिकारकांना भीति वाटली व प्रवृत्तिवाद पुनः वर आला. संन्यास व कर्ममार्ग यांच्यामधील झगड्यांना सुरवात जी झाली ती याच क्रांतिकारकांनीं केली असली पाहिजे. उपनिषत्कालांत जीवनासंबंधीं व्यक्त केलेले विचार हे पुढील काळांत दिसून येत नाहींत. कारण विरक्तींत समाजाला फार दिवस रहातां येत नाहीं. कांहीं व्यक्ति अशा प्रकारचें उज्ज्वल जीवन व्यतीत करून समाजाचें मार्गदर्शन करतात. पण अशा आदर्श व्यक्तींच्या विचारआचारांचें सूक्ष्म दृष्टीनें निरीक्षण होऊं लागतें व त्यांच्यांत दोष काय आहेत, हें पहाण्याची प्रवृत्ति बळावते. त्याचा परिणाम विचारस्वातंत्र्यांत होतो आणि स्वाभाविकपणेंच ह्या

स्वैरविचारामुळें कोठलीहि व्यक्ति किंवा कोठलेंहि तत्त्वज्ञान हें आदरणीय न वाटतां दूषणीय वाटूं लागतें.

हिंदुस्थानांत वैराग्याची लाट येऊन गेल्यानंतर जी समाजव्यवस्था अस्तित्वांत आली ती बरीचशी विकृत स्वरूपाची होती. त्या काळच्या राजांच्या चरित्रांचा इतिहास वाचवणार नाहीं इतका घाणेरडा आहे. पण दुसऱ्या बाजूला भौतिकशास्त्रें उदय पावूं लागलीं. शास्त्र, कला, ज्योतिष, संगीत, काव्य, नाटकें वगैरेंचा परिपोष भारतीय पूर्वजांनीं केला आणि आध्यात्मिक पार्श्वभूमीवर भौतिक शास्त्रें रंगूं लागलीं. हा काल बौद्धिक विलासाचा होता व तो आजच्यापेक्षां भिन्न नव्हता. त्यानंतर पुनः निवृत्तीकडे समाज झुकला आणि त्याचा शेवट लाखो वारकरी खांद्यांवर पताका टाकून 'विठ्ठल' नामाचा गजर करीत पंढरीच्या यात्रा करण्यांत झाला. ह्या कालखंडांत समाज सुखी होता, असें म्हणतां येत नाहीं. पारतंत्र्य हें आम्हांला बिलगून राहिलें होतें. पारतंत्र्यांतून निर्माण होणाऱ्या दुःखांचा विसर पडावा म्हणून ऐहिक जीवन ईश्वरभक्तींत समर्पण केलें होतें कीं काय अशी शंका येते.

* * *

कोठलाहि समाज सतत एकाच स्थितींत राहूं शकत नाहीं. त्यामुळेंच त्याची पूर्णावस्था झाली असें कधींहि म्हणतां येत नाहीं. डोंगरांमागून डोंगर दिसावे, त्याप्रमाणें एका अवस्थेंतून दुसऱ्या अवस्थेंत समाज जात असतो. कधीं आध्यात्मिक तर कधीं भौतिक, पण बहुतेक भौतिक जीवनाकडेच समाजाचा कल असतो. अंतर्मुखदृष्टि करण्याऐवजीं बहिर्मुखदृष्टि करणेंच जनतेला आवडते. श्रेयसाऐवजीं प्रेयसाकडे वळणें हेंच पुरुषार्थाचें लक्षण मानलें जातें. पण सांघिक जीवनाचे प्रश्न हे संपूर्णतः कोणत्याहि परिस्थितींत सोडविण्यांत आले नाहींत अगर सुटूं शकले नाहींत, हेंहि तितकेंच खरें. जो समाजाच्या खोल अंतर्विभागांत प्रवेश करून त्या प्रश्नाचा धागादोरा उलगडण्याचा प्रयत्न करतो त्याला 'तत्त्ववेत्ता' असें म्हणतात. त्याचे विचार हे त्या काळालाच फक्त लागू नसतात; ते सर्व काळाला लागू पडतात. समाजांतील दुःखें, समाजांतील

आकांक्षा व समाजांतील निरनिराळे वाद यांच्या मुळाशीं जाऊन जो त्याचें निराकरण करतो तो तत्त्वज्ञ होय. बहुतेक जनतेचे पुढारी हे वरवर त्या त्या प्रश्नापुरते व त्या त्या काळापुरते विचार करणारे असतात. हे पुढारी जनतेच्या कलाप्रमाणें वागणारे, पण शूर व असामान्य बुद्धिवान असे समजले जातात.

पाश्चात्त्य समाज हा पौर्वात्य समाजापेक्षां फारसा वेगळा होता असें समजण्याचें कारण नाहीं. त्यांच्यांतहि आध्यात्मिक प्रवृत्तीच्या अलौकिक व्यक्ति निर्माण झाल्या व त्यांनींहि जीवनाचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले. प्लेटो, सॉक्रेटिस, व येशू ख्रिस्त या काय युगकर्त्या व्यक्ति नव्हत्या? त्याहि व्यक्तींचे धिंडवडे तेथें कमी निघाले नाहींत. याचें कारण एकच आहे. ज्या वेळीं समाजांतील प्रश्न सोडविण्यास विशिष्ट तत्त्वज्ञान अपुरें आहे असें वाटतें तेव्हां समाजांत निराळ्या विचारांचे वारे वाहूं लागतात. फ्रान्सच्या राज्यक्रांतीपूर्वीं होऊन गेलेले राजे हे येशू ख्रिस्ताला कोळून प्यालेले होते. अशा राजांच्या वृत्तींत बदल करावयास येशूचें अहिंसात्मक तत्त्वज्ञान उपयोगीं पडणार नाहीं असा निर्णय त्या काळच्या क्रांतिकारकांनीं घेतला आणि त्यांना ठाऊक असलेल्या शस्त्रपूजेला त्यांनीं आरंभ केला. अन्यायाचा प्रतिकार हा फक्त हिंसात्मक प्रतिकारानेंच होऊं शकतो, एवढेंच त्यांना ठाऊक होतें. यांशिवाय दुसरा परिणामकारक मार्ग जगाला ठाऊक नव्हता. हिंसात्मक प्रतिकारानें पुनः हिंसात्मक प्रवृत्ति वाढते आणि आपण समाजाची उन्नति करूं शकत नाहीं, हे विचार कोणाला सुचले नाहींत, पटले नाहींत अगर सुचले असले तरी त्यांचा उपयोग झाला नाहीं. त्यामुळें नेपोलियन हा अत्यंत थोर पुरुष होऊन गेला असें मानलें जातें. वास्तविकपणें नेपोलियनच्या वृत्तीचे पुरुष सर्व काळांत व सर्व देशांत होऊन गेले आहेत. अशा या पराक्रमी पुरुषांना जन्म देण्याचें, आणि समाजाला चेतवण्याचें काम भावनाप्रधान लेखक करीत असतात. त्यांच्या जलाल लेखांनीं व काव्यानें जनता भारली जाई, आणि जें काम तरवार करूं शकली नसती तें काम यांच्या लेखण्या करीत. अशा लेखकांवर समाज बेहद्द खूष असे. त्यामुळें तेथील जनता नुसती आपल्या देशांतील अन्याय दूर करून न थांबतां दुसऱ्या

देशावर अन्याय लादूं लागे. इंग्लंड–फ्रान्सच्या साम्राज्यवाढीचा इतिहास हा याच प्रवृत्तीचा परिणाम आहे. समाजाला सुख हवें असेल, तो परिपूर्ण व्हायचा असेल तर त्यानें पराक्रम केला पाहिजे, दुसरे देश जिंकले पाहिजेत आणि आपल्या सर्व शत्रूंचा निःपात केला पाहिजे असें म्हणणारा हा एक लेखकांचा वर्ग झाला.

पण स्वातंत्र्यांत किंवा साम्राज्यांत वैयक्तिक दुःखें नष्ट होतात असें नाहीं. हिऱ्यामाणकांच्या राशींनीं कोठारें भरलीं आणि शत्रूंच्या मुंडक्यांचे पर्वत उभारले तरी त्यांत सुख नाहीं म्हणून रडणारे राजे झाले नाहींत अगर होत नाहींत असें नाहीं. त्यांना समाधान हवें असतें. तें समाधान त्यांना संपत्तींत सांपडत नाहीं. जीवन हें नुसत्या वस्तूंच्या लाभानें सुखी होत नाहीं. त्याकरतां नीतिमत्तेचें अधिष्ठान लागतें. जीवनाचा हेतु उपभोग नसून सेवा, त्याग व परोपकार आहे असें सांगणारे साहित्यिक पुढें सरसावूं लागतात. ते मानवी मनाचें सूक्ष्म अध्ययन करून त्याच्या मनोधर्मांचे व्यापार निवेदन करतात आणि नीतीच्या गोष्टी सांगूं लागतात. समाजांत त्यांना वाटणारीं चिरंतन तत्त्वें ते सांगतात व घसरणाऱ्या समाजाला सावरून धरण्याचा प्रयत्न करतात. पण याहीपेक्षां तिसरा एक लेखकवर्ग असतो. तो समाजांतील दुःखांच्या मुळाशीं जाऊन त्या दुःखांचा परिहार कसा करतां येईल याचा विचार करतो.

कोणत्याहि काळांतला व कोणत्याहि देशांतला समाज घेतला तर तेथील जनता वैषम्य व नैर्घृण्यानें गांजलेली असते. माणसामाणसांत कितीतरी विषमता आपण पहातों. श्रीमंताच्या घरीं जन्माला आलेला माणूस आपलें जीवन सुखांत घालवितो आणि गरिबाच्या झोंपडींतील माणसाचें जीवन कष्टप्रद असतें. दोन सख्खे भाऊ असतात; पण त्यांतला एक बुद्धिमान व दुसरा ठोंब्या असतो. सारखेंच शिक्षण घेतलेले दोन पदवीधर घेतले तर त्यांतील एक चांगला धनवान व कीर्तिवान होतो व दुसऱ्याचें नांवहि निकालपत्रांत एकदां आल्यानंतर पुनः कोठें छापलें जात नाहीं. सारखेंच राबणारे शेजारशेजारचे दोन शेतकरी

असतात. पण एकाचें शेत उत्तम पिकतें आणि दुसऱ्याचें करपून जातें. असे कितीतरी वैषम्याचे प्रकार आपल्याला दिसतात.

निर्घृणतेचें तसेंच आहे. एकुलता एक मुलगा एकाद्या विधवेला असावा व तो गतप्राण व्हावा; खिडकींत आपण उभे असावें आणि बंदुकीची गोळी चटकन् डोक्यांत शिरावी; इन्फ्ल्युएंझाची साथ यावी व लाखो लोक प्राणास मुकावे; धरणीकंप व्हावा व शहरेंच्या शहरें नष्ट व्हावींत अगर एकाद्या हिटलरनें आपल्या देशाच्या गौरवाकरतां अमानुष युद्धें आरंभावीं; असले प्रकार पाहून मनुष्य गांगरतो, क्वचित् तो वेडा होतो. हें असें कां व्हावें, याचा ग्रंथ त्याला लागत नाहीं. सांप्रतच्या युद्धांत काय किंवा कोठल्याहि युद्धांत काय, कितीतरी निरपराधी जीवांची हत्त्या होत असेल!!

हे प्रकार पहाणारा जर कवि असला तर तो भावनात्मक काव्यें रचून आपली प्रतिभा फुलवील आणि जर शेक्सपीयरसारखा लेखक असला तर तो दुःखावर नैतिक विचारांची पांखर घालून दुःखाची तीव्रता कमी करील. पण तत्त्वज्ञाचें तसें नाहीं. तो सांगेल कीं, जग हें मिथ्या आहे. तेव्हां अर्थात् जगांतील सुखदुःखें हीं मिथ्याच मानलीं पाहिजेत. आपल्या कर्माप्रमाणें हीं सुखदुःखें आपण भोगतों. दुःखानें दुःखी न होणें अगर सुखानें सुखी न होणें अशी चित्ताची साम्यावस्था झाली पाहिजे म्हणजे आपण या द्वंद्वाच्या पलीकडे जाऊं असें तत्त्वज्ञ सांगतील. जगांत दिसणारी विषमता ही पूर्वजन्माच्या पापपुण्यानुरूप प्राप्त होत असते, असेंहि ते म्हणतील आणि विषमतेप्रमाणें निर्घृणतेचेहि. तत्त्वज्ञ हा ईश्वराला अन्यायी व क्रूर म्हणणार नाहीं.

पण वैषम्य आणि नैर्घृण्य एवढेच दोन प्रश्न तत्त्ववेत्त्यांना सोडवावयाचे नसतात. हें जग कोणीं निर्माण केलें, परमेश्वर साकार आहे का निराकार आहे, किंबहुना असा कोणी गुणविशिष्ट ईश्वर आहे किंवा नाहीं, आत्मा म्हणजे काय, पुनर्जन्म आहे किंवा नाहीं; मोक्षब्रह्म म्हणजे काय वगैरे अनेक प्रश्नांचा विचार तत्त्ववेत्ते करीत असतात. ते आपापल्या कल्पनांप्रमाणें त्यांचीं उत्तरेंहि देतात. आपल्याला हा

विश्वाचा जो प्रचंड पसारा दिसतो तो सारा आभासमय आहे असें तत्त्वज्ञ सांगतात. आपल्यांतील कांहींजण तें खरेंहि मानतात आणि हा शोध लावणाऱ्या वेदांत्याबद्दल कृतज्ञता, आदर, भक्ति इत्यादि व्यक्त करतात.

आतां या तत्त्वज्ञांवर विश्वास ठेवावा का ठेवूं नये आणि ठेवावयाचा असला तर तो किती प्रमाणांत ठेवावा हा ज्याच्या त्याच्या प्रकृतीचा प्रश्न आहे. वास्तववादी म्हणेल जग हें सत्य आहे, सुखदुःखें पूर्वकर्मांचीं फळें नसून भांडवलशाही राज्यव्यवस्थेचा परिणाम आहे. तो श्रद्धा अगर विश्वासावर कोणतीहि गोष्ट सोपवावयास तयार नाहीं. डोळ्यांला दिसतें तें सत्य बाकीचें असत्य. ईश्वर, पुनर्जन्म वगैरे अनुमेय गोष्टी तो मान्य करीत नाहीं, याचा अर्थ तोहि दुसऱ्या अर्थानें तत्त्वज्ञच आहे.

अशाप्रकारें जगांतील कोडीं उलगडणारें व त्याचा ग्रंथ लावणारे कोणीतरी लागतच असतात. मनुष्याचें समाधान अशा तत्त्वज्ञांवांचून होतहि नाहीं. त्याला देव, परलोक, पुनर्जन्म वगैरेंची कल्पना आणून दिली म्हणजे बरें वाटतें व त्या विश्वासावर तो जगांतील दुःखांना टक्करहि देतो. वास्तववादांत असें समाधान होत नाहीं. त्यामुळें मानवसमाज हा नास्तिक बनण्याऐवजीं आस्तिकतेकडेच जास्त वळलेला असतो. नास्तिकाला समाधान मानण्यास जागा नसते. आस्तिकाचें तसें नाहीं. तो देवाला आळवतो, आपल्यावरील संकट टाळ असें म्हणून त्याची आराधना करतो आणि सर्व काळ जरी नाहीं तरी कांहीं काळ त्याच्यांत सद्भावनांचा संचार होतो.

तत्त्वज्ञांच्या लिखाणामुळें जाणत्या व्यक्तींना जगांतील आद्यतत्त्वांचा बोध होतो व कांहीं अध्यात्माकडे वळतात तर कांहीं नीतिमत्तेनें वागून जगांत उपकारी निदान निरुपद्रवी तरी होतात. प्रत्येक काळांत व प्रत्येक देशांत असे तत्त्वज्ञ असतात. त्यांचें आचरण व त्यांची शिकवण हींच काय ती जगाला मार्गदर्शक होत असते. बाकीच्या लेखकांचें नांवहि इतिहासांत उरत नाहीं. वास्तविक नांवाचें महत्त्व फारसें नसतें. उपनिषदें निर्माण करणाऱ्या ऋषींचीं नांवें शिवाजी, नेपोलिअनसारखीं ज्ञात नाहींत. तथापि त्यामुळें त्यांचें महत्त्व कमी आहे असें नाहीं.

* * *

भौतिक शास्त्रांतहि ज्यांना तत्त्वज्ञान म्हणतां येईल असें क्रांतिकारक संशोधक होऊन गेले व होत आहेत. ज्यांनीं वाफेचा, विजेचा, विमानांचा, रणगाड्यांचा, आणि हजारो यंत्रांचा शोध लावला त्या काय कमी बुद्धिवान् व्यक्ति होत्या ? त्यांच्या शोधामुळें मानवी जीवनांत क्रांति झाली. अपार वाटणारें जग आटोक्यांत आलें. या शोधांनीं जीवनाचा प्रत्येक भाग व्यापून टाकला. पूर्वीचें जीवन व आजचें जीवन यांत कोठें तरी साम्य सांपडेल का ? आजच्या जीवनांत व्यक्तींचें व्यक्तित्व हें नाममात्र राहिलें आहे, तसेंच राष्ट्रांचें. जगांत कितीतरी राष्ट्रांचीं नांवें आपण ऐकतों व तीं स्वतंत्र आहेत असें म्हणतों. माणसांप्रमाणें त्या राष्ट्रांनाहि आपण स्वतंत्र आहों असें वाटत असते. पण आज जर्मनीनें व त्यापूर्वी ब्रिटिशांनीं हा भ्रम आहे असें सिद्ध केलें. बेल्जम स्वतंत्र खरा पण त्याचें स्वातंत्र्य हें नेहमींच पारतंत्र्याच्या भीतीनें ग्रस्त रहाणार. बेल्जमप्रमाणेंच डेन्मार्क, रुमानिया, बल्गेरिया, हंगेरी, पोलंड, फिनलंड, वगैरे छोटीं राष्ट्रेंच काय पण फ्रान्स, इटली, इंग्लंड, रशिया यांसारखीं राष्ट्रेंहि आपलें स्वातंत्र्य एकाकी टिकवूं शकत नाहींत. भौतिकशास्त्राच्या शोधांनीं जगाला एकदांच सांगून टाकलें आहे कीं, जग हें एक यंत्र आहे आणि यंत्रामध्यें ज्याप्रमाणें निरनिराळे भाग हें व्यवस्थित बसविलेलें असतात, त्याप्रमाणें या जागतिक यंत्रामध्यें प्रत्येक राष्ट्र व प्रत्येक व्यक्ति हीं ठाकठीक बसलीं पाहिजेत, तीं विस्कळितपणें, स्वतंत्रपणें बसतां कामा नये. सांप्रतच्या युद्धांत या प्रश्नाचा बराचसा निकाल लागेल आणि तो आतां लागला नाहीं, तर पुढच्या युद्धांत खास लागेल. भौतिकशास्त्राच्या संशोधनामुळें दुसरी एक गोष्ट झाली. मनुष्य हा माणुसकीला विसरला. जीवनाच्या कलहामुळें सर्व सात्त्विक भावनांवर एक प्रकारचें पटल येतें, त्यामुळेंच बोलपट गृहांत प्रेक्षकांची व हळुवार भावना जागृत करणाऱ्या कादंबऱ्यांचीं दुकानें फुललेलीं दिसतात. भौतिकशास्त्राची जसजशी वाढ होत जाते तसतसा जीवनकलह तीव्र होत जातो आणि या जीवनकलहांत तग धरण्याकरतां क्वचित् प्रसंगीं माणुसकीला पायाखालीं तुडवून वर डोकें ठेवावें लागतें. हीं माणुसकी तुडवली जाऊं लागली म्हणजे कारणांचा शोध सुरू होतो. भौतिक सुधारणाकालांत अशी स्थिति येणें

अपरिहार्य आहे असें पटलें तरी कोणीहि या शास्त्राच्या विरुद्ध जात नाहीं. जो तो असें म्हणूं लागतो कीं, जीवनकलह कमी बिकट अगर अधिक सुसह्य करण्याकरतां भांडवलशाही नष्ट केली पाहिजे, पर्वतप्राय तयार मालाच्या राशींची समान विभागणी केली पाहिजे, कामाचें तास कमी केले पाहिजेत, कामगारांचें जीवन हें सुखी व्हावें म्हणून मुख्य मुख्य धंदे राष्ट्राच्या मालकीचे केले पाहिजेत. इतकें केलें म्हणजे कामगारांचा स्वर्ग अवतरेल असें त्यांना वाटते. रशियांत कामगारांचा स्वर्ग आहे असें समाजवादी म्हणतात आणि चला तिकडे जाऊं या असा इतरांना आग्रह करतात. त्यांना असेंहि वाटतें कीं, आज ना उद्यां साऱ्या जगांतील कामगार आपापल्या भांडवलशाही सरकारविरुद्ध बंडें पुकारून आर्थिक समतेच्या शैलतलावर आरूढ होतील.

भौतिकशास्त्रें हीं आहेत तशीच अगर अधिक प्रगतिमान झालीं म्हणजे आजच्यापेक्षांहि कठीण परिस्थिति निर्माण होईल यांत वाद नाहीं. त्यावेळीं किंवा आज चाललेल्या धडपडींतून समाजाची घडी नीटनेटकी बसविण्याचा प्रयत्न होईल व तो थोडाफार यशस्वीहि होईल, हें निर्विवाद आहे. पण ही यशस्विता त्या त्या राष्ट्रांतील कामगार बंडें करून समाजसत्ता स्थापतील, या खात्रीवर आधारलेली असेल तर ती सिद्धीस जाणें कठीण दिसतें. उद्यां समजा, हिटलर यशस्वी झाला तर जर्मनींतला कामगारवर्ग हिटलरविरुद्ध बंडाची उभारणी करील, ही कल्पना भ्रामक वाटते. उलट, विजयी झालेला हिटलरच आपल्या सिद्धांताचा फैलाव जिंकलेल्या देशांत करील. जो शस्त्रांत विजयी होतो तो अर्थशास्त्रांत पराभूत होईल असें वाटत नाहीं. तेव्हां समाजसत्तावाद्यांनीं बेभरवंशाच्या स्थानिक कामगार बंडावर अवलंबून न रहातां जर्मनीप्रमाणें शस्त्राच्या सहाय्यानें कामगार राज्याविरुद्ध असणाऱ्या सरकारला नामोहरम केलें पाहिजे, तरच समाजवादाचा रस्ता साफ होईल.

अशा प्रकारें जगांतील प्रवृत्तींचा थोडक्यांत इतिहास आहे. परिपूर्णावस्थेला जाण्याकडेच सर्व समाज धडपडत असतो. कारण त्याला विद्यमान स्थिति असंतोषकारक वाटत असते. या साऱ्या विचारांच्या खळबळाटांत अहिंसेचें स्थान कोणतें, हेंच आपल्याला पहावयाचें आहे.

हिंदुस्थान व जग. : : २

> The peculiar classification of the Hindu Society in the four main Varnas made violence and war the hereditary calling of only a small class of Hindus.
>
> [Practical Non-violence
> by
> **K. G. Mashruwala.**]

भौतिकशास्त्रांची जोरानें प्रगति होत चालली म्हणजे भांडवल, परदेश व लष्कर यांना अभूतपूर्व महत्त्व प्राप्त होतें. हिंदुस्थान हा भौतिकशास्त्राच्या वाढीला बळी पडलेला देश आहे. हिंदुस्थानचा इतिहास नव्यानें सांगावा अशी परिस्थिति नाहीं. पण प्रत्येक राष्ट्राचे कांहीं विशेष गुणधर्म असतात. पिढ्यान्‌पिढ्यांचे संस्कार हे बाह्य वेष बदलले, अगर संवयी बदलल्या किंवा जीवनांत फेरफार झाले तरी नष्ट होत नाहींत. इंग्रज माणसांतली व्यापारी दृष्टि किंवा जर्मन माणसांतली लष्करीवृत्ति अगर

मुसलमानांतील जीवनाविषयींची बेपर्वाई ही सुधारणांचे पुरावर पूर वाहिले तरी नष्ट होणार नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांचे असेच स्वभावधर्म आहेत. अनेक शतकांच्या प्रचारामुळें हिंदी लोक हे पापभीरू व कर्मवादी असे बनले आहेत. आमच्यांत झालेल्या तत्त्वप्रधान ग्रंथांनीं व धार्मिक संस्कारांनीं आम्हांला चमत्कारिक करून टाकलें. निवृत्तिमार्गाच्या शिकवणुकींचा जर पुरेसा परिणाम आमच्यावर झाला असता तर हा देश वेदांत्यांचा व धार्मिकांचा देश बनला असता. पण तुकाराम–रामदासापर्यंतच काय, पण रामकृष्ण परमहंस आणि विवेकानंदापर्यंत सर्व सत्पुरुषांनीं ऐहिक जीवनाविषयीं अनासक्ति निर्माण करून सुद्धां हा देश सत्त्वप्रधान झाला नाहीं. अगदीं अलीकडचे राजकीय पुढारी बाबू अरविंद घोष आणि लोकमान्य टिळक यांनीं सुद्धां राजकारणाप्रमाणें तत्त्वप्रतिपादनाकरतां आपली बुद्धि झिजवली. म. गांधींबद्दलहि असेंच म्हणतां येईल. पण इतके थोर थोर उपदेशक ह्या देशांत निपजून त्यांच्या उपदेशाला फळें आलीं नाहींत. याच्या उलटहि आमची स्थिति झाली नाहीं. आम्ही पारतंत्र्यामुळें चारित्र्यहीन, स्वाभिमानशून्य असेंहि झालों नाहीं. अजूनपर्यंत आमची बुद्धि शुद्ध आहे व पापपुण्याच्या विचारानें आमचें अंग अजून शहारतें. कोणाच्या पाठींत जाऊन सुरा मारावा अशी दुर्बुद्धि अद्याप आम्हांला होत नाहीं. अरब लोक अतिथि-सत्काराबद्दल प्रसिद्ध आहेत. पण येथील लोकहि त्या बाबतींत अरबालाहि हार जाणार नाहींत. धर्म म्हटला कीं, अजूनहि अंतःकरणांत पवित्र विचार येतात. अर्थात् सुशिक्षित व अशिक्षित यांच्या भावनांत फरक पडेल, पण तो कांहीं प्रमाणाचा.

धर्मांकरतां या देशांत कोट्यवधि रुपये दरसाल खर्च होतात. देवळांची खानेसुमारी केली तर लाखों देवळें या देशांत विखुरलेलीं दिसतील. धोंडा सांपडला अगर दगड सांपडला तरी त्याला शेंदूर फांसून देव मानण्याची आमची वृत्ति आहे. पीर आहे असें कळतांच त्यावर मशीद बांधण्याची वृत्ति मुसलमानांत दिसते. आम्ही दगडच काय, पण पशुपक्षी, जलचर आणि स्थलचर प्राणी यांनाहि देव मानतों. महादेवाच्या पिंडीसमोर असलेल्या नंदीला, त्याच्या डोक्यावर

फणा उभारलेल्या नागाला, विष्णूचें वाहन असलेल्या गरुडाला आणि गणपतीच्या मूषकाला आम्ही देव समजतों. अग्नीची देव म्हणून पूजा कोण करतो ? सूर्य, चंद्र वगैरे सर्वच धर्मांत देवत्व पावले असल्यामुळें आमच्या संग्रहांत त्यांचा अंतर्भाव नसला तरच आश्चर्य ! पण शनि, मंगळ, गुरु वगैरे ग्रहांना देव मानून त्यांची कृपा संपादन करूं इच्छिणारे लोक अन्यत्र किती सांपडतील ? झाडाला देव मानणारे लोक अन्य देशांत किती असतील हें सांगतां येत नाहीं, पण सावित्रीला सौभाग्य दिलें म्हणून वटवृक्ष हा देवत्व पावला आहे. शनि–मारुतीमुळें पिंपळ, उंबरामुळें दत्त, पांडवांनीं शस्त्रें ठेविलीं म्हणून शमी, तुळस वगैरे लहान मोठीं झाडें आमचीं दैवतें बनलीं आहेत. फुलांचेंहि तसेंच आहे. फुलझाडें हीं तुळशीवडांप्रमाणें पूजिलीं जात नाहींत. पण त्यांना पाय लागला कीं, आम्ही त्यांना नमस्कार करतों. या झाडांत किंवा फुलांत औषधी गुणधर्म आहेत म्हणून देवाच्या नांवाखालीं त्यांचा उपयोजकानें गृहांत प्रवेश करविला असेल, पण आज त्यांतील हेतु दूर राहून वरच्या स्वरूपाला आम्ही कवटाळून बसलों.

गंडकींत सांपडणारा शाळिग्राम हा आमच्या पंचायतनांत प्रमुख स्थानीं बसतो. सत्यनारायणाच्या पूजेंत त्यालाच मुख्य स्थान असतें. अन्य नदींत सांपडणाऱ्या दगडांनाहि आम्ही देव मानतों, मग समुद्रांत सांपडणाऱ्या शंखाला किती मान द्यावा ? शंख तर महासागरांत सांपडतो, तो विष्णूच्या हातांतलें आयुध ! तो आमच्या देवांत जाऊन बसला. गंगेचें पाणी आमच्यांतील भाविक पूजीत असतात. शिवराई, अकबर बादशहाच्या वेळचीं व इंग्रजी राज्यांतील नाणीं आमच्या पूजेंत असतात. सुपारी, गडवा, समई, पाट्या, पुस्तकें, कुऱ्हाड, चाकू, तरवार वगैरे कितीतरी पदार्थांना आम्ही पूज्य मानतों. निर्जीव वस्तू पूजेला अपुऱ्या पडतात म्हणून भूतयोनीलाहि आम्हीं सोडलें नाहीं. वेदकाळापासून आधुनिक काळापर्यंत दृष्टि टाकली तर कितीतरी देवदेवतांच्या भक्तिभावनेनें आमचीं मनें भारून गेलेलीं दिसतात. या देवत्वाच्या भावनेला धर्माचें बंधन अटकाव करूं शकत नाहीं. सेंट मेरी ही मरीअम्मा या रूपानें मद्रासेंत आली. पीर व फकीर हे असेच आम्ही पूज्य मानले. बुद्धाला

वैदिकधर्मानें अवतार मानलें. या भावनेंत बरीचशी भीति आहे हें नाकबूल करून चालणार नाहीं. देवांनीं आपलें वाईट करूं नये, म्हणून भयानें आपण सांपडेल त्याला देव मानूं लागलों. भोळसटपणा व अंध-भक्ति हीं हिंदुस्थानांतल्या लोकांच्या अंगांत इतकी मुरली आहेत कीं, तीच आमच्या राजकीय गुलामगिरीला कारणीभूत झाली कीं काय अशी शंका येते.

इतर धर्मांत देवपूजा नसली तरी त्यांच्या मनाची ठेवण हिंदूंपेक्षां भिन्न नाहीं. तेव्हां येथील इतर धर्मांचे लोक हे मनोरचनेंत निराळे आहेत, असें बिलकुल समजण्याचें कारण नाहीं. पण कर्मावर ठेवलेला विश्वास, पापभीरूपणा, अंधश्रद्धा इत्यादि हिंदुस्थानचीं वैशिष्टयें म्हणून सांगण्यास हरकत नाहीं.

भारत, रामायणांत राजकीय म्हणून वर्णन केलेल्या हकिकती या धर्मापासून फारशा दूर नाहींत. रावणाचा वध करणारा राम हा नुसता राजा नसून परमेश्वराचा अवतार म्हणून सांगितला आहे. तसेंच कौरवांचा नायनाट करावयास नुसते पांडव पुरले नाहींत, तर हातांत शस्त्र न घेणारा श्रीकृष्ण ईश्वराच्या रूपानें तेथें अवतीर्ण करावा लागला. अगदीं अलीकडे अलीकडे शिवाजी महाराजांना भवानी आईचें सहाय्य होतें असें बखरींतून लिहिलें आहेच कीं नाहीं? पूर्वीच्या लेखकांनीं राजाला देवत्व देण्याकरितां ही युक्ति योजली कीं काय कोणास ठाऊक? पण आमचा राजकीय पुढारी हा देवाचा अवतारच असावा लागतो, असा एक आभास पूर्वीच्या ऋषीमुनींनीं निर्माण करून ठेवला आहे. तेव्हां दुष्टांचें निर्दालन करणें असो, किंवा पारतंत्र्यांतून सुटणें असो, त्या-करतां ईश्वराचा अवतार व्हावा लागतो; असें भोळीं मनें समजतात.

ईश्वरी अवतार याचा अर्थ सद्‌बुद्धि, सद्भावना, सद्विचार यांचा जनतेंत संचार होणें असा केला तर हरकत नाहीं. पण मुक्याला बोलका करणारा, पंगूला गिरिशिखरावर चढविणारा, मारुतीच्या शेपटीनें लंकेला आग लावणारा, किंवा जयद्रथाला मारण्याकरतां सूर्यमंडळ झांकून टाकण्याचा चमत्कार करणारा देव असला तर जगाच्या उद्धाराकरतां गीतेंतील आश्वासनावरच विसंबून रहावें लागेल व युगायुगाच्या ठाई

कृष्णाचा संभव केव्हां होतो हें आपल्याला पहात बसावें लागेल. या ठिकाणीं गीतेंतील वचनाबद्दल आक्षेप घेऊन फायदा होणार नाहीं. पण दुष्कृतांचा विनाश करण्याकरतां परमेश्वराला अवतार घ्यावा लागतो, हीहि स्थिति मोठी स्पृहणीय नाहीं. त्याचा परिणाम जनतेवर झाला नसेल असें मानण्याचें कारण नाहीं.

हिंदुस्थानची धार्मिक वा आध्यात्मिक परंपरा ही इतर देशांपेक्षां म. गांधींच्या तत्त्वज्ञानाला अधिक लायक होती यांत वाद नाहीं. यूरोप खंडांत ख्रिश्चन धर्माचे संस्थापक येशू ख्रिस्त यांनीं तेथील जनतेला अप्रतिकाराचा व प्रेमाचा दिव्य संदेश दिला असला, तरी आजचे ख्रिश्चन धर्मीय " कोंबडा आरवण्यापूर्वी हा आमचा नाहीं असा तीनदां पुकारा करतील. " इतर कोणत्या देशांत गांधीवाद रुजला असतां ? अमेरिकेंत? तेथें प्रत्येक माणूस पैशाच्या इतका मागें लागला आहे कीं, त्या शर्यतींत त्याला दुसरा विचारच सुचणार नाहीं. रशियांत ? कार्ल मार्क्सच्या शिकवणुकीनें रशियाला इतका तर्ककठोर बनविला आहे कीं, तो कोठल्याहि श्रद्धेवर अधिष्ठित झालेल्या विचाराला थारा देणार नाहीं. मग काय गांधीवाद चीन–जपानमध्यें रुजला असता ? जपानची परंपरा व इतिहास फार प्राचीन. बुद्ध धर्महि त्यांना अपरिचित नाहीं. उलट हिंदुस्थाननें बुद्धधर्माला चीन जपानकडे हांकून दिल्यामुळें तेथेंच गांधींच्या अहिंसा धर्माचें बीजारोपण होऊं शकलें असतें. पण यूरोपनें जसा येशू ख्रिस्त कोळून प्याला, तसा जपाननें गौतम बुद्ध खाऊन टाकला. उरला चीन. तो अद्याप शस्त्रविहीन झाला नसल्यामुळें अहिंसेचे प्रयोग करण्यास मोकळा नाहीं. अशाप्रकारें इतर देशांची स्थिति आहे. हिंदुस्थानांत चीन, जपान, इंग्लंड, अमेरिका, रशिया वगैरे देशांत वर्णन केलेली मनोवृत्ति थोडीफारहि नाहीं, असें समजण्याचें कारण नाहीं. अगर वर निर्दिष्ट केलेल्या देशांत हिंदुस्थानची मनोवृत्ति बिलकुल नाहीं, असेंहि समजण्याचें कारण नाहीं. पण हिंदुस्थानांतील लोकांची मनोवृत्ति ही अहिंसा वृत्तीच्या प्रयोगाला बरीचशी अनुकूल आहे असें वाटतें. निदान गांधींना तरी तसें वाटलें असावें. सात्विक वृत्ति ही थोतांड न मानणारे पण तामसी वृत्तीबद्दल आदर न बाळगणारे असे हिंदी लोक आहेत.

आमची वर्णव्यवस्था हीहि अहिंसेला पोषक अशीच होती. फक्त क्षत्रियांनीं युद्धें करावीं अशी आमची समाजरचना आहे. या रचनेमुळें ब्राह्मण, वैश्य व शूद्र हे हिंसाकर्मापासून अलिप्तच होते. ' कलौ आद्यंतयोः स्थितीः ' ह्या वचनावरून तर क्षत्रिय वर्गाचें अस्तित्वहि कलियुगांत नाहीं असें म्हणावें लागतें. पण तें खोटें आहे. क्षत्रीय वर्गानें केलेलें पराक्रम कोण विसरूं शकेल ? विशेषतः रजपुतांनीं आत्मसमर्पण करून क्षात्रवृत्तीचा जो कळस केला तो तर कधींच विसरणें शक्य नाहीं. पण इतकें असलें तरी सर्वसाधारण प्रवृत्ति क्षात्रवृत्तीची नव्हती, हें खरें आहे. इंग्रजांनीं तर सर्वच देश निःशस्त्र करून टाकला व ' कलौ आद्यंतयौः स्थितीः ' हें सिद्ध केलें.

* * *

हिंदुस्थान हा मनोरचनेनें अहिंसेच्या प्रयोगाला अनुकूल देश आहे, तसा राजकीय परिस्थितीनेंहि तो अनुकूल देश केला गेला आहे. इंग्रजांच्या राजवटींत हिंदुस्थानजवळ आपल्या आत्म्याशिवाय काय शिल्लक होतें ? १८५७ च्या बंडाचा परिणाम काय झाला ? स्वतःचे प्राण बचाविण्याचें साधनहि त्यांच्यापासून हिरावून घेतलें गेलें. पैसा ? तो तर क्लाईव्ह-हेस्टिंग्सनीं पूर्वींच नेला होता आाणि त्या वेळपासून त्याचा प्रवाह अविरतपणें इंग्लंडकडे सुरूंच होता. आणि उद्योगधंदे ? इंग्लंडमधील लँकेशायर व मँचेस्टरमध्यें ज्या गिरण्या उभारल्या त्या कोणाच्या पैशानें उभारल्या ? त्या गिरण्यांत हिंदुस्थानकरतां कापड निघूं लागलें, त्यामुळें तोहि प्रश्न मिटला. तेव्हां निर्धन हिंदुस्थाननें आपल्या शेतांत पिकेल तें खावें, जवळ असलेल्या पैशानें विलायती माल खरेदी करावा आणि हातांत शस्त्र नसल्यामुळें राज्यकर्त्यांना प्रतिकार न करतां त्यांच्या हुकमतीखालीं कालक्रमणा करावी, असा हिंदुस्थान देश आहे.

एकीकडे साऱ्या जगांत अत्यंत प्रबळ, शस्त्रास्त्रांमध्यें बरेच पुढारलेले, बुद्धिमत्ता, शास्त्रीय संशोधन व मुत्सद्दीगिरी, संपत्ति, राज्यविस्तार, संघटित जीवन, वगैरेंत अग्रेसर असलेले आणि दुसरीकडे आत्मरक्षण करण्यास असमर्थ, निर्धन, सामान्य बुद्धीचे, संशोधनांत मागासलेले आणि आपसांतील कलहामुळें जर्जर झालेले, असा हा झगडा होता. आमच्याजवळ

इंग्रजांशीं भांडण्याकरतां काय होतें ? नुसती वाणी होती आणि लेखणी होती. पण ती वाणी व ती लेखणी सर्व समाजाजवळ होती काय ? फक्त पुढारलेले लोक तेवढें तिखट लिहीत व कडक बोलत. बाकीचा सारा समाज घाबरलेला, भ्यालेला आणि त्यामुळेंच चारित्र्यहीन होतो कीं काय अशा बेतांत होता.

इंग्रजांचें राज्य अत्यंत जुलमी आहे या गोष्टीची जाणीव व्हावयासच बरींच वर्षें लागलीं. त्या जाणिवेचा उच्चार करण्यास अशींच आणखीं कांहीं वर्षें लागलीं. पण उच्चारानंतर आचार करावयास आमचे जवळ कोणतें साधन होतें ? रशियाच्या व आयर्लंडच्या मार्गानें कांहीं दहशतवादी गेले व त्यांनीं कांहीं गोऱ्यांचे खूनहि केले. पण अशा अत्याचारांमुळें जनतेची प्रतिकारशक्ति वाढण्याऐवजीं जनता गर्भगळितच होत गेली. इंग्रजांचें राज्य नष्ट करणें म्हणजे शें दोनशें अधिकाऱ्यांचे खून करणें नव्हें. सारी जनता ज्या वेळीं निर्भयपणें असें म्हणूं लागेल कीं हें राज्य घालविण्याकरतां आम्ही वाटेल ते कष्ट सोसूं, त्याच वेळीं कांहीं बदल होण्याचा संभव.

पण जनता कोठें होती ? सुशिक्षितवर्ग त्या वेळीं सुद्धां दिखावू देशभक्ति करीत होता. अर्थात् अशी देशभक्ति करणारेहि तेव्हां इतर वर्गांत नव्हते हें कबूल करावें लागेल. या देशभक्तांपैकीं बऱ्याच जणांची दृष्टि सरकारी नोकरी, अगर नोकरींतील बढती, किंवा सार्वजनिक मानमान्यता, यांवर असे. बाकीचा सारा समाज झोपलेला असे. अशा तुटपुंज्या देशसेवेनें पारतंत्र्याचा हिमालय कसा हादरावा ?

हिंदी लोक इंग्रजी विद्येचें ' वाघिणीचें दूध ' पिऊन कमी तरतरीत झाले नव्हते. त्यांची बुद्धिमत्ता, त्यांची वक्तृत्वशक्ति, त्यांची सरकारांतलि मानमान्यता, त्यांची वादविवादपटुता वगैरे कोठल्याहि स्वतंत्र देशांत कौतुकास्पद ठरली असती. पण येथें ? त्यांच्या तेजस्वी बुद्धीला फार तर पांच हजार रुपये महिना मिळाले असते.

कांहीं बंडखोरांनीं मात्र आपली बुद्धि विनावेतन राष्ट्राच्या उद्धाराकरतां खर्च केली. पण नुसती बुद्धि ही पारतंत्र्य घालविण्यास उपयोगी पडत नाहीं असें त्यांना कळून आलें.

बुद्धीच्या जोडीला संघटना लागते. ती संघटना प्रभावी नव्हती. वर्षाला एकदां यात्रेकरू जमतात तसें जमावें व पुढच्या वर्षापर्यंत घोरत पडावें अशी संघटनेची रडकथा होती. निर्भयता तरी आमच्यांत होती का ? रँडसाहेबाच्या किंवा जॅकसनसाहेबाच्या खुनानंतर पुण्यांतील भेदरलेल्या कुटुंबांचें वर्णन एखादा कादंबरीकार करील, तर तें चित्र फार बहारीचें होईल. या अत्याचाराचें कशाला ! टिळकांना शिक्षा झाल्यावर शाळा-कॉलेजचे अधिकारीच काय, पण इतर पांढरपेशी कुटुंबेंहि भिंतीला कान असतात असा वेदान्त सांगूं लागलीं. तोंडानें मवाळांना शिव्या देणारे सुशिक्षित स्वतः जर वाघाचे बच्चे असते तर एकटेच टिळक किंवा एकटेच परांजपे राजद्रोही म्हणून अटकेंत पडते ना. पण तेव्हां राजद्रोह करणें हें खून करण्याइतकें भयंकर मानलें जात असे. लोकांत जर निर्भयता, शूरत्व असतें तर त्यांनीं राजद्रोहाचें बीज जनतेंत फैलावण्यास कमी केलें नसतें. त्यांनीं मुनसफीची, मामलेदारीची, रेव्हेन्यू खात्यांतील कारकुनाच्या जागेची किंवा हेडमास्तर अगर शाळा-मास्तरच्या जागेची कदर फारशी केली नसती. चार स्नेही एकत्र जमले म्हणजे मवाळांना व इंग्रजांना शिव्या देण्याची मैफल झडे आणि अमुक अमुक झालें म्हणजे आपण स्वतंत्र होऊं असा सल्ला देण्याची वारेमाप पिकें येत. असल्या करंट्या वृत्तींतून स्वातंत्र्य कसें निपजावयाचें ? टिळकांनीं राजद्रोही लेख लिहावेत व राजद्रोही भाषणें करावींत आणि असे लेख लिहिण्यांत व भाषणें करण्यांत आपला हेतु सरकाराविरुद्ध लोकांचीं मनें कलुषित करण्याचा नाहीं असें समर्थन करावें, हें चमत्कारिक वाटतें. पण टिळकांनीं तरी काय करावें ? त्यांना आपल्या भोंवतालचा समाज ठाऊक होता. त्यांच्यासारख्या बुद्धिवंताला आपण राजद्रोह करीत आहों, आपण हिंदुस्थानच्या असंतोषाचे जनक आहों, हें काय ठाऊक नसेल ? हें ठाऊक असूनहि त्यांनीं आपलें निर्दोषित्व सिद्ध करण्याचा अनेक वेळां प्रयत्न केला. या प्रयत्नांतील फक्त एकच प्रयत्न व तो होमरूल चळवळीसंबंधींचा यशस्वी झाला; बाकीचे सर्व प्रयत्न फसले. होमरूल चळवळ ही कायदेशीर का बेकायदेशीर या प्रश्नाचा निकाल लागण्यापूर्वी सभा होत; हजारों लोक सभेला जमत. होमरूल लीगचे सभासद

व्हावयास कोण तयार आहे, असें टिळकांनीं विचारलें म्हणजे त्या विराट समुदायांतून फारसे हात वर होत नसत. पण हीच चळवळ सरकारनें कायदेशीर आहे असें ठरवितांच होमरूल चळवळ जोरानें फोफावली. कायदेशीर गोष्टी करावयासहि शूरत्व लागतें पण तें शूरत्व जिवंत नव्हें; पण मेलेल्या सापाला मारण्याइतपतच लागतें. जी स्थिति महाराष्ट्रांत होती तीच थोड्या फार फरकानें साऱ्या हिंदुस्थानांत होती.

हिंदुस्थानांत अशा प्रकारें काय नव्हतें व काय होतें, हें आपण पाहिलें. आमच्या मनांत स्वातंत्र्य मिळावें अशी इच्छा होती, पण तें मिळावयाचें साधन नव्हतें. आपसांत असलेल्या भेदांमुळें संघटना होणें कठीण झालें होतें, आणि समाज भयानें ग्रासलेला असल्याकारणानें सरकारविरुद्ध ब्र काढण्याची जनतेची तयारी नसे. याच्या जोडीला बहुजनसमाज अज्ञानी व अशिक्षित असा असल्याकारणानें पारतंत्र्याची पक्कड ही जास्तच घट्ट बसत चालली होती. पण या पारतंत्र्यांत गांधींना आमचा आत्मा शुद्ध दिसला. त्या आत्म्याला प्रतिकाराची प्रबळ शक्ति आहे असें त्यांच्या दृष्टीस पडलें. श्रद्धेच्या सामर्थ्यानें हें आत्मबल आपण प्रभावी व कार्यक्षम करूं असा त्यांचा विश्वास होता.

हिंदुस्थानच्या सर्वांगीण हानींत जर कांहीं शिल्लक उरलें असेल तर तें आत्मबल आहे आणि ज्याचें आत्मबल शिल्लक आहे तो काय करूं शकणार नाहीं ? त्यांचें आत्मबल जर जागें केलें, जर त्यांत चेतना निर्माण केली, तर जगांत अशी कोणती पाशवी शक्ति आहे कीं, जिला आपण नमवूं शकणार नाहीं ? ही आत्मशक्ति इंग्रजांनीं आपल्या सुधारणेच्या मोहिनीनें निजवून ठेवली आणि जे सुरवातीचे दिखाऊ देशभक्त झाले त्यांनीं सावधगिरी, राजकारण, मुत्सद्दीपणा, गनिमी कावा वगैरे उपाधींच्या माऱ्यानें त्या शक्तीला नीट वाढूं दिलें नाहीं. तेव्हां जें सामान्य माणसाला दिसलें नाहीं व जें म. गांधींना दिसलें तें हें आत्मबल आहे. राजकीय परिस्थितीचें भीषण दृश्यहि त्यांच्या नजरेंतून सुटलें नाहीं.

अशा या देशाला आपण जर योग्य नेतृत्व दिलें, जनतेंत आपण जर निर्भयता उत्पन्न केली आणि आत्मबल जागृत केलें तर हें मृतप्राय दिसणारें राष्ट्र खडबडून जागें होईल आणि पारतंत्र्य झुगारून देईल असें गांधींना वाटलें.

———

'I am impatient to realise myself, to attain Moksha in this very existance. My national service is a part of my training for freeing my soul from the bondage of flesh–I am striving for the kingdom of Heaven which is Moksha.'

M. K. Gandhi,
Young India, Vol. I., P. 1417–18.

मानवता की सेवा के द्वारा ही ईश्वरके साक्षात्कार का प्रयत्न मैं कर रहा हूं। क्योंकि मैं जानता हूं कि ईश्वर न तो स्वर्ग में है और न पाताल में। किन्तु हरएक के हृदय में.
—सर्वोदय ४.–१९३८.

पहिल्या भागांत गांधीवाद म्हणजे जीवनशास्त्र आहे असें म्हटलें आहे. तसेंच गांधीवाद जगावें कसें हें शिकवितो असेंहि सांगितलें आहे. याच विधानांचा विस्तार या विभागांत करावयाचा आहे. जीवन हें एक शास्त्र

आहे व जगणें ही एक कला आहे असें म्हणतात. ज्याला नीट रीतीनें जगतां येत नाहीं, तो नीट रीतीनें मरूंहि शकत नाहीं. तसेंच ज्याला ऐहिक कर्तव्यें पार पाडतां येत नाहींत, तो पारलौकिक ध्येयाकरतां कितीहि तळमळत असला तरी त्याचा जगाला उपयोग काय ? जगांत यशस्वी रीतीनें जगावयाचें म्हणजे लांड्यालबाड्या केल्या पाहिजेत, कोणाला पिळलें पाहिजे, कोणाला लुटलें पाहिजे, दुसऱ्याच्या दुःखाबद्दल बेफिकीर राहिलें पाहिजे, स्वतःपलीकडे जग मानता कामा नये, अशी सामान्य समजूत आहे. ही समजूत अजीबात चूक आहे, अशी शिकवण जर कोणी सध्यांच्या काळांत दिली असेल; तर ती गांधीवादानें दिली. जगांत प्रचलित असलेले अशा प्रकारचे सारे समाज, सारे सिद्धांत हे समूळ उखडून टाकण्याकरतांच गांधीवाद निर्माण झाला आहे. तुम्हांला शांति पाहिजे, तुम्हांला सुख पाहिजे, तुम्हांला आनंद पाहिजे, ती शांति, तें सुख व तो आनंद आजच्या समाजरचनेंत तुम्हांला मिळूं शकणार नाहीं असें गांधीवाद सांगतो. खोट्या शांतिसुखाची प्राप्ति हल्लींच्या जगांत सहज होऊं शकते. पण जें विचारी मन असतें तें जर आपल्या सुखाच्या उगमाकडे दृष्टि फेकूं लागेल तर त्याला तेथें काय दिसेल ? किती जणांच्या रक्तावर, अश्रूंवर, कष्टांवर माझ्या सुखाचा डोलारा उभा आहे, हें पाहून त्याचा थरकांप होईल. खोटें सुख ज्यांना हवें असेल त्यांना गांधीवाद एकदम पटणार नाहीं. पण जो सहृदयी, सात्विक प्रवृत्तीचा माणूस आहे त्याला सध्यांची समाजरचना आमूलाग्र बदलली पाहिजे असें वाटल्यावांचून रहाणार नाहीं. गांधीवाद हा जीवनाच्या प्रत्येक प्रश्नाला व्यापून राहिला आहे. तो अमुक एका प्रश्नाचें उत्तर देत नाहीं असें नाहीं. म्हणूनच त्याला जविनशास्त्र असें म्हणतां येईल.

प्राचीन वा आधुनिक कालांत अनेक तत्त्ववेत्ते झाले आहेत. ते खोल विचार करणारे, समाजाच्या कल्याणाची चिंता वहाणारे आणि जगाच्या बऱ्याकरतां तळमळणारे होते. त्यांनीं आपापल्या कल्पनांप्रमाणें जगाची नाडी तपासली, दुखण्याचें निदान केलें आणि औषधाचा पाठहि लिहून दिला. या पाठाप्रमाणें ज्यांनीं औषधें घेतलीं, त्यांना तात्पुरता आरामहि वाटला. पण दुखणें कायमचें बरें होईना. हें दुखणें बाह्योप-

चारांनीं बरें होणार नाहीं. त्या दुखण्याच्या कारणांचा खोल विचार केला पाहिजे व उपाययोजना केली पाहिजे. आपल्या जगण्यांत इतरांचें मरण ओढवतां कामा नये; उलट आपल्या जगण्यानें इतरांचें जीवित प्रफुल्लित, तेजस्वी व आनंदी झालें पाहिजे. यालाच खरें जीवित म्हणतात. स्वतःचें जीवित कसें परिपूर्ण करतां येईल, स्वतःला मोक्ष कसा मिळवितां येईल, हें पहाणारे व आचरणारे अनेक मुमुक्षु व साधुसंत या देशांत होऊन गेले. त्यांनीं जीवनच मुळीं शिक्षा मानली. जगत् ही माया आहे, असा त्यांचा सिद्धांत. तेव्हां अशा जगांत असलेलीं सुखें, तशींच दुःखें हीं कृतकर्मांचीं फळें आहेत व हीं फळें भोगण्याकरतां आपण दुर्दैवानें या कर्मभूमींत जन्मलों आहों असें ते समजत. तेव्हां असल्या कर्मभूमींतून शक्य तितक्या लवकर निवृत्त होऊन अरण्य गांठावें, अशी त्यांची वृत्ति. असल्या संन्याशांची उंची इतरेजनांपेक्षां फार जास्त होती हें खरें, पण त्यांचा संसारी माणसाला प्रत्यक्ष उपयोग झाला नाहीं.

संन्यास न घेतां संसारांत राहून विहित कर्मे करावीं असें प्रतिपादन करणारा कर्मयोग्यांचा दुसरा पंथ येथें फार प्राचीनकाळीं निघाला. पण जगाला त्यांनींहि संन्यासमार्गीयांपेक्षां फारसें निराळें मानलें नाहीं. समाजांत राहून समाजाची सेवा करणें, त्याच्या उद्धाराकरतां आपलें जीवित खर्च करणें व उभयतांच्या जीवनांत उभयतांचा उद्धार करणें ही शिकवण गांधीवादानें दिली.

गांधींनीं जितकी जीवनाची चर्चा केली आहे, तितकी मरणोत्तर स्थितीची चर्चा केली नाहीं. 'मी एक सत्याचा संशोधक आहे; माझी आणि येशू ख्रिस्त, गौतम बुद्ध वगैरे सत्पुरुषांची तुलना करूं नका' असें ते म्हणतात. गांधींना जीवनाचेच इतके प्रश्न सोडवावयाचे आहेत कीं, ते सोडवितांनाच त्यांना पुरेसें होईल. तें परमेश्वर आहे असें धरून चालले. त्यांचा पुनर्जन्मावर, आत्म्याच्या अमरत्वावर विश्वास आहे, तसेंच त्यांना मोक्षहि हवा आहे.

पण मोक्ष कसा मिळतो, आत्मज्ञान कसें होतें, चित्ताची साम्यावस्था कशी करावी; ध्यान, धारणा, सविकल्प, निर्विकल्प, समाधी, योग वगैरे

प्रश्नांबद्दल त्यांच्या लिखाणांत फारसें सांपडणार नाहीं. एखाद्या योग्याच्या सान्निध्यांत जाऊन त्यांनीं ब्रह्मज्ञान प्राप्त करून अगर समजूनहि घेतलें नाहीं.

'अविज्ञातं विजानतां' आणि 'विज्ञानं अविजानतां' हा विरोधी वाटणारा मंत्रहि त्यांच्या ऐकिवांत नसेल. 'भिद्यंते हृदयग्रंथी छिद्यंते सर्वसंशयाः। क्षीयंते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे' ही स्थिति प्राप्त होण्याचा सनातन प्रयत्न त्यांनीं केला नसेल. हें ब्रह्मज्ञान तर्कानें प्राप्त होत नाहीं. दिव्यानें जसा दिवा पेटवावा, त्याप्रमाणें एक ब्रह्मज्ञानी दुसऱ्या मुमुक्षूला काळ वेळ न लावतां आपणांसारखें तत्काळ करतो, ह्याहि स्थितीचा अनुभव घेण्याचा गांधींनीं परंपरासिद्ध प्रयत्न केला नाहीं. तसा प्रयत्न त्यांना करावयाचा असता तर ते अरविंद बाबूंप्रमाणें एकांतांत जाऊन आत्मचिंतन करीत बसले असते. मग ते 'निर्वैरः सर्वभूतेषु' झाले असते. इंग्रजांनीं त्यांची शिफारस नोबल पीस प्राइझ करतां केली असती. हिंदु व मुसलमानांनीं आपल्यामध्यें असा अलौकिक पुरुष निर्माण झाला म्हणून जगभर त्यांची स्तुति गाइली असती.

म. गांधी हे प्रेमळ भक्त आहेत. सकाळ—संध्याकाळीं ते भजन करतात. साधुसंतांचीं पदें मन लावून ऐकतात आणि गीतेंत सांगितलेलीं स्थितप्रज्ञाचीं लक्षणें रोज म्हणतात. पण देवाची पूजा करणें, देवाच्या देवळांत जाऊन दर्शन घेणें, वगैरे करीत नाहींत. नवविधा भक्तींपैकीं एक दोनच भक्तीचे प्रकार आपल्याला त्यांच्या चरित्रांत पहावयास सांपडतात. अर्चन, वंदन, पादसेवन वगैरे प्रकार सांपडत नाहींत. या प्रार्थनेमुळें त्यांच्या चित्ताला शांति मिळते व कामाला हुरूप येतो. जीवनशास्त्रांत शांतीकरतां, श्रद्धा दृढ करण्याकरतां जितकें व ज्या प्रकारचें ईश्वरचिंतन करणें अवश्य आहे तितके ते करतात. नरसी मेहताचा 'वैष्णवजन' हा त्यांचा ध्येयरूपी पुरुष आहे. जो परक्यांचें दुःख जाणतो, दुसऱ्याच्या दुःखांचें निवारण केल्यावर जो मनांत अभिमान आणित नाहीं, बोलण्यांत व वैवाहिक भोगांत ज्याचें मन निश्चल रहातें, जो असत्य बोलत नाहीं, जो परस्त्री मातेसमान मानतो, जो कोणाचीहि निंदा करीत

नाहीं, जो सर्वांना वंदन करतो, ज्यानें दृष्टि सम करून तृष्णेचा त्याग केला आहे, ज्याच्या मनांत दृढ वैराग्य आहे, जो निर्लोभी, कपटरहित आहे, ज्यानें कामक्रोधाचें निवारण केलें आहे असा पुरुष हा गांधींचा आदर्श पुरुष आहे. जगाचा त्याग केलेला संन्यासी किंवा यति किंवा योगी हा त्यांचा आदर्श पुरुष नाहीं.

संन्यासमार्गाच्या किंवा संन्यासमार्गप्रधान कर्ममार्गाच्या किंवा उपासना मार्गाच्या द्वारें मोक्ष मिळविणारे जे अनेक योगी झाले त्यांच्या परंपरेंत गांधी बसत नाहींत. या वेदांतविषयक प्रश्नांची चर्चाच गांधींनीं केली नसल्यामुळें त्यांना यांपैकीं कोणता मार्ग ग्राह्य व कोणता त्याज्य वाटतो याविषयीं आपणांला अनुमान करतां येत नाहीं. तेव्हां गांधी-वादासंबंधीं लिहितांना आपण त्यांतील प्रमेयें हीं वेदांताच्या परिभाषेंत बसवलीं पाहिजेत असें बिलकुल नाहीं. उलट असें करण्याचा प्रयत्न केला गेला तर तो अट्टहासाचा प्रकार होईल.

गांधी म्हणतात " मला मोक्ष हवा आहे, मी त्याच्याकरतां उतावळाहि झालों आहे. हा मोक्ष मिळविण्याकरतां गिरिकंदरींत जाऊन बसण्याची जरुरी नाहीं. माझा मोक्षाचा मार्ग हा राष्ट्राची सेवा करतांना अत्यंत कष्ट करणें आणि त्याच्या द्वारानें मनुष्यमात्राची सेवा करणें असा आहे. प्रत्येक सजीव वस्तूबरोबर मला एकरूप व्हावयाचें आहे. गीतेच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे मला शत्रु व मित्राशीं समानतेनें वागावयाचें आहे. ' गांधी म्हणतात माझ्या बायकोमुलांनीं माझा द्वेष केला तरी ज्याप्रमाणें मी त्यांच्याशीं प्रेमानें वागतों, त्याप्रमाणें कोणत्याहि जातीच्या व धर्माच्या माणसानें माझा द्वेष केला तरी मला त्याच्यावर प्रेम करावयाचें आहे व त्याची सेवा करावयाची आहे. ' देशसेवा हा शाश्वत मुक्ति व शांतीच्या साम्राज्यांत नेणारा माझ्या प्रवासांतील एक टप्पा आहे. धर्मरहित राजकारण हें मला ठाऊकच नाहीं. राजकारण हें (Subserve) धर्माच्या कक्षेखालीं येतें. राजकारणांतून धर्म काढून टाकला म्हणजे तो एक मृत्यूचा सापळा होईल; कारण राजकारण हें आत्म्याचा नाश करणारें आहे. " गांधी हे मुमुक्षु आहेत व त्यांचा

मोक्ष मिळवण्याचा मार्ग देशसेवा, मनुष्यमात्राची सेवा, शत्रुमित्रांत अभेद मानून त्यांच्यावर प्रेम करणें असा आहे. एखादा मीमांसक, अगर सांख्य म्हणेल सेवेच्या किंवा प्रेमाच्या मार्गानें आत्मज्ञान कसें होणार ? या मार्गानें पुण्य-संचय करून फार तर स्वर्गात जातां येईल व गांठचें पुण्य संपलें म्हणजे मृत्युलोकांत परत यावें लागेल. पण गांधींनीं, मागें म्हटल्याप्रमाणें जुन्या तत्त्वज्ञांना विचारून आपल्या मोक्षाचा मार्ग आखलेला नाहीं. तुकाराम किंवा नरसिंमेथाप्रमाणें भूत-मात्रावर प्रेम करावें हें गांधींना मान्य आहे. पण त्या संतांनीं विरक्त होऊन ज्याप्रमाणें ईश्वराच्या भजनांत काळ घालविला तसा मार्ग गांधींना अनुसरावयाचा नाहीं. जगांतील प्रश्नांकडे पाठ फिरविण्याऐवजीं त्या प्रश्नांना तोंड देऊन गांधी मोक्षाची प्राप्ति करून घेऊं इच्छित आहेत. त्या मोक्षाला जुनीं शास्त्रें आड येणार नाहींत. ज्ञानाचा दीप शुद्ध अंतःकरणांत प्रज्वलित होऊन प्रेमाचा उपासक मुक्त कां होणार नाहीं ?

गांधीवादासंबंधींची आध्यात्मिक भूमिका अशी आहे. मोक्ष हें या वादाचें प्राप्तव्य, सेवा हा मोक्ष मिळवण्याचा टप्पा किंवा मार्ग आणि जीवमात्राबद्दलचें प्रेम हें या मोक्षाचें साधन होय. हें प्रेम जितकें जितकें शुद्ध, सात्विक, निर्मळ होत जाईल तितकें तितकें अंतःकरण पवित्र, दिव्य व उज्वल होत जाईल आणि शेवटीं जीवात्मा परमात्म्यांत मिसळून मोक्षप्राप्ति होईल.

सध्यां जें गांधींच्या नेतृत्वाखालीं राजकारण चालूं आहे तें निव्वळ राष्ट्रीय स्वातंत्र्याकरतां नाहीं. भूतदया, सत्य अगर प्रेम यांच्या प्रयोगाकरतां राजकारणाची पार्श्वभूमि गांधीवाद स्वीकारतो. यांत राष्ट्रीय स्वातंत्र्याचा अगर पारतंत्र्याचा प्रश्नहि येत नाहीं. हिंदुस्थानच्या ऐवजीं गांधी हे दुसऱ्या एकाद्या स्वतंत्र देशांत जन्माला आले असते तरी तेथें त्यांनीं प्रेमाचा उज्वल धर्म त्या त्या देशांत आचरण्याचा, प्रेमाच्या द्वारां भूत-मात्राची सेवा करण्याचा आणि त्या मार्गानें जगाच्या दुःखाला कारणीभूत झालेल्या प्रश्नाचा निरास करण्याचा खास प्रयत्न केला असता.

तेव्हां मोक्ष, प्रेम व सेवा हीं गांधीवादाचीं तीन महत्त्वाचीं सूत्रें आहेत. त्यामध्यें साऱ्या जगांत क्रांति करून टाकण्याची शक्ति आहे. गांधीवाद

ह्या हिंदुस्थानपुरता मर्यादित आहे अशी कोणीहि समजूत करून घेऊं नये. भौगोलिक मर्यादा ह्या कोणत्याहि तत्त्वज्ञानाला व तत्त्वाचरणाला लागूं पडत नाहींत. अर्थात् प्रत्येक देशांतील परिस्थिति ही भिन्न भिन्न असल्यामुळें तें तत्त्वज्ञान कोठें यशस्वी होईल, तर कोठें कमी यशस्वी होईल. मोक्ष, प्रेम व सेवा हे तीन शब्द सुटे असले तरी ते स्वतंत्र नाहींत. **प्रेमाच्या धर्मानें मनुष्यमात्राची सेवा करून मोक्ष मिळविणें असें गांधीवादाचें स्थूल स्वरूप सांगतां येईल.** मोक्षप्राप्तीची जी अंतिम अवस्था आहे तिच्याबद्दल कोरडी चर्चा करून उपयोग नाहीं. पण प्रेमाचें व सेवेचें तसें नाहीं. प्रेमाबद्दल आपण विचार करूं शकतों व आचाराहि करूं शकतों. मोक्ष, प्रेम व सेवा ह्या तीन शब्दांचा अर्थ समजला म्हणजे गांधीवाद समजला. यांपैकीं, मोक्ष किंवा आत्मप्रतीति या शब्दाचा गांधीवादांतील अर्थ हा विशेष नसल्यामुळें आपण त्याचा सामान्य अर्थच समजला पाहिजे. पण प्रेमाचें व सेवेचें तसें नाहीं.

* * *

गांधीवादामध्यें या दोन शब्दांना विशेष अर्थ आहे, सर्वव्यापी अर्थ आहे, म्हणून तो अर्थ समजून घेणें जरूर आहे. अनत्याचार, अहिंसा किंवा नॉनव्हायोलन्स हे शब्द आपण फार वेळ ऐकतों. हिंसेच्या किंवा अत्याचाराच्या अभावाला देशी भाषेंत किंवा इंग्रजी भाषेंत शब्द नाहीं. यावरून अहिंसेला किती योग्यता होती हें कळून येतें ! पण अहिंसा या शब्दानें गांधीवादांतील मोक्षसाधनाचा अर्थ व्यक्त होत नाहीं. आपण हिंसेपासून अलिप्त राहिलों म्हणजे मोक्ष आपल्याला मिळेल हें शक्य नाहीं. कर्मापासून दूर राहिल्यानें नैष्कर्म्य येतें; पण त्यामुळें संसिद्धि प्राप्त होत नाहीं. संसिद्धीकरतां कर्माचा अभाव चालत नाहीं, भावरूपी कर्म करावें लागतें. म्हणून अहिंसेनें मोक्ष मिळणार नाहीं; मोक्ष मिळविण्यास अहिंसेचें भावरूप जें प्रेम तें प्रेम आपण केलें पाहिजे. 'जगांतील यच्चयावत् सजीव वस्तूंशीं आपण एकरूप झालें पाहिजे ' असें गांधी म्हणतात. याचाच अर्थ आध्यात्मिक दृष्ट्या जीवात्मा व परमात्मा यांचें ऐक्य होणें आणि लौकिक दृष्ट्या भूतमात्रावर प्रेम करणें असा होतो.

प्रेम हें माणसांना एकत्र बांधणारें साधन आहे. निरनिराळे दगड किंवा विटा सीमेंटनें कशा एकत्र केल्या केल्या जातात ! माणसामाणसांना किंवा माणूस व सजीव सृष्टीला एकत्र बांधण्याचें प्रेमाशिवाय अन्य कोणतें साधन आहे ? या जगांतून जर प्रेम काढून घेतलें तर माणूस कसा होईल ? तो क्रूर, भयंकर राक्षस होणें अशक्य नाहीं. कुठें इंग्लंड, कुठें जर्मनी, कुठें जपान, कुठें अमेरिका. पण वरील देशांत जर एखाद्याचें घर जाळलें आणि माणसें भाजलीं, तर आपल्या अंतःकरणाचा थरकांप होतो. जपानमध्यें भूकंप झाल्यामुळें अपरिमित नुकसान व मनुष्यहानि झाल्याच्या बातम्या आल्या, तर अमेरिकेंत मदतीकरतां फंड उभारले जातात. पोलंडमध्यें जर्मन नाझींनीं भयंकर प्राणहानि केली असें कळतांच हिंदुस्थान आपलें पोट उपाशी ठेवून त्यांच्याकरतां धान्य वा पैसा पाठविण्यास तयार होतो. आतां हें खरें कीं, त्या देशांचा व आपला तितका संबंध येत नसल्यामुळें व ते देश दूर असल्यामुळें आपल्या दुःखाला तीव्रता नसते. पण बिहार प्रांतांत भूकंप झाल्याचें वाचून किंवा अमृतसरला ज. डायरनें केलेल्या अमानुष कत्तलीची हकीगत ऐकून आपण अधिक दुःखी होतों व त्या दुःखाची प्रतिक्रिया प्रक्षोभांतहि होते. बंगालांत जर ओला दुष्काळ पडला, तर मुंबईंत फंड गोळा होतो व तो खुषीनें दिला जातो. पण बंगालऐवजीं जर आपल्याच प्रांतांत, आपल्या जिल्ह्यांत, आपल्या तालुक्यांत, आपल्या गांवांत अशी आपत्ति आली, तर आपल्या दुःखाची तीव्रता अधिक होते. शेजारच्या घराला जर आग लागली तर आपण बादल्या दोन बादल्या पाणी घेऊन जाऊंच कीं नाहीं ? स्वतःचें घर पेटूं नये, म्हणूनहि ही धांवपळ होत नसेल, असें नाहीं. पण निःस्वार्थ बुद्धीनेंच अंतःकरणें दुःखित होतात.

हें झालें सामुदायिक आपत्तींबद्दल. पण प्रेमाची कसोटी वैयक्तिक संकटांचे प्रसंगीं अधिक होते. एखादी स्त्री अगर पुरुष पाण्यांत गटंगळ्या खात असल्याचें पहातांच आपण तिचा अगर त्याचा जीव वांचविण्या-करतां आपला जीव धोक्यांत घालतोंच कीं नाहीं ? ती संकटग्रस्त व्यक्ति अगदीं अपरिचित असते. पण आपले पाय त्या व्यक्तीकडे धांव घेतात. एखाद्याच्या अंगावर धड वस्त्र नसलें, किंवा एखाद्याच्या घरांत जर

अन्नाचा कण नसला किंवा कोणी प्राणांतिक दुखण्यानें आजारी पडला तर आपल्या अंतःकरणांत कालवाकालव होते. रस्त्यानें आपण चाललों असतां एखादा कैदी पोलिसाच्या काढणीनें बांधून नेला जात असतां आपल्या तोंडून 'अरेरे' असे उद्गार निघतात. फटफटीत कपाळाची तरुण स्त्री जर समोर दिसली तर आकाशाची कुऱ्हाड बिचारीवर कोसळल्याबद्दल आपण हळहळतों. अमुक एक शेतकऱ्याची स्त्री शेतांत ऐन पावसाळ्यांत काम करीत होती व तिचा पाय एका सापावर पडला, तिला सर्पदंश झाला व ती मरण पावली, हें ऐकून आपल्याला भीति वाटते व दुःखहि होतें. एखाद्याचें बोट चाकूनें कापलें, तर आपल्या अंतःकरणांत चर्र होतें. माणसामाणसांबद्दल हें झालें. पण इतर प्राण्यांबद्दलहि आपली तीच वृत्ति असते.

एखाद्या सार्जंटनें कुत्र्याला गोळी घातली म्हणजे आपल्याला वाईट वाटतें. गाईवर कोणीं काठ्या घातल्या म्हणजे वेदना होतात. कोणत्याहि सजीव प्राण्याला दुःख झालेलें पाहिलें अगर ऐकलें म्हणजे दुःखी होणें हा स्वभावधर्म आहे. हा स्वभावधर्म जेव्हां जागृत असतो, अगर होतो त्या वेळीं मनुष्याला हिंसा का अहिंसा असा प्रश्न विचारला तर तो अहिंसा असेंच उत्तर देईल. पण हा स्वभावधर्म सतत टिकत नाहीं. हिंसा करावी असें मनुष्याला वाटूं लागतें. सापाला मारूं नका, असें जर कोणी सांगूं लागला तर त्याला वेड्यांत काढतील. पिसाळलेल्या कुत्र्यावर गोळी झाडूं नका असें जर म्हटलें तर म्हणणाऱ्याचें डोकें तपासलें पाहिजे असें लोक बोलतील; आणि कौरवांवर किंवा रावणावर प्रेम करा असें आपण सांगूं लागलों तर आपल्या बुद्धीबद्दल शंका घेतील. स्वभावधर्म टिकण्यास साधर्म्य लागतें असें हिंसेचे पुरस्कर्ते म्हणतात. जो माझा प्राण घेण्याकरतां हातांत तरवार घेऊन उभा आहे, त्याच्यावर मी कसें प्रेम करावें? हा स्वभावधर्म नाहीं. हें स्वभावधर्मा-विरुद्ध वर्तन आहे. मला हें ठाऊक आहे कीं, माझा प्राण घ्यावयास आलेल्या सापाचें डोकें मी ठेंचलें तर माझे प्राण वांचतील. तेव्हां मी माझे प्राण वांचवावे कां सापाचे वांचवावे? हिंसा करावयाची नाहीं असा माझा धर्म असेल तर माझे प्राण मला घालवावे लागतील.

तेव्हां भगवंतांनीं गीतेंत सांगितल्याप्रमाणें ' ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भज्याम्यहं ' हाच मार्ग बिनधोक आहे, असें म्हणणारा मध्यस्थाचा पक्ष. अगदींच हिंसा करूं नये; हिंसा–अहिंसेच्या बाबतींत तारतम्य पाळावें आणि हिंसाच करावी असें म्हणणारे तीन पक्ष समाजांत आहेत.

मध्यस्थ पक्षाची वाखाणणी करणारेच समाजांत फार. तुकारामबुवा हे मोठे भगवद्भक्त. शेत राखायला बसले, पण पीक खाणाऱ्या पांखरांना त्यांनीं हाकललें नाहीं. देवाचें नांव घेतलें कीं, प्रेमाश्रूंचा घळघळां ओघ नेत्रांतून वहावयाचा, रंजल्या–गांजलेल्यांना जवळ करणारांना संत साधु, देव म्हणणारे तुकारामबुवा, पण ते म्हणतात– ' दया तिचें नांव भूतांचें पालन आणि निर्दालन कंटकांचें '. तुकाराम महाराज हे संतमालिकेंतील शिरोमणि, म्हणून त्यांचा आधार घेतला. हीच भावना इतर साधुसंतांची.

' निर्वैरः सर्वभूतेषु ' होण्याचा उपदेश करणारे भगवान् श्रीकृष्ण म्हणतात कीं, दुष्कृतांच्या विनाशाकरतां मला वारंवार जन्म घ्यावा लागतो. ' शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ' किंवा स्थितप्रज्ञावस्थेचा व अहिंसेचा उपदेश करणारे श्रीकृष्ण हे ज्या अर्थीं स्वतः हिंसेकरतां अवतार घेतात, त्या अर्थीं अहिंसा हा व्यावहारिक प्रबंध नाहीं असा त्यावर चटकन् शिक्का मारला जातो. आक्षेपक विचारतो गीता जर युद्धकर्माकरतां सांगितली आहे, तर तुमची अहिंसेची बडबड काय कामाची ? हिंसेच्या प्रतिपादनाकरतां मनूसारखे स्मृतिकारहि ' आततायिनमायांतं हन्यादेवाविचारयन् ' असा सल्ला देतात. महाभारतकार ' अहिंसासाधुहिंसेति श्रेयान् धर्मपरिग्रहः ' असें सांगतात. गीता, उपनिषत्, महाभारत व मनुस्मृतीसारखे ग्रंथ ज्याअर्थीं हिंसेला मान्यता देतात, त्याअर्थीं अहिंसा हा धर्म होऊं शकत नाहीं. श्रुति, स्मृति मान्य असणारांना आणखी काय हवें आहे ?

आतां हें खरें कीं, पूर्वीचीं धर्मशास्त्रें, गीता, पुराणें वगैरे अहिंसेचीं आत्यंतिक पुरस्कर्तीं नव्हतीं. शरीरांतील सडलेला भाग जसा आपण कापून टाकतों, किंवा शेतांत उगवलेलीं विषारी रोपटीं जशीं उपटून काढतों, त्याप्रमाणें समाजांत असणारीं दुष्ट प्रवृत्तीचीं माणसें नष्ट करणें हें समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीनें इष्ट आहे, एवढेंच नव्हे तर आवश्यक

आहे, आपलें तें कर्तव्य आहे, आपला तो धर्म आहे, असें समजलें जात असे. एखाद्या सर्जननें ॲपेंडिसायटिस काढलें किंवा मधुमेहाच्या विकारामुळें जखमी झालेला पाय तोडला तर आपण त्या सर्जननें हिंसा केली असें न म्हणतां उलट त्यानें आपले प्राण वांचविले म्हणून त्याला देवतास्वरूप समजतों. तसेंच या विराटपुरुषाच्या शरीरांत कांहीं दुष्ट प्रवृत्तींचीं माणसें रोगाप्रमाणें वाढत जातात व तीं नष्ट करण्याकरतां श्रीकृष्णाला शस्त्रवैद्य म्हणून यावें लागतें. शस्त्रक्रिया ही हिंसा नाहीं. कोणीहि ती हिंसा मानीत नाहीं. त्याचप्रमाणें 'कंटकांचें निर्दालन' करणें किंवा दुष्कृतांचा विनाश करणें, हीहि एक शस्त्रक्रिया आहे. ही शस्त्रक्रिया भगवान् श्रीकृष्णासारखा सर्जन करीत असेल किंवा स्वतः हातांत शस्त्र न घेतां अर्जुनाकडून ती करवीत असेल, तरच ती शस्त्रक्रिया ठरेल.

हा दुष्कृतांचा विनाश वाटेल त्यानें करावा अशी भगवंतांनीं इच्छा प्रदर्शित केली नसून त्या विनाशाकरतां मला जन्म घ्यावा लागतो असें भगवंतांनीं सांगितलें आहे. तेव्हां दुर्जनांना मारणें हें ईश्वरानें आपल्या हातीं ठेवलें आहे. हिंसा करायची असेल तर ती मी करीन असें सांगण्याचा भगवंताचा आशय. यांत अडचण एकच असण्याचा संभव. दुर्जन किंवा दुष्कृत कसे ओळखायचे ? सामान्य माणसांना सुष्ट कोण व दुष्ट कोण, याचा निर्णय देतां येणार नाहीं. एकच माणूस दोघांना निरनिराळा वाटेल. एक त्याला चांगला म्हणेल, दुसरा वाईट म्हणेल. धर्मराजाला विचारलें, वाईट माणसें दाखव तर त्याला कोणीच वाईट दिसणार नाहीं. तसेंच दुर्योधनाला विचारलें, चांगलीं माणसें दाखव तर त्याला कोणीच चांगलें दिसणार नाहीं. तेव्हां चांगल्या—वाईटाचा निर्णय हा मनुष्याच्या प्रकृतिभेदानुसार भिन्नभिन्न असूं शकेल. जर्मनींत तुम्ही जाल आणि हिटलर कसा आहे हा प्रश्न जर्मनांना विचारला तर ते हिटलर चांगला आहे, आमचा त्राता आहे असें म्हणतील. हाच प्रश्न इंग्लंडमधल्या लोकांना विचाराल तर सर्वजण एकमुखानें म्हणतील कीं, हिटलर क्रूर आहे, राक्षस आहे, दुष्ट आहे. तेव्हां हिटलर चांगला का वाईट हें कसें व कोण ठरविणार ? सुकृत का दुष्कृत हें ठरविण्याचें काम

आणि तो निर्णय घेतल्यानंतर त्यांचा विनाश करण्याचें कामहि भगवंतांनींच केलें पाहिजे. हिंसा करण्याचें आणि चांगलीं माणसें कोण व वाईट कोण हें ठरविण्याचें काम आपलें नाहीं, तें परमेश्वराचें काम आहे असें गीतेवरून दिसतें. पण आपण हें काम ईश्वरावर सोपविण्यास तयार नसतों. आपण दुष्कृतांचा विनाश करतों तसा सत्कृतांचाहि करतों. हातांत कुऱ्हाड सांपडलेला जॉर्ज वॉशिंग्टन जसा ती कुऱ्हाड प्रत्येक झाडावर चालवूं लागला, तशी आपली स्थिति आहे. जरी समाज कोणावांचून अडत नसला तरी समाजांतील चांगल्या लोकांची हिंसा होणें हें समाजाला घातुक ठरत नाहीं का ? शरीरांतील कुजक्या व सडक्या अवयवाऐवजीं चांगला अवयव कापला जाणें हें शरीराला अपायकारक असतें. निष्णात शस्त्रवैद्याऐवजीं जर शस्त्रक्रियेचें काम एखाद्या अलबत्यागलबत्यानें केलें तर रोग नष्ट होण्याऐवजीं रोगीच नष्ट व्हावयाचा. तेव्हां हिंसा करावयाची हें जरी गीतिप्रमाणें अवश्य असलें तरी ही हिंसा कोणी करायची व कोणाची करायची हेंहि ठरविणें अवश्य आहे. हिंसा करणें हें काम फार सोपें आहे. अवघड काम आहे तें कोणाची हिंसा करायची हें ठरविण्याचें. ज्याला रोगाचें निदान करतां येत नाहीं, तो जर शस्त्रक्रिया येते म्हणून शस्त्रक्रियेला प्रवृत्त होईल तर त्याच्या हातून भयंकर प्रमाद घडेल. विवेचक हिंसावाद्यांचा पक्ष हा या अडचणीमुळें लंगडा पडतो.

विवेचक हिंसा करावी का करूं नये हा प्रश्न बाजूला ठेवला आणि सापासारख्या, विंचवासारख्या, खुनी इसमासारख्या प्राण्याची हिंसा करावी का करूं नये असें विचारलें तर त्याचें काय उत्तर द्याल ?

शुद्ध अहिंसावादी म्हणेल माझा जीव धोंक्यांत आला तरी हरकत नाहीं, पण मी सापाची सुद्धां हिंसा करणार नाहीं. सापांना जर कांहीं ज्ञान असेल तर ते माझ्याजवळ येतांच आपला स्वभाव विसरले पाहिजेत. ' अहिंसा प्रतिष्ठायां तत्सन्निधौ वैरत्यागः ' असें एक वचन आहे. भर्तृहरीनें वैराग्यशतकांत म्हटलें आहे—

' किंतैर्भाव्यं मम सुदिवसैर्यत्र ते निर्विशंकाः ॥
कण्डूयन्ते हरिणशिशवः स्वांगमङ्गे मदीये ॥ '

हरिणशावकें हीं अत्यंत बुजरीं व भित्रीं. तीं माझ्याजवळ येतील आणि आपलें अंग माझ्या अंगाला घासतील असे दिवस माझे कधीं होतील का ? परमहंसावस्था हीच होय. अशा परमहंसाच्या अंगावर पांखरें येऊन निःशंकपणें बसतात. असा परमहंसपदाला गेलेला पुरुष आपलें देहभान विसरलेला, आत्मानंदामध्यें मग्न असलेला असा असतो. त्याच्या अंगावर साप आला अगर वाघ आला तर ते प्राणी आपला धर्म विसरतील, म्हणजेच त्यांच्या अंतःकरणांत अशा पुरुषाच्या दर्शनानें किंवा स्पर्शानें क्रांति होईल. पण अशी क्रांति झाली नाहीं तरी तो पुरुष हिंसा करणार नाहीं हें निश्चित. त्याचे प्राणहि कदाचित् जातील.

यावरून संपूर्ण अहिंसा ही फक्त परमहंसाकरतां आहे असें मानण्याचें कारण नाहीं. प्रत्येक ध्येयाला कांहीं क्रम असतो. आपली प्रगति ही एकदम होत नाहीं. अहिंसा पाळावी असा एखाद्याला उपदेश केला आणि पहिल्याच दिवशीं त्याच्या अंगावर साप सोडला तर तो बिचारा हिंसेपासून परावृत्त होणार नाहीं. पण तो जर वृत्तीनें अहिंसावादी बनत गेला तर केव्हां ना केव्हां संपूर्ण अहिंसावादी बनेल.

अहिंसावादी बनणें म्हणजे सर्कशींतील खेळ करणें नव्हे. सर्कशींत आपण मनुष्यच काय पण वाघसिंहहि आपला स्वभाव विसरून शेळ्यामेंढ्यांच्या बरोबर एकाच ताटांत जेवत असलेले पहातों. ती अहिंसा नाहीं. हिंसेच्या भीतीमुळें तो प्रकार होतो. गारुडी करीत असलेले सापाचे प्रयोग हे निव्वळ करमणुकीचेच प्रयोग असतात. एखादा जादूगार आपल्यासमोर रुपयांचा ढीग पाडतो; पण त्यांतला एकहि रुपया त्याला अन्न देऊं शकत नाहीं. उद्यां जर कोणी अहिंसावादाची थट्टा करण्याकरतां सापांना माणसाळविण्याचे प्रयोग मी करणार आहें असें सांगूं लागला तर आपण त्या प्रयोगांतून अहिंसा निर्माण होणार आहे असें बिलकुल समजणार नाहीं. अहिंसा ही वृत्तींत भिनावी लागते आणि नंतर तिचें प्रत्यंतर कृतींत व्हावें लागतें. कृतींत अहिंसा जेव्हां येते तेव्हां ती भावस्वरूप धारण करते. या भावस्वरूपाच्या अहिंसेला प्रेम म्हणतात.

" सापांना मारूं नका हें अहिंसावादी सांगत होता तोंवर ठीक होतें. आम्ही आपले मुंबईसारख्या शहरांत राहिलों असतों आणि सापाचें तोंडहि दिसणार नाहीं अशी काळजी घेतली असती. पण अहिंसेची ही पुरी कसोटी नाहीं असें तुम्ही म्हणतां. कठीण आहे बुवा हें आचरायला. आम्ही नाहीं सापावर प्रेम करूं शकत. आम्हांला तुम्ही सांगणार जंगलांत जा आणि साप, वाघ, गांठून त्यांच्यावर प्रेम करूं लागा ! हें काय शक्य आहे ? असा जर गांधीवाद असेल तर तो चुकीचा आहे, भ्रामक आहे. " अशी टीकाकारांची टीका होणें स्वाभाविक आहे.

अहिंसावादी हा एखाद्याला जंगलांत जाऊन वाघ-सिंहांवर किंवा साप-नागांवर प्रेम करण्याचा सल्ला देईल असें वाटत नाहीं. चराचर वस्तूवरच प्रेम करण्याची अपेक्षा अहिंसावादांत असते. गाईवर प्रेम कर आणि वाघाची शिकार कर, चर्चिलवर प्रेम कर आणि हिटलरचा द्वेष कर, अशी व्यक्तीव्यक्तींत किंवा प्राण्याप्राण्यांत भेदाभेद करण्याची बुद्धि नष्ट होणें आणि सर्वांवर सारखें प्रेम करूं लागणें हीच अहिंसा-वृत्तीची परिसीमा आहे. बुद्धीची साम्यावस्था याच अवस्थेला म्हणतात. या अवस्थेप्रत गेलेला माणूस कोणाचा द्वेष करणार व कोणाची हिंसा करणार ? अशा पुरुषाकडे पाहून दुष्टांचीं सुद्धां अंतःकरणें बदललीं पाहिजेत. परिणतावस्थेला जो पुरुष जातो तो हिंसा अहिंसेच्या पलीकडे जातो. तो प्रेममय होतो. त्याला परमेश्वराची सारी सृष्टि प्रेम करण्या-लायक वाटूं लागते. असा पुरुष मोक्षाला लायक होतो असें म्हटलें तर चुकेल काय ?

संपूर्ण अहिंसावाद्यांचा व विवेचक अहिंसावाद्यांचा आपण परामर्ष घेतला. तिसरा एक पक्ष आहे. तो हिंसावादी पक्ष आहे. या हिंसा-वाद्यांना जगाची सारी उभारणी हिंसेवर झालेली दिसते. क्षणोक्षणीं, पावलोंपावलीं, अणूरेणूत, श्वासोच्छ्वासांत चहूंकडे हिंसा भर-लेली त्यांना दिसते. एका जीवाला मारल्याशिवाय दुसरा जीव जगूंच शकत नाहीं असें त्यांचें म्हणणें. तेव्हां अहिंसा ही त्यांना खरी वाटत नाहीं. ती सृष्टीच्या व परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध आहे, कृत्रिम आहे, अस्वाभाविक आहे, असें ते म्हणतात. तेव्हां जो आपल्या-

वर अन्याय करतो, त्याचा प्राण घेतला तर त्यांत वाईट काय ? आणि प्राण घेण्यांत हिंसा असली तरी हिंसेला भिण्याचें कारण काय ? परमेश्वराची सृष्टि ही रुद्रस्वरूपाची नाहीं काय ? आकाशांत विजा किती जोरानें कडाडतात. विद्युत्पात होतो, गुरें, माणसें मरतात. वादळ येतें, सोसाट्याचा वारा सुटतो, मुसळधार पाऊस पडतो, कडक थंडी पडते, अगर उन्हाच्या तिरपीनें अनेक जीव जातात. एखाद्या रोगाची साथ येणें हें काय ईश्वराच्या अहिंसेचें का प्रेमाचें प्रतीक ? मग जर ईश्वर हिंसा करतो तर आपण कां करूं नये ? त्यानेंच म्हटलें आहे, ' मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ' तेव्हां हिंसा करायला धर्माची बिलकुल हरकत नाहीं.

रक्ताचा टिळा लावणारी कालीदेवी ही तर किती क्रूर, भयंकर आहे. तसाच नररुंडाची माळ घालणारा शंकर ! तेव्हां अशीं देवांचीं उदाहरणें समोर असतां अहिंसेचें प्रतिपादन करणें चूक आहे. शिवाय हिंसा वाईट असली म्हणजेच अप्रिय असली तरी, ती शुद्ध हेतूनें केली म्हणजे बाधक होत नाहीं. कायदेशीर हिंसा ही कुठें गुन्हा ठरते ? एखाद्या माणसाला फांशीं दिला तर दोष न्यायाधिशाचा नाहीं, किंवा फांस आंवळणाऱ्या शिपायाचा नाहीं, किंवा अन्य अधिकाऱ्याचा नाहीं. सर्वजण ' इदं न मम ' इतक्या निरहंकारानें बोलतील. कायदा तरी माणसेंच करतात नाहीं का ? तीं माणसें चुकीचा व अन्यायाचाहि कायदा करूं शकतात. तीं आपल्या सामर्थ्यामुळें असले जुलमी कायदे करतात. तेव्हां निर्जीव कायद्यांची हिंसा करण्याऐवजीं सजीव कायदे करणाऱ्यांची हिंसा करणें, जास्त चांगलें. आपली शक्ति जर जास्त ठरली तर आपले हुकूम जग मानेल आणि कमी पडली तर आपण गुलाम होऊं. तेव्हां वैयक्तिक अत्त्याचार किंवा सामुदायिक अत्त्याचार किंवा युद्ध हें जर शुद्ध बुद्धीनें केलें तर त्याचा दोष आपल्याला लागत नाहीं.

हिंसावाद्यांचें हें प्रतिपादन व हा इतिहास ऐकून त्यांच्या म्हणण्यांत कोठें चूक असेल असें वाटत नाहीं. जगांत आजपर्यंत कोणी हिंसा केली नाहीं, किंवा सांप्रतहि हिंसा चालू नाहीं, असेंहि कोणी म्हणत नाहीं. तसेंच, हिंसा करण्यांत हिंसा करणाराला मोठा आनंद वाटतो असेंहि

नाहीं. 'आतां सर्व मार्ग संपले म्हणून मी युद्ध जाहीर करतो' असेंच आजपर्यंतचे सर्व योद्धे म्हणत आले आहेत. खून करणारे पुष्कळजण भानावर आले म्हणजे 'अरेरे, काय माझ्या हातून हें घडलें' असें म्हणून हळहळतात. तेव्हां हिंसा ही सतत चालूंच आहे. शरीरानें, मनानें, बुद्धीनें हिंसा करण्याचें होमकुंड पेटलेलें आपण पहातोंच. त्यांत नवीन असें काय आहे? एखाद्याला सांगितलें कीं, ब्रह्मचर्य पाळणें हें श्रेष्ठ आहे. त्यावर तो जर असें म्हणूं लागला कीं, "जगांत सर्वजण जर ब्रह्मचर्य पाळतील तर जगत् चक्र थांबेल; धर्मग्रंथांत कोठें ब्रह्मचर्य सांगितलें आहे; मनुष्याच्या प्रवृत्तीविरुद्ध तुमचा हा उपदेश आहे." ह्या त्याच्या उत्तरांत चूक काय आहे? त्याचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. "जीव-जंतूंपासून तों मनुष्यापर्यंत सर्वजण संतति निर्माण करीत असतात. श्रीकृष्णाचे, रामाचे पत्नीवांचून चाललें नाहीं. भक्तमंडळींनीं तर श्रीकृष्णाला सोळा हजार बायका अर्पण केल्या! असा हा जगाचा पसारा दिसत असतां जर गांधीवादी म्हणेल कीं, ब्रह्मचर्य पालन हें श्रेष्ठ आहे, तर तें कबूल करणें म्हणजे ईश्वराविरुद्ध गुन्हा करणें होय. आतां कांहीं फटिंग, कांहीं तऱ्हेवाईक, कांहीं विरक्त लोक होऊन गेले व विद्यमानहि आहेत, त्यांनीं वैवाहिक जीवनापासून स्वतःला अलिप्त ठेवलें; पण असले लोक हे विक्षिप्त व विलक्षण असतात. त्यांचीं उदाहरणें सांगून काय फायदा?" असा हा युक्तिवाद आहे.

इतकें असूनहि जगांत ब्रह्मचर्य पाळणारांचा एक वर्ग आहेच कीं नाहीं? सर्वच जण मोक्षप्राप्तीकरतां ब्रह्मचर्य पाळीत नसतील. कांहीं अन्य उच्च हेतूनें प्रेरित होऊन अविवाहित रहातात.

अहिंसेचें तसेंच आहे. जगांत हिंसा चालते म्हणून आपणहि हिंसेचा पक्ष उत्तम मानला पाहिजे, हें म्हणणें चूक आहे. सर्वांत मजा वाटते, हसूं येते आणि रागहि येतो कीं, जेव्हां गीतेंत अर्जुनाला भगवंतांनीं कौरवांची हिंसा करावयास सांगितली आहे असा पुरावा पुढें केला जातो तेव्हां. गीतेंतील अगर धर्म ग्रंथांतलि इतर सर्व विधिनिषेध हे महाभाग पाळत असते तर गोष्ट वेगळी. आणि **धर्मग्रंथांत हिंसेचा पुरस्कार**

केला असला म्हणून आपण त्याच्या पुढें जाऊंच नये का ? मनुष्य वाह्यात वागूं लागला म्हणजे त्याला निदान धर्मांत सांगितल्याप्रमाणें तरी वाग असें म्हणतात. पण कालमानाप्रमाणें नवा धर्म, नवे आचार-विचार, नवी संस्कृति, हीं निर्माणच होऊं शकत नाहींत का ? किंवा असलेल्या धर्माला, संस्कृतीला, आचारविचाराला उजळा देतां येतच नाहीं का ? मनुष्याची बुद्धि ही सतत वाढ पावत असते. ती विवेचक असते, तशी बंडखोरहि असते. तेव्हां मनुष्यांतील हा जिवंतपणा लक्षांत घेऊन आक्षेपकांनीं घ्यायचेच असले तर आक्षेप घ्यावेत.

धर्मग्रंथांत हिंसेचें प्रतिपादन केलें आहे, सभोंवारच्या दृश्य व अदृश्य सृष्टींतहि हिंसाच हिंसा माजली आहे असेंहि आपण समजूं. पण अहिंसेचा पक्ष उत्तम आहे असें म्हणण्यांत आपण सनातन धर्माविरुद्ध किंवा माणुसकीच्या सर्वश्रेष्ठ धर्माविरुद्ध बंडखोरी करतो असें तर कोणी म्हणणार नाहीं. म्हणतील, कांहींजण म्हणतीलहि. दुर्जनांचा जर तुम्ही वेळींच नाश केला नाहींत, तर त्यांची संख्या व बळ वाढेल आणि ते जगाच्या अहिताला कारणीभूत होतील, असा आरोप अहिंसावाद्यांवर येईल. पण हिंसेचा मार्ग श्रेष्ठ का अहिंसेचा, हें आज झाड लावलें, आणि उद्यां वाढलें असें झटपट दिसणारें नाहीं. कांहीं अल्पजीवी जिरेनियम सारखीं फुलझाडें आठ पंधरा दिवसांत फुलांनीं डवरलेलीं दिसतात. पण कांहीं झाडें आंब्यासारखीं असतात. त्यांना फळें यावयास दीर्घकाळ लागतो. अहिंसेचा मार्ग हा हिंसेच्या मार्गाप्रमाणें सद्यःफलदायी वाटत नाहीं. तो श्रेष्ठ आहे. हिंसा ही जर पाशवी वृत्तीची द्योतक मानली, तर अहिंसा ही दैवी वृत्तीची द्योतक मानली पाहिजे. प्रेम हें द्वेषापेक्षां आणि अहिंसा ही हिंसेपेक्षां श्रेष्ठ आहे यांत कांहींच वाद नाहीं.

गांधीवादाचें मुख्य सूत्र अहिंसा व प्रेम हें आहे. प्रेमाच्या जोरावर आपण आत्मप्रतीति करून घेऊं असा या वादाचा मुख्य सिद्धांत आहे. त्या सिद्धांताच्या यशस्वितेबद्दल आक्षेप घेतले गेले तर निराळें; पण सिद्धांताबद्दल आक्षेप घेणें चूक ठरेल.

अहिंसा व प्रेम : : : ४

आध्यात्मिक दृष्ट्या प्रेमाचा व अहिंसेचा मार्ग हा मोक्षाच्या ध्येया-कडे कसा जातो हें आपण पाहिलें. जगांतील व्यवहारांत अहिंसा व प्रेम हें मोक्षाचें नव्हें, पण व्यक्तीच्या विकासाचें वा परिणतावस्थेचें साधन होऊं शकणार नाहीं का ? त्याकरतां प्रेम करतां आलें पाहिजे. तोचें जगाचा नियम आहे. जो वृत्तीनें अहिंसक नाहीं तो उज्ज्वल प्रेमहि करूं शकणार नाहीं. ज्याच्या मनांत हिंसा आहे व ज्याच्या मनांत हिंसा नाहीं अशीं आपण दोन माणसें घेतलीं तर कोणाचें प्रेम जास्त शुद्ध, पवित्र असूं शकेल ? हिंसावादी उत्कट प्रेम करूं शकेल, पण अहिंसावाद्याचें प्रेम उत्कट, गाढ व शुद्ध असेल.

प्रेम करणें ही आपण समजतों तितकी गोष्ट सोपी नाहीं. ती अत्यंत कठीण गोष्ट आहे. आईवर जितकें आपलें प्रेम असतें, तितकें बापावर नसतें. आईच्या वर्तनांतील मायाळूपणा बापाच्या वर्तनांत सांपडत नाहीं. पत्नीवर जितकें पतीचें प्रेम असतें तितकें आईवर नसतें. कांहीं एका काळानंतर मातृप्रेमाला पुत्रधर्माचें स्वरूप येतें आणि प्रेमाच्या जागीं कर्तव्य जाऊन बसतें. अर्थात् प्रेमाला वयोमानाचेंहि बंधन असतेंच. आई आपल्या मुलांच्या लहानपणीं जितकें त्यांच्यावर प्रेम करील तितकें तीं मुलें मोठीं होत गेलीं, म्हणजे करणार नाहीं. तसेंच तरुणाचेंहि असतें. तरुणपणीं जितकें पत्नीवर प्रेम (पाहिजे तर वेड म्हणा) असतें, तितकें तें प्रौढावस्थेंत रहात नाहीं. वयोमानाचा जसा प्रेमावर परिणाम होतो तसा परिस्थितीचाहि होतो. एखाद्या आईला चार मुलें असलीं तर तिचें प्रेम चौघांत वांटलें जातें. या चार मुलांपैकीं, जो जास्त शिकलेला, जास्त पैसा मिळवणारा, जास्त मातृभक्त असतो, त्यावर आईचें जास्त प्रेम असतें. पण या चौघांपैकीं एखादा मुका असल्यास किंवा मुलगी असून ती विधवा असल्यास स्वाभाविकपणेंच कारुण्यामुळें मातृप्रेमाला भरती येते. पति-पत्नींच्या प्रेमाचें असेंच आहे. त्या प्रेमांतहि जर कारुण्य असेल तर प्रेमाची कला वाढते. माता-पुत्र, पति-पत्नी यांच्यामधील प्रेम जितकें उत्कट असतें, तितकें बहिण-भाऊ किंवा अन्य नातेवाईकांत नसतें. प्रेम करण्याचीं स्थानेंहि आपल्या आयुष्यांत कमी नसतात. चराचरावर आपलें प्रेम असतें. आपलें घरावर, बागेवर, शाळेवर, देशावर, देवावर, धर्मावर, जातीवर, गांवकऱ्यांवर, समाजावर प्रेम असतें. स्नेही, नातलग, गडीमाणसें, गुरुजन, शेजारी, यांच्यावरहि आपलें प्रेम असतें. कुत्र्यामांजरावर, पोपटावर, घोड्यावर, गाईबैलांवरहि आपलें प्रेम असतें. हें प्रेम अर्थातच सारखें नसतें. सर्वाभूतीं समानतेनें आपण पहात नाहीं. कुठें जिव्हाळा, कुठें सहानुभूति, कुठें माया, कुठें कळकळ, कुठें करुणा, कुठें लोभ असे प्रेमाचे नाना प्रकार किंवा नाना छटा आपल्या प्रेमांत असतात. शाळा किंवा कॉलेज सोडतांना आपल्याला वाईट वाटतें, पण त्या विरहाची जाणीव क्षणिक असते आणि स्मृति गोड

असते. तसा विरह निकटच्या नातेवाईकांचा झाला तर तो क्षणिक असणार नाहीं व त्याची स्मृतीहि आल्हादकारक असणार नाहीं. तेव्हां प्रेमाची कला ही वस्तूच्या मानानें कमीअधिक होते. पतिपत्नी किंवा मातापिता यांच्यावर प्रत्येकाचें प्रेम असतें. पण देशावर, धर्मावर, देवावर किंवा ध्येयावर प्रेम करणारीं व त्या प्रेमानें वेडावणारीं माणसें आपल्या पहाण्यांत थोडींच असतात. देश, धर्म किंवा देव संकटांत असतांना त्यांच्या रक्षणाकरतां हजारों लाखोंजण धांवतील व त्याकरतां मरतीलहि. पण कौटुंबिक प्रेमांत गुरफटलेली जशी सारी जनता दिसते, तशी देशप्रेमांत गुरफटलेली नसते. देशाची किंवा धर्माची स्वार्थत्यागपूर्वक सेवा करणारांना किंमत असते ती संख्येच्या कमी प्रमाणामुळें. हें प्रेम कौटुंबिक प्रेमापेक्षांहि थोर असतें.

कांहींना नातेवाईकांवरील प्रेमांत किंवा देशधर्मावरील प्रेमांत स्वार्थ दिसतो. स्वार्थाशिवाय त्यांना शुद्ध प्रेम अशक्यच वाटतें. मोक्ष हाहि उच्च दर्जाचा स्वार्थच आहे असें त्यांचें म्हणणें. 'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति' असा त्यांचा सिद्धांत. प्रेमांतून स्वार्थ गेला तर बाकी काय रहातें असें ते विचारतात. सकृद्दर्शनीं त्यांचें म्हणणें बरोबर वाटतें. पण निःस्वार्थबुद्धीनें प्रेम करणारीं माणसें काय कमी असतात ? किंबहुना प्रेमांतील स्वार्थ गेला तरच त्याला शुद्धस्वरूप प्राप्त होतें. स्वार्थानें केलेलें प्रेम, स्वार्थ दुखवतांच कोलमडून पडतें. कॉंग्रेसवर असलेलें प्रेम कायदेमंडळांतील जागेकरतां तिकिट मिळालें नाहीं म्हणजे लटपटायला लागतें. अन्य प्रेमाचें असेंच आहे. तेव्हां स्वार्थरहित प्रेम हेंच खरें आदर्श प्रेम होय.

स्वतःच्या पत्नीचा त्याग करणारा सिद्धार्थ (गौतमबुद्ध) हा आपल्या तत्त्वावर आपल्या पत्नीपेक्षांहि अधिक प्रेम करणारा होता. देशभक्तांचीं उदाहरणें अशींच अनेक देतां येतील. कुटुंबप्रेम व देश किंवा धर्मप्रेम यांची पातळी अर्थात् एक नाहीं.

आपण आपल्या शेजाऱ्यावर आपल्या घरांतील नातलगाइतकें प्रेम करतों का ? नाहीं. येशूख्रिस्तानें म्हणूनच सांगितलें आहे कीं, स्वतःवर

जसें तुम्ही प्रेम कराल तसें शेजाऱ्यावर करा. आपल्या जातीच्या माणसावर आपलें जितकें प्रेम असतें तितकें परजातीच्या माणसावर नसतें, आणि स्वधर्मीयावर जितकें प्रेम आपण करतों तितकें परधर्मीयावर करीत नाहीं. ज्यांच्यावर आपण प्रेम करीत नाहीं, त्यांचा आपण द्वेषच करतों, असें नाहीं. फिन्लंडमधील माणसावर माझें प्रेमहि नसतें, तसेंच माझा द्वेषहि नसतो. ज्यांचा व आपला कधींच संबंध येत नाहीं, त्यांच्याविषयींच्या आपल्या भावना सुप्त असतात. या सुप्त भावना जेव्हां विरोधानें डिवचल्या जातात तेव्हां त्या द्वेषाचें स्वरूप धारण करतात. उपजतांच जशा आपल्या प्रेमाच्या भावना उमलतात, तशा द्वेषाच्या भावना कारणाशिवाय उफाळत नाहींत. आपण शेजाऱ्याचा द्वेष करतो, पण जेव्हां तो आपल्या स्वार्थाच्या आड येतो तेव्हां. आपण परधार्मियाचा द्वेष करतो, कारण तो आपल्या धर्मांतील लोकांचें धर्मांतर करवतों म्हणून. आपण इंग्लंडचा द्वेष करतों, कारण त्यांची राज्यपद्धत आम्हांला पिळून काढणारी आहे म्हणून. तेव्हां जेथें जेथें आपल्या स्वार्थाला, स्वाभिमानाला, ध्येयाला धक्का पोहोंचतो, तेथें तेथें द्वेषाच्या भावना फुलतात. द्वेष वाढूं लागला म्हणजे उसनें फेडण्याची, सूडाची, शिक्षा करण्याची बुद्धि होते आणि त्याचा शेवट हिंसेंत होतो.

तेव्हां हिंसा टाळावयाची असेल तर द्वेष टाळला पाहिजे आणि अहिंसामय वृत्ति बनवावयाची असेल तर प्रेम करण्यास शिकलें पाहिजे. प्रेम करणें हें द्वेष करण्यापेक्षां अतिशय अवघड आहे. आणि ज्याचा द्वेषच करावयास पाहिजे त्याच्यावर प्रेम करणें तर अशक्यप्रायच आहे. आपण कित्येकांचा निष्कारण द्वेष करीत असतों. त्यांच्याबद्दल आपले ग्रह उलटे करून ठेवतो. या वृत्तीमुळें मनाची शुद्धि जाते; आणि आपण दुसऱ्याचें अकल्याण करण्याऐवजीं स्वतःचें अकल्याण करतो. आपल्या स्वतःच्या मानसिक पावित्र्याची कितीजण काळजी वाहतात ? द्वेष करणाऱ्यावर प्रेम करून आपल्या मनाची प्रगल्भता, औदार्य कितीजण दाखवतात ?

येशू खिस्तानें आपल्या शिष्यांना कांहीं सूत्रें सांगितलीं आहेत, तीं मनन करण्यासारखीं आहेत.

(१) जर एखाद्यानें तुझ्यावर कोर्टांत फिर्याद केली व तुझा एक कोट घेतला, तर त्याला तुझा झगाहि देऊन टाक.

(२) जर तुझ्यावर कोणी एक मैल चालण्याची सक्ती केली, तर त्याच्या बरोबर दोन मैल जा.

(३) मी तुला सांगतों कीं, तूं आपल्या शत्रूवर प्रेम कर. जे तुला शाप देतील त्यांना तूं आशीर्वाद दे. जे तुझा तिरस्कार करतील, त्यांच्याशीं चांगल्या रीतीनें वाग. जे तुझा द्वेषानें छळ करतील, त्यांच्या कल्याणाकरतां परमेश्वराची प्रार्थना कर.

(४) जे तरवारीचा आश्रय करतात, ते तरवारीनेंच नाश पावतात, हें लक्षांत ठेव.

रोजच्या आचरणांत हा येशू ख्रिस्ताचा उपदेश आणणें कित्येकांना अशक्य वाटेल, तर कित्येक ह्या उपदेशाची टवाळी करतील. कांहींजण असेंहि म्हणतील कीं, हा उपदेश मानणें म्हणजे पौरुषत्वाची हानि करणें आहे, नामर्द बनणें आहे, गुलामगिरीला आमंत्रण देणें आहे. कांहीं म्हणतील कीं, हा विरक्तांचा धर्म गृहस्थाश्रमियांना लावला तर अनर्थ होईल. माझा कोट एखाद्यानें घेतल्याबरोबर मी झगा देऊं लागलों तर मला अरण्याची वाट शोधावी लागेल. अर्थात् आपल्याजवळचें सर्व देऊन टाकून एखाद्या देवदूताच्या मागें ज्याला जावयाचें असेल त्याला हा उपदेश ठीक आहे. पण असें संन्यासी सर्वजण बनूं इच्छित नाहींत.

ह्या विचारसरणीवरून सर्वांवर सारखें प्रेम करायचें म्हणजे सर्वसंग परित्यागाला तयार व्हावयाचें असाच अर्थ होतो. ह्या त्यागाला आपली तयारी नसते, म्हणून आपण प्रेमाऐवजीं नकळत द्वेषाची उपासना करीत जातो. जो प्रेमाचा उपासक आहे, तो स्वार्थत्यागी असला पाहिजे, त्यानें आपलें व्यक्तित्व हें सामुदायिक व्यक्तित्वांत विसर्जन केलें पाहिजे म्हणजे स्वतःला विसरलें पाहिजे. जगांत सर्व कांहीं विसरतां येईल पण माणसानें स्वतःला कसें विसरायचें ? स्वतःला विसरणें म्हणजेच आपण कोणी विशिष्ट व्यक्ति आहों, ही भावना काढून टाकणें,

म्हणजेच अहंकाररहित होणें. तेव्हां प्रेमाला स्वार्थत्यागाबरोबर निरंहकाराची आणखी एक उपाधि लागली. ज्याचा अहंकार जातो, तोच खरें प्रेम करूं शकतो, कारण अशा प्रेमाला कुटुंब, समाज किंवा देश, धर्म, इत्यादि मर्यादा उरत नाहींत. ज्याचा स्वार्थ डिवचला जात नाहीं व जो अहंकाराच्या पलीकडे जातो त्यालाच खरें, शुद्ध, सात्त्विक, अमर्याद प्रेम करतां येतें. यालाच विश्वप्रेम म्हणतां येईल.

फारच कठीण वाटतें हें. कादंबऱ्यांतील प्रेमाचीं वर्णनें वाचलीं म्हणजे शाळेंत चौथ्या इयत्तेंत असलेल्या मुलापासून तो देहयात्रा संपविण्याच्या बेतांत आलेल्या ऐंशीं वर्षांच्या वृद्धापर्यंत सर्वांना तसलें प्रेम आपल्याला हवें असें वाटते. तें स्वाभाविकहि आहे. कारण त्या प्रेमांत निरातिशय सुखाचा ठेवा दडवलेला आहे असें वाटतें. या कादंबऱ्यांत, नाटकांत, अगर बोलपटांत व्यक्त झालेल्या प्रेमांत जर का कुठें ध्येयवादाचा वास येऊं लागला तर तें कथानक लोकप्रिय होत नाहीं. त्याची वाखाणणी होत नाहीं असें नाहीं; पण त्यांत शृंगाराचा संपूर्ण रसास्वाद घेतां येत नाहीं, म्हणून ते उच्छृंखल वृत्तीच्या लोकांना आवडत नाहींत. अशा कथानकाला उत्तम, चांगलें म्हटलें म्हणजे झालें. जें चांगलें असतें तें लोकप्रिय असतेंच असें नाहीं. विशिष्ट वर्गाच्या विशिष्ट भावनांना उत्तेजित करणारें प्रेमप्रधान वाङ्मय हेंच लोकप्रिय होऊं शकतें. पण प्रेम म्हणजे एक जळती ज्योत आहे, एक अत्यंत शुद्ध सात्त्विक भावना आहे, तिच्यांत विश्वक्रांतीची शक्ति आहे या गोष्टीची जाणीव कितीजणांना झाली आहे ? असलें प्रेम लोकांना नको असतें. ज्या प्रेमामुळें विरक्ति उत्पन्न होईल, अहंकार नष्ट होईल, त्याग करावा लागेल आणि अत्यंत सात्त्विक सुखाचा लाभ होईल तें प्रेम—तें दिव्य प्रेम—जगाला नको आहे. तें प्रेम साहित्यिकाला नको आहे, तें प्रेम राजकीय नेत्याला, मुत्सद्याला, जातिविशिष्ट चळवळी करणाराला नको आहे. पण गांधीवादांत हेंच प्रेम अपेक्षित आहे.

व्हिक्टर ह्यूगोच्या ' ले मिझेरा बल् ' या कादंबरींत एक मोठा हृदयंगम प्रसंग वर्णन केलेला आहे. एक कैदी सकाळीं तुरुंगांतून सुटलेला असतो.

तो आश्रयाकरतां साऱ्या गांवांत हिंडतो. सर्वजण त्याला हिडिस-फिडिस करतात. त्या चोराला कोण थारा देणार ? शेवटीं संध्याकाळ होते. त्याला एक धर्मगुरुचें घर दिसतें. त्या ठिकाणीं आपल्याला आसरा मिळेल का अशा विचारांत त्याचा आणखी काळ जातो. शेवटीं आशेनें तो त्या बिशपच्या घरांत जातो. बाहेर थंडीचा कडाका पडलेला असतो. ह्या कुडकुडणाऱ्याला पाहून बिशपला दया येते. तो त्याला स्नानाला गरम पाणी, रुचकर अन्न व स्वच्छ ऊबदार आंथरूण पांघरूण देतो. त्या कैद्याला पराकाष्ठेचा आनंद होतो. तेथेंच त्याच्या डोक्याजवळ एक चांदीचा देव्हारा असतो. निजल्या निजल्या त्याला विचार येतात, आपण हा देव्हारा चोरला तर ? तो पहाटेंच उठतो आणि हळूच दार उघडून देव्हारा घेऊन पळून जातो. पोलीस त्याच्या पाळतीवर असतात. ह्याच्याजवळ हा मौल्यवान जिन्नस पाहून त्याला पकडतात आणि त्या बिशपकडे आणतात. त्याच्या लक्षांत सारा प्रकार आलेला असतो. पोलिसांसमवेत आलेल्या त्या कैद्याला बिशप म्हणतो, ' अरे, तूं तुझा देव्हारा घेऊन गेलास खरा, पण त्याचा कळस न्यायला विसरलास. घे हा कळस. '

आपल्या घरांत येऊन चोरी करणाऱ्यावर प्रेम करणारा असला भिक्षुक मोठा चमत्कारिक वाटतो नाहीं ? वास्तविक तो देव्हारा चोराचा नसतो. पण बिशपनें मनानें तो त्या चोराला अर्पण केलेला असतो. म्हणून त्यांत असत्यहि नाहीं. अशीं उदाहरणें समाजांत किती सांपडतील ?

न्यायाचीं कोर्टें पहा कशीं भांडखोर लोकांनीं भरलेलीं असतात ! टीचभर जागेकरतां, यत्किंचित् अपमानाकरतां, थोड्या फार नुकसानीकरतां आपण एकमेकांच्या जिवावर उठण्यास मागेंपुढें पहात नाहीं. शिकलेले असतात ते कायद्याचा आश्रय घेऊन आणि न शिकलेले असतात ते सुऱ्या, काठ्यांचा आश्रय घेऊन आपल्या प्रतिपक्षाचा नायनाट करण्याकरतां टपलेले असतात. शतकानुशतकें माणसामाणसांतील भांडणें संपविण्याचीं हीच पद्धत आहे. जो जास्त हिंसा करतो, तो जास्त शूर, जास्त बुद्धिवान्, जास्त पराक्रमी समजला जातो. सारा देश त्याचा स्तुतिपाठक बनतो.

ऐहिक व्यवहारांत मनुष्य कितीहि संयमी असला तरी त्याला क्षोभजनक प्रकार पाहून आपली अहिंसावृत्ति कायम ठेवणें अशक्य होतें. तो एक अतिमानुष म्हणजे क्रोधद्वेषांच्या पलीकडे तरी गेलेला असला पाहिजे, किंवा अ-मानुष म्हणजे या भावना त्याच्यांत नसल्या तरी पाहिजेत. एखाद्या स्त्रीवर गुंडांनीं हल्ला केला, ते जबरदस्तीनें तिच्यावर बलात्काराकरतां धांवले आणि तो प्रकार अहिंसेचा उपासक पहात असला तर त्याचें रक्त उसळल्याशिवाय खास रहाणार नाहीं. तो आपले प्राण संकटांत घालून त्या स्त्रीचा बचाव करील. अशा प्रक्षोभजनक प्रसंगीं हिंसा झाली तर ती क्षम्य ठरेल. घाबरून पळून जाणें आणि स्वतःला अहिंसावादी म्हणविणें हें पातक आहे.

जातीय दंग्यांमध्यें हे प्रश्न वारंवार येतात. गुंड व मवाली कोणाच्या तरी फूसलावणीनें रुपया आठ आण्यांकरतां वाटेल त्याचे प्राण घ्यावयास तयार होतात. पैसे देणारे जातिनिष्ठ व पैसे घेणारे गुंड जोंपर्यंत समाजांत आहेत तोंपर्यंत हे दंगे चालू रहाण्यास हरकत नसते. हे दंगे कसे थांबवावे हें पुढाऱ्यांना कोडें पडतें. म. गांधी म्हणतात, "स्वतःचे प्राण अर्पण करण्यास तयार असणारे शांतिदल उभारा." पण अशीं शांतिदलें किती उपयोगीं पडतील हा प्रश्नच आहे. कारण प्राण देण्याकरतां जरी या दलांतील मंडळी तयार असली, तरी त्यांचे प्राण घेण्याकरतां—उघड उघड—कोण तयार असतो ? शांतिदलाला जर ही दंगल थांबवितां येईल तर ती पोलिसांना कां थांबवितां येणार नाहीं ? हल्ला करणारे एकट्यादुकट्याला गल्लींत गांठून पाठीमागून त्याच्यावर वार करतात. अशा जागीं शांतिदलाचा काय उपयोग होणार ? या दलांतील मंडळी उपदेश करूं शकतील. पण तें नित्याचें काम होईल, नैमित्तिक होणार नाहीं. अन्य प्रसंगीं हीं दलें अवश्य कार्यक्षम होतील. जातीय दंगलींतसुद्धां त्यांचा उपयोग दंगे कमी करण्याकरतां होईल.

प्रश्न असा विचारला जातो कीं, एका माणसाच्या हातून जर स्त्रीच्या रक्षणाकरतां हिंसा होणें चूक नाहीं, तर व्यक्तिसमूहानें संघटित होऊन काठ्यालाठ्यांचें शिक्षण घेऊन अशा संकटांकरतां सुसज्ज होणें अधिक इष्ट नाहीं का ? जो माणूस त्या स्त्रीच्या रक्षणाकरतां धांवतो तो जर

शिक्षण घेतलेला असेल, तर त्याला त्या स्त्रीचें रक्षण बरोबर करतां येईल. तेंव्हां गांधीवादांत वैयक्तिक हिंसेला आपत्कालीं जर परवानगी असेल, तर संघटित हिंसेला आपत्कालींच परवानगी कां असूं नये ? आजकालचीं युद्धें संघटित हिंसाच करीत नाहींत का ? जर्मनीनें पोलंड वगैरे देशांवर केलेली स्वारी किंवा इंग्लंडनें सीरियावर केलेली स्वारी ही वरवर तरी आत्मरक्षणाकरतांच होती. वैयक्तिक हिंसा, सामुदायिक हिंसा, राष्ट्रीय हिंसा या क्रमानें जर हिंसेला मान्यता द्यायची असेल तर मग अहिंसा ही फक्त साधुसंन्याशांपुरतीच मर्यादित होईल. राजकीय जीवनांत अगर सामाजिक जीवनांत अहिंसेचा प्रयोगच होणार नाहीं. हिंसेचा मूळ उद्देश अन्याय, जुलूम वगैरेंचा प्रतिकार करण्याचा असतो हें खरें; पण पुढें हिंसेचें संरक्षक स्वरूप नष्ट होऊन ती संहारक बनते. मग सामर्थ्यालाच महत्त्व येतें. बलवान् तोच यशस्वी होतो. तोच अन्याय करूं लागतो. आक्रमणाला संरक्षण असें नांव तो देतो आणि जगांत चाललेला क्रम पुढें सुरू रहातो.

व्यक्तिधर्म व समाज किंवा राष्ट्रधर्म यांत एका दृष्टीनें फरकच आहे. जी गोष्ट व्यक्तीकडून अपेक्षिली जाते, ती राष्ट्राकडून अपेक्षिली जात नाहीं. कोणत्याहि परिस्थितींत हिंसा करूं नये असें म. गांधी सांगतात. स्वतःचे प्राण देऊन संकटांत सांपडलेल्या स्त्रीचा बचाव करा असें गांधी सांगतील. पण तो राष्ट्रधर्म होणार नाहीं. राष्ट्राच्या वृत्तींत व कृतींत क्रमाक्रमानेंच बदल होतो. म्हणून कॉंग्रेसनें जो गयेचा ठराव केला, त्यांत स्त्रीच्या अब्रूवर घाला घातला जात असतां, किंवा मुलावर व माणसावर अक्षम्य हल्ला होत असता, किंवा धर्माचा अपमान होत असतां तेथें अत्याचार क्षम्य मानला आहे. इंडियन पिनलकोडांत खासगी संरक्षणाला जितकी परवानगी दिली आहे तितकी कॉंग्रेसनें दिली आहे. पण वर निर्दिष्ट केलेल्या तीन बाबींसारख्या बाबी वगळून कॉंग्रेस स्वयंसेवकेला कॉंग्रेसचें कार्य करीत असतां खासगी रक्षणाला हक्क नाहीं. ह्या व्यक्ति धर्माच्या व राष्ट्रधर्माच्या मर्यादा बरोबर ओळखल्या पाहिजेत.

हिंसेचा प्रतिकार कसा करावा हा प्रश्न नंतर सोडविण्याचा रहातो.

त्याचा आपण पुढें विचार करूं. पण गांधीवाद हा सामुदायिक, संघटित हिंसेचा पुरस्कर्ता नाहीं, हें निश्चित. सरकारची पोलिससेना ही याच हिंसे-करतां आहे आणि जोंवर अहिंसेचा पगडा राजकारणांत बसला नाहीं, तोंवर ही सेना कायम रहाणार आहे मग राज्यकारभार कोणीहि चालवो. अर्थात् आजच्या सरकारप्रमाणें पुढील सरकारांत अहिंसेचा प्रचार करणें, आणि तो युद्धासारख्या अत्यंत गंभीर परिस्थितींत करणें हा गुन्हा ठरणार नाहीं.

गांधीवाद हा अंतर्गत दंगलीचा प्रश्न असो किंवा अन्य राष्ट्रांबरोबर झगडण्याचा प्रश्न असो, हिंसेला बिलकुल मान्यता देत नाहीं. पुष्कळांना हें चमत्कारिक वाटतें. ते म्हणतात, " अहिंसा ही फार तर व्यवहारांत यशस्वी होऊं शकेल. मी प्रेमळ वृत्तीनें माझ्या शेजाऱ्यांचें अंतःकरण बदलूं शकेन, पण ज्यांना मीं कधीं पाहिलेलें नाहीं, असे गुंड अगर अशीं राष्ट्रें जर माझ्यावर चाल करून आलीं, तर त्यांच्यावर प्रतिहल्ला करण्यास काय हरकत आहे ? " साऱ्या जगांत चाललेल्या प्रकारांवरून हिंसा हीच अन्याय दूर करण्याचें साधन आहे असें दिसतें. कांहीं अहिंसावादी गीतेंतील हिंसेचा आधार पाहून निरुत्तर होतात. पण गीतेंत अहिंसा सांगितली नसली तरी तिचें आचरण कोणींहि करूं नये, असा निर्बंध घालणें योग्य नाहीं. अशा गृहस्थाला जग विक्षिप्त, वेडा, तऱ्हेवाईक, अति शहाणा म्हणतें. पण विशेषणानें विशेष्य बदलूं शकत नाहीं. तेव्हां गांधीवाद हा राजकारण असो, समाजकारण असो, नैतिक आचरणाचा प्रश्न असो किंवा आध्यात्मिक क्षेत्र असो, कोठेंहि हिंसेला परवानगी देत नाहीं. भित्रेपणापेक्षां अत्याचार बरा असें जरी गांधीवाद म्हणत असला, तरी तेवढ्या आधारावर गांधीवादाला हिंसेकरतां रणांगण मोकळें करावयाचें नाहीं.

मग प्रश्न असा उद्भवतो कीं, व्यक्तिव्यक्तींमधील किंवा समाजासमाजामधील किंवा जातिजाति अगर राष्ट्राराष्ट्रांमधील भांडणाचे प्रश्न कसे सोडवावयाचे ? मी माझ्या शत्रूवर अत्यंत प्रेम करीत असलों आणि त्या प्रेमाचा परिणाम जर त्या हृदयशून्य शत्रूवर झाला नाहीं तर काय करावयाचें ? माझें अंतःकरण शुद्ध प्रेमानें भरून गेलें तर मी प्रेममय

होईन, मी क्रोध, मोहरहित होऊन परिपूर्णावस्थेला पोहोंचेन, पण तो माझा मानीव शत्रु जगांत उपद्रव देत राहील. गांधीवाद हा पूर्वीच्या तत्त्वज्ञानापेक्षां विशेष जर असला तर याच बाबतींत. गांधीवादी हा कर्तव्य-पराङ्मुख होऊन सत्यशोधन व प्रेम करीत नाहीं. तो कर्तव्याच्याद्वारें ही सिद्धि मिळवण्याचा प्रयत्न करतो. पूर्वीचे साधुसंत किंवा संन्यास-मार्गी हें जग मिथ्या मानीत व जगांतील बऱ्यावाईट कारभारांशीं आपला संबंध नाहीं असें समजत. म्हणून ते एकाकी असे होते. गांधीवादी हा जगांतील सर्व नित्याचे प्रश्न सोडवूं इच्छितो. अहिंसा हा त्याच्या प्रयोगशाळेंत घडवलेला पदार्थ आहे. त्या पदार्थांचा परिणाम काय होतो हें त्याला जनतेवर प्रयोग करूनच पहावयाचें असतें. त्याला मनुष्यमात्राचा स्वभाव, मनुष्यमात्राचें शील बदलावयाचें आहे. त्यामुळें जनतेपासून तो दूर जाऊं शकत नाहीं. जनता हाच त्याचा परमेश्वर आहे. दोन अडीचशें कोटी लोकांच्या विचारसरणींत आणि आचारांत अहिंसात्मक क्रांति करण्याची गांधीवादाची महत्त्वाकांक्षा आहे. गांधीवाद त्याच वेळीं प्रभावी झाला असें म्हणतां येईल कीं, ज्या वेळीं जगांतील बहुसंख्याक लोक कमींत कमी हिंसेपासून परावृत्त होतील. जगानें हिंसा सोडली असें तेव्हां म्हणतां येईल कीं, ज्या वेळीं त्या त्या राष्ट्रांच्या अंदाजपत्रकांत लष्करावरील खर्च पूज्य होईल.

हिंसेशिवाय असा कोणता प्रभावी मार्ग आहे कीं, जो दुष्टांतील दुष्टपणा काढून टाकून त्याला ताळ्यावर आणील ! मी अहिंसावादी असलों तरी जग अहिंसावादी बनत नाहीं. मलाच तें हिंसावादी बनविण्याचा प्रयत्न करील. गांधीवादानें जर अत्यंत मोठा, इतिहासांत न घडलेली कोणती गोष्ट सांगितली व केली असली तर ती सत्याग्रहाच्या प्रतिकाराची. सत्याग्रहानें आपण प्रचंड शत्रूलाहि नमवूं शकतों अशी गांधीवादानें शिकवण दिली आहे. जगांत अनेक भौतिक शोध लागले व त्यांबद्दल त्या संशोधकांनीं बक्षिसें व मान्यताहि मिळवली. पण म. गांधींच्या ह्या शोधाकडे जगांतील पुढारलेल्या राष्ट्रांनीं गांभीर्यानें बघितलें नाहीं. त्यांना हिंसेची जागा अहिंसा, सत्याग्रह घेऊं शकेल असें वाटतच नाहीं. पिढ्यानपिढ्या होत

आलेल्या संस्कारांचा तो दोष आहे. गांधीवाद हा नुसता सत्य आणि अहिंसा सांगत बसला असता तर त्याचें तें प्रतिपादन वेदांतांतील कुठल्या तरी एखाद्या वचनांत ठाकठीक रीतीनें बसवून त्याचें नावीन्य केव्हांच नष्ट करून टाकलें गेलें असतें. पण गांधीवाद हा हिंसेपेक्षांहि प्रबळ अशा एका शक्तीचें शस्त्र जनतेच्या हातीं देत आहे. या शस्त्रानें आपण जर झगडलों तर माणुसकीचा नायनाट न करतां, स्वतःच्या पावित्र्याची व संस्कृतीची हानि न करतां, आपण जुलमापासून व अन्याया-पासून जगाला सोडवूं शकूं असें गांधीवाद ओरडून सांगत आहे. ' स्वतःजवळ शस्त्रें नाहींत म्हणून तुम्ही स्वातंत्र्याविषयीं निराश बनूं नका. '' हा संदेश हिंदुस्थानला मिळतांच आमचा वठलेला आशावृक्ष पल्लवित झाला, हें आपण पाहिलें. कांहींतरी अजब, अद्‌भुत त्यांत आहे एवढें जनतेला वाटलें. जगांतलि विचारवंतांचेंहि लक्ष म. गांधींनीं आपल्याकडे खेंचून घेतलें व त्यांच्यांत कुतूहल निर्माण केलें.

ज्या सत्याग्रहानें एवढी आशा निर्माण केली, विचारांत क्रांति केली, त्या सत्याग्रहाच्या मार्गाचें संपूर्ण आकलन झाल्याशिवाय गांधीवादाचें दर्शन होणार नाहीं. म्हणून आपण सत्याग्रहाच्या या शस्त्राचा यथाक्रम परिचय करून घेऊं.

सत्य व अहिंसा : : : ५

> अहिंसा सत्य की गवेषणा का अधिष्ठान है। अहिंसा और सत्य एक दूसरे के साथ इस तरह गुथे हुए हैं कि उनको खोल कर अलग अलग करना बहुत मुश्किल है। वे सिक्के की दो बाजुओं के समान हे...फिर भी अहिंसा साधन हैं और सत्य साध्य। साधन का साधनत्व इसीमें है कि वह अव्यवहार्य न हो। इसलिए अहिंसा हमारा परमधर्म है। यदि हम साधन की रक्षा करें तो आज नहीं तो कल हम साध्य को प्राप्त ही कर ही लेंगे।
>
> सर्वोदय ४।१९३८

अहिंसा व सत्य हे गांधीवादांतील दोन भिन्न भिन्न शब्द दिसतात. सत्य व अहिंसा हे दोन शब्द आपण असंख्य वेळां ऐकलेहि आहेत. ह्या दोन शब्दांचा परस्परांशीं कांहीं संबंध आहे, का ते स्वतंत्र शब्द आहेत? अहिंसेच्या मार्गानें सत्याकडे जायचें, का सत्याच्या मार्गानें अहिंसेकडे जायचें असा विकल्प मनांत उभा रहातो. अर्थात् आध्यात्मिक दृष्ट्या आपण ह्या बाजूकडे पहात आहों. गांधींनीं सत्याला परमेश्वर असेंच

म्हणून टाकलें आहे. अहिंसेशिवाय ईश्वराची प्राप्ति होणार नाहीं असें गांधीवाद समजतो. हिंसेच्या विचारानें जोंवर मन अस्वच्छ, अपवित्र आहे, तोंवर अशा अस्वच्छ जागीं ईश्वराची मूर्ति कशी प्रस्थापित होणार ? तेव्हां ईश्वराचा साक्षात्कार व्हायचा असला तर मन निर्वैर, हिंसारहित, क्रोधरहित असें झालें पाहिजे.

गांधीजी म्हणतात देव हा सत्य आहे असें म्हणण्यापेक्षां सत्य हाच देव आहे हें अधिक बरोबर आहे. ' जेथें सत्य आहे तेथें ज्ञान—शुद्ध ज्ञान— असतें. ईश्वराच्या नांवाबरोबर ज्ञान म्हणजेच चित् हा शब्द जोडण्याचें कारण हेंच आहे. आणि जेथें शुद्ध ज्ञान असतें तेथें आनंद असतो. दुःखाला तेथें जागा नसते. आणि जसें सत्य हें शाश्वत आहे, तसेंच त्यापासून प्राप्त झालेला आनंद हाहि शाश्वत आहे. म्हणून आपण देवाला सच्चिदानंद म्हणतों. याचा अर्थ त्याच्या ठिकाणीं सत्य, ज्ञान व आनंद हे तीनहि आहेत. '

पण हें सत्य कसें प्राप्त करावयाचें ? सत्यप्राप्ति म्हणजे ईश्वरप्राप्ति. सत्यशोधनापेक्षां जीविताचें दुसरें ध्येय तरी काय असणार ? या सत्याची व्याख्या काय, असा गांधीजींना प्रश्न विचारला. सत्याची व्याख्या आपल्याला करतां येणें अशक्य आहे असें त्यांनीं उत्तर दिलें. सत्याची व्याख्या म्हणजेच परमेश्वराची व्याख्या आणि परमेश्वराची व्याख्या कोण करणार ? परमेश्वर हा अंतर्ज्ञानानें समजावा लागतो. त्याचीं लक्षणें फारतर सांगतां येतील. सत्यस्वरूपाचा जो परमेश्वर आहे त्या सत्याचीं तींच लक्षणें आहेत.

सत्याची खूण अंतःकरणाला पटते. बाह्य इंद्रियांचे जसे व्यापार चालू असतात तसेच अंतरिंद्रियांचे व्यापार चालू असतात. अंतरिंद्रियांचे व्यापार सूक्ष्म असतात व तीं इंद्रियें जितकीं शुद्ध असतील तितकी त्यांना शुद्ध संवेदना होते. आपली दृष्टि स्वच्छ, निर्दोष व तीक्ष्ण असली म्हणजे लांबचाहि पदार्थ आपल्याला स्वच्छ दिसतो. आपले कान तीक्ष्ण असले म्हणजे कुजबुजहि आपल्याला ऐकू येते. आपलें घ्राणेंद्रिय किंवा रसना जितक्या प्रमाणांत तीक्ष्ण, तितक्या प्रमाणांत आपल्याला वस्तूंचा

वास किंवा चव कळते. अंतरिंद्रियांचे व्यापारहि असेच चालू असतात. सत्य हें मनानें व बुद्धीनें आकलन व्हायचें असल्यामुळें आपलें मन व बुद्धि जितकी शुद्ध व स्वच्छ असेल तितकें आपल्याला वस्तूचें सत्य ज्ञान होईल. डोळ्यांवर जर सारा, मोतीबिंदु आला असेल, तर दृष्टि मंद होते. कानाला बहिरेपणा येणें, किंवा घ्राणेंद्रिय मरणें किंवा रुचिदोष उत्पन्न होणें हीं त्या त्या इंद्रियांचे व्यापार नीट चालू नसण्याचीं लक्षणें आहेत. मनाचें व बुद्धीचेंहि तसेंच आहे. आपलें मन जर एखाद्या विकारानें कलुषित झालें असेल तर आपल्याला सत्यज्ञान होणार नाहीं. बुद्धि जर भ्रष्ट झाली असली तर बुद्धीला सत्य कळणार नाहीं. सोनें व मोतीं वजन करण्याचा कांटा जसा लखलखित, स्वच्छ असावा लागतो, तसें मनाचें व बुद्धीचें आहे. लहानशा चुकीनें कांट्याचा समतोलपणा बिघडला तर अनर्थ होतात. सत्य याचा अर्थ जसें असेल तसें. आपण डोळ्यानें सत्य पहातों, कानानें सत्य ऐकतों, नाकानें सत्य अनुभवतों, जिभेनें सत्य चाखतों. पण जर डोळे बिघडले असले, कावीळ झाली असली तर दूधहि पिवळें दिसेल. कान बहिरे झाले असतील तर भलतेच ध्वनि ऐकूं येतील. नाक दूषित झालें असलें तर अमुक वास कशाचा हें सांगतां येणार नाहीं किंवा रुचींत बिघाड झाला असला तर गोड पदार्थहि कडू लागेल. मन व बुद्धि या अंतर-इंद्रियांचें तसेंच आहे. हीं इंद्रियें मलिन झालीं, अगर दूषित झालीं तर त्यांच्या द्वारां होणारें बाह्य वस्तूंचें ज्ञान हें दूषित होतें. जर एखाद्याचा मुलगा मरण पावला असला आणि त्याला आपण उत्तम बोलपट पहावयला नेलें तर तो म्हणेल कीं, माझें मनच जागेवर नाहीं, मी हा पट चांगला किंवा वाईट हें सांगूं शकत नाहीं. एखाद्याचें मन जर त्यापेक्षां प्रचंड आघातानें बिघडलें व तो जर वेडा झाला अगर जन्मतःच वेडा असला तर त्याला जगांतील कोणत्याच वस्तूचें आकलन होणार नाहीं; म्हणजे त्याला सत्य कळणार नाहीं. मन हें अनेक विकारांनीं ग्रस्त होऊं शकतें. एखाद्यानें यावें आणि आपल्या डोक्यांत काठी मारावी; किंवा आपण एखाद्याच्या डोक्यांत काठी मारावी किंवा एखाद्या सुंदर स्त्रीनें वेड लावावें, किंवा एखाद्या अधिकाराच्या जागेचा लोभ सुटावा; या व इतर गोष्टींमुळें मनाचा तोल सुटतो

आणि मन त्याच विषयाकडे वहावत जातें. स्वप्नांत मनाचे व्यापार कसे चालतात हें आपण अनुभवतोंच. वाटेल तेथें मन भटकत असतें. त्याला सूत्रबद्धता नसतेच. जागेपणींहि आपण मनाला वाटेल तेथें नेऊं शकतों. मन हें वाटेल त्या वस्तूचें पावित्र्य भ्रष्ट करूं शकतें, वाटेल त्या अधिकारावर बसूं शकतें, वाटेल त्या देशांत जाऊं शकतें, वाटेल त्या काळांतील परिस्थिति रेखाटूं शकतें. पण हे सर्व व्यापार काल्पनिक असतात. त्यांत सत्य बिलकुल नसतें. बुद्धि ही मनाप्रमाणेंच अदृश्य आहे, पण तिचे व्यापार चाललेले असतात. सर्वांचीं मनें जशीं सारखीं नसतात, तशी सर्वांची बुद्धीहि सारखी नसते. प्रत्येकाच्या बुद्धीची ग्राहकशक्ति ही निरनिराळी असते. त्यामुळें दोघांच्या पुढें जर एकच यंत्र ठेवलें तर दोघेजण त्या यंत्रांतील गुंतागुंती एकाच तऱ्हेनें उलगडूं शकतील असें नाहीं. ज्याची बुद्धि जास्त तीव्र असेल त्याचीच बुद्धि त्या यंत्राच्या मुळाशीं पोहोंचूं शकेल. आध्यात्मिक वडामोडींकडेहि बुद्धीची अशीच शक्ति जाऊं शकतें. जगाचें कोडें उलगडण्यास शुद्ध बुद्धिच उपयोगी पडूं शकते. ही बुद्धि जर निर्दोष व पवित्र असेल तर तिला सत्यासत्यविवेक करतां येईल. दूषित बुद्धीला सत्य कळणें अशक्यच आहे. म. गांधी हे अत्यंत वाईट आहेत असा एखाद्याच्या बुद्धीचा ग्रह झाला आणि त्यांचें मन किंवा त्याचा अनुभव तसा नसला तरी त्या गृहस्थाला सत्य कळूं शकणार नाहीं. बुद्धीच्या व्यापाराची आणखी कांहीं उदाहरणें पाहूं.

दोघेजण दुष्काळी विभागांतून चालले आहेत. त्यांना जागोजागीं मेलेलीं गुरें, अस्थिपंजर झालेले माणसांचे घोळके दिसले तर त्यांच्या मनावर काय परिणाम होईल ? ज्या चित्रपटामुळें मिस पर्ल बक या प्रसिद्धीला आल्या व त्यांच्या ' गुड अर्थ ' ला नोबल प्राईझ मिळालें तो चित्रपट 'गुड अर्थ' असाच कारुण्यपूर्ण आहे. चीनमधील दुष्काळांचें भयंकर दृश्य त्यांत चित्रित केलें आहे. अशीं दृश्यें पहाणारे सर्वच जण हादरतात. पण त्यानंतर सर्वांचीच बुद्धि जागृत होते व त्यांना कर्तव्याची प्रेरणा होते असें नाहीं. कांहींची बुद्धि त्या दुर्दैवी लोकांना आपण मदत केली पाहिजे असें सांगते; कांहींची बुद्धि नुसती हळहळ व्यक्त करते व

विराम पावते; तर कांहींची बुद्धि देवाला, दैवाला, किंवा तशा परिस्थितींत रहाणारांना दोष देऊन मोकळी होते. बुद्धि ही सात्विक, राजस किंवा तामस अशी तीन प्रकारची असते. प्रत्येकाच्या बुद्धीवर विशिष्ट संस्कार होतील असें समजण्याचें कारण नाहीं. रानटी मनुष्याची बुद्धि ही सुधारलेल्या माणसाच्या बुद्धीपेक्षां निराळी असते; हिंदी माणसाची बुद्धि ही इंग्लिश माणसाच्या बुद्धीपेक्षां निराळी असते आणि स्त्रियांची बुद्धि ही पुरुषांच्या बुद्धीपेक्षां निराळी असते. त्यामुळें प्रत्येकाच्या बुद्धींत पडणारें प्रतिबिंब हें सारखें नसतें. त्याचमुळें सर्वांच्या बुद्धीला सर्वच गोष्टींचें सारखें ज्ञान होईल असें म्हणतां येत नाहीं. पण सम्यक् ज्ञान शुद्ध बुद्धीला होतें.

सत्यावरच गांधीवादाची उभारणी झाली असल्यामुळें आणि इंद्रियें हींच सत्यासत्याचा निर्णय देणारी असल्यामुळें आपण ह्या व्यापाराची थोडक्यांत माहिती करून घेऊं.

गीतारहस्यांत क्षेत्रक्षेत्रज्ञ विचारांत ह्या विषयाची चर्चा केली आहे. रहस्यकारांनीं मनुष्याला इंद्रियद्वारां सृष्टींतील पदार्थांचें ज्ञान होतें असें म्हटलें आहे. इंद्रियें दोन प्रकारचीं. पांच कर्मेंद्रियें व पांच ज्ञानेंद्रियें. हातपाय आदि कर्मेंद्रियें; कान डोळे वगैरे ज्ञानेंद्रियें होत. ‘ ज्ञानेंद्रियांच्या द्वारें बाहेरचा माल देहाच्या कारखान्यांतील मन या कारकुनाकडे येतो, त्याची तपासणी करतो. हा कारकून ज्ञानेंद्रियांमार्फत मनावर जे संस्कार घडतात ते प्रथम एक ठिकाणीं मांडून...ग्राह्य कोणते व टाकावू कोणते,..याचा प्रथम निर्णय त्याला करावा लागतो. ’ मनरूपी हा कारकून आपल्या ग्राह्याग्राह्यतेबद्दलचा साक्षीपुरावा बुद्धिरूपी न्यायाधिशापुढें मांडतो. बुद्धि हा न्यायाधीश आहे. बुद्धीनें दिलेला निकाल हा आत्म्याला कळवावा लागतो. कोणत्याहि वस्तूचें यथार्थ ज्ञान करून देण्याचें काम बुद्धीचें आहे. हें ज्ञान झाल्यानंतर बुद्धि, मन व कर्मेंद्रियें यांच्या मार्फत अमलबजावणीला सुरवात होते.

न्याय देण्याचें काम बुद्धीचें असल्यामुळें ती शुद्ध असावी लागते. सारासारविवेक करून निश्चय करणारें इंद्रिय असा बुद्धीचा अर्थ आहे. या बुद्धीला व्यवसायात्मिक बुद्धि म्हणतात. दुसरी बुद्धि वासनात्मक बुद्धि

होय. अमुक गोष्ट चांगली का वाईट हा निर्णय व्यवसायात्मिका बुद्धीनें दिल्यावर ती गोष्ट करण्याची वासना किंवा इच्छा ज्यामुळें होते तिला वासनात्मक बुद्धि म्हणतात. व्यवसायात्मिका बुद्धि शुद्ध व स्थिर केली म्हणजे भलत्या सलत्या वासना मनांत उत्पन्न होऊन मन बिघडत नाहीं. ही व्यवसायात्मिका बुद्धि शुद्ध होण्यास पातंजल योगांतील समाधि, किंवा भक्ति, ज्ञान किंवा ध्यान यानें परमेश्वर स्वरूप ओळखले पाहिजे व सर्वभूतीं एकच आत्मा आहे हें बुद्धींत ठसलें पाहिजे. ही बुद्धि आत्मनिष्ठ झाल्यावर व मनोनिग्रहानें मन व इंद्रियें तिच्या ताब्यांत वागण्यास शिकल्यावर, सात्विक कर्मांकडे देहेंद्रियांची प्रवृत्ति होत असते. 'ज्या बुद्धीस आत्म्याचें किंवा परमेश्वराच्या सर्वव्यापी खऱ्या स्वरूपाचें पूर्ण ज्ञान झालेलें नाहीं, ती बुद्धि शुद्ध नाहीं.' बुद्धि शुद्ध होण्यास समाधि, भक्ति, ध्यान किंवा ज्ञान, असे चार मार्ग सांगितले आहेत. या चार मार्गांपैकीं एकानें बुद्धि शुद्ध करावयाची, नंतर ती आत्मनिष्ठ करावयाची. नंतर मनोनिग्रह करून मन व इंद्रियें तिच्या ताब्यांत द्यावयाचीं असा हा इंद्रियांचा मोठा पसारा व व्यापार आहे.

शुद्ध बुद्धि करून आपण काय संपादन करतों ? सर्वभूतीं एकच आत्मा आहे हें आपण ओळखतों. या विश्वाच्या व्यापक पसाऱ्यांत सत्य जर कोणतें असेल तर हेंच होय. तेव्हां सत्य ओळखण्यास बुद्धीची शुद्धता कां लागते हें यावरून कळून येईल. पण बुद्धि जरी ध्यान, ज्ञान, भक्ति किंवा समाधीनें शुद्ध करावयाची असली तरी मन व इंद्रियें हीं अशुद्ध ठेवून भागणार नाहीं. भक्ति, ध्यान, ज्ञान वगैरे कशाकरतां हवींत ? मनाची शुद्धि करण्याकरतां. लो. टिळकांनीं म्हटल्याप्रमाणें बुद्धिरूपी न्यायाधिशाकडून खरा न्याय केव्हां मिळेल ? ज्या वेळीं मनरूपी कारकून हा ग्राह्याग्राह्यतेचा पुरावा नीट मांडील तेव्हां. जर हा कारकून लुच्चा, लफंग्या असला तर तो खोटाच पुरावा मांडून न्यायाधिशाला फसवील. तसेंच कारकुनालाहि खरा पुरावा केव्हां मांडतां येईल, ज्या वेळीं त्याला माहिती करून देणारे शिपाईप्यादे (ज्ञानेंद्रियें) हे सच्चे असतील तेव्हां. तेव्हां ध्यान, ज्ञानभक्तींनें बुद्धि शुद्ध करावयाची म्हणजे बुद्धि, मन व इंद्रियें शुद्ध करावयाचीं. अशा प्रकारें इंद्रियें, मन व बुद्धि

हीं शुद्ध झालीं म्हणजेच त्यांना सत्यासत्य विवेक करतां येईल. तीं जर अशुद्ध, अपवित्र असतील तर सत्याचें म्हणजेच परमेश्वराचें ज्ञान त्यांना होणार नाहीं. आत्म्याची शक्ति काय याविषयीं थोडासा विचार केल्याशिवाय ही परंपरा पूर्ण होणार नाहीं.

आपण इंद्रियांच्या द्वारां निरनिराळे सृष्टींतील पदार्थ पहातों, अगर अनुभवतों. सृष्टिज्ञान म्हणजे काय ? सृष्टिज्ञान हा जड पदार्थ नसून इंद्रियांच्याद्वारें मनावर घडलेल्या अनेक संस्कारांचें पहाणारा आत्मा जें एकीकरण करतों त्याचें ज्ञान हें फल आहे. [गी. र. २१२]

जगांतील इंद्रियद्वारां गोचर होणाऱ्या वस्तु नामरूपात्मक असतात. त्या पालटतात अगर नष्टहि होतात. पण मूळ द्रव्य हें सत्य म्हणजे अविनाशी आहे. सत्य याचा अर्थ अव्यय व अविकारी असा आहे. तेव्हां या मूळ द्रव्याचा व आत्म्याचा संबंध काय हें पाहिलें पाहिजे. बाह्य सृष्टींतील नामरूपानें आच्छादिलेलें अविनाशी तत्त्व आणि आपल्या शरिरांतील बुद्धीपलीकडचें आत्मतत्त्व हीं दोन्ही एकच म्हणजे एकजिनसी, अमर व अव्यय आहेत. म्हणजेच, जें पिंडीं तें ब्रह्मांडीं किंवा ' तत् त्वं असि ' असा परब्रह्म व आत्मा यांचा संबंध आहे. [गी. र. २२४–२५]

सत्य शब्द हाहि शेवटीं निरुपयोगीच ठरतो. कारण शेवटच्या स्थितींत अमुक सत्य किंवा अमुक असत्य असा भेदाभेद रहात नाहीं. पण सत्य शब्दाला ज्या मर्यादेपर्यंत लौकिक अर्थ आहे, त्या मर्यादेपर्यंत आपण त्याचें महत्त्व जाणूं शकूं व विवरण करूं शकूं. ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, मन व बुद्धि हीं शुद्ध करण्याचा प्रयत्न करणें हें तर सत् तत्त्व जाणण्याचें मुख्य साधन आहे. अर्थात् तो प्रयत्न करणें हें अध्यात्मशास्त्रदृष्ट्या आवश्यकच ठरतें. अहिंसेचा व सत्याचाहि अध्यात्मशास्त्रांत संबंध लागतो. बुद्धि शुद्ध करण्याकरतां ज्ञान एक साधन आहे, असें रहस्यकारांनीं सांगितलें आहे. गीतेच्या १३ व्या अध्यायांत ७ व्या श्लोकांत अहिंसेचा उल्लेख आहे. तेथें अहिंसा हें ज्ञानाचें लक्षण सांगितलें आहे. अहिंसेचें जो पालन करील तो ज्ञानी समजावा. अशा ज्ञानी पुरुषाची बुद्धि शुद्ध असते या शुद्ध बुद्धीला अनेकांत असणारें एकत्वाचें सत्तत्त्व कळतें.

सत्य व अहिंसा हे दोन शब्द प्रातिनिधिक आहेत. वेदांतशास्त्राच्या प्रणालीमध्यें असे कितीतरी शब्द आहेत कीं, ज्यांच्यावर आपल्याला अध्यात्म रचतां येईल. सत्य अहिंसेच्या ऐवजीं शुद्ध बुद्धि व अनहंकार हे शब्द एखाद्यानें उपयोगांत आणले असते तर त्यांचाहि संबंध आपण पिंडब्रह्मांडापर्यंत लावूं शकलों असतों. पण शब्दाकरतां अध्यात्म्य हें अडून रहात नाहीं; त्याचप्रमाणें व्यवहारहि अडत नाहीं. संन्यास, उपासना हे शब्द भिन्न असले तरी ते नामरूपतः भिन्न आहेत. ते ज्या ध्येयाकडे नेत आहेत, तें ध्येय एकच आहे. नुसता संन्यास म्हटल्यानें कांहीं मोक्ष मिळत नाहीं. त्याकरतां एक विशिष्ट प्रणालि बनत असते.

तेव्हां सत्य व अहिंसेचा उद्देश बुद्धि शुद्ध करून आत्मतत्त्वाची ओळख पटणें हाच आहे. हिंसायुक्त व असत्य वृत्तीनें कोणाला ज्ञानप्राप्ति होणार नाहीं. खिश्चन, बुद्ध व जैन धर्मांत हीच अहिंसावृत्ति विस्तारानें विवेचली आहे. बायबलांतील शंभर उतारे एका पंडितानें काढून ते गीतेच्या श्लोकांशीं तंतोतंत जुळतात असें त्यानें म्हटलें. त्यावरून गीतेनें बायबलचा आधार घेतला असें त्या पंडिताचें म्हणणें. (गी. र. ५८०). तशींच साम्यस्थळें बुद्धाच्या व जैनांच्या धार्मिक ग्रंथांतहि आढळतात. सत्य व अहिंसा हीं अमान्य व त्याज्य मानणारा कोणताहि धर्म नाहीं. अर्थात् सर्वच धर्म अहिंसेवर व सत्यावर सारखाच जोर देतात असें मात्र नाहीं. द्रष्ट्याच्या दृष्टीला पूर्णावस्थेला पोहोंचविणारा जो भाग जास्त महत्त्वाचा वाटला, त्यावर त्यानें जास्त जोर दिला इतकाच त्याचा अर्थ आहे. कोणाला तपश्चर्येचें, कोणाला भक्तीचें, कोणाला योगाचें, कोणाला ध्यानाचें, कोणाला समाधीचें असें निरनिराळ्या द्रष्ट्यांना निरनिराळ्या साधनांचें महत्त्व वाटणें स्वाभाविक आहे. पण त्यामुळें इतर गोष्टी त्यांना मान्य नाहींत असा कोणीहि अर्थ करूं नये.

म. गांधी हे सत्यावर अत्यंत भर देणारे. ते म्हणतात, " तुमच्या सर्व शक्ति सत्यावर केंद्रित करा. तुमच्या श्वासोच्छ्वासांतून सत्याशिवाय कांहीं बाहेर पडतां कामा नये. सत्य म्हणजे नुसतें खरें बोलणें नव्हे. विचार, उच्चार व आचार यांत सत्य असलें पाहिजे. ज्याला हें सत्य

कळलें त्याला कोणतेंहि ज्ञान होण्याचें राहिलें नाहीं. कारण सर्व ज्ञान सत्यांत अंतर्भूत झालें आहे. खऱ्या ज्ञानाशिवाय अंतर्गत शांति नाहीं. ही सत्याची न चुकणारी कसोटी कशी लावावयाची हें आपणांस समजलें तर आपणांला करण्याला योग्य काय, पहाण्याला योग्य काय व वाचण्याला योग्य काय हें तावडतोब कळेल. पण हें सत्य कसें समजावयाचें ? गीता म्हणते अभ्यासानें व वैराग्यानें. पण हा अभ्यास केला तरी एकाला जें सत्य दिसेल तें दुसऱ्याला असत्य दिसेल. पण त्याची साधकानें चिंता करूं नये. प्रामाणिक प्रयत्न केला म्हणजे आपल्याला असें कळून येईल कीं, जीं आपणाला निरनिराळीं सत्यें दिसतात तीं एकाच झाडाच्या असंख्य निरनिराळ्या पानांप्रमाणें असतात. भक्तांना परमेश्वर निरनिराळ्या रूपांत दिसत नाहीं का ? पण तो एकच आहे. सत्य हेंच त्याचें खरें नांव. तेव्हां प्रत्येकानें आपल्या अंतःप्रकाशाप्रमाणें सत्याचें संशोधन केलें तर त्यांत चूक नाहीं. या सत्यानुसरणांत प्रमाद झाला तर तो आपोआप दूर होईल. सत्य-संशोधनांत तपाचा अंतर्भाव होतो. आत्मक्लेश किंबहुना मृत्युहि त्यांत येतो. त्यांत स्वार्थाला यत्किंचित् जागा नसते. म्हणून सत्याचरण म्हणजेच खरी भक्ति होय. हाच मार्ग देवाकडे नेतो. या मार्गांत भित्रेपणाला किंवा पराभवाला स्थान नाहीं. ''

सत्यालाच परमेश्वर म्हटल्यानंतर व त्याकरतां सर्व आयुष्य खर्च करावयाचें ठरविल्यानंतर दुसरा पुरुषार्थच उरत नाहीं. **तेव्हां गांधीवाद म्हणजे सत्यवाद आहे.** जितकें जितकें सत्याचरण एखाद्या व्यक्तीकडून होईल, तितकी तितकी ती व्यक्ति गांधीवादी किंवा सत्यवादी आहे असें म्हणतां येईल. अहिंसेनें तरी दुसरें काय मिळवावयाचें आहे ? अहिंसेचें प्राप्तव्य सत्यच आहे. सत्याची अहिंसेच्या मार्गानें उपासना करणें हेंच गांधीवाद सांगतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ' परमेश्वराची प्राप्ति प्रेमाच्या मार्गानें होऊं शकते ' हेंच गांधीवादांत सांगितलें आहे. सत्यस्वरूपी परमेश्वराची प्राप्ति अहिंसेनें करा हाच गांधीवादाचा संदेश आहे.

कांहींजणांना परमेश्वर वगैरे मान्य नसतो. ते निरीश्वरवादी

असतात. त्यांच्याकरतां गांधीवाद नाहीं, असा वरील लक्षणाचा अर्थ होईल. पण ज्यांना सत्य कळूं शकतें त्यांची अशी स्थिति होणार नाहीं. आणि सत्याची योग्यता कोणाला कळत नाहीं ? तेव्हां प्रेमाच्या मार्गानें आपण गेलों म्हणजे सत्याची प्रचीती आपल्याला होतें हें समजणें कठीण नाहीं.

कांहींजण म्हणतात तुम्ही जें अत्यंत श्रेष्ठ प्रतीचें सत्य म्हणतां तें अध्यात्माच्या दृष्टीनें ठीक आहे. 'तत्त्वमसि' ह्याची जाणीव होण्यास सत् तत्त्व कळणें जरूर असेलहि. पण रोजच्या व्यवहारांत अशी सत्याचरणाची, सत्य भाषणाची व सत्यचिंतनाची कसोटी तुम्ही लावूं पहाल तर सारा व्यवहार चुकेल. तेव्हां कृपा करून सत्याचे तीन भाग पाडा. (१) व्यावहारिक, (२) नैतिक, (३) आध्यात्मिक. यांपैकीं आध्यात्मिक सत्याला तुम्ही वाटेल तितकें वरच्या पायरीवर चढवा. आमची त्याला ना नाहीं. पण सामान्य व्यवहारांत खरें बोलून चालत नाहीं. नैतिक क्षेत्रांतहि सत्यासत्य विवेक करावा लागतो. जगांत खोटें बोलणें भागच पडतें. आपणच सत्य बोलूं लागलों तर आपला व्यवहार ठार बुडेल व खोटें बोलणारा श्रीमंत होईल. अशी ही सत्यासत्य विवेकाची अडचण उभारली जाते. ही अडचण कितपत खरी आहे याचा आपण विचार करूं.

व्यवहारांतील सत्य : : ६

गांधीवाद जैसी कोई भी वस्तु नहीं हैं। मैने कोई नयी चीज हिन्दुस्तान के सामने रखी नहीं है। प्राचीन वस्तु को नये ढंग से रखी है। सर्वोदय
१।१९३८

एखाद्या व्यापाऱ्याकडे आपण माल घ्यावयास गेलों व त्याला मालाचा भाव विचारला तर तो भाव कमी अधिक सांगतो. आपल्यालाहि कमींत कमी भावांत माल घेण्याची संवय लागलेली असते. तेव्हां जसें गिऱ्हाईक तसा मालक. दुकानांत आलेलें गिऱ्हाईक जाऊं द्यायचें नाहीं असा कांहीं व्यापाऱ्यांचा बाणा असतो. तेव्हां ते गिऱ्हाईक मागेल त्या भावांत माल देतात. पण हेंच गिऱ्हाईक जर उधारीचें असेल व ह्या उधारीची वसूली सुगीच्या दिवसांत होणार असेल तर दुकानदार म्हणेल तो भाव गिऱ्हाइकाला कबूल करावा लागतो. व्यापारी व गिऱ्हाईक हे दोघेहि प्रामाणिक असले तर व्यवहार सत्यानें होऊं शकेल. व्यापारी म्हणेल कीं, मला एवढ्याला माल पडला

आहे, त्यावर एवढा नफा मी घेणार आहे. समजूतदार गिऱ्हाईक तेवढी किंमत द्यावयास खुषीनें तयार होतें, पण सारींच गिऱ्हाइकें समजूतदार नसतात. तसेंच, सारेच व्यापारी वाजवी नफा घेऊं इच्छित नसतात. गिऱ्हाईक पाहून ते नफ्याचें प्रमाण वाढवतात. सांगण्याचें तात्पर्य असें, व्यापारी म्हणतात कीं, सत्यानें व्यापार करणें शक्य नाहीं, खोटें बोलल्याशिवाय व्यापारच होणार नाहीं. जोंवर समाज खोटें बोलणारा आहे, तोंवर व्यापारी वर्ग खरें बोलूं शकणार नाहीं, असें या वर्गाचें म्हणणें.

वकील वर्ग हा तर धंदेवाईक खऱ्याखोट्यांचा व्यापारी. न्यायाचा व सत्याचा संबंध जरी नजीकचा असला तरी जें असत्य अगर अर्धसत्य असतें, तें सत्य आहे असें भासवून वकील वर्ग आपल्या अशीलांना न्याय मिळवून देतो. सत्याची व न्यायाची ओढाताण जितकी न्यायमंदिरांतून होते, तितकी इतरत्र क्वचित् होत असेल. फौजदारी गुन्ह्यांत तर वकील व आरोपी यांचा प्रयत्न सत्य लपविण्याचा असतो. बुद्धिवान् वकील कुठें तरी पळवाट शोधून काढून मॅजिस्ट्रेटच्या मनांत, निदान संदेह तरी निर्माण करतो व आपल्या कुळाला बचावतो. गांधीवाद व वकीलवर्ग यांचें कधींच जमणार नाहीं. कारण अगदीं प्रामाणिक वकील असला तरी त्याला असत्य बोलावें अगर लिहावें लागतें, निदान सत्य लपवावें तरी लागतें. जो वकील आरोपीचा गुन्हा कबूल करील त्याचा धंदा चालणारच नाहीं. अशा वकीलाकडे कोणता पक्षकार जाणार ? आणि गुन्हाच कबूल करायचा असेल तर वकील काय करायचा ? हजारों लोकांच्या समक्ष एकादा गुन्हा घडला असला तरी मी गुन्हा केला नाहीं, असें धडधडीत असत्य आरोपी सांगतो व वकील त्याचा बचाव करतो ! तेव्हां सत्य व वकीली यांचें सूत जमणार नाहीं असें वकील सांगतील.

सर्व प्रातिनिधिक संस्था ह्या वकीली करणाऱ्यांच्या संस्था आहेत. अर्थात् त्या संस्थांतील लोकनियुक्त सभासद हे ज्या वर्गाची किंवा ज्या हितसंबंधांची वकीली करतो, तो वर्ग त्यांना वकिलाप्रमाणें पैसे मोजीत नाहीं. कायदेमंडळें, स्थानिक स्वराज्य–संस्था, किंवा जेथील कारभार

अल्पमत व बहुमताचे योगानें चालतात अशा संस्थांतील सभासदांना वारंवार सत्य लपवावें लागतें व असत्याचें समर्थन करावें लागतें. अशा संस्थांत वैयक्तिक हितापेक्षां जनतेच्या हिताचाच प्रश्न अधिक महत्त्वाचा असल्यामुळें तेथें बोलली जाणारी असत्यें हीं मुत्सद्देगिरीच्या नांवाखालीं खपतात. तेथें सत्यभाषणी लोक नसतात असें नाहीं. पण त्यांचें सत्यप्रेम जर प्रभावी नसेल तर त्यांचें तेज पडत नाहीं. अशा संस्थांत सत्य बोलणारी व वागणारी माणसें येणेंहि फार कठीण असतें. पण जर सत्याचा प्रभाव व प्रसिद्धि जास्तींत जास्त व लौकर कोठून होण्याचा संभव असला तर अशाच संस्थांतून. ज्याला स्वार्थ नसतो असाच प्रतिनिधि या संस्थांत सत्याची जोपासना करूं शकेल. विद्यार्थी, शिक्षक, डॉक्टर, कारकून वगैरे वर्गांत असत्य बोलण्याचें प्रलोभन इतकें दांडगें नसतें. पण तेथेंहि सत्यासत्याचा विधिनिषेध कितीजण बाळगतात ? दुसऱ्याकडून गणित सोडवून घेऊन मीं तें सोडविलें असें शिक्षकाला सांगणारा विद्यार्थी, आजारी नसतां आजारी असल्याच्या चिठ्ठ्या पाठविणारे शिक्षक, आजारी असल्याचीं खोटीं सर्टिफिकिटें देणारे डॉक्टर्स आणि भत्त्याकरतां खोटीं बिलें करणारे व संधी सांपडतांच लांच खाणारे सरकारी नोकर हें काय आपण पहात नाहीं ? शेतकरी व कामकरी, जमीनदार व गिरणीमालक वर्गहि याला अपवाद नाहीं. किती शेतकरी आपल्या शेतांत इतकें इतकें पीक आलें असें खरेपणानें जमीनदाराला सांगतात ? किती कामकरी प्रामाणिकपणें आपलें काम करीत असतात ? यांत कोणत्याहि एका वर्गाला दोष द्यावयाचा उद्देश नाहीं. आपल्याला सर्वच वर्गांत सामान्यतः जी प्रवृत्ति दिसते ती पहावयाची आहे. खोटें माप देणारा वाणी, दुधांत पाणी घालणारा गवळी, कापड चोरणारा शिंपी, खोट्या बातम्या देणारे व खोट्या टीका करणारे वृत्तपत्रकार, समाजांत कितीतरी माणसें अशा वृत्तीचीं सांपडतात ! अशा लोकांमुळेंच समाज व राष्ट्र खालीं खालीं जात असतें.

अशा वृत्तींच्या लोकांचा धिक्कार होण्याऐवजीं त्यांचा गौरवच केला जातो. सत्याचा प्रचार होऊं लागला व त्यावर भर दिला जाऊं लागला

म्हणजे त्याला अडवण्याकरतां असत्याचरणाचीं मोहक उदाहरणें दिलीं जातात. विवेकानेंच सत्य बोलावें असेंहि सांगण्यांत येतें. अडवणुकीकरतां जीं असत्याचीं उदाहरणें पुढें टाकलीं जातात त्यांतील कांहीं पुढें देतों.

कसाई व गाईचें उदाहरण प्रसिद्धच आहे, तेव्हां तें देण्याची जरूरी नाहीं. गीतारहस्यांत असेंच दुसरें उदाहरण घेतलें आहे. ' समजा कीं, कांहीं मनुष्यें दरवडेखोरांच्या हातांतून निसटून तुमच्या देखत दाट रानांत दडून राहिलीं आणि मागाहून हातांत तरवार घेतलेले दरवडेखोर येऊन तीं मनुष्यें कोठें गेलीं म्हणून तुम्हांस विचारूं लागले, तर तुम्हीं काय उत्तर द्याल ? सत्य बोलाल का निरपराधी प्राण्यांचे जीव बचावाल ? कारण निरपराधी प्राण्यांची हिंसा बंद करणें हा शास्त्राप्रमाणें सत्याइतकाच धर्म आहे. '

म. गांधींनीं हिंद-स्वराज्यांत एका डॉक्टरचें उदाहरण घेतलें आहे. रोगी मरणार हें डॉक्टरला कळल्यावर त्यानें ती अशुभ वार्ता त्या रोग्याला अगर नातेवाइकाला कळवावी का कळवूं नये ? रोग्याला कळवली तर कदाचित् तो धक्क्यानें अगोदरच मरेल किंवा नातेवाइकांना कळवली व ते जर धीर सोडून आक्रोश करूं लागले तर त्याचाहि रोगी मरण्यांतच शेवट होईल. तेव्हां त्यानें काय करावें ? सत्य बोलून मरण जवळ आणावें का असत्य बोलून वेळ मारून न्यावी ?

एखादा राजकीय खुनी इसम तुमचेकडे आला व तुम्ही त्याला आपले घरीं आश्रय दिलांत. पुढें पोलिसांना तुमचेकडे असा इसम असल्याबद्दल सुगावा लागला व त्यांनीं तुम्हाला त्या इसमाविषयीं विचारलें. तर तुम्ही काय उत्तर द्याल ? खोटें सांगाल तर तो दहशतवादी जगेल आणि खरें सांगाल तर फांसावर चढेल. तेव्हां खरें सांगावें का खोटें सांगावें ?

मुंबईसारख्या शहरांत जातीय दंगा माजला. तुमच्या साहेबी पोषाखावरून तुम्ही कोणत्या जातीचे आहां हें दंगेखोरांना कळत नाहीं. ते तुमची जात विचारतात व खरी जात सांगितली तर तात्काळ मरणें आणि खोटी सांगितली तर जगणें. तेव्हां खरें बोलावें का खोटें बोलावें ?

स्वतःचे किंवा परक्यांचे प्राण असत्य भाषण करून जर वांचवितां येत असतील तर ते वांचवावेत कां वांचवूं नयेत हा या उदाहरणांत अंतर्भूत झालेला प्रश्न आहे.

महाभारतांत खालील पांच ठिकाणीं खोटें बोललें तर पातक नाहीं असें म्हटलें आहे. (१) थट्टेमध्यें, (२) स्त्रियांच्याजवळ, (३) विवाहकालीं, (४) प्राणावर संकट आलें असतां, (५) सर्व धनाचा अपहार होत असला तर. (म. भा. ८२; १६)

इतर धर्मांत, व्यापारांत आणि सत्कृत्याकरतां खोटें बोलण्याला मोकळीक आहे. असत्य बोलून जर राष्ट्रहित साधत असेल किंवा धर्म वाढत असेल तर अवश्य असत्य बोलावें असें म्हटलें आहे. हेतु चांगला असला म्हणजे झालें; खऱ्याखोट्याचा विधिनिषेध बाळगूं नये असें कांहीं धर्म सांगतात.

महाभारतांत जीं अनृत बोलण्याचीं पांच ठिकाणें सांगितलीं आहेत त्यांचा अंतर्भाव पातकांत होत नाहीं असें म्हटलें आहे. (पंचानृतान्याहुरपातकानि) हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

थट्टेंत आपण कोणतीहि गोष्ट मनापासून बोलत नाहीं. सर्व वरवर असतें. विनोद निर्माण करून हंसण्या व हंसविण्याकडे आपली प्रवृत्ति त्यांत असते. या थट्टेंत अतिशयोक्ति असते. एखाद्याला खंडीभर मुलें आहेत, असें एखादा मनुष्य म्हणतो, तेव्हां त्याचा उद्देश असत्य भाषण करण्याचा नसून निवळ विनोद करण्याचा आहे हें सांगणारा व ऐकणारा जाणून असतो. पत्नी जवळ बोलतांना जर थट्टा करावयाची असेल तर प्रश्न वेगळा. पण जर गांभीर्यानेंच बोलावयाचें असेल तर खोटें बोलणें अक्षम्य आहे. स्त्रियांना लहान मुलें किंवा वेडीं किंवा आजारीं माणसें या सदरांत घालून त्यांच्याशीं कांहींच गंभीर बोलूं नये, असा महाभारतकारांचा उद्देश असल्यास न कळे. ' विवाहकालीं असत्य बोलणें हें पातक नाहीं. ' या वचनावरून त्या काळीं विवाह होणें म्हणजे एक युद्ध होण्याइतकेंच कठीण मानीत कीं काय कळत नाहीं. आज सुद्धां खोटें बोलून लग्न जमत असेल तर त्यांत कांहीं पाप नाहीं असें समज-

तात. पूर्वी मुली पहात नसत, त्यांच्या कुंडल्याच पहात. तेव्हां मुलगी मुकी किंवा आंधळी असली तरी अव्यंग आहे असें मध्यस्थ सांगत आणि एकाच्या कुंडलींत पापग्रह असला तर दुसऱ्याची कुंडली बदलून देत. हल्लीं अशीं लग्नें कोणी करीत नाहींत. पण मुलीचें पाऊल वांकडें पडलें असलें तर तें सत्य वरपक्षाला सांगून कोणी लग्न मोडणार नाहीं; किंवा मुलगा व्यसनी अगर त्याच्या घराण्यांत आनुवंशिक रोग असला तर ती गोष्ट कोणी प्रकट करणार नाहीं. तेव्हां विवाह जमविणें हा उदात्त हेतु असल्यामुळें असत्य बोलण्यांत कांहीं पातक नाहीं हें आपल्या शास्त्रकारांनीं सांगितलें आहे.

प्राणावर संकट येणें म्हणजे सर्वच जाणें आणि सर्व धनाचा अपहार होणें म्हणजे भिकारी होणें. तेव्हां खोटें बोलायला काय हरकत आहे असें लोक विचारतील. कायदेभंगाच्या चळवळींत भाग घेतला तर सरकार आपली सर्व मालमत्ता जप्त करील किंवा जबर दंड झाला तर तो मालमत्ता विकून वसूल केला जाईल या भीतीनें संपत्तिवानांनीं मालमत्तेचे हातबदल करून टाकले. तसें करण्यांत सत्याग्रहींहि आपण असत्य करतों असें म्हणत नाहींत. कांहींच्या वडिलांनीं मुलांच्या मालमत्तेवरील हक्क उडवावेत तर कांहींनीं आपला वडिलार्जित संपत्तीवर हक्क नाहीं असे कागद करून ठेवावेत. कायद्याला फसविण्याकरतां या सर्व युक्त्या. जो अशा युक्त्या जास्त योजील तो जास्त व्यवहारचतुर समजला जातो. महाभारतांत सांगितलेल्या या अपवादांना गांधीवाद मान्यता देऊं शकणार नाहीं आणि अमुक प्रसंगीं असत्य बोललें असतां पातक लागत नाहीं, असें म्हणणार नाहीं. एकदां असत्य भाषणाला परवानगी दिली व सत्य केव्हां बोलावें आणि असत्य केव्हां बोलावें हें व्यक्तीच्या विवेचक बुद्धीवर सोपविलें म्हणजे सत्यासत्यविवेकच नष्ट होईल. मनुष्य जें असत्य बोलतो तें स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या फायद्याकरतांच बोलत असतो ना ? ज्याला आध्यात्मिक उन्नति हवी असेल, तो व्यावहारिक स्वार्थ टाकून देईल व संकटाबरोबर झगडेल.

महाभारतांत जे अपवादात्मक पांच प्रसंग सांगितले त्यांमुळें पुण्य लागेल असें म्हटलें नसून पाप लागणार नाहीं, एवढेंच म्हटलें आहे.

अश्वत्थामा मेला असें धर्मराज म्हणाले, त्यामुळें द्रोणाचार्य शोकमग्न झाले, त्यांच्या हातांतून शस्त्र पडलें आणि सशस्त्र द्रोणाचार्यांना मारणें अशक्य झाल्यामुळें त्यांना निःशस्त्र करण्याची ही युक्ति धर्मराजाकडून करवली व त्यांचा वध केला. द्रोणाचार्यांनीं शस्त्र टाकून दिल्यावर धर्मराज म्हणाले कीं, अश्वत्थामा नांवाचा हत्ती मेला, म्हणजेच द्रोणाचार्यांचा पुत्र अश्वत्थामा मेला नाहीं. धर्मराज जरी शेवटीं 'अश्वत्थामा गज' मेला असें म्हणाले असले, तरी त्यांचा उद्देश असत्य बोलण्याचा होता. त्यामुळें त्या दिवसापासून धर्मराज पतित झाले व जमिनीच्यावर चार अंगुलें चालणारा त्यांचा रथ इतर रथाप्रमाणें जमिनीवरून चालूं लागला व घटकाभर त्यांना नरकलोकांत रहावें लागलें, असें महाभारतांतच सांगितलें आहे.

कांहीं कांहीं प्रसंगीं असत्य बोलावें लागतें, तें श्रेयस्कर असतें, असें श्रीकृष्णांनीं (श्रेयस्तत्रानृतं वक्तुं सत्यादिति विचारितम्) अर्जुनास कर्णपर्वांत (६९. ६१) सांगितलें आहे, आणि त्यांतला एक प्रसंग दरवडेखोरास लोक कोठें जंगलांत पळून गेले आहेत हें न सांगण्याचा. अशा असत्यभाषी गृहस्थाला निरपराध्यांचे प्राण वांचविल्याबद्दल धन्यवाद मिळतो, का त्याला शासन होतें हें धर्मराजाच्या रथाप्रमाणें प्रकट झालें नाहीं. श्रीकृष्ण विशिष्ट प्रसंगीं खोटें बोलणें क्षम्य मानतात. महाभारत, मनुस्मृति वगैरे धर्मग्रंथहि तसेंच सांगतात, आणि प्रसंगहि जीवन-मरण्याचे येतात. अशा परिस्थितींत गांधीवाद जर असत्य बोलूं देत नसेल तर तो वाद अधार्मिक व अनैतिहासिक आहे. आमचा धर्म बरोबर आहे असें अनेक जण सांगतील.

पण ज्या महाभारतांत विशिष्ट प्रसंगीं असत्य बोलण्यांत पाप नाहीं असें म्हटलें आहे तेंच महाभारत सांगतें.

> आत्महेतोः परार्थे वा नर्महास्याश्रयात्तथा ।
> ये मृषा न वदन्तीह ते नरा स्वर्गगामिनः ।

'स्वार्थाकरतां, परहिताकरतां, किंवा थट्टेनें या जगांत जे खोटें बोलत नाहींत, त्यांसच स्वर्ग प्राप्ति होते' [अनुशासन पर्व १४४. १९]

उच्च स्वार्थाकरतां किंवा उच्च परार्थाकरतां असत्य भाषण करणारे

हे पापी नाहींत, असें जरी धर्मग्रंथ सांगत असले तरी ते पुण्यवान् नाहींत हेंहि खरें. कोणत्याहि प्रसंगीं खोटें न बोलणारे हेच खरे पुण्यवान्, व तेच स्वर्गाला जातात असें महाभारत सांगतें. चोरापासून किंवा दरवडे-खोरापासून निरपराध्यांना बचावणारा हा असत्य बोलत असला तरी प्राण वांचविण्याचें महत्कार्य त्याच्या हातून होत असल्यामुळें तो पापी ठरत नाहीं हें खरें आहे. स्वतःच्या किंवा आपल्या नातेवाइकांच्या स्वार्थाकरतां खोटें बोलणाऱ्यापेक्षां हा निस्वार्थी खोटें बोलणारा निःसंशय चांगला यांत वाद नाहीं. पण हेतु कितीहि उच्च असला व श्रेय का प्रेय असा प्रश्न पुढें उभा राहिला, म्हणजे जो श्रेयाला—आपल्या व्रताला—चिकटून रहातो तोच श्रेष्ठ होय. महाभारताच्या अनुशासन पर्वांत जो सत्यासंबंधीं दण्डक सांगितला आहे, तोच गांधीवादांत अभिप्रेत आहे. गांधीवाद जेथें सत्याला परमेश्वर म्हणतो, तेथें तो सत्याच्या बाबतींत तारतम्यानें वाग असें कसें म्हणेल ? तो वाद सत्याच्या बाबतींत ' जडवत् आचरेत् ' घुम्यासारखे वागा असेंहि सांगत नाहीं. गाय कुठें आहे असें विचारलें असतां गांधीवादी वेड्याचें सोंग आणणार नाहीं, गाय पूर्वेकडे गेली असतां ती पश्चिमेकडे गेली असें असत्य सांगणार नाहीं, किंवा कोठें गेली तें मला माहीत नाहीं, असा सत्यापलापहि करणार नाहीं. तो एक तर सांगेल कीं, ' गाय कोठें गेली हें मला माहीत आहे, पण मी तें तुला सांगणार नाहीं ' किंवा तो म्हणेल ' माझ्या बरोबर चल मी तुला गाय दाखवतों; पण तिच्यावर हात टाकण्यापूर्वी तुला माझ्या प्रेतावरून जावें लागेल. अशा प्रकारें सत्याचें व गाईचें रक्षण करीत असतां त्याला स्वतःच्या प्राणाला मुकावें लागेल. पण सत्याग्रहीनें मरणाला केव्हांही तयार असले पाहिजे. मरणाचें भय सत्याच्या आड येतां कामा नये. जो स्वतःच्या किंवा परक्यांच्या मरणाला भिऊन असत्य सांगतो, तो कदाचित् मरणापासून त्यांचा बचाव करूं शकेल, पण स्वतःच्या आध्यात्मिक हानीपासून त्याचा बचाव होणार नाहीं. ह्या हानीला जो तयार असेल त्यानें असत्य बोलावें, त्यांत पाप लागणार नाहीं.

जे असें म्हणत असतील कीं, अशा गोंधळून टाकणाऱ्या प्रसंगीं सत्य बोललों तरी मी स्वर्गी जाईन हें सांगणेंच मुळीं खोटें आहे; कारण

सांगणाऱ्यानें स्वर्ग कधीं पाहिला आहे! अशा बुद्धिवादी लोकांना हें गांधीवादाचें आत्यंतिक स्वरूप पटणार नाहीं. ते म्हणतील धडधडीत दिसणाऱ्या अन्यायाला दूर सारून सत्यरक्षण करणें हीच चूक आहे. पण गांधीवाद इतर लौकिक किंवा पारलौकिक, बुद्धिग्राह्य किंवा भावनाग्राह्य विकारांना कवटाळून सत्याचें सुकाणूं सोडूं इच्छित नाहीं हेंहि तितकेंच खरें आहे.

गांधीवादी महाभारतांत सांगितलेल्या अपवादात्मक असत्यांचा धिःकार करणार नाहीं. जो तो आपापला आदर्श निवडीत असतो. सत्याकरतां आपल्या राज्याचें, बायकोमुलांचें बलिदान करणारा हरिश्चंद्र हा गांधीवादाचा आदर्श ठरेल. नारायण नांवाचा उच्चार तूं करूं नकोस आणि केलास तर तुला जाळीन, कड्यावरून ढकलीन, कढईत तळीन इत्यादि धाकांना न जुमानणारा व नारायणाचा जप न सोडणारा प्रल्हाद हा गांधीवादाचा आदर्श ठरेल. पित्याची आज्ञा प्रमाण मानून वनवास पत्करणारा सत्यवचनी राम हा सत्यापुरता गांधीवादाचा आदर्श ठरेल. श्रीकृष्णाच्या विरुद्ध गांधीवाद कांहीं सांगत नाहीं; पण श्रीकृष्ण हा गांधीवादाचा आदर्श ठरेल असें वाटत नाहीं. विशिष्ट प्रसंगीं असत्य बोलावें लागतें आणि विशिष्ट प्रसंगीं हिंसा करावी लागते असें सांगणारा श्रीकृष्ण जरी परमेश्वर असला तरी सत्याचें व अहिंसेचें तत्त्वज्ञान, हें अपवाद सुद्धां मानावयास तयार नसल्यामुळें गांधीवाद श्रीकृष्णाला आदर्श मानणार नाहीं. याचा अर्थ त्याला देव, सर्वज्ञ वगैरे मानावयास तयार नाहीं असें नाहीं. पण प्रत्येकाचे देव निराळे असतात आणि हिंदुधर्मांत तर असंख्य देव आहेत. एका देवाचा भक्त हा दुसऱ्या देवाचा निंदक नसतो. तेव्हां रामाला आदर्श मानल्यानें कृष्ण कमी ठरत नाहीं. पण ही तुलना येथेंच सोडणें बरें.

दुसऱ्याचे प्राण वांचविण्याकरतां असत्य बोलण्याचा उपदेश करणाऱ्या विरुद्ध जरी कांहीं सांगावयाचें नसलें तरी इतिहासांत अलौकिक त्यागाचीं अशीं कांहीं उदाहरणें घडलीं आहेत कीं, ज्या उदाहरणांपुढें आपण मस्तकच नमवलें पाहिजे. पन्नादाईचें उदाहरण किती थोर व उदात्त

आहे. या दाईनें बालराजाचा वध करण्याकरतां त्याचा शत्रु येणार व त्याला ठार करणार असें पहातांच आपल्या लहान मुलाला त्या पाळण्यांत निजवलें व 'कुठें आहे राजपुत्र' असें विचारतांच तिनें आपल्या मुलाकडे बोट केलें. स्वतःच्या डोळ्यांदेखत तिला आपल्या मुलाचा वध पहावा लागला. अपत्यप्रेमापेक्षां स्वामिभक्ति श्रेष्ठ असाच याचा अर्थ आहे. तिनें असत्य बोलून आपल्या मुलाचा प्राण वांचविला नाहीं, तर त्याचा प्राण घेवविला. अशा स्त्रीला असत्य बोलल्याबद्दल जर दोष दिला तर तिच्या अलौकिक त्यागाबद्दल तिला धन्यवाद दिले पाहिजेत.

मराठेशाहीच्या काळांत अशीं कांहीं उदाहरणें घडलेलीं आहेत. संभाजी राजांना पकडून नेल्यानंतर त्यांची पत्नी बालराजासह तेथून निसटते. पण वाटेंत मोंगलांकडून त्यांच्यावर घाला पडतो. त्यावेळीं गणोजी शिर्क्यांची बहीण मीच येसूबाई आहे असें सांगते व राणी-साहेबांची सुटका करते. पुढें राणीसाहेब सुखरूप गेल्यावर ती मुसल-मानांच्या अटकेंत पडलेली वीरस्त्री हिरकणी खाऊन आत्महत्त्या करते. अशा स्त्रीचें असत्य भाषण तिच्या स्वर्गाआड येणार असेल तर येवो; पण तिच्या अलौकिक त्यागाबद्दल तिला सद्गतीच प्राप्त होईल. अशाच प्रकारचीं अलौकिक उदाहरणें जगाच्या इतिहासांत अनेक घडतात, फक्त आपल्याला त्यांची माहिती नसते.

सत्यासत्य विचारांत आपण चार प्रकारचीं उदाहरणें पाहिलीं. (१) असत्य बोलून प्राण वांचविणारांचीं, (२) असत्य बोलून प्राण देणारांचीं, (३) सत्य बोलून प्राण वांचविणारांचीं (४) सत्य बोलून प्राण देणा-रांचीं. पहिल्या प्रकारांत धर्म राजाचें ' नरो वा कुंजरो वा ' येतें. त्यांच्या असत्य भाषणामुळें द्रोणाचार्य मेले, पण पांडव जगले व ते विजयी होण्याचा रस्ता मोकळा झाला. यांत पांडवांचे प्राण वांचण्यापेक्षां यश मिळणें हेंच प्राप्तव्य होतें. दुसऱ्या प्रकारांत पन्नादाईचें उदाहरण येतें. तिनें आपला मुलगा असत्य बोलून मारला. सत्य बोलून प्राण वांचले असे हरिश्चंद्र, प्रल्हाद. त्यांच्या सत्यनिष्ठेला भिऊन मृत्यु पळाला. हरिश्चंद्राच्या सत्य-निष्ठेमुळें विश्वामित्राच्या अंतःकरणांत बदल झाला व त्याचे प्राण वांचले.

प्रल्हादाचें तसेंच झालें. आतां उरला एकच प्रकार व तोच महत्त्वाचा प्रकार आहे. सत्य बोलेन, मृत्यु आला तरी सत्य सोडणार नाहीं; असें म्हणणारे फारच विरळा. धर्माकरतां संभाजीनें मृत्यूला कवटाळलें, देशाकरतां हजारोंजण मरतात, प्रेमाकरतांहि कांहींजण आत्महत्त्या करतात; किंवा संकटांत जीव घालतात. पण मृत्यु समोर उभा असतां मी सत्य सोडणार नाहीं असें म्हणणाऱ्यांचीं उदाहरणें फारच क्वचित् असतात. मृत्यु व सत्य हे तराजूच्या दोन कांड्यांत टाकून त्यांत सत्य श्रेष्ठ आहे—मरण्यालायक आहे—असें वाटण्याची प्रवृत्ति झाली पाहिजे. असें सत्यावर प्रेम किती जणांचें असतें ? हरिश्चंद्र सत्याकरतां मरायला तयार होता; प्रल्हादहि होता. पण दोघेहि वांचले. ते वांचले म्हणून त्यांचें सत्यप्रेम हिणकस होतें असें नाहीं. पण सत्याकरतां मेलेल्यांचें असें एक उदाहरण पुराणांत सांपडेल. तें उदाहरण म्हणजे ख्रिश्चन धर्मसंस्थापक येशू ख्रिस्ताचें.

येशू ख्रिस्त हा प्रेम, सेवा व सत्य यांचा उपासक. त्या काळच्या ज्यूंना त्याचा उत्कर्ष सहन होईना. जागोजाग हा गोसावडा जातो, त्याच्यामागें गांवेंच्या गांवें लागतात, तो चमत्कार करतो, मेलेल्यांना उठवतो, आणि आम्हा जुन्या सनातनी लोकांना धर्मबुडवे म्हणून शिव्या देतो ! येशू ख्रिस्ताच्या निंदेंत काय खोटें होतें ? पण प्रतिष्ठेला माणूस बळी पडतो आणि त्या प्रतिष्ठेकरतां सज्जनांचे प्राणहि घेतो.

बेथनीला येशूचें स्वागत अभूतपूर्व झालें. त्याच वेळीं येशूनें सोमवार व मंगळवारीं चर्चमध्यें प्रार्थनेच्या दरम्यान प्रवचनें केलीं. ज्यूंनीं त्याला अडविलें, प्रश्न विचारले, पण येशूनें त्यांना खोट्या धर्माचरणाबद्दल व ढोंगीपणाबद्दल इतकें फजीत केलें कीं, त्यांचीं तोंडें काळींठिक्कर झालीं. त्यामुळें तर त्यांचा राग वाढलाच. त्यांनीं फक्त ३० रुप्याचीं नाणीं देऊन ज्यूडासकडून येशूला पकडविलें; ज्यू चर्चच्या मुख्याधिकाऱ्यापुढें उभें केलें. उंदराला मांजरापुढें उभें करण्यासारखेंच होतें तें. त्याचें नांव अनास होतें. ती मध्यरात्र होती. तेथें कांहीं दुष्ट जमा झाले होते. खोट्या धर्मावर ते पोटें जाळीत होते. त्यांच्या आड येशू येत होता. त्याच्यापुढें येशू उभा राहिला. याच्यावर कसला आरोप लादावा हें त्यांना

ठाऊक नव्हतें. पण कांहीं गोष्टीं त्याच्याकडून निघाल्या तर आरोप बनवितां येईल असा त्यांनीं विचार केला. त्याला अनासनें विचारलें, ' तुझ्या शिष्यांबद्दल व तुझ्या शिवणुकीबद्दल माहिती दे. ' येशू म्हणाला, ' येथें जमलेल्यांना ती माहिती आहे. ते माझ्या प्रवचनांना हजर राहिलेले आहेत. ' जुन्या धर्मगुरूंचा हा अपमान होता. त्यांचे डोळे लाल झाले. त्याच्या आसपासच्या लोकांनीं असें बेमुर्वतखोर उत्तर दिल्याबद्दल येशूच्या तोंडांत लगावल्या. त्यानें मुकाट्यानें तो मार खाल्ला.

त्याला नंतर सॅनेड्रीमच्या कोर्टापुढें नेला. केआफस हा मुख्य धर्मगुरु होता. हा केआफस पूर्वीच म्हणाला होता कीं, हा माणूस ज्यूंच्या करतां मेलाच पाहिजे. अशा पंचायतीपुढें येशूचा खटला सुरूं होणार होता. पण त्याच्यावर काय आरोप लादावा हें मात्र कोणाला कळत नव्हतें. त्याला ठार मारण्यासारखा आरोप तयार करावयास हवा होता. त्याला पुष्कळ डिवचला तरी तो शांत व गंभीर होता. शेवटीं त्याला देवाची शपथ घालून विचारलें, ' तूं ईश्वराचा प्रेषित आहेस का नाहींस तें सांग ? ' येशूला उत्तर देणें भाग पडलें, " होय मी आहे. " " आतां आणखी साक्षी पुरावे काय करायचे आहेत, बोला पंच हो, ह्या देव-द्रोह्याला काय शिक्षा द्यायची ? " धर्मगुरूंनीं विचारलें. सर्वजण म्हणाले " देहदंडाची त्याला शिक्षा द्या. "

पण त्या पंचांना शिक्षा देण्याचा अधिकार नव्हता. आपल्या अभिप्रायासह त्यांना हे खटले रोमन कोर्टांत पाठवावे लागत. त्या-प्रमाणें आरोपपत्र व आपला अभिप्राय यासह त्यांनीं येशूला रोमन कोर्टांत पाठविलें. त्याला रस्त्यांतून कोर्टांत नेत असतां ज्यूंनीं त्याच्यावर लत्ताप्रहार, मुष्टिप्रहार किती केले असतील याची मोजदाद नाहीं. त्यांनीं त्याचे डोळे बांधले, त्याला मारलें आणि म्हटलें " अरे तूं देवदूत ना, मग सांग कोणीं तुला लाथा मारल्या ? "

पायलेट हा रोमन कोर्टाचा न्यायाधीश होता. त्यानें सकाळीं ७ वाजतां कोर्टाला सुरवात केली. पायलेटनें त्या ज्यूंना विचारलें. " काय याच्यावर आरोप आहेत ? " " (१) राष्ट्र बिघडवणें. (२) सीझरला

खंडणी न देणें. (३) आपण स्वतः देवदूत आहों–राजा आहों–असें म्हणणें, हे तीन आरोप आहेत. " ज्यूंचा पुढारी म्हणाला. पहिला आरोप गुळमुळीत होता. दुसरा आरोप खोटा होता. कारण येशूनें खंडणी देण्याचा उपदेश केला होता. पण तिसरा आरोप भयंकर होता.

" तूं ज्यूंचा राजा आहेस काय ? " पायलेटनें विचारलें. येशूला त्याचा रोख कळला नाहीं. " तुम्ही स्वतः हा प्रश्न विचारतां, का कोणी तुम्हांला तसें सांगतात म्हणून विचारतां ? मी राजेपदावर हक्क सांगतों असें आपल्याला विचारावयाचें आहे का मी देवदूत आहे असें जे ज्यू म्हणतात, त्याला अनुलक्षून तुम्ही मला हा प्रश्न विचारतां ? "

तुच्छतेनें पायलेट म्हणाला, " मी काय ज्यू आहे ? मला ज्यूंच्या प्रतिवृत्तांशीं काय करावयाचें आहे ? तुझ्या राष्ट्रानें आणि मुख्य धर्मगुरूनें तुला माझ्यापुढें आणलें आहे. तूं काय केलें आहेस ? बोल, तूं राजा का आहेस ? "

" होय " येशू म्हणाला, 'मी राजा आहे. पण माझें राज्य इहलोकींचें नाहीं. "

" तुझें राज्य, मग काय तूं राजा आहेस ? "

" होय, मी राजा आहे. जे जे **सत्याचा शोध** करणारे आहेत त्यांचा मी राजा आहे. ज्याला ज्याला **सत्याची** चाड आहे, तो तो माझा शब्द प्रमाण मानतो. "

" सत्य, सत्य " पायलेट उपहासानें म्हणाला.

" सत्य हें काय आहे ? " आणि त्यानें येशूच्या तोंडून सत्याची व्याख्या ऐकण्याची पर्वा न करतां खटला संपविला. त्याला रोम राज्या-वर येशूमुळें संकट येणार आहे असें वाटेना. तो रोमच्या गादीवर हक्कहि सांगत नव्हता किंवा लोकांना स्वतः राजा होण्याकरतां, बंडाकरतां चिथवीतहि नव्हता तेव्हां त्यानें येशूला दोषमुक्त करावें असें ठरविलें. पण हा निकाल जाहीर करण्यापूर्वीं तो त्या ज्यूकडे गेला. त्याला रोमहून अशी ताकीद होती कीं, त्यानें ज्यूंना विनाकारण दुखवूं नये. मॅजिस्ट्रेट फिर्यादीचा सल्ला घेण्यास जातो, काय न्याय आहे ! ते फिर्यादी म्हणाले,

' काय हा निरपराधी आहे ? जो स्वतःला राजा म्हणवतो, तो राजद्रोही नाहीं काय ? आम्हां ज्यूंच्या नव्हे, पण तुम्हां रोमन लोकांच्या राजाविरुद्ध हा राजद्रोह करतो आहे. याला काय तुम्ही जिवंत सोडणार ? ' पायलेटचें मन बदलेना. स्वतःच्या मताविरुद्ध याला कसा ठार करावा ? इतक्यांत पायलेटला त्याच्या बायकोकडून चिठ्ठी आली. 'या प्रामाणिक पुरुषाला कांहींहि करूं नका. मला त्याच्यामुळें रात्रीं स्वप्नांत त्रास झाला.' कितीहि शूर रोमन असला तरी त्याचें धैर्य स्वप्नें म्हटलें कीं खचतें. पायलेट पुन्हां गोंधळला. त्यानें ऐकलें कीं, येशू हा गॅलिलीचा आहे. त्याबरोबर त्यानें गॅलिलीच्या हेरॉड नांवाच्या न्यायाधिशाकडे त्याला पाठविला. तो न्यायाधीश त्या वेळीं जेरुशलेमलाच होता; पण तो ज्यू होता म्हणून त्यानें ती जबाबदारी नाकारली. येशू परत पायलेटपुढें आला. ज्यूंनीं कोर्टांत जमलेल्या लोकांना आतां भडकावून दिलें. 'चढवा, त्याला क्रूसावर चढवा' लोकांचा एकच सूर निघाला. पायलेट म्हणाला, ' आज तुमचा पास-ओव्हरचा सण आहे ना ? तुम्ही या सणाला एक कैदी बंधमुक्त करतां ना ? मग येशूला मुक्त का करीत नाहीं ? ' लोक ओरडले, ' नाहीं, नाहीं. त्या देशद्रोह्याला सोडणार नाहीं. '

पायलेट पुनः भ्रमांत पडला. येशूच्या दिव्य दृष्टीनें त्याचें अंतःकरण बदलून टाकलें होतें. पायलेट म्हणाला, ' मी त्याला क्रूसावर चढवणार नाहीं. मी त्याला फटके देववीन व मोकळा करीन. ' लागलाच येशूला बाहेर आणतात, उघडा करतात व त्या सत्याच्या उपासकाला खांबाला आवळून फटके मारतात. त्याच्या अंगांतून रक्त वाहूं लागतें. येशूचें शरीर त्या मारानें थरथर कांपूं लागतें. इतक्यांत त्याची राजा म्हणून चेष्टा करण्याकरतां एक कांटेरी मुकुट त्याच्या डोक्यावर घालतात व हातांत एक वेळूची काठी देऊन म्हणतात, ' ज्यूंच्या राजाचा जयजयकार असो.' ज्यूंचें एवढ्यानें समाधान होत नाहीं. ते म्हणतात, ' हा मेलाच पाहिजे. देवदूत म्हणवतो आपल्याला ! ' पायलेटचें काळीज धडधडूं लागतें. तो येशूजवळ जातो व विचारतो. ' बाबा, तूं कोठून आलास ? ' येशूनें उत्तर दिलें नाहीं. ' तूं माझ्याशीं बोलत नाहींस ? तुला मारण्याची किंवा तारण्याची शक्ति माझ्यांत आहे हें तुला ठाऊक नाहीं ? ' येशूनें उत्तर

दिलें. ' स्वतःच्या शक्तीबद्दल हा तुझा भ्रम आहे. जी परमेश्वरानें तुला शक्ति दिली असेल तेवढीच तुला माझ्या विरुद्ध उपयोगांत आणतां येईल. तूं वाईट आहेस. पण ज्यांनीं मला तुझ्या स्वाधीन केलें ते तुझ्यापेक्षांहि जास्त पापी आहेत. ' पायलेट पुनः गडबडला. लोक ओरडत होते, त्याला ठार करा; पण त्याचें अंतःकरण सांगत होतें ' तसें करूं नकोस. ' इतक्यांत त्याच्या डोळ्यांसमोर रोमच्या राजाची क्रूर, भयंकर व संशयी मूर्ति उभी राहिली. याला सोडलें तर सीझर बादशहा मला आपला शत्रु म्हणतील. हा विचार येतांच त्यानें आपलें मत बदललें. त्यानें पाणी आणवलें, हात धुतले व तो लोकांना म्हणाला, ' या पुण्यात्म्याच्या रक्ताचा स्पर्श माझ्या हाताला लागूं नये म्हणून हे मी हात धुतों. ' सर्वजण म्हणाले, ' ठीक आहे. त्याच्या वधाचें पाप आम्हांला व आमच्या मुलाबाळांना लागूं दे. ' नंतर त्यानें येशूला त्या राक्षसांच्या ताब्यांत दिलें व सांगितलें कीं, ' चढवा त्याला क्रूसावर. '

सबंध जन्मभर ज्यानें सत्याचा प्रचार केला, त्याच सत्याकरतां येशूनें हजारों लोकांकडून आपल्या शरीरांत खिळे टोंचून घेतले ! पांडुरंग जसा विटेवर अठ्ठावीस युगें उभा आहे, तसा येशू आज १९४१ वर्षें ' सत्य सत्य ' करीत क्रूसवर उभा आहे. सत्यधर्माचा प्रचार जर येशूनें केला नसता व आपल्या शत्रूवरहि प्रेम करण्यास शिकवलें नसतें तर त्याला क्रूसावर मरण्याची खास पाळी आली नसती.

येशू ख्रिस्तापूर्वी ४६९ व्या वर्षी जन्मलेल्या सॉक्रेटिसचें विस्मरण सत्यासत्याच्या विवेचनांत होतां कामा नये. येशू ख्रिस्त जेरुशलेममध्यें रोमच्या क्रोधाला बळी पडला व सॉक्रेटिस अथेन्समध्यें ग्रीकांच्या धर्म-विन्मुखतेला बळी पडला. वयाच्या ७० व्या वर्षी या तत्त्वज्ञाला त्याच्या शत्रूंनीं " गांवांतलीं पोरें बिघडावितों व लोकसत्ताक राज्यांतले देव मानीत नाहीं " म्हणून कोर्टापुढें खेंचलें. त्याच्या मित्रानें बचावाचें भाषण तयार करून दिलें. ' कसला बचाव ? ' सॉक्रेटिस म्हणाला, " मी परमेश्वराच्या आज्ञेनें जनतेची सेवा करीत आहे. त्याकरतां मला शिक्षा होत असेल तर ती आनंदानें भोगीन. न्यायाधीशहो, जर तुम्ही मी सत्याचा शोध

सोडून द्यावा या अटीवर मला मुक्त करणार असाल, तर मी म्हणेन नको. मला ती मुक्तता नको. मी सत्याच्या मागें जाईन. ईश्वराची आज्ञा पाळीन आणि माझ्यांत ताकद आहे तोंपर्यंत मी तत्त्वाचें अध्ययन सोडणार नाहीं. मी भेटेल त्यांना विचारीन अरे, तूं सत्याकडे दुर्लक्ष करून पैशाच्या व मानाच्या मागें लागतोस ? " त्याच्या या जबाबावरून न्यायाधीशमंडळ क्षुब्ध झालें व त्याला मृत्यूची शिक्षा फर्मावली. त्या काळच्या कायद्याप्रमाणें सॉक्रेटिसला हद्दपारीसारखी दुसरी शिक्षा मागून घेतां आली असती. तो म्हणाला, मला लोकांचा उपकर्ता म्हणून मोकळा सोडा. लोकांच्या खर्चानें मला खाणेंपिणें द्या. आतां तुम्ही मला दोषी म्हणतच आहां, तेव्हां फार तर ५० रुपये दंड हवा तर घ्या. त्याचे मित्र म्हणाले, १५०० रुपये कबूल कर म्हणजे तूं सुटशील. त्यानें नकार दिला. न्यायमूर्तिमंडळ या औद्धत्याला रागावलें व त्या-काळच्या रूढीप्रमाणें त्यानें हेमलॉक (विष) पिऊन मरावें, अशी त्याला शिक्षा दिली.

मृत्यूचा दिवस आला. मित्र व शिष्यांचा त्याच्याभोंवतीं गराडा पडला होता. त्याची पत्नी व तरुण मुलगा त्याच्याजवळ होतीं. दोघेहि आक्रोश करीत होते. सॉक्रेटिस आपला शिष्य क्रिटोला म्हणाला, " अरे, हिला येथून घेऊन जा. " तिचें मन वळवून तिला नेण्यांत आलें. नंतर सॉक्रेटिस अंथरुणांत उठून बसला. त्यानें जाड बेड्या घातलेले आपले पाय घासले आणि सुखदुःखावर प्रवचन सुरू केलें. मृत्यूच्या अमरत्वाची त्यानें चर्चा केली. संध्याकाळ होत आली, तसा तो उठला, त्यानें स्नान केलें. सूर्यास्ताचे वेळीं त्याला मरावयाचें होतें. सरकारी अधिकारी हातांत विषाचा पेला घेऊन आला आणि म्हणाला माझ्यावर रागावूं नका. इतकें बोलून अधिकाऱ्यानें तोंड वळविलें व तो रडूं लागला. त्याचा शिष्य क्रिटो म्हणाला, " अजून सूर्य अस्ताला गेला नाहीं. इतक्यांत गर्दी कां करतां ! " ' वेडा आहेस तूं ' सॉक्रेटिस म्हणाला, " आण तो विषाचा प्याला. " असें म्हणून त्यानें प्याला हातांत घेतला. त्यांतला थोडासा अंश त्यानें देवाला समर्पण करण्याकरतां जमिनीवर ओतला व बाकीचा शांत चित्तानें प्राशन केला. सभोंवार

जमलेल्या मित्रांना तो प्रसंग सहन करवेना. पण सॉक्रेटिसनें त्यांना शांत रहाण्यास सांगितलें. हळूं हळूं विषाचा परिणाम होऊं लागला. तो बेशुद्ध झाला आणि शेवटीं त्याची प्राणज्योति मालवली. येशूच्या व सॉक्रेटिसाच्या मृत्यूनंतरच त्यांचीं तत्त्वज्ञानें लोकांना पटूं लागलीं. त्यांच्या आत्मयज्ञामुळें ही क्रांति घडून आली नाहीं काय ?

आपल्याकडील संतमंडळांत धर्माकरतां छळ सोसलेल्यांचीं उदाहरणें सांपडतात. विषाचा प्याला प्राशन करणारी मिराबाई व पांडुरंगाकरतां मरण पत्करणारी कान्होपात्रा, सखूबाई यांचाहि उल्लेख केला पाहिजे. इस्लाम धर्मांतील हसनचें उदाहरण असेंच उज्ज्वल आहे.

देवाला सत्य म्हणून म्हटलें काय, धर्म म्हणून म्हटलें काय, अगर अन्य नांवानें संबोधलें काय, सर्वांचा हेतु एकच. सद्धर्माचा जगांत प्रभाव व्हावा, म्हणून आजपर्यंतच्या सर्व तत्त्वज्ञांनीं, द्रष्ट्यांनीं, साधुसंतांनीं व विरक्त पुरुषांनीं प्रयत्न केले आहेत. सर्व धर्मांत हेंच सत्तत्त्व आपणांस पहावयास सांपडतें. कोणताहि धर्म असत्य बोलला अगर असत्यानें वागा असें सांगत नाहीं. म्हणूनच सत्याच्या उपासकाला सर्व धर्म सारखे वाटतात.

सत्याचरण करतांना व्यवहारांत किती अडचणी येतात, हें काय आपल्याला ठाऊक नाहीं ? सत्य पालनाकरतां आत्मत्याग करणारांचीं वर दिलेलीं उदाहरणें आपण काय नुसतींच पहायचीं ? कांहींजण म्हणतील कीं, 'आध्यात्मिक सृष्टींत सत्य पालन सोपें आहे, कारण तेथें गमविण्यासारखें कांहीं नसतें. पण व्यवहारांत सत्याचरण करणें फार कठीण आहे.' आध्यात्मिक सृष्टींत प्राण देण्यापर्यंत पाळी कशी येते हें येशू ख्रिस्त, सॉक्रेटिस वगैरेंच्या उदाहरणांवरून दिसत असल्यामुळें आध्यात्मिक सृष्टि निर्भय आहे असें नाहीं. पण व्यावहारिक जगांत सत्याचरण करण्यास अडचणी फार असतात यांत संशय नाहीं. जे गाय व कसायाच्या गोष्टी सांगतात, त्यांनीं निदान व्यवहारांत आपण किती खरें बोलतों याचा स्वतःच्या मनाशींच पडताळा घ्यावा. जिथें, नफ्यातोट्याचा प्रश्न नसतो तेथेंहि खोटें बोलण्याची खोड लागलेली असते. लहानपणापासून ही संवय जडत जाते, आणि खोटें बोलण्यांत कमीपणा

आहे असें न वाटतां हुशारी आहे असें वाटूं लागतें. खोटें बोलून एकमेक एकमेकांला फसवीत असतात. घरांत, दारांत, समाजांत, राजकारणांत, व्यापारांत, खोटें बोलण्याचा इतका प्रघात पडतो कीं, त्यापासून आपण स्वतःची व समाजाची हानि करतों असें वाटत नाहीं. १४ वर्षांच्या मुलाचें अर्धें तिकिट काढून तो बारा वर्षांच्या किंवा दहा वर्षांच्या आंतला आहे असें खुशाल वडील सांगत असतात. क्रिकेटची मॅच किंवा सिनेमा पहायला गेलेले चिरंजीव मास्तरनीं आज जादा तास घेतला असें वडिलांना सांगावयास कमी करीत नाहींत. शेजारची बाई दूध मागण्याकरतां आली तर मांजर दूध पिऊन गेलें असें सांगावयास बाईसाहेब कचरत नाहींत. सायकलला दिवा लावला नसला तरी आतांच दिवा गेला असें पोलिसला कोणताहि शहरांतला गृहस्थ सांगेल. चार दिवसांचें शिळें लोणी विकणारा आतांच ताजा डबा फोडला, असें गिऱ्हाइकाला सांगतो. लांच न देतां एखाद्या सरकारी किंवा निमसरकारी नोकराकडून वाजवी काम करून घ्यावयाचें असेल तर तो वेळ असूनाहि वेळ नाहीं असें उत्तर देईल. अशीं उदाहरणें कितीतरी देतां येतील. सत्याचा उपदेश करणारे उपदेशकहि आपल्या उपदेशाविरुद्ध वर्तन करीत असतात.

अशा ह्या व्यावहारिक असत्याबद्दल कितीजणांना चीड येते? म० गांधींच्या सत्याबद्दल बोलतांना सर्वजण म्हणतात, "अहो आम्ही कधीं असत्य बोलतों? सामान्यतः आम्ही सत्यच बोलत असतों. आतां कांहीं प्रसंगच असे असतात कीं सत्य बोलून भागत नाहीं. सरकारनें आमच्यावर राजद्रोहाचा खटला केला तर काय खरें बोलून तुरुंगांत जावें? असल्या शठाबरोबर शाठ्य नीतीनेंच वागलें पाहिजे. हाच खरा धर्म आहे." गांधीवादाचें राजकारणांत आगमन होण्याला हीच वृत्ति कारण झाली. अधिकारी वर्ग अत्यंत शिरजोर व जनता भित्री. आपला भित्रेपणा शाठ्य नीतीच्या सोज्वल नांवाखालीं जनता दडपून टाकीत असे. त्याचा परिणाम असा होतो कीं, राजद्रोहाच्या आरोपांतून एखादा चळवळ्या सुटला तर त्याबरोबर हजारों लोक हाय खातात. याच्या उलट मी राजद्रोह केला आहे, करणार आहे,

तें माझें कर्तव्य आहे, व ह्या कर्तव्याबद्दल जास्तींत जास्त होणारी शिक्षा भोगण्यास मी तयार आहें, असें म्हटलें व शिक्षा भोगली म्हणजे जनतेंतलि घाबरटपणा जातो. जनता शूर, प्रतिकारक्षम होते. शाठ्यनीतीच्या नांवाखालीं आपण जनतेंत असत्य व भित्रेपणा पसरवितों. सत्य नीतीनें जनता भित्रेपणा सोडून देते पण तिला शारीरिक कष्टाला तयार व्हावें लागते; किंबहुना मरणालाहि तयार असावें लागते. जो आर्थिक, शारीरिक किंवा अन्य त्यागाला तयार होतो, तो असत्य कधींहि बोलणार नाहीं. असत्याच्या मुळाशीं क्षणिक किंवा तात्कालिक स्वार्थ असतो, सत्यामुळें क्षणिक स्वार्थ बुडतो पण शाश्वत स्वार्थ संपादन करतां येतो. शाठ्य नीतिमुळें आपण जें मिळवूं इच्छितों, तें सत्यनीतीनें खात्रीनें मिळूं शकतें. शाठ्यनीति यशस्वीच होते असें नाहीं. कारण आपला प्रतिस्पर्धी शठ असतो. त्याच्यापेक्षां जास्त शठपणा आपल्या ठिकाणीं असला तरी आपलाच जय होईल असें सांगतां येत नाहीं. उलट सत्याचा मार्ग हा धोपट असल्याकारणानें त्यांत अपयश येण्याचा संभव कमी. तेव्हां सत्य का असत्य असा प्रश्न उभा राहिला, म्हणजे स्वकीयांशीं सत्य, परकीयांशीं असत्य, शठांशीं असत्य, सज्जनांशीं सत्य, असला भेदाभेद गांधीवाद करूं इच्छित नाहीं. त्यामुळेंच जीवनांतल्या क्षुल्लक गोष्टीपासून तों अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीपर्यंत गांधीवाद सत्याचाच पुरस्कार करतो.

जीवित हें अखंड आहे. त्यांत आपण टप्पे पाडतों, आपण भेद करतों. व्यवहार निराळा, नीति निराळी, आणि अध्यात्म निराळें समजतों. एकांत खरें, दुसऱ्यांत खोटें असें आपण करतों. पण ती चूक आहे. सत्याच्या बाबतींत तडजोड होऊं शकत नाहीं.

सत्य म्हणजे काय निव्वळ दोन आणि दोन चार होतात असें सांगणें आहे ? सत्य म्हणजे काय विश्वामित्राला दिलेलें हरिश्चंद्रानें वचन पाळणें आहे ? हें तर आहेच; पण याहीपेक्षां जास्त सत्यांत आहे. जें नश्वर आहे, जें सांत आहे, त्याच्या पलीकडे असणारें विश्वांतील जें आद्यतत्त्व ज्याला सत् म्हणतात, व जें दिसत नाहीं, त्या तत्त्वाशीं एकरूप होणें हाच सत्याचा उद्देश आहे. तेव्हां सत्य हें बोललें

पाहिजे, आचरलें पाहिजे व पाळलें पाहिजे. गांधीवाद हें नव्यानें सांगत नाहीं, जुन्या धार्मिक वचनांना फक्त तो उजळा देत आहे. पण गांधीवाद हें जीवनशास्त्र आहे, त्यामुळेंच सत्याच्या या शास्त्राचा जीवनांत कसा उपयोग होतो हें आपण पाहूं. आतां हें खरें कीं, सत्याचरण करणारी सर्व जनता एकाच उंचीची असूं शकणार नाहीं. आध्यात्मिक सत्य हें काय आहे याची अनेकांना कल्पनाहि असणार नाहीं. पण ते आपल्या मर्यादा ओळखतात, सत्याची महतीहि त्यांना कळते. ते फक्त व्यक्त सृष्टींत घडणाऱ्या गोष्टींच्या बाबतींत सत्य बोलतात व सत्य आचरतात. गांधीवाद हा ध्येयवाद असला तरी प्रत्येकाला मर्यादा आहेत व त्याप्रमाणें वागण्यास त्याला हरकत नाहीं, हेंहि गांधीवाद मान्य करतो. हें सत्य आचरणांत कसें आणावयाचें हें सत्याग्रह सांगतो.

सत्याग्रह व सत्याग्रही : : : ७

गांधीवादानें आधुनिक काळांत अत्यंत मोठी गोष्ट जर कोणती केली असेल तर जनतेच्या हातांत सत्याग्रहाचें शस्त्र देण्याची. शस्त्रबलापेक्षां आत्मबल श्रेष्ठ आहे ही गोष्ट म. गांधींनीं सांगितली व तिचें आचरण करून दाखवलें. आपल्या हातांतील शस्त्रें गेलीं असलीं, आपल्यांतलि प्रतिकारशक्ति नष्ट झाली असली, तरी जोंपर्यंत आपलें आत्मबल नष्ट झालें नाहीं, तोंपर्यंत कोणत्याहि राष्ट्राला आपल्या भवितव्याबद्दल निराश होण्याचें कारण नाहीं, हा म. गांधींनीं दिलेला दिव्य संदेश आहे. सत्याग्रह हें शस्त्र असलें तरी तें शस्त्र चालविण्यास शक्ति जी लागते ती आत्मबलानें प्राप्त होते. तरवारी सारखें शस्त्र हें शारीरिक बलानें चालवितां येतें. तसें सत्याग्रहाचें नाहीं. सत्याग्रह हा आत्मबल नसणाऱ्याला करतां येणार नाहीं. त्यानें सत्याग्रहाचा आव आणला तर तो खोटा ठरेल. ज्याचें आत्मबल प्रखर नाहीं, तो सत्याग्रहाला लायक ठरणार नाहीं. किंबहुना आत्मबलाची जाणीव नसणारांना सत्याचीहि जाणीव नसते, त्यामुळें ते सत्याचा आग्रहहि धरूं शकणार नाहींत.

" हें आत्मबल काय आहे बुवा " असें डोळ्यांला दिसणाऱ्या वस्तू-पलीकडे कोणत्याहि गोष्टीवर विश्वास न ठेवणारा वास्तववादी विचारतो. शरीरबल हें लोखंडाची कांब वांकवून दाखवतां येतें, पण आत्मबल हें दुसऱ्याच्या डोळ्यांला दाखवतां येणार नाहीं. पण तुम्हांला सुख किंवा दुःख दाखवतां येतें का ? नाहीं; तथापि वास्तववादी 'मनाचे हे धर्म आहेत' असें म्हणतो. सुखी माणसाच्या चेहऱ्यावर प्रफुल्लता दिसते आणि दुःखी माणसाच्या चेहऱ्यावर खिन्नता दिसते. आत्मबलाचेंहि तसेंच आहे. तुमच्या इच्छेविरुद्ध तुम्हांला एखादी गोष्ट करायला सांगितली तर ती तुम्हीं कराल का ? एखाद्या पतिव्रता स्त्रीला परक्या पुरुषानें व्यभिचार करायला सांगितला, किंवा एखाद्या देशप्रेमी हिंदी गृहस्थाला युनियन जॅकला सलाम करावयास सांगितलें, तर दोघेहि ती गोष्ट करीत नाहींत.

प्राण गेला तरी मी व्यभिचार करणार नाहीं, अगर माझें स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्याच्या निशाणाला वंदन करणार नाहीं, हें सांगण्याची शक्ति कोठून येते ? आपण इतिहासांत अशीं अनेक उदाहरणें वाचतों व त्यांच्या निश्चयाबद्दल कौतुक करतों. ती अबला निःशस्त्र असते अगर तो तरुण शृंखलाबद्ध असतो. त्यांना ठाऊक असते कीं, आपली मरणा-वांचून सुटका होणें शक्य नाहीं. इतकें असूनहि ती अबला व तो तरुण प्रतिकार करतात व मरण पत्करतात. हा प्रतिकार करण्यास जें बल लागतें, तेंच आत्मबल होय. आत्मबलाचा उपयोग करणारा प्रत्येकजण मृत्युमुखींच पडतो असें नाहीं.

पण आत्मबलावर अवलंबून असणाऱ्या सत्याग्रहींनीं मृत्यूकरतां तयार असलें पाहिजे. येशू ख्रिस्त हा ऐतिहासिक काळांत आद्य सत्याग्रही होता व त्याला मरण पत्करावें लागलें. कोणताहि सिद्धांती अगर त्या सिद्धांताचा उपासक हा आपल्या प्रखर निष्ठेंत जळून खाक होत असतो. त्याच्या ज्वलनामध्यें तीं तीं तत्त्वें तप्त होऊन शुद्ध स्वरूपांत बाहेर पड-तात. हा एक आत्मयज्ञ आहे, हें सत्याग्रहींनें विसरतां कामा नये.

तेव्हां आत्मबल किंवा आत्मिक शक्ति ही अशी एक अनुभवानें प्रत्ययास येणारी शक्ति आहे. ती प्रत्येक व्यक्तीमध्यें थोड्या फार प्रमा-

णांत असते. ती शक्ति वाढविण्याचा प्रयत्न करणें अशक्य नसतें. एखाद्यानें असत्य बोललें नसावें, किंवा चोरी केलेली नसावी, किंवा अन्य पातक केलेलें नसावें आणि आपण त्याच्यावर असत्य भाषणाचा किंवा चोरीचा आरोप लादावा, म्हणजे त्याच्यावर प्रतिक्रिया कशी होते हें आपणांस अनुभवावयास सांपडतें. मनावर अगर बुद्धीवर जर शुद्ध संस्कार होत गेले, दुर्गुणाबद्दल जर चीड येत गेली तर आत्मबल वाढल्यावांचून खास रहाणार नाहीं. ज्यांना असें वाटतें कीं, आपण खोटें बोललों, अगर चोरी केली म्हणून काय झालें, आपलें काम झालें, आपल्या खिशांत चार पैसे अधिक पडले म्हणजे झालें. अशीं माणसें जगांत द्रव्य संपादन करतील पण त्यांचें आत्मबल वाढणार नाहीं. सत्य, चोरी वगैरेसंबंधींच्या आपल्या कल्पना मोठ्या चमत्कारिक असतात. जे कायद्याच्या पकडींत सांपडत नाहींत ते सावच असतात. एरवीं प्रत्येकजण जर कायदा दूर सारून नीतीच्या दृष्टीनें आत्मनिरीक्षण करूं लागला तर आपणहि केव्हां ना केव्हां चोरी केलेली असते, इतर पातकें केलेलीं असतात, असेंच त्याचें त्याला समजून येईल. अशांचें आत्मबल हें कसें वाढावें ? शरीरांत जर घाण सांचली असली तर शरीरबल वाढतें का ? शरीरांत कुठें घाण सांचली आहे याचें आपल्याला ज्ञान नसतें, पण पौष्टिक खुराक घेऊन आणि उत्तम हवापाण्याच्या ठिकाणीं राहूनहि शरीर जेव्हां तग धरत नाहीं, तेव्हां आपण तज्ज्ञांचा सल्ला घेतों आणि ते आपल्या शरीरांतील घाण औषधोपचारानें दूर करण्याचा प्रयत्न करतात. आत्मबलाचेंहि तसेंच आहे. आत्मबलाचा साक्षात्कार न झाल्यामुळें समाजांत गुन्हेगारवृत्ति वाढत जाते. ज्याचें आत्मबल श्रेष्ठ असतें तोच नकार देऊं शकतो. चार पैशांकरतां वाटेल तीं अपकृत्यें करणारे पुरुष आपल्या समाजांत कमी आहेत असें समजण्याचें कारण नाहीं. पोटाकरतां गुन्हा करणें हें क्षम्य समजावें, अगर सच्चा माणसांत गुन्हेगारी प्रवृत्ति जी वाढते ती पोटामुळें वाढते असें मतप्रतिपादन कांहीं आधुनिक अर्थवादी करतात. हिंसावादी जसें अडवतो किंवा असत्यभाषीहि जसें अडवतो तसाच हा प्रकार आहे. माथेफिरूला मीं मारावें कीं नाहीं, कसायाला

खोटें सांगावें कीं नाहीं, ह्याच प्रश्नाप्रमाणें, खाण्यावांचून मरण्याऐवजीं चोरी अगर व्यभिचार केला तर काय हरकत आहे? असा हा प्रश्न आहे. ह्या प्रश्नांचीं उत्तरें निराळीं असूं शकणार नाहींत. जीवनाला आपण किती किंमत देतों आणि आत्मिक शक्तीला किती किंमत देतों यांवर ह्या प्रश्नांचीं उत्तरें अवलंबून आहेत. गांधीवादी हा जीवनापेक्षां आत्मिक शक्ति अधिक मानीत असल्यामुळें, हिंसा करूं नये, असत्य बोलूं नये आणि चोरीसारखीं पातकें करूं नयेत असेंच सांगतो.

शाळेंत प्रत्येक मुलाला हीं नीतितत्त्वें सांगतात; समाजसेवक प्रत्येक सभ्य गृहस्थापुढें हीं तत्त्वें मांडतो आणि साधुसंतहि निराळें सांगत नसतात. पण तीं तीं तत्त्वें कसोटीला लावण्याची वेळ आली म्हणजे मनुष्य युक्तिवाद लढवून पळवाट काढतो. अशीं माणसें समाजांत फारशीं धिक्कारलीं जात नाहींत. कारण समाज अशाच लोकांचा बनलेला असतो. फिर्यादीनें कोर्टांत असत्य सांगितलें नाहीं तर त्याचा वकील वाभाडे काढतो. अशी तर आमची समाजरचना! तेव्हां समाजांत जगण्याकरतां नीतितत्त्वें दूर ठेवावीं लागतात. मात्र अशा तत्त्वांचें विस्मरण होऊं नये म्हणून तीं ठिकठिकाणीं टांगलेलीं असतात. पण बिनबोलके देवळांतले देव जितपत आपल्या चारित्र्यावर परिणाम करतात तितपतच ह्या नीतितत्त्वांच्या पाट्यांचाहि आपण उपयोग करता.

दररोज वेडेवांकडे हिशेब करणारा सावकार, अगर अनेक कुळें रसातळास नेलेला जमीनदार, सरकारजवळ बंदुकीचा परवाना मागतो. त्यांना ठाऊक असतें कीं, आपली संपत्ति ही सद्गुणाच्या भूमींत पैदा झालेली नाहीं. त्यामुळें आपला प्राण केव्हां घेतला जाईल याचा नेम नाहीं. या भीतीनें तो आपल्या पदरीं पगारी पेहलवान, पठाण, भय्ये अगर शीख ठेवतो. त्याच्या अपकृत्यांचें संरक्षण आत्मबलानें कसें होणार? अपकृत्य करणारा हा आत्मबली नसतो, तो शस्त्रबली असतो. ज्याप्रमाणें धर्माचें रक्षण आपण केलें म्हणजे धर्म आपलें रक्षण करतो, त्याप्रमाणें जो आत्म्याचें रक्षण करतो, त्याचें आत्मा रक्षण करील. तालमीनें जसें

शरीर वाढतें, किंवा अभ्यासानें जशी बुद्धीची वाढ होते, त्याचप्रमाणें सदाचरणानें व निग्रहानें आत्मबल वाढत असतें. ज्याचें आत्मबल प्रखर असतें, तो बाह्य रक्षणावर अवलंबून नसतो. तो आत्मबलानें आपलें रक्षण करतो. शस्त्राची त्याला जरूरी लागत नाहीं.

साधुसंतांच्या जवळ पिस्तुलें किंवा तलवारी नसतात, पण सरदार व जमीनदारांच्या जवळ असतात. कारण एकाला आत्मरक्षणाची जरूरी नसते आणि तशी जरूरी भासली तर तो आत्मबलानें आपलें रक्षण करण्याचा प्रयत्न करील. दुसऱ्याला आत्मरक्षणाची नेहमींच जरूरी असते व तो शस्त्राशिवाय आत्मरक्षण करूं शकत नाहीं. लोकांचा पुढारी हा निर्भयपणें लोकांत हिंडतो; पण राजे, गव्हर्नर्स हे बाहेर हिंडावयाचे असले म्हणजे पोलिसांची पलटण त्यांच्या रक्षणाकरितां उभी करावी लागते. ज्याच्याजवळ पैसा किंवा सत्ता असते, व हीं साधनें ज्यानें अन्यायानें संपादन केलेलीं असतात त्याला शस्त्रधारी असावें लागतें, आणि साराच पैसा व सारीच संपत्ति ही कमी अधिक प्रमाणांत अप्रशस्त मार्गानें मिळविलेली असल्यामुळें जगांत आजपर्यंत आत्मबलानें राष्ट्ररक्षण करणारे राजे, कांहीं अपवाद सोडल्यास, जन्मलेच नाहींत !

पण याचा अर्थ आत्मबलानें असें रक्षण करतां येणार नाहीं, असा मात्र नाहीं. गांधीवादाची सर्व इमारत या आत्मबलावर उभारलेली आहे. सत्य व अहिंसा यांमुळेंच आत्मबल वाढतें. हिंसावृत्तीचा मनुष्य शस्त्रबलावर अवलंबून रहात असल्यामुळें तो आत्मबलाला तितकी किंमत देत नाहीं. ह्या आत्मबलानें लौकिक व पारलौकिक प्रश्नहि सोडवितां येतील अशी गांधीवादाची खात्री आहे. पण लौकिक आचारांतच आत्मबल कसें काय प्रभावी होईल, याची सद्बुद्धीच्या टीकाकारांना काळजी वाटते.

सत्याग्रहानें किंवा आत्मबलानें तीन गोष्टी आमच्यासारख्या देशांना साधावयाच्या आहेत. (१) गेलेलें स्वातंत्र्य आम्हांला परत मिळवावयाचें आहे. (२) परक्यांच्या कडून आमच्या देशावर जर भविष्यकाळीं आक्रमण झालें तर तें आक्रमण परतवावयाचें आहे. आणि

(३) आमचा राज्यकारभार अहिंसेनें चालवावयाचा आहे. ही कामगिरी जरी आपल्याला त्रिविध स्वरूपाची भासली तरी ती एकच आहे. एखादें हिंसावादी राष्ट्र जर प्रबळ असलें तर तें आपल्या शस्त्राच्या बलावरच स्वतंत्र होईल, परचक्र निवारण करील, स्वकीयावर सत्ता चालविल. शस्त्रबलानें ज्या गोष्टी शक्य होतात, त्याच आत्मबलानेंहि साध्य होऊं शकतील. तेव्हां आत्मबल किंवा सत्याग्रह किंवा सत्यबल म्हणजे काय याची आपण जास्त माहिती करून घेऊं.

म० गांधींनीं सत्याग्रहाला आत्मबल, सत्यबल किंवा प्रेमबल असें म्हटलें आहे. (Young India Page 12). सत्याग्रहाला कोणत्यांहि नांवानें संबोधलें तरी त्याचा अर्थ एकच आहे. प्रेम किंवा आत्मबलानें आपण मित्रांना वश करूं शकतों. मुलानें जर सत्याकरतां हट्ट धरला तर आईचें हृदय पाझरतें. यालाच हृदयपरिवर्तन म्हणतात. ती त्याचें जें काय म्हणणें असेल तें पुरें करते. आपण संतचरित्रांत भक्तांच्या हांकेला धावून आलेल्या परमेश्वराची वर्णनें वाचतों. द्रौपदीच्या लज्जारक्षणाकरतां, कृष्ण धांवून येतो. ध्रुव, प्रल्हाद, गजेंद्र, जनाई, दामाजी, नामदेव, तुकाराम वगैरे भक्तांच्या प्रेमबलानें परमेश्वर आकर्षिला जातो व त्यांचें रक्षण करतो, असें सांगतात. आजच्या काळांत असे चमत्कार कोणी मानीत नाहींत. तेव्हां भक्तांच्या परित्राणाकरतां भगवंत प्रेम किंवा आत्मबलानें ओढला जाईल व धांवून येईल, असें कोणी समजत नाहीं. शास्त्रीय युगांत श्रद्धा मरते, त्यामुळें ईश्वरहि मेलेला असतो. जेथें देवाचें अस्तित्वच अमान्य, तेथें प्रेमबलानें तो ओढला जाईल हें अशक्यच. ज्या वेळीं लोकांचा देवावर विश्वास होता त्या वेळीं म्हणजे दोनशें वर्षांपूर्वी जर गांधींनीं आत्मबलाचा किंवा सत्याग्रहाचा महिमा सांगितला असता तर लोकांनीं त्यावर विश्वास ठेवला असता. आज कोणतीहि गोष्ट बुद्धिप्रामाण्यवादी श्रद्धेनें गृहीत धरण्यास तयार नाहीं. त्यामुळें सत्याग्रहाचें तत्त्व लोकांना पटविणें कठीण जातें. त्यांतल्यात्यांत हिंदुस्थानांत असे वेडे खपतील; पण युरपमध्यें अशांची रवानगी वेड्यांच्या इस्पितळांतच होईल; अशी ग्वाही कांहींजणांकडून दिली आहे.

पण अतिमानुष गोष्टी सोडणें हें अपरिहार्यच असतें. तेव्हां प्रेम-

बलाचा प्रयोग हा ईश्वरावर करण्याऐवजीं आपल्या सारख्याच माणसां-वर केला पाहिजे. तो प्रयोग नात्याचीं किंवा प्रेमाचीं माणसें जेथें असतात तेथें पूर्णपणें यशस्वी होतो. पण सर्वच माणसें प्रेमाचीं नसतात एवढेंच नव्हें, तर कांहीं आपला जास्तींत जास्त द्वेष, वैर करणारीं असतात. ह्या वैरांत कोठें तरी स्वार्थ खटकत असतो. आपला अत्यंत वैरी जो असेल त्याच्या मनांतील वैरभाव आपल्या प्रेमळ वर्तनानें व सेवावृत्तीनें जाईल. या बाबतींत गांधीवादाचे कट्टे विरोधक कदाचित् तितके वांकडें जाणार नाहींत. पण ज्यावेळीं एका किंवा अनेक व्यक्तींना अधिकृत सत्तेविरुद्ध म्हणजेच चेतनाशून्य व पोलादी राज्ययंत्रा-विरुद्ध झगडावें लागतें, त्यावेळीं झगडणारा एक वेडा तरी किंवा अयशस्वी तरी ठरतो. चर्चिल, हिटलर किंवा स्टॅालिन यांच्या अंतःकरणांत गांधींच्या प्राणांतिक उपोषणानें काय दया येणार ? गांधी जगून जर हिंदुस्थान जाणार असेल तर ते गांधींना मरूं देऊन हिंदुस्थान टिकवतील. हिंदु-स्थानवर आमच्या राज्यकर्त्यांची जितकी प्रीति आहे तितकी गांधींवर म्हणजे गांधींच्या सत्य अहिंसेवर नाहीं. हिटलरच्या ताब्यांत हिंदुस्थान असता तर तो गांधींना उपोषणाचे आधींच ठार मारता. आम्हीं इंग्रज मोठे न्यायी आहोंत म्हणून आम्ही गांधींसारखा माणूस मरूं देत नाहीं, अशी फुशारकी कांहीं इंग्रज मारतात. बरं. या कायदेशीर राज्ययंत्रांत कोणी ना धनी, ना चाकर. गांधी झाले तरी ब्रिटिश राज्य सैतानी आहे असें म्हणणार, अमुक गव्हर्नर किंवा व्हाईसरॉय किंवा मुख्य प्रधान वाईट आहे असें म्हणणार नाहींत. तेव्हां आत्मबलाच्या प्रयोगाची ही साखर अशा यंत्रावर पसरून काय फायदा, असें आक्षेपक विचारतील. याला काय उत्तर देणार ? सत्याग्रहांत यंत्रहि बदलण्याची शक्ति आहे असें म्हणणें म्हणजे प्रार्थनागीतें गाऊन डोंगर हलविणें आहे, किंवा दीपराग गाऊन विक्रमाप्रमाणें दिवे लावणें आहे, असें टीकाकार म्हणतील. पण यंत्र झालें तरी तें माणसावांचून चालत नाहीं. यंत्राचा जन्मदाता माणूस असतो, तीं चालवणारा व मोडणारा माणूसच असतो. तेव्हां सत्याग्रहाचा प्रभाव जर पडावयाचा असेल तर तो राज्ययंत्राच्या मागें असणाऱ्या व्यक्तीवरच पडावा लागतो. सत्याग्रहामुळें हृदय–परि-

वर्तन जें व्हावें लागतें तें यंत्राच्या बुडाशीं असलेल्या व्यक्तीचें. मग ती व्यक्ति राज्याचें अपहरण केलेली असो किंवा करणारी असो. शस्त्रयुद्धांत तरी दुसरें काय होतें ? हजारों लाखों माणसें कापून वा नष्ट करून जो राज्याचा प्रमुख असतो, त्याच्या अंतःकरणांत असहाय्यतेमुळें भीति किंवा थरकांप उत्पन्न करावयाचा असतो व त्याला शरण आणावयाचें असतें. हिटलरनें जीं निरनिराळीं राज्यें जिंकलीं तीं काय सर्व लोक ठार मारून जिंकलीं ? मुख्य प्रधानांच्या हृदयांत भीति उत्पन्न होईल इतकी कत्तल करून त्यानें त्या त्या देशांना पराभूत केलें. शस्त्रबलानें जशी भीति व थरकांप उत्पन्न केला जातो, तसा प्रेमबलानें जिव्हाळा व प्रेम उत्पन्न केलें जातें. शस्त्रबलामध्यें जो बलिष्ठ असतो तो दुष्ट मानण्याची प्रथा आहे.

नेपोलिअन किंवा औरंगजेब हे शस्त्रबली होते म्हणून त्यांना दुष्ट समजत. आज हिटलरला काय समजतात ? त्याला जितक्या शिव्या आज दिल्या जातात तितक्याच पूर्वीच्या योद्धयांना मिळत असत. कालांतरानें कालचे खाटिक हे आजचे पराक्रमी पुरुष ठरतात. तेव्हां ज्यांची शस्त्रशक्ति जास्त ते दुष्ट मानले जातात. पण आत्मशक्तीचें तसें नाहीं. जो आत्मबली असतो तो सुष्ट मानला जातो. सर्वांची सहानुभूति त्याच्याकडेच असते. याचें कारणहि उघड आहे. ज्याच्याजवळ कमी शस्त्रें आहेत किंवा मुळींच शस्त्रें नाहींत, त्या व्यक्ति अगर राष्ट्राबद्दल इतरेजनांना अनुकंपा वाटते. सत्पक्ष अशा व्यक्तींचा वा राष्ट्राचा आहे असें जग म्हणतें, आणि अशा निःशस्त्र लोकांचा छळ करणाऱ्या सत्ते-बद्दल आपोआपच अप्रीति उत्पन्न होते. जितकें छळाचें प्रमाण जास्त तितकी छलकांबद्दल अप्रीति अधिक. शासकांनीं निःशस्त्र लोकांवर गोळ्या सोडल्या व त्यांच्या प्रेतांचे ढीग पाडले म्हणजे राज्यकर्त्यांची बदनामी जगभर होते व त्यांतच त्यांची सत्ता जळून खाक होऊं लागते.

शस्त्रबली हा आपल्याविषयीं शत्रूच्या मनांत भय व दरारा उत्पन्न करतो. आत्मबली हा आपल्या प्रातिस्पर्ध्याच्या मनांत प्रेम व दया उत्पन्न करतो. शस्त्रबली हा स्त्रीपुरुषांच्या मनांत चीड, त्वेष उत्पन्न करतो, तर आत्मबली हा करुणा व वात्सल्य निर्माण करतो. शस्त्रबलीचें यश हें

असंख्य शिपायांच्या रक्तमांसावर उभारलेलें असतें, तर आत्मबलीचें यश हें असंख्य दुष्ट भावनांच्या मरणांतून जन्माला येतें. अशा प्रकारें या दोन शक्तींच्या क्रिया होत असतात. त्यांतील एका क्रियेचा जगानें पुरेपूर अनुभव घेतला आहे. दुसऱ्या म्हणजे आत्मबलाचा अनुभव हा राष्ट्रांनीं घेतलेला नाहीं. म० गांधी हेच पहिले पुरुष हा प्रयोग करणारे निघाले.

द. आफ्रिकेंत त्यांनीं प्रथम सत्याग्रहाचा प्रयोग केला. त्याला ते निःशस्त्र प्रतिकार (Passive resistance) म्हणत. पण इंग्लंडांतील सफ्रेजिट स्त्रिया आपल्या चळवळीला तेंच नांव देत असत. त्या जरी बंदुकांचा उपयोग करीत नसत, तरी पोस्टांच्या पेट्यांत ॲसिडें टाकणें, आगा लावणें, अधिकाऱ्यांना फटके लगावणें वगैरे प्रकार करीत. गांधी हे प्राणाची जशी हिंसा नको म्हणत तशी वस्तूंचीहि नको म्हणत. काया, वाचा व मनानेंहि त्यांना हिंसा नको आहे. त्यामुळें त्यांनीं आपल्या चळवळीचें नांव बदललें व तिला सत्याग्रह असें नांव दिलें.

ज्या सत्याबद्दल आग्रह धरावयाचा तें सत्य तर व्याख्येनें सांगतां येत नाहीं, असें म० गांधी म्हणतात. तथापि जगांत सत्याशिवाय दुसरें कांहींच अस्तित्वांत नाहीं, असें त्यांचें म्हणणें. या सत्याकरतां जगणें हाच आपला जीवितहेतु असला पाहिजे, असें ते म्हणतात. आपल्या सर्व हालचाली सत्यावर केंद्रित झाल्या पाहिजेत. तेव्हां जेथें अन्याय दिसत असेल तो सत्याचा आग्रह धरूनच दूर केला पाहिजे. हा आग्रह धरणें म्हणजे काय करणें ? आपल्या प्रतिपक्षाला पुष्कळ समजावून सांगितलें तरी तो ऐकत नाहीं, आपली जुलमी वृत्ति व सत्ता सोडत नाहीं. अशा स्थितींत आपण आपलें म्हणणें शारीरिक क्लेश सोसून सिद्ध केलें पाहिजे. सत्याच्या जोडीला आपण अहिंसेचें व्रत घेतलें असल्यामुळें आपल्याला वाटणारें सत्य आपण प्रतिपक्षावर शस्त्रबलानें लादूं शकत नाहीं. आपण सत्याचा आग्रह धरून मरून जाऊं शकतों. आपल्या क्लेशानें प्रतिपक्षाचें मन बदलणें हें असंभाव्य नाहीं. कारण मनुष्यमात्र हा राक्षस नसून त्यांत प्राकृतिक गुण दैवी आहेत. ह्या दैवी गुणांवर

मोहानें अगर स्वार्थानें आसुरी गुणांची राख चढलेली असते. ती राख आपण जर आत्मक्लेशानें झाडून टाकूं शकलों तर आपला सत्याग्रह यशस्वी होईल आणि हा आत्मक्लेशानें व्यक्त झालेला सत्याग्रह यशस्वी कां होऊं नये ? असें सांगतात कीं, देवीला द्यावयाचा बळी जितका शुद्ध व पवित्र असेल तितकी ती लवकर व खात्रीनें प्रसन्न होते. सत्याग्रह म्हणजे एक बळीच आहे. हा बळी जर शुद्ध असला तर प्राण न जातांहि सत्याग्रह यशस्वी होऊं शकेल.

पण शुद्ध बळी म्हणजे काय ? हातांत शस्त्र असून मरणारे असंख्य सांपडतात, पण हातांत शस्त्र नसतां विशिष्ट तत्त्वाकरतां आपणहून मरण पत्करणारे अत्यंत थोडे सांपडतात. त्यांच्या मरणानें ते मृत्यूला अमरत्व आणतात; ते मृत्यूला तजेला व वैभव चढवितात व मृत्युंजय होतात. एरवीं मृत्यु कोणाला टळला आहे ? पण उघड्या डोळ्यानें मृत्यूला निर्भयपणें कवटाळणारे किती असतात ? तेव्हां मनांत मृत्यूची भीति नसणें, सत्यावर पूर्ण श्रद्धा असणें, प्रतिपक्षाबद्दल मनांत यत्किंचित् द्वेषाची भावना नसणें हे गुण ज्याच्या ठिकाणीं सांपडतात तो शुद्ध सत्याग्रही होय. असे सत्याग्रही ज्या ज्या चळवळी हातीं घेतात त्या यशस्वी झाल्याशिवाय रहात नाहींत. यमासारखा सर्व सजीव प्राण्यांचे प्राण हरण करणारा देव. पण तोहि सावित्रीसारख्या स्त्रीच्या पातिनिष्ठेनें द्रवला व त्यानें सत्यवानाचे हरण केलेले प्राण परत दिले. महाभारतांतील ही कथा कल्पित वाटली तरी त्या कथेंत अंतर्भूत झालेलें तत्त्व हें अमर आहे, सत्य आहे. शुद्ध भावनेपुढें अत्यंत दुष्ट माणूसहि आपला स्वभावधर्म टाकून देतो हें काय आपण नाकबूल करूं शकूं ? अशा कथा निदान हिंदुधर्मांत अनेक सांपडतील.

प्रत्येक गोष्टीचा शेवट हा यशानेंच मोजतां येईल असें नाहीं. असे अनेक प्रसंग असतात कीं, आपल्याला यश कां मिळालें नाहीं ह्याचा बुद्धीला उलगडाच होत नाहीं. आपण त्याला दैव किंवा कर्म म्हणून सोडून देतों. येशू ख्रिस्तासारखा सत्याचा उपासक ह्याचा शेवट तशा प्रकारें व्हावा याचें कारण कोण सांगूं शकेल ? पण त्यामुळें आपण

सत्याचा मार्ग सोडावयाचा का? उलट येशूच्या मृत्यूमुळें ख्रिस्ती धर्माचा अधिक प्रसार होऊं शकला. १९०८ सालीं लो. टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाल्यावर त्यांनीं असे उद्गार काढले कीं, ' ज्या कार्याचा मी पुरस्कार करीत आहे तें कार्य माझ्या बाहेर रहाण्यापेक्षां तुरुंगांत गेल्यानेंच अधिक वृद्धिंगत व्हावें अशी ईश्वरी इच्छा असावी. ' टिळकांना तुरुंगवास भोगावा लागला खरा, पण त्यांचें कार्य वाढीला लागलें. १९१९ च्या पंजाब प्रकरणांत शेंकडों लोक ठार केले गेले. पण त्यांच्या मृत्यूंतून स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रचंड चालना मिळाली. तेव्हां एका वा अनेक व्यक्तींच्या नाशामुळें आपण निराश होतां कामा नये. अहिंसात्मक चळवळींमध्यें खरें यश लवकर दिसणें जवळजवळ अशक्य असतें. विशिष्ट बाबींपुरतें आपण यश मिळवूं शकूं. घरांतल्या लढ्यापेक्षां बार्डोलींतला लढा कठीण असतो; बार्डोलींतल्या लढ्यापेक्षां हिंदुस्थानचा व हिंदुस्थानच्या लढ्यापेक्षां जगाचा लढा कठीण आहे. कारण सत्याग्रह तेव्हां पूर्णपणें यशस्वी झाला असें म्हणतां येईल कीं, ज्या वेळीं जगाच्या लढ्यांत त्याला यश येईल. इंग्रज सरकारबरोबर आपण सत्याग्रहानें लढलों व आपण स्वतंत्र झालों असें समजूं. पण जर आपण सत्याग्रहाचा अवलंब इंग्रजी अंमल दूर करण्यापुरताच केलेला असला तर हातीं सत्ता येतांच आपण हिंसात्मक साधनांची सिद्धता करूं व आपला राज्यशकट जुन्या चाकोरींतून हांकूं लागूं. तें संधिसाधूपणाचें किंवा दुर्बलतेचें कृत्य होईल. अर्थात् अहिंसेनें हिंसेला पराभूत केलें ही गोष्ट महत्त्वाची झाली नाहीं असें कोण म्हणेल? पण ज्यांनीं सत्याग्रहाचा अगर आत्मबलाचा अवलंब शाश्वत तत्त्व म्हणून केला असेल त्यांनीं तें तत्त्व सोडतां कामा नये. ज्या वेळीं सत्याग्रह हा हिटलरसारख्या शस्त्रवाद्यावर विजय संपादन करील त्याच वेळीं तो खरा विजय ठरेल. तोंपर्यंत मिळालेले विजय हे अपुरे होत. तेव्हां सत्याग्रहीनें विजय मिळाला नाहीं म्हणून निराश होतां कामा नये. सत्याग्रहाचा अवलंब हेंच त्याचें पारितोषिक आहे. आपल्या शोधाकरतां कितीतरी शास्त्रज्ञ मरतात. एवरेस्ट शिखरावर किंवा उत्तर ध्रुवावर जाण्याकरतां किती जणांना स्वतःचे बळी द्यावे लागतात. आपल्या प्रयोगाकरतां कितीतरी संशोधक डॉक्टरनीं

आपले प्राण घालविले. सत्याग्रह हा प्रयोग नसून तें एक शास्त्र आहे. तें शास्त्र यशस्वी झालेंच पाहिजे असा त्या शास्त्राच्या संशोधकाचा सिद्धांत आहे. तो सिद्धांत खरा ठरण्याकरतां श्रद्धावान्, आशावादी, निर्भय अशा असंख्य लोकांना मरावें लागेल व शस्त्रवाद्याकडून हालहाल करून घ्यावे लागतील.

तेव्हां तात्कालिक पराजय हा खरा पराजय नाहीं हें सत्याग्रहीनें ओळखलें पाहिजे. सत्याग्रहाचा पराजय होणें म्हणजे सत्याचा पराजय होणें. पण सत्याचा पराजय कसा होणार ? जें पराभूत होतें तें सत्य तरी नसलें पाहिजे किंवा त्याचा आग्रह धरणारा तरी दुर्बल असला पाहिजे. तेव्हां सत्याग्रहीनें नेहमीं अंतर्मुख दृष्टि करून आत्मनिरीक्षण केलें पाहिजे. आपल्यांत काय अशुद्धि आहे हें जो ओळखतो व ती दूर करतो तोच सत्याग्रही होऊं शकतो. सत्याग्रही हा लढवय्या असतो, क्रांतिप्रिय व क्रांतिकारक असतो. त्यामुळें तो समाजाची अगर सत्ताधिकाऱ्यांच्या रागलोभांची किंवा देहदंडाची पर्वा करीत नाहीं. अस्पृश्यता ही वाईट आहे असें पटल्यावर आपण अस्पृश्याला जवळ केलें तर सारा समाज आपल्यावर उलटेल, याची सत्याग्रहीनें कां पर्वा बाळगावी ? कोणतीहि नवी गोष्ट केली म्हणजे त्याची प्रतिक्रिया होते व त्या प्रतिक्रियेचे-चांगले नव्हे—वाईट परिणाम, निदान सुरवातीला तरी, भोगावे लागतात. सारी बोलकी जनता तुमची शत्रु बनते. तुम्ही धर्म बुडवला, संस्कृति बुडवली, देवळें भ्रष्ट केलीं, अनाचार माजवला अशा टीका होऊं लागतात आणि म. गांधींवर जसा पुण्यास बॉंब टाकण्याचा प्रयत्न केला तसा प्रयत्न अनेक महाभाग करूं लागतात. त्यांत मरणहि येतें. जर सनातन्यांच्या हातीं राजसत्ता असती तर त्यांनीं हरिजनांना मंदिरांत प्रवेश करूं देणाऱ्या गांधींना पूर्वीच्या येशूप्रमाणें मृत्यूची शिक्षा फर्मावली असती. जुडासप्रमाणें कदाचित् अनेक हरिजन सनातन्यांच्या बाजूलाहि उभे राहिले असते. त्यांना तें शक्य नव्हतें म्हणून त्यांनीं कायदा हातीं घेऊन तसला प्रकार केला. तेव्हां सत्याग्रही हा मरणाला भिणारा नसावा, तसाच जें गाऱ्हाणें न्याय्य आहे, त्याच्या पुरस्कारालाहि भिणारा

नसावा, किंबहुना समाजांत असणारे अन्याय शोधून काढून त्यानें ते दूर केले पाहिजेत.

आपण सत्याग्रहीला लढवय्या, क्रांतिकारक वगैरे म्हटलें. पण शस्त्रानें लढणारा लढवय्या, हा जसा कठोर, क्रूर असतो, तसा सत्याग्रही असूं शकणार नाहीं. शस्त्रधारींच्या अगदीं उलट गुण सत्याग्रहीच्या ठिकाणीं लागतात. सत्याग्रही जर नम्र नसेल, मधुभाषी व सेवाभावी नसेल तर त्याला बरेंच शिकावें लागेल. अत्यंत कठोर शब्दांचा वर्षाव होत असतांना त्यानें कठोर शब्द उच्चारतां कामा नये; कारण वाचेची हिंसा ही क्रियेच्या हिंसेइतकीच त्याज्य आहे. सत्याग्रहीवर प्रक्षुब्ध होण्याचे अनेक प्रसंग येतात. त्या प्रसंगीं मनाची साम्यावस्था ढळूं न देणें हें अत्यंत कठीण असतें. पतीनें लाथा मारल्या तर लाथा मारून त्याचे पाय दुखावले असतील म्हणून गरम पाण्यानें पाय शेकणारी, त्यांना तेल लावणारी व हातानें ते रगडणारी एखादी सती सांपडेल. पण पोलिसांनीं लाथा मारल्या असल्या तर पोलिसाची सेवा करणारा कोणी भेटेल का ? हें अत्यंत चमत्कारिक वाटतें. मनुष्यत्वाचें परिवर्तन कसलें, उच्चाटनच तुम्हीं सत्याग्रहानें करतां असा आरोप त्यावर येईल. भूक लागली असतां जेवणें, किंवा ऊन लागत असतां डोक्यावर छत्री घेणें हे प्रकृतिसिद्ध जसे धर्म आहेत, तसें अपकार करणाऱ्यावर निदान उपकार न करणें एवढें तरी करायला परवानगी द्या. आईला मुलानें लाथा मारल्या, तिला तें चावलें, तरी प्रेमळ आई त्या मुलाला ' बाळ, असें करूं नये ' असें लाडानें बोलत त्याची सेवाच करीत असते. आपल्या अंतःकरणांत जर खऱ्या बंधुत्वाची भावना निर्माण झाली असेल तर आपण आपल्यावर लाठ्या मारणाऱ्या पोलिसांची किंवा त्यांच्या पोटाची कींव करूं आणि त्यांच्यावर उपकारच करूं. १९३० च्या किंवा त्यानंतरच्या लढ्यांत म. गांधींनीं सरकारी अधिकाऱ्यांवर सामाजिक बहिष्कार घालूं नका, असा आदेश दिला होता. तो आदेश मिळण्यापूर्वी सरकारी अधिकारी व नोकर यांना अन्नपाणीहि मिळणें अशक्य झालें होतें.

तेव्हां सत्याग्रही हा गोड बोलणारा, अत्यंत नम्र, अपकार करणाऱ्या-

वरहि उपकार करणारा आणि सेवाप्रेमी असला पाहिजे. तसेंच तो श्रद्धावान असला पाहिजे. श्रद्धेशिवाय सत्याग्रही पुढें पाऊलच टाकूं शकणार नाहीं. ही श्रद्धा सत्यावर असली पाहिजे. सत्याचरण करणारा कधींहि नाश पावत नाहीं, अशी श्रद्धा त्यानें बाळगली पाहिजे. श्रद्धेच्या उजेडांत त्याला मार्ग आक्रमण करावयाचा असतो. तो मार्ग अतिशय कष्टप्रद, दीर्घ, कंटाळवाणा व निराशा वाटणारा असतो. त्याची सत्यावर श्रद्धा असेल तरच तो या रस्त्याच्या शेवटाला जाईल. अशा श्रद्धाळू माणसाच्या विरुद्ध सर्व जनता जाते आणि त्याला आपण तरी बरोबर आहों कीं नाहीं, याबद्दल शंका येऊं लागते. अशावेळीं त्याला श्रद्धाच शक्ति, सामर्थ्य व धीर देऊं शकते व ध्येयाप्रत पोहोंचवते. ह्या श्रद्धेचा उगमहि सत्यांत, आत्मबलांत असतो.

सत्याग्रही हा कोणत्या वृत्तीचा असावा याच्याबद्दल वर चर्चा केली आहे. त्याचे अंतर्गत गुण कोणते तें आपण पाहिलें. त्या गुणांचा संक्षेपानें उल्लेख करूं. सत्याग्रही हा (१) अहिंसा व प्रेम करणारा, (२) सत्यावर म्हणजेच ईश्वरावर श्रद्धा असणारा, (३) निर्भय, (४) आशावादी, (५) नम्र, (६) गोड बोलणारा, (७) सेवा-भावी, (८) अन्यायाचा व पापाचा प्रतिकार करणारा, (९) संयमी, (१०) क्लेश सहन करणारा, (११) मृत्यूला न भिणारा वगैरे लक्षणांनीं युक्त असावा.

सत्याग्रहीला हीं अनेक विशेषणें जरी लावलीं असलीं तरी तीं वाट-तात तशीं भिन्न नाहींत. त्यांचा विकास हा मूलभूत आत्मबलापासून होत असतो. पण सत्याग्रहीनें—हिंदुस्थानांत स्वातंत्र्याकरतां लढणाऱ्या सत्याग्रहीनें—आणखी कांहीं गोष्टी करावयाच्या आहेत. तो हिंदु—मुस्लिम ऐक्याचा पुरस्कर्ता असावा आणि अस्पृश्यता त्याला मान्य असतां कामा नये. हरिजन सेवा करण्यास तसेंच जातीजातींतील ऐक्याकरतां प्रयत्न करण्यास त्याची तयारी असावी. तिसरीहि एक गोष्ट त्यानें करा-वयास पाहिजे. दरिद्री नारायणाची सेवा त्यानें करावयाची आहे. त्या करतां ग्रामोद्योग, खादी व अन्य विधायक कार्यावर त्यानें भर दिला पाहिजे.

प्रत्यक्ष लढा चालू असतां सत्याग्रहींचें वर्तन हें आदर्श वाटलें पाहिजे. आपल्या वरिष्ठांचे हुकूम पाळण्यास त्यानें अनमान करतां कामा नये. शिस्त हा लढ्याचा प्राण आहे; हें ओळखून त्यानें नेहमीं शिस्त पाळली पाहिजे. तसेंच निवळ आत्मबलाच्या प्रौढीच्या गप्पा मारून ज्ञानाचीं गवाक्षें त्यानें बंद करतां कामा नये. पुस्तकाचें वाचन व मनन हें सत्याग्रहीनें सतत चालू ठेवलेंच पाहिजे. सत्याग्रही हा बावळट, निष्काळजी असतां कामा नये. गाफीलपणा हा जसा सशस्त्र युद्धांत पराभवाला कारण होतो, तसा तो सत्याग्रहाच्या युद्धांतहि पराभवाला कारण होतो. तेव्हां सत्याग्रही हा अत्यंत सावध असला पाहिजे. त्यानें आपले डावपेंच व योजना प्रकट करण्याची जरूरी नसते. सत्याग्रही हा हटवादी असतां कामा नये. सत्याग्रहांत यश जें मिळतें, तें विनंतीनें, युक्तिवादानें, तडजोडीनें किंवा शरीरक्लेशानें मिळतें. तेव्हां प्रतिपक्षाला आपला स्वाभिमान राखून विनंति करणें हें कमीपणाचें नाहीं. प्रतिपक्षाबरोबर युक्तिवाद करून त्याचें मतांतर करणें अगर आपलें चुकत असेल तर आपलीं मतें बदलणें हें सत्याग्रहीनें मान्य केलें पाहिजे. तडजोडकिरतां सत्याग्रही नेहमींच तयार असतो. तेव्हां तत्त्व न सोडतां तडजोड करणें यांत कांहींच गैर नाहीं. शरीरक्लेश हा सत्याग्रहाच्या लढ्यांतला शेवटचा उपाय आहे. तेव्हां वरील क्रमानें सत्याग्रहीनें वागावयास हवें.

सत्याग्रहाच्या लढ्यांत कडक निर्बंध–पालन करावें लागतें. पुष्कळांची अशी समजूत असते कीं, सत्याग्रहाचा लढा हा हंसत–खेळत जिंकतां येतो. पण ती चूक आहे. शस्त्राच्या लढ्याइतपतहि क्लेश, हानि न सोसतां यश मिळालें नाहीं म्हणजे सत्याग्रहाच्या लढ्यानें कांहींहि होणार नाहीं असें आपण म्हणत सुटतों. शस्त्राच्या लढ्यापेक्षां सत्याग्रहाच्या लढ्यांत अधिक मनुष्यबळाची जरूरी लागते. गांवेंचींगांवें या लढ्यांत सामील व्हावीं लागतात. बार्डोलीचा लढा यशस्वी कां झाला हें आपणांला ठाऊक आहे. त्या तालुक्यांतील सर्व शेतकरी अभेद्य एकीनें व दृढनिश्चयानें भारलेलें होतें. जीवनमरणाचाच तो संग्राम होता. पण सारी जनता कशी शिस्तीनें व एकदिलानें वागत होती! त्यांच्या एकीच्या बळापुढेंच सरकारला नमावें लागलें. पण त्याहीपेक्षां मोठा लढा कर-

ण्याचे प्रसंग जेव्हां आले, तेव्हां तितकी शिस्त आपण पाळूं शकलों नाहीं व सत्याग्रहावर तितका विश्वासहि ठेवूं शकलों नाहीं. सरकारला सामुदायिक उठावाच्या जोरावर आपण वठणीवर आणूं अशा विश्वासानें गांवेंच्यागांवें उठलीं. पण त्यावेळीं मिळालेलें यश हें अल्पजीवी ठरलें.

जनतेची प्रतिकार शक्ति ही एकाएकीं जागृत होत नाहीं. आपण सध्यांचें लष्कर पहातों आणि पूर्वीच्या बाजारबुणग्या लष्कराचीहि आपल्याला माहिती आहे. ब्रिटिशांच्या कडक शिस्तीच्या लष्करापुढें हिंदुस्थानांतलि आयत्या वेळीं गोळा झालेलें, दारुगोळा नसलेलें दल कसें टिकाव धरणार ! सत्याग्रही लढ्यांत जर यश मिळावयाचें असेल तर नुसती राणा भीमदेवी भाषणें ऐकून तयार झालेले किंवा स्वार्थपरायण लोक येऊन सत्याग्रहाचा लढा यशस्वी होणें कठीण आहे. त्या करतां सतत वर्षानुवर्षे सत्याग्रहाची दीक्षा घेतलेले व वरिष्ठांच्या परीक्षेला उतरलेले असे खड्या फौजेप्रमाणें सत्याग्रही सैनिक तयार असावेत. त्यांच्याचकडून हे लढे लढले गेले, तर ते यशस्वी होतील. एरवी सरकारचें व काँग्रेसचें बितुष्ट यावयाचें, काँग्रेसनें सत्याग्रह पुकारावयाचा आणि कोणी तरी त्या लढ्यांत हुकूम म्हणून सामील व्हावयाचें ही स्थिति यशदायी नाहीं. अशा अननुभवी सत्याग्रहींना सत्याग्रहाचें सारें तंत्रहि कळत नाहीं. ते बिचारे शुद्ध भावनेनें येतात. कोणी गांधींवरील प्रेमामुळें येतात तर कोणी काँग्रेसवरील प्रेमामुळें येतात. पुढारी जे असतात, त्यांतील कांहीं कुठेंतरी जागा मिळावी म्हणून येतात, तर कांहीं काँग्रेस संस्थेंतील आपलें स्थान कायम रहावें म्हणून येतात. अर्थात सर्वचजण संधिसाधु नसतात. कांहींजणांना तर, यत्किंचित् स्वार्थ नसतो. उलट बिचाऱ्यांच्या उपजीविकेचें साधन अशा लढ्यांत आल्यामुळें जातें. ते कमी बोलकें किंवा कमी विद्वान् असल्यामुळें कोणी त्यांना विचारीतहि नाहीं, आणि ते दारिद्र्यांतच आपली जीवनयात्रा संपवितात.

ही स्वयंसेवकी थाटाची युद्धाची पद्धत कितपत यशस्वी होईल याबद्दल शंका वाटते. उलट शांतिसेनेची उभारणी केली तर हिंसावादी सरकार कांहीं ना कांहीं निमित्त काढून अशीं दलें उधळून लावील.

शिवाय दलें म्हटलीं म्हणजे त्यांतील सैनिकांना अल्पस्वल्प वेतन दिलें पाहिजे. तें वेतन कोठून आणावयाचें ? या व अन्य व्यावहारिक अडचणीमुळें शांतीदलें उभारण्याची कल्पनाच कोणी गंभीरपणें पुढें आणीत नाहीं. पण त्याशिवाय कोणत्याहि स्वातंत्र्येच्छु देशाला गत्यंतर नाहीं. या दलांतील सैनिक शीलवान, चारित्र्यसंपन्न, बुद्धिवान असें असावें.

ज्या लढ्यांत शारीरिक क्लेश हे प्रधान आहेत, आणि जो लढावयास असाधारण गुण लागतात, असा लढा दुर्बल माणसें कशी लढूं शकतील ? गांधीवादासंबंधीं एक चुकीची समजूत या तत्त्वज्ञानाच्या विरोधकांनीं फैलावून दिली आहे कीं, या तत्त्वज्ञानामुळें मनुष्य पराक्रमशून्य नेभळट व घाबरट होतो. सत्याग्रहाच्या लढ्यांत येणारा माणूस हा जर त्यांतील जबाबदाऱ्या न ओळखतां लढ्यांत सामील होईल तर तो लढ्याला कमीपणा आणील. पण जर नेभळट लोक सत्याग्रह करणार असतील तर त्याला यश कसें येणार ? यशापयशाचा प्रश्न आपण बाजूला ठेवूं. सत्याग्रहाच्या लढ्यांत जो त्याग व जे क्लेश सहन करावे लागतात ते सामान्य माणूस, नेभळट माणूस सहन करील काय ? अशीं माणसें या लढ्यांत येत नाहींत असें नाहीं; पण तीं कांहीं तरी कारण काढून बाहेर पडतात.

सशस्त्र लढ्यापेक्षां आत्मबलाच्या लढ्यांत अत्यंत दुःख व यातना सोसाव्या लागतात; लाठ्या खाव्या लागतात, तुरुंगांत वर्षानुवर्षें काढावीं लागतात; प्रसंगीं देहहि अर्पण करावा लागतो आणि हें सर्व कायेनें, वाचेनें किंवा मनानें प्रतिकार न करतां. म० गांधीसारखे सत्याग्रही जेव्हां प्रायोपवेशनाची प्रतिज्ञा करतात, तेव्हां तर त्यांच्या शौर्याची व देहावरील अनासक्तीची किती स्तुति करावी हेंच समजत नाहीं. असे दुसरे व दुसऱ्या देशांतहि वीर होऊन गेले. त्यांना काय आपण घाबरट नेभळट म्हणणार ? १९३०–३२ सालीं ज्या असंख्य सत्याग्रहींनीं जागेवरून न हलतां पोलिसांच्या लाठ्या डोक्यावर झेलल्या त्यांना आपण नेभळट म्हणणार काय ? त्याच सालीं सरहद्दप्रांतांतील पठाणांनीं आपल्या छात्या लष्करी शिपायांच्या बंदुकांपुढें मोकळ्या केल्या व त्यांनीं आपले देहहि त्या गोळ्यांना अर्पण केले. अशा लोकांना शूर म्हणणार

कां भित्रे म्हणणार? जे लाखों सत्याग्रही सरकारचे जुलमी कायदे मोडतात, मी ते कायदे मोडले असे निर्भयपणें सांगतात, आणि तुरुंगवास हंसत हंसत पत्करतात, त्यांना काय तुम्हीं भित्रे म्हणणार? अर्थात् त्यांचें शौर्य हें निराळ्या प्रकारचें आहे. तें आत्मबलापासून निर्माण झालेलें असतें. ते कोणावर शस्त्र चालवीत नाहींत. ज्याला आत्मबलानें रक्षण करतां येत नाहीं, तोच शस्त्र हातीं घेतो असा अहिंसा तत्त्वज्ञानाचा सिद्धांत आहे. क्षुद्रजीवजंतु मारावयास हातांत कांहीं घ्यावें लागत नाहीं; पण साप मारावयास काठी लागते. ही काठी आपण कां घेतों? कारण सापाची आपल्याला भीति वाटते म्हणून. पण वाघ-सिंहांना मारावयास काठी पुरत नाहीं, त्यामुळें हातात बंदुक घ्यावी लागते. वाघाची शक्ति ही सापाच्या शक्तीपेक्षां जास्त म्हणून आपण जास्त प्रभावी शस्त्रें हातीं घेतों. माणसांना मारावयास बॉंब, तोफा वगैरे लागतात. हीं एकापेक्षां एक मोठीं शस्त्रें जीं धारण केलीं जातात, तीं वाढत्या भयामुळेंच. सापाची, वाघाची, माणसाची भीति जर आपल्याला वाटली नसती तर आपण जास्त जास्त मारक शस्त्रें घेतलींच नसतीं. तेव्हां जो शस्त्रें घेतो तोच भित्रा असतो; पण व्यवहारांत त्याला शूर, पराक्रमी, योद्धा असें म्हणण्यांत येतें.

सत्याग्रही हा कोणतेंहि शस्त्र हातीं घेत नाहीं. तो आत्मबलावर विसंबून प्रतिकार करतो आणि कदाचित् शस्त्र धारण करणाऱ्याच्या हातून मरतोहि. अशा सत्याग्रहीला व त्याच्या सत्याग्रहाला जे भ्याड किंवा भित्रे म्हणत असतील त्यांना सत्याग्रहाचें तत्त्व समजलें नाहीं, असेंच म्हणावें लागेल.

सत्याग्रहांत व सशस्त्र लढ्यांत आणखी एक मोठा फरक आहे. सत्याग्रहाच्या लढ्यांत कोणाच्या घरावर बॉंब पडणार नाहींत, कोणाला जमिनीच्या पोटांत दडून रहावें लागणार नाहीं, कोणी पाणबुडीच्या पाणतीराला बळी पडणार नाहीं. सत्याग्रहाचें युद्ध सुरू झाल्यावर बजेटें वाढवावीं लागणार नाहींत, किंवा बायकामुलें दूरदेशीं पाठविण्याची पाळी येणार नाहीं. ज्याच्याविरुद्ध सत्याग्रह करावयाचा त्याच्या मनांत मात्र प्रचंड खळबळ उडेल. त्याला झोंपहि येणार नाहीं. आपण अत्यंत

पापी, दुरात्मे आहों असें त्याचें मन त्याला सांगूं लागेल. प्रतिपक्षियांच्या मनाची सत्याग्रहानें प्रगल्भता होते. त्याच्या मनांतील सुप्त भावना जागृत होतात आणि त्या आपल्या हातून होत असलेल्या अन्यायाबद्दल त्याला वैषम्य वाटूं लागतें. आपल्या जुलमामुळें अनेक सच्चा माणसांना आपण क्लेश भोगावयास लावीत आहों या गोष्टीचें दडपण जुलमी अधिकाऱ्यांच्या मनावर पडतें व त्यामुळेंच अन्याय दूर होतात. जोंपर्यंत अधिकाऱ्यांच्या वृत्तींत असा बदल होत नाहीं, तोंपर्यंत सत्याग्रह चालवावा लागतो.

सशस्त्र युद्धांत युद्ध संपलें तरी वैर संपत नाहीं. किंबहुना झालेल्या हानीमुळें वैराची ज्वाला अधिकच भडकत जाते. पराभूत झालेलें राष्ट्र विजयी राष्ट्राबद्दल सूडाची भावना बाळगतें आणि संधि सांपडतांच पुनः युद्ध पुकारतें. सत्याग्रहाच्या युद्धांत अशी भावना उरतच नाहीं. विजयी पक्ष व पराजयी पक्ष हे जेव्हां मनाच्या व हृदयाच्या समान भूमिकेवर येतात, तेव्हांच त्यांच्यांत सलोखा होतो. परस्परांच्या मनांत असलेलें शल्य त्यानंतर शिल्लकच उरत नसल्यामुळें मागाहूनच्या वैराचा प्रश्न उद्भवत नाहीं. सत्याग्रहांत प्रतिपक्षाच्या वित्ताला, शरीराला, संपत्तीला कोणत्याहि प्रकारची हानि पोहोंचत नसल्याकारणानें प्रतिपक्षी शत्रुत्व सोडून मित्र होतो. हा बदल जर खरा नसेल तर सत्याग्रहीला अधिक क्लेश सोसावे लागतील. पण जुलूम करणाऱ्याला कांहींहि होत नाहीं. तेव्हां सत्याग्रहानें मत बदलतें, मनुष्यांतील उच्च व उदात्त भावना जागृत होतात, आणि हृदयपालट होतो. अशा प्रकारचा बदल हा समाज, राष्ट्र किंवा व्यक्ति यांच्या उत्कर्षाला कोणत्याहि प्रकारें बाधक न होतां सहाय्यकारकच होतो. सत्याग्रहींना फार तर अशा लढ्यांत तक्रार करावयास जागा मिळेल. पण त्याच्या आत्म्याची किंवा आत्मबलाची या अग्निदिव्यामुळें हानि न होतां वाढच होत जाते. त्यामुळें तोहि संतुष्ट व समाधानी असतो.

सत्याग्रह व सत्याग्रही यांच्या विषयीं केलेल्या विवेचनावरून ही चळवळ नीतिमत्तेवर आधारलेली आहे हें कळून येईल. कायदा मोडायचा व जाणून बुजून तो मोडला असतां कोर्टांत स्वतःचा बचाव

करायचा हें सत्याग्रहाला साजेसें नाहीं. कारण अशा खोट्या बचावामुळें त्यांतील नैतिक शक्ति जाते. सत्याग्रही हा आपल्या शत्रूशीं गनिमी काव्यानें लढूं इच्छित नाहीं. तसेंच तो आपल्या उच्च दर्जाच्या मनोभूमिकेवरून खालीं येऊन प्रतिपक्षाशीं अशिष्ट वर्तन करूं शकत नाहीं. हातांत शस्त्र घेतलें नाहीं म्हणजे सत्याग्रह झाला, असा सत्याग्रहाचा अर्थ नाहीं. पुष्कळांना असें वाटतें कीं, सत्याग्रह करणें याचा अर्थ प्रतिपक्षाला न मारणें. पण ती चूक आहे. अहिंसावाद्यांची एक विशिष्ट मनोवृत्ति बनत असते. अशा मनोवृत्तीचीं माणसें व्यवहारांतील नीतिनियम अत्यंत कसोशीनें पाळतात. ज्यामुळें आपल्या प्रतिपक्षावर आपल्या वर्तनाची छाप पडेल व त्याच्या अंतःकरणांत बदल होईल, अशी प्रत्येक गोष्ट सत्याग्रहीकडून अपेक्षित असते. इतर युद्धपद्धतींप्रमाणें सत्याग्रहालाहि एक विशिष्ट तंत्र आहे. हें तंत्र अनुभवाप्रमाणें वाढत चाललें आहे. सत्याग्रह करणारांनीं गुप्त गोष्टी करूं नयेत, खोटीं नांवें सांगूं नयेत, न ओळखण्यासारखे पोषाख करूं नयेत, कागदपत्र किंवा पैसा लांववूं नये, गुप्त प्रचार करूं नये, सरकारला कळविल्याशिवाय प्रतिकार करूं नये, गुन्हा केल्याचें नाकारूं नये, आपल्या कुटुंबाचा भर संस्थेवर टाकूं नये, पकडलें असतां पळून जाऊं नये, शिक्षा झाल्यावर काम टाळूं नये, अधिकाऱ्यांचे अपमानकारक हुकूम मानूं नयेत वगैरे गोष्टी पाळावयाच्या आहेत.

सत्याग्रहासंबंधींचे हे व असले नियम पाळले तरच तो शुद्ध सत्याग्रह होतो. आपण मधूनमधून जे प्रतिकाराचे प्रकार पहातों त्यांना सत्याग्रह म्हणतां येत नाहीं. गिरण्यांतून संप होतात किंवा कांहीं व्यक्तींवर किंवा दुकानावर बहिष्कार वगैरे घालण्यांत येतात. संपवाल्यांच्या मनांत आपल्या प्रतिपक्षाविषयीं म्हणजे मालकाविषयीं यत्किंचितहि प्रेम नसतें. तो त्याला शत्रूप्रमाणें वाटतो. त्यानें जर त्यांच्या मागण्या पुऱ्या केल्या नाहींत तर संप फोडणाऱ्या कामगार-बंधूंना मारण्यास व गिरण्यावर दगडफेंक करण्यास संपवाले मागें घेत नाहींत. त्यामुळें असले संप हे सत्याग्रहाच्या सदरांत येत नाहींत.

बहिष्काराच्या बाबतींत अशीच वृत्ति असते. ज्या व्यक्तीवर बहिष्कार

घातला जातो, ती व्यक्ति अडचणींत सांपडावी व तिनें आपलें म्हणणें मान्य करावें अशी त्यांत दृष्टि असते. सत्याग्रही आपल्या प्रतिपक्षावर दडपण आणीत नाहीं असें नाहीं, पण त्या दडपणाचा उद्देश त्याचें अन्न-पाणी बंद करावें, त्याला न्हावी, धोबी, दूध, सर्पण मिळूं नये व तो टेकीस यावा असा नसतो. सत्याग्रही या सोयी व इतर पदार्थ प्रति-पक्षाला मिळूं देईल व आपण इतकें पातक करतों तरी सत्याग्रही आप-ल्यावर उपकार करतो या जाणिवेनें तो त्याला आपला स्वभाव विसरा-वयास लावील. सत्याग्रहांत दडपण येत असलें तर तें मनावर येतें व तें उपकाराचें, उदार वृत्तीचें व सात्विक भावनांचें दडपण येतें. शरीरा-ऐवजीं मनावर केलेले संस्कार हेच अधिक टिकावू होतात. हिंसात्मक लढे वा युद्धें हीं शरीरावर परिणाम करणारीं असतात. पण सत्याग्रह हा मनाशीं युद्ध झुंजतो व मनावर परिणाम करतो. हा परिणाम व्हावयास दीर्घकाळ लागतो. तसेंच ज्याच्याकडून हा परिणाम व्हावयाचा त्याची शक्तिहि तशीच सात्त्विक व शुद्ध लागते. आपण एक काडी पेटवली व कागदाला लावली कीं कागद तात्रडतोब पेट घेतो. पण लोखंड, पोलाद तापविण्यास काडीची धग पुरत नाहीं. आगीच्या मोठाल्या भट्ट्या बांधाव्या तेव्हां ह्या धातु वितळतात. पांच पन्नास हजार आगकाडीच्या काड्या पेटवल्या तरी लोखंड फारसें तापणार नाहीं. मग वितळण्याची गोष्ट कशाला ? पण चांगले दगडी कोळसे भट्टींत भरले म्हणजे त्या धातूंचें पाणी व्हावयास वेळ लागत नाहीं. सत्याग्रहाचें तसेंच आहे. सत्याग्रह यशस्वी व्हावयाचा असला तर राष्ट्रप्रेमानें भारलेले पण तेजानें कमी असलेले हजारों नांवाचे सत्याग्रही उपयोगी पडणार नाहींत. उलट प्रखर वृत्तीचे थोडेसे जरी सत्याग्रही असले तरी ते इष्ट कार्य करूं शक-तील. म्हणून गांधीजी म्हणतात सत्याग्रह हा संख्येवर अवलंबून नसतो, गुणांवर अवलंबून असतो.

पण आपल्याला गांवोगांव प्रभातफेऱ्या निघताहेत, स्वयंसेवकांच्या तुकड्या भगिनींकडून ओवाळून घेऊन सत्याग्रहाला जाताहेत, कुठें हरताळ पडताहेत, कुठें प्रचंड सभा भरताहेत, कुठें लाठी हल्ले होताहेत, वृत्त-पत्रांत फोटो येताहेत असे प्रकार पहाण्याची संवय झाली आहे. गांवेंचीं-

गांवें हादरलीं नाहींत तर सत्याग्रह कसला ? ज्यांत खळबळ नाहीं त्यांत तेज नाहीं अशी आपली समजूत असते. त्यामुळें सामान्य जनता ही गुणांपेक्षां संख्येवर विसंबून रहाणार हें निश्चित आहे. सामान्य जनतेलाहि आपल्या हातून कांहीं कार्य व्हावें असें वाटतें. त्यांत त्यांचें देशप्रेमच व्यक्त होतें. तेव्हां सत्याग्रही, जनतेला तुच्छ लेखत नाहीं किंवा त्यांच्या सेवेची किंमत कमी मानीत नाहीं. फक्त कोणत्या वेळीं व कोणत्या प्रकारचें जनतेचें सहाय्य घ्यावयाचें हें तो ठरवितो. राजकीय लढा लढवावयाचा असला म्हणजे सारीच जनता लढ्याच्या मागें येणें अवश्य असतें. अर्थात् त्याहि वेळीं जनतेचें वर्तन सत्याग्रहाला न शोभेसें असतां कामा नये. तशा वर्तनानें कार्यनाश होतो. थोडासा पोलिसांना हात दाखवला म्हणून काय बिघडतें असा जर जनता विचार करूं लागेल तर तिच्या मदतीमुळें सहाय्य होण्याऐवजीं नाश मात्र व्हावयाचा. खुद्द सत्याग्रह करणारेच जर अशा वृत्तीचे असतील तर पुढाऱ्यानें आपल्या नेतृत्वाची विटंबना करून न घेणें चांगलें आणि अशी विटंबना होत असेल तर त्याला सत्याग्रह न म्हणणें चांगलें. पण असले प्रकार झालेले आपण पहातों. त्यांना सत्याग्रह म्हणूं नये व स्वतःची फसवणूक करून घेऊं नये.

सत्याग्रह हा दोन प्रकारचा असतो. एक सामुदायिक व दुसरा वैयक्तिक. व्यक्तीवर जेव्हां एखादें अपमानकारक बंधन घालण्यांत येतें, त्या वेळीं तें बंधन मोडून टाकून वैयक्तिक सत्याग्रह केला जातो. एखाद्या ठिकाणीं १४४ कलम लागलें व तेथें जाण्यास बंदी केली, किंवा भाषणबंदी झाली, तर तसले अन्यायी हुकूम मोडून टाकले जातात व त्याला सामुदायिक पण स्थानिक गाऱ्हाण्याचें स्वरूप येतें. देशाच्या स्वातंत्र्याकरतां किंवा विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या पुरस्काराकरतां वैयक्तिक किंवा सामुदायिक सत्याग्रह करतां येतो. सत्याग्रहाच्या वैयक्तिक व सामुदायिक प्रकारांप्रमाणें आक्रमक व संरक्षक असेहि पुनः त्यांत भेद आहेत. मिठाचा सत्याग्रह हा आक्रमक स्वरूपाचा होता; पण बेकायदा ठरविलेल्या कॉंग्रेस कमिट्यांकरतां झगडणें हा संरक्षक सत्याग्रह होता.

असहकारिता व कायदेभंग हे सत्याग्रहाचेच प्रकार आहेत. असह-

कारिता म्हणजे असत्य व अन्यायाशीं असहकारिता होय. याचाच अर्थ सत्याशीं सहकारिता. आपल्याला जें पाप वाटतें, त्याच्याशीं आपण सहकार्य करूं शकत नाहीं. ब्रिटिश राजसत्ता ही अन्यायी व पापी आहे, म्हणून आपण त्या सत्तेशीं संबंध ठेवतां कामा नये. या मूलभूत हेतूनें असहकारिता पुकारण्यांत आली. ती पूर्णपणें यशस्वी झाली नसली तरी त्या चळवळीनें ब्रिटिशांची पुरीच बेअब्रू झाली. १९२० सालीं तरी हिंदी लोकांना आपल्या सहकार्यामुळें आपण गुलाम आहोंत हें पटलें होतें. त्यांची दुर्बलता त्यांच्या असहकारितेच्या आड आली.

असहकारिता हा सत्याग्रहाचा नेमस्त प्रकार आहे. अर्थात् तो सोपा नाहीं. वृत्तिछेदाला तयार होण्यास अलोट धैर्य व त्याग लागतो. तो एक प्रकारचा संप आहे. सरकारशीं केलेली सहकारिता काढून घेणें व त्यांचें राज्ययंत्र बंद पाडणें हा त्यांत हेतु असतो. हें राज्यदंत्र बंद पाडण्यास शेतसारा व इतर कर बंद करावे लागतात. ह्या गोष्टी पायरीपायरीनें व्हाव्या लागतात. रेल्वेवर बहिष्कार घालावा का, पोस्टावर बहिष्कार घालावा का, सरकारी नाणीं बहिष्कृत करावीं का असे प्रश्न असहकारितेच्या चळवळींत विचारले जात व त्याला नकारार्थी उत्तरें द्यावीं लागत. असहकारितेंत अगदीं साधी, निरुपद्रवी, पण परिणामकारक गोष्ट म्हणजे सरकारच्या प्रतिष्ठेचा भंग करण्याची. त्यानंतर सारा-बंदी वगैरे येते.

असहकारिता ही आयर्लंडप्रमाणें प्रतिस्पर्धी सरकार स्थापन करण्याकरतां निघणारी चळवळ नव्हे. त्यामुळें सरकारचीं जितकीं खातीं असतील तितकीं आपलीं खातीं काढावीं, असा या चळवळींत दृष्टिकोण नव्हता. तेव्हां आपलें पोस्ट-खातें सुरू करावें, आपली रेल्वे, आपलीं नाणीं असावींत असा त्यांत हेतु नव्हता. असहकारितेंत स्वकीयांबरोबर सहकार्याचा कार्यक्रम जोरानें अंमलांत आणावा लागतो. कारण आपसांत जर सहकार्य नसेल तर परक्याबरोबरची असहकारिता यशस्वी होणार नाहीं. ही आपसांत सहकारिता करावी म्हणून गांधींनीं हिंदुमुसलमानांच्या ऐक्यावर जास्तींत जास्त जोर दिला. तसेंच अस्पृश्यता निवारण्याचे बाबतींत. अस्पृश्यवर्ग हा आपल्यांतून फुटण्यास मुख्य कारण म्हणजे त्यांचा स्पर्श आपण अपवित्र मानला व त्यांना दूर लोटलें हें होय.

तेव्हां असहकारिता यशस्वी होण्यास हिंदु-मुसलमान एकी व अस्पृश्यता निवारण केलें पाहिजे हें उघड आहे.

वर असहकारितेचा उद्देश प्रतिस्पर्धी संस्था काढण्याचा नाहीं असें सांगितलें. पण त्या दिवसांत कांहीं संस्था काढण्यांत आल्या व त्यांना राष्ट्रीय संस्था म्हणण्यांत आलें. शाळा-कॉलेजें, कोर्टें व कचेऱ्या, पदव्या व कायदेमंडळें यांच्याशीं असहकार पुकारण्यांत आला. राष्ट्रीय विद्यापीठें त्यावेळीं स्थापन केलीं. सरकारी कोर्टाऐवजीं आपले निकाल खासगी पंचा-यतीकडून करून घ्यावेत अशाबद्दल तेव्हां प्रयत्न झाले. पण या एक दोन बाबी सोडल्या तर असहकारितेच्या चळवळींत प्रतिस्पर्धी सरकार स्थापण्याचे प्रयत्न झाले नाहींत. कारण या चळवळीचा तो उद्देश नव्हता. असहकारितेंतून करबंदी व कायदेभंग निर्माण होईल असें तेव्हां वाटत होतें. पण ती चळवळ जास्त तीव्र करण्यासारखी बाह्य परिस्थिति उपलब्ध नव्हती म्हणून तो प्रयत्न तसाच राहिला.

सत्याग्रहाचा दुसरा प्रकार कायदेभंग हा आहे. कायदे म्हणजे सरकारी कायदे, जे अन्यायी असतात, जे असत्यावर उभारलेले व सार्वजनिक जीवनाचा गुदमरा करून टाकणारे असतात ते. अशा कायद्यांचा केव्हां भंग करावयाचा हें आपल्या शक्तीवर व बाह्य परिस्थितीवर अवलंबून असतें. तसेंच सर्व कायदे अन्यायी असतात असें नाहीं. चोरी, बलात्कार, खून, वगैरेंबद्दलचे कायदे हे सत्याग्रहाच्या कक्षेंत येत नाहींत. कारण ते कोठल्याहि सरकारला करावेच लागतात. तेव्हां जुलमी व अन्यायी कायदे व हुकूम निवडून काढून ते मोडावयाचे व त्याकरतां होईल ती शिक्षा भोगावयाची, हा सत्याग्रहाचा दुसरा प्रकार आहे.

सर्वच जण कायदे मोडूं लागले तर कायद्याची व त्याहींपेक्षां कायदे करणारांची प्रतिष्ठा रहात नाहीं. लष्करांतील शिपायांना जर असेच क्रांतिकारक आदेश दिले व त्यांनीं ते मानले तर कोणतीहि सत्ता राज्य करूं शकणार नाहीं. पण ही प्रेरणा सर्व वर्गांत व्हावी लागते. अराजकता निर्माण करणें, हा कायदेभंगांचा उद्देश नसतो. पण सत्याग्रही जुलमी राज्यापेक्षां अराजकता व अंदाधुंदी पसंत करील. कारण तींतूनच सुव्यव-

स्थित राज्यघटना निर्माण होऊं शकेल. सामुदायिक सत्याग्रहांत राष्ट्रांतील सर्व वर्ग हे एका वृत्तीचे निदान आपसांत न भांडणारे तरी असावे लागतात. अशी एकी जर झाली तर एका बाजूनें कायदे मोडणें, दुसरीकडून करबंदी करणें, तिसरीकडून सरकारी संस्थांतून सहकार्य काढून घेणें वगैरे प्रयत्न करतां येतील. तेव्हां तत्त्वशः विचार केला तर सत्याग्रह हा राजकीय स्वातंत्र्य संपादन करण्यास अत्यंत परिणामकारक असा उपाय आहे यांत शंका नाहीं.

पण हा उपाय यशस्वी होण्यास वर निर्दिष्ट केलेलीं पथ्यें कडक रीतीनें पाळावीं लागतात. जातीय ऐक्याच्या पथ्याशिवाय विधायक कार्याचें एक पथ्य गांधींनीं सांगितलें आहे. खादी हा विधायक कार्याचा एक भाग आहे. प्रथम लोकांना असें वाटत होतें कीं, गांधी आपले जातीय ऐक्याबद्दलचे किंवा विधायक कार्याबद्दलचे आग्रह सोडून देतील. पण ते आग्रह सुटण्याच्या ऐवजीं जास्त दृढ होत आहेत, त्यामुळेंच या अटीबद्दल गंभीरपणें विचार करावा लागतो. विधायक कार्यक्रमाचा व सत्याग्रहाचा संबंध काय, हें आपण पाहूंच. तूर्त सत्याग्रहाला विधायक कार्यक्रम आवश्यक असतो एवढेंच नमूद करून ठेवावयाचें आहे.

सत्याग्रह हा म. गांधींनीं म्हटल्याप्रमाणें नवा सिद्धांत नाहीं. पूर्वींच्या काळीं आत्मक्लेश सहन करीत तोच आत्मक्लेशाचा सिद्धांत सत्याग्रहाच्या रूपानें पुनरुज्जीवीत केला आहे एवढेंच. तेव्हां सत्याग्रह म्हणजे कोठें अस्तित्वांत नसलेला एखादा नवा शोध आहे या दृष्टीनें पाहूं नये. तो जुनाच शोध आहे, पण नव्या परिस्थितीला तो लागू करण्यांत आला आहे इतकेंच.

गांधीवादांतील विधिनिषेध : : ८

" नम्रता की चरम सीमाकाही नाम तो अहिंसा है ।"

— म० गांधी

गांधीवाद हा राजकारणांत जो आला तो दुय्यम म्हणून आला. गांधीवादांत जर निष्क्रियता असती किंवा केवळ संन्यस्त वृत्ति असती तर राजकारणाच्या उठाठेवी या वादानें केल्या नसत्या. पण जीवनाच्या प्रश्नांना बगल देऊन गांधीवाद आत्महित करूं इच्छित नाहीं. त्याच-बरोबर तो संसारांतील प्रवाहाबरोबर वाहून जाऊं इच्छित नाहीं. वर्तना-मध्यें अनासक्ति व वैराग्य ठेवूनच गांधीवादाला राजकारणाचा व जीवनाचा प्रश्न सोडवावयाचा आहे.

गांधीतत्त्वाचा अनुयायी हा गांधी राजकारणापेक्षां फार मोठा व निराळा आहे. राजकारणांत येणारीं माणसें सामान्य असतात व विशिष्ट प्रश्नापुरतेंच त्यांचें लक्ष राजकारणांत केंद्रित झालेलें असतें. पण गांधी-वादीचें तसें नाहीं. तो आपलें सर्व आयुष्य या तत्त्वाला वाहतो. हिंदु-स्थान स्वतंत्र व्हावा असें म्हणणारा संसारी माणूस गांधींनीं सांगितलेलें

ब्रह्मचर्यव्रत पाळूं शकणार नाहीं. गांधी म्हणतात, 'जो सत्याचा उपासक आहे, ज्यानें सत्याबरोबर विवाह लावला आहे.' तो सत्यदेवतेशिवाय दुसऱ्या कोणाची आराधना करूं लागला तर तो सत्याशीं बेइमान होईल.' तेव्हां सत्याच्या उपासकाला ऐहिक सुखाच्या मागें लागतां येणार नाहीं. ब्रह्मचर्यासारखीं निरनिराळीं व्रतें हीं सत्यापासून निर्माण होतात, असें गांधी म्हणतात. अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, अस्वाद, ब्रह्मचर्य, शरीर-श्रम, स्वदेशी वगैरे व्रतें गांधीवादांत अंतर्भूत आहेत.

'गीते'च्या १६ व्या अध्यायांत वर्णन केलेलीं दैवी संपदेचीं २६ लक्षणें हीं जास्त व्यापक आहेत. पण त्याहीपेक्षां शांतिपर्वांत या गुणांचा अधिक विस्तार केलेला आहे. दम, तप, सत्य वगैरेंच्या व्याख्या त्यांत आहेत. "दम या गुणांत क्षमा, धृति, अहिंसा, सत्य, आर्जव, ऱ्ही, आणि सत्याच्या व्याख्येंत सत्य, समता, निग्रह, अमात्सर्य, क्षमा, लाज, तितिक्षा, अनसूयता, याग, ध्यान, आर्यता, धृति, दया या तेरा गुणांचा समावेश केला आहे." गांधीवादांतील दहा व्रतें काय, गीतेंतील २६ गुण काय किंवा महाभारतांतील अनेक गुणांचीं वर्णनें काय, हीं मूलतः एकच आहेत. जो एका विशिष्ट मनोरचनेच्या पलीकडे जातो, त्याचे नीतिनियम हे आपोआपच बनतात.एकदां मनामध्यें विरक्ति आली म्हणजे गांधीतत्त्वांतील सत्याचा उपासक किंवा गीता—महाभारतांतील मुमुक्षु हा क्षुल्लक विचाराच्या पलीकडेच जातो. परमेश्वरप्राप्तीकरतां जो अविवाहित रहातो तो कोणाकरतां व कशाचा संग्रह करणार ? त्याला असलेल्या वस्तु नको असतात, मग तो संपादन करून कोणत्या वस्तु आणणार ? ज्याला वस्तूंची अभिलाषा नसते तो त्या वस्तु चोरीत नाहीं व त्यांचा संग्रह तर करीत नाहींच नाहीं.

अस्वादाबद्दल तेंच म्हणतां येईल. ज्याला दोन वेळ काय, पण एक वेळ खायला नियमानें मिळत नाहीं तो अस्वादव्रतीच बनतो. मनानें किंवा वृत्तीनें तो स्वादाच्या पलीकडेच गेलेला असतो व त्याची जिव्हाहि स्वादप्रिय नसते. जो स्वादाला बळी पडला तो कसला सत्याच्या मागें जाणार ? आत्मसाधन करणारे लिंबाचा पाला वाटून खातात किंवा गिरि-

कंदरांत रहाणारे साधु कंदमुळें खातात, अशीं आपण वर्णनें वाचतों. त्याला घरच नसतें, तेव्हां अशा अनिकेताला आपली रुचि मारावी लागते. ती रुचि जर जिवंत असेल तर त्याला घर करावें असें वाटूं लागेल, घराबरोबर द्रव्यार्जनाची जरूरी भासूं लागते आणि द्रव्यार्जन जो करूं लागतो तो त्यांतच गुरफटतो.

गांधीवादीनें अपरिग्रह, अस्वाद वगैरे व्रतें घेतलेलीं असलीं तरी तो पूर्वीच्या साधूप्रमाणें अरण्यांत रहात नाहीं हें निश्चित. कर्म करतां करतां सत्याप्रत म्हणजे ईश्वराप्रत जावयाचें असा हा सत्याग्रही निष्काम कर्म-योग आहे. तेव्हां इतर संसारी माणसांप्रमाणें सत्याग्रही हा विधेयात्मक कर्में करीत असतो आणि निषेधात्मक टाळीत असतो. सेवा व प्रेम हे त्याचे आसक्तिरहित संसारांतील वाटाडे आहेत. म्हणूनच गांधीवादांतील एकादश व्रतांत अहिंसा, शरीरश्रम यांना समाविष्ट केलें आहे. शरीरश्रम जो करीत नाहीं तो दुसऱ्याचे श्रम चोरतो. पण अस्तेय हें गांधीतत्त्वांतील एक व्रत आहे. तेव्हां स्वतःच्या जीवनाकरतां दुसऱ्याच्या कृपेवर अवलंबून न रहातां आपल्याला लागणारें अन्न-वस्त्र आपण मिळविलें पाहिजे, असें हा वाद सांगतो. रशियासारख्या आर्थिक क्रांतिकारक देशांत प्रत्येक माणसानें काम केलें पाहिजे असा कायदा आहे. रिकाम-टेकड्याला तेथें आयतें अन्न मिळत नाहीं. गांधीवाद प्रत्येकाला काम करण्याला लावून दुसऱ्याचें श्रम चोरूं नका एवढेंच सांगतो असें नाहीं तर जवळ कांहीं ठेवूं नका असें सांगतो. परिग्रह किंवा संग्रह करण्याची वृत्ति निर्माण झाली म्हणजे भांडवलशाहीचा पाया घातला जातो; आणि जो भांडवलशाही वृत्तीचा बनला त्याचें सत्यशोधन संपलेंच. अशा प्रकारें गांधीवादानें शरीरश्रम, अस्तेय व अपरिग्रह हीं तीन व्रतें सांगून प्रत्ये-काला काम करण्यास सांगितलें, दुसऱ्याच्या श्रमावर जगूं नका असें सांगितलें आणि संग्रह करण्याच्या मोहाला बळी पडून संसारांत गुरफटूं नका व भांडवलशाही वृत्ति वाढवून विषमता स्थापन करण्यास सहाय्य-भूत होऊं नका, असें बजावलें नाहीं काय ?

अस्तेय, अपरिग्रह व शरीरश्रम हे गांधीवादांतील तीन महत्त्वाचे नियम आहेत. त्याचे अर्थहि सामान्य अर्थाहून भिन्न आहेत. अस्तेय

म्हणजे निव्वळ चोरी न करणें असें नाहीं. ज्या वस्तूंवर आपली मालकी आहे, परंतु ज्या वस्तूचा आपल्याला उपयोग नाहीं ती वस्तु स्वतःजवळ ठेवणें म्हणजे चोरीच आहे. अपरिग्रह म्हणजे जवळ कोणतीच वस्तू न ठेवणें असा नाहीं. पण ज्या वस्तूचा आपल्याला पुढें उपयोग होईल म्हणून आपण ती जवळ ठेवतों तो परिग्रह आहे. यावर कोणी विचारील कीं, मजजवळ असलेल्या सर्व वस्तु मी फेकून द्याव्या काय ! वस्तु फेकून देण्याचें कारणच नाहीं. " स्वतःजवळ असणारी फाटकी चिंधी दुसऱ्याला न देणारा परिग्रही आहे, पण स्वतःजवळ असलेले लाखों रुपये वाटेल त्या वेळीं योग्य उपयोगाकरतां खर्च करण्यास तयार असलेला माणूस अपरिग्रही आहे. " * गांधीवादांतील या नियमांचें विवरण अशा प्रकारें करण्यांत आलें आहे. तेव्हां मूळ प्रश्न वृत्तीचा आहे. " ज्याची तृष्णा विशाल त्याला दारिद्री म्हणतात आणि ज्याची वृत्ति संतोषी असते तो श्रीमंत समजला जातो. " तेव्हां जवळ पैसा असणारा अपरिग्रही असूं शकतो व जवळ कांहीं नसणारा परिग्रही असूं शकतो.

शरीरश्रम करणें हें अपरिग्रह, अस्वाद व अस्तेय व्रताच्या माणसाला कठीण नाहीं. कारण जवळ कांहीं बाळगायचें नाहीं, कशाची चोरी करायची नाहीं आणि खातांना जिभेचे चोचले पुरवायचे नाहींत इतकीं बंधनें पाळणाराला शरीरश्रम हे त्रासदायक वाटणार नाहींत. गांधीवाद हा शरीरधारणेकरतां बौद्धिक श्रमापेक्षां शरीरश्रमावर अधिक भर देतो. कारण बौद्धिक श्रम करणारांना शरीरश्रम करणें हें हलकेंपणाचें वाटतें. फिलिपाइन्समध्यें एक श्रीमंत वर्ग असे. या वर्गातील लोक आपण शारीरिक कामें करीत नाहीं, हें सिद्ध करण्याकरतां आपलीं नखें खूप वाढवीत. वाढलेल्या नखांमुळें हातांनीं काम करणें अशक्य होतें. दीनदुबळ्या जनतेपासून आपण भिन्न नाहीं, हें सिद्ध करण्याकरतां गांधीवादानें शरीरश्रम केलेच पाहिजेत. म. गांधींनीं शरीरश्रमाचें एक कलम मुंबई कॉंग्रेसमध्यें (१९३४) कॉंग्रेस अधिकाऱ्यांना लागू केलें होतें. ते चरख्याला जें महत्त्व देतात तें शरीरश्रमाच्या प्रतिष्ठेकरतांच. स्वतःचा स्वयंपाक स्वतः करणें, स्वतःचें दळण–कांडण करणें, स्वतःचे

* गांधी–विचार--दोहन.

कपडे धुणें, कपडे तयार करणें, ही व अशा प्रकारची स्वतःची सेवा गांधीवादानें अपेक्षिली आहे. अशी स्वतःची सेवा कितीजण करीत असतील ?

यानंतरचें गांधी तत्त्वांतील सूत्र स्वदेशी आहे. आपण स्वदेशीकडे केवळ राजकीय दृष्टीनें पहातों. पण स्वदेशीकडे पहाण्याची गांधीवादाची विशिष्ट दृष्टि आहे. वर शरीरश्रमामध्यें आपण अनेक कामें स्वतःला करतां येतील असें म्हटलें. पण सर्व कामें स्वतःला करणें अशक्य असतें. समाजांत श्रमविभागणी ही मान्यच केली आहे. मला भांडीं घासतां येतील, पण भांडीं तयार करतां येणार नाहींत; मला कपडे धुतां येतील पण साबण तयार करणें जमणार नाहीं; मी स्वयंपाक करूं शकेन, पण तांदूळ, डाळ, गहूं निर्माण करूं शकणार नाहीं. या वस्तूकरतां मला परक्यावरच अवलंबून रहावें लागेल. हा परका कोण असावा ? तो आपल्या गांवांतला असावा का परका ? तो आपल्या देशांतला असावा का परक्या ? गांधीवाद म्हणतो, तो आपल्याजवळचा आपल्या देशांतला असावा. याचा अर्थ परदेशांतील माणसाचा मी द्वेष करावा असा नाहीं. म्हणून म. गांधी स्वदेशीचा जितका पुरस्कार करतात तितका बहिष्काराचा करीत नाहींत. हातसुताचा जितका पुरस्कार करतात तितका गिरणीचा करीत नाहींत. तेव्हां स्वदेशीमध्यें श्रमविभागणीचें तत्त्व आहे. या तत्त्वाप्रमाणें जवळचा माणूस जो असेल त्याचेच श्रम आपण घ्यावेत व त्यालाच आपले श्रम द्यावेत.

हरिजन–सेवा अथवा अस्पृश्यता–निवारण आणि सर्वधर्मी समभाव हीं गांधीवादांतील आणखी दोन सूत्रें आहेत. गांधीवादी हा कोणाचाच द्वेष करीत नाहीं व कोणाला कमी लेखीत नाहीं. त्यामुळें अमुक धर्म श्रेष्ठ व अमुक कनिष्ठ ही कल्पनाच त्यांत नाहीं. सर्व धर्मांमध्यें सत् तत्त्व आहे. तें आपण पाहिलें पाहिजे. याचाच अर्थ आपण धार्मिक सहिष्णुता बाळगली पाहिजे. कोठल्याहि धर्मामध्यें कांहींहि वाईट नसतें. त्या त्या धर्मांचे अनुयायी आपल्या उत्साहातिरेकानें धर्माला कमीपणा आणतात; तर कांहीं आपल्या धर्माची थोरवी आपल्या वर्तनानें वाढवितात. मुळांत

पाणी वाईट नसतें, तें पाणी आपण मोरीला किंवा गंगेला मिळवूं शकतो. जो तत्त्वशोधक आहे तो मुळांतील पाणी शुद्ध आहे एवढेंच लक्षांत घेईल.

अस्पृश्यता–निवारण हा तर गांधीवादाचा प्रमुख भाग आहे. सर्व देशांत अस्पृश्यता असते. पण हिंदुस्थानांतील अस्पृश्यता ही भयंकर आहे. तिला पूर्वीच्या लोकांनीं धार्मिक स्वरूप दिलें. त्यामुळें अस्पृश्यांना शिवणें म्हणजे धर्मबाह्य वर्तन करणें असा अर्थ होऊं लागला. इंग्लंड-सारख्या देशांत उच्चनीचता अतिशय आहे. गरीब, मध्यम, श्रीमंत, हे भेद तेथें अत्यंत तीव्रतेनें पाळतात. लोकशाहीच्या व समानतेच्या गप्पा मारणाऱ्या या लोकांची मनोवृत्ति पहाण्यासारखी आहे. जर्मनीच्या बॉंब-हल्ल्यांनीं कॉमन्सचे पार्लमेंट सभागृह कोसळून पडलें. त्यामुळें हौस ऑफ कॉमन्सच्या सभासदांना हौस ऑफ लॉर्ड्समध्यें बसूं द्यावें का नाहीं असा प्रश्न उद्भवला. कॉमन्सचे सभासद आपल्या खुर्च्यांवर बसले तर खुर्च्या विटाळतील या भावनेनें लॉर्डसूनीं सांगितले कीं, आमच्या तांबड्या मखमलींनीं मढवलेल्या खुर्च्या काढा आणि नंतर कॉमन्सच्या सभासदांना तेथें बसूं द्या. ऐन युद्धाचे दिवसांत, लोकशाहीकरतां लढणाऱ्या पार्लमेंटच्या सभासदांत असणारी ही भावना पाहिली म्हणजे हिंदुस्थानांतच अस्पृश्यता नसून इतरत्रहि हीच भावना आहे असें दिसून येतें.

शांघायला इंग्रज लोकांच्या बागेंत कुत्री, चिनी आणि सायकली यांना बंदी आहे. दाक्षिण आफ्रिकेंत तर हिंदी लोकांना कांहीं रस्ते चालण्याला बंद आहेत; कांहीं भागांत त्यांना राहूं सुद्धां देत नाहींत; पहिल्या वर्गांतून प्रवास करूं देत नाहींत. लंडनमध्यें विमान-हल्ल्याच्या आपत्तींत सांपडलेल्या डॉ.हारिसिंग गौर ह्यांना ते हिंदी गृहस्थ म्हणून हॉटेलमध्यें रहावयास जागा मिळत नाहीं आणि अमेरिकेंत नीग्रो लोकांना उभे जाळतात. जर्मनीचा ज्यू द्वेष तर सुप्रसिद्ध आहे. तेव्हां वर्णभावना ही जगांतील सर्व देशांना व्यापून राहिली आहे. हिंदुस्थानांत इतर देशांतील कांहीं दोष आहेतच पण शिवाय हरिजनांना स्पर्शाहि न करण्याचा महान् दोष आहे.

गांधी तत्त्वज्ञान माणसामाणसांत उच्चनीचता मानीत नाहीं. त्यामुळें कोणालाहि अस्पृश्य मानण्याची गांधीवादाची तयारी नाहीं.

याचा परिणाम असा झाला कीं, एरवीं गांधीवाद मान्य असणारे पण जे त्या तत्त्वज्ञानाच्या उच्च मनोभूमिकेपर्यंत पोहोंचले नाहींत ते गांधींशीं वैर करू लागले. तसेंच सर्व धर्म समभावाचा सिद्धांत मान्य करणारे व त्याप्रमाणें आचरण करणारे गांधी हे मुसलमानधार्जिणे ठरले! पण गांधीवादी कोणाच्या रागलोभांची पर्वा करीत नाहीं, तो फक्त सत्याची भीति बाळगतो.

या सर्वधर्मी समभावामुळें हिंदु गांधींवर उलटले तसें मुसलमानहि उलटले. हरिजन–सेवेमुळें स्पृश्य गांधीवर क्रुद्ध झाले, तसे अस्पृश्यहि झाले. पण आज ना उद्यां या रागावणारांना आपली चूक कळून आल्याशिवाय रहाणार नाहीं. सत्य हें पटायला फार दिवस लागतात. कारण सत्याचा रस्ता हा लांबचा आहे. क्षणिक लोभाला अगर स्वार्थाला बळी पडलेला माणूस हा रागावलाच पाहिजे. तोच त्याचा स्वभावधर्म आहे. पण अशा लोकांच्या रागामुळें आपण आपला धर्म सोडतां कामा नये.

गांधीवादांतील अकरा नियमांपैकीं, अभय फक्त राहिलें. जो असत्या-वादी, अन्यायी असतो तो भितो. सत्यवादी कोणालाच भीत नाहीं. तो फक्त पापाला आणि परमेश्वराला भितो. निर्भय नसणारा, गांधीवादी असूंच शकणार नाहीं. ज्याला भय वाटतें तो सत्य सांगणार नाहीं. मी राजद्रोह केला, मी कायदा मोडला असें कबूल करणाराला शिक्षा भोगावी लागते. ज्याला शिक्षेची भीति वाटते तो या गोष्टी करणार नाहीं व केल्या तर नाकबूल तरी करील किंवा उद्देशाबद्दल भांडत बसेल. तेव्हां निर्भयता ही बाब गांधीवादांत अवश्य समजली जाते.

अशा प्रकारें ज्याला गांधीवाद म्हणतात त्याचीं अकरा सूत्रें आहेत. १ सत्य, २ अहिंसा, ३ ब्रह्मचर्य, ४ अस्तेय, ५ अपरिग्रह, ६ शरीरश्रम, ७ अस्वाद, ८ अभय, ९ सर्व धर्म समभाव, १० अस्पृश्यता निवारण, ११ स्वदेशी. वर सांगितल्याप्रमाणें हीं तत्त्वें अगर सूत्रें भिन्नाभिन्न दिसत असली तरी एका सत्यापासून निर्माण होतात. पाण्यांत एक खडा टाकला म्हणजे लाटांमागून लाटा उद्भवतात. त्याचप्रमाणें सत्याचें दर्शन झालें म्हणजे इतर तत्त्वांचें आचरण आपोआप होऊं शकतें. हीच क्रिया उलट क्रमानेंहि होऊं शकेल. आपण एक अस्वादासारखें व्रत घेतलें तर

त्यापासून आपण ब्रह्मचर्याकडे जाऊं शकूं. तेव्हां कोणत्या तरी एका तत्त्वाचें जर निष्ठापूर्वक वर्तन होऊं शकलें तर सत्याकडे प्रगत होण्यास हरकत येणार नाहीं.

गांधीवाद हा आस्तिक वाद आहे. गांधीवाद हा परमेश्वर मानतो एवढेंच नव्हे तर जीविताचें ध्येय परमेश्वराचा साक्षात्कार कारणें आहे असें समजतो. परमेश्वर हा अविनाशी आहे म्हणूनच त्याला म. गांधी सत्य या नांवानें ओळखतात. सत्य हें परमेश्वराचें निर्गुण स्वरूप आहे असें ते म्हणतात. सत्य हें काय आहे याचा शोध करणें हें प्रत्ये-काचें कर्तव्य आहे. जितकें सत्य आपल्याला समजलें असेल तितकें व्यवहारांत आणणें हेंहि कर्तव्यच ठरतें. सत्याचा शोध करीत असतां असत्याचा पाडाव करणें हेंहि क्रमप्राप्तच असतें. आसुरी प्रकृति नष्ट झाल्याशिवाय दैवी प्रकृति ही प्रभावी होत नाहीं. या विरोधी प्रवृत्तींचा झगडा जगाच्या आरंभापासून चालला आहे. तेव्हां ज्याला सत्याची म्हणजे परमेश्वराची प्राप्ति करून घ्यावयाची असेल त्यानें असत्य व अन्याय यांच्याबरोबर झगडलें पाहिजे. म्हणजेच सत्याग्रह केला पाहिजे. तेव्हां सत्याग्रह हें ईश्वरप्राप्तीचें साधन आहे असें गांधीवाद सांगतो. आपल्या भोंवतीं जर अत्यंत घाण साचली असेल तर आपण निरोगी कसें रहाणार ? तसेंच आपल्या भोंवतीं जर अन्यायाचा व असत्याचा दाट अंधकार माजला असला तर आपल्याला सत्याचा मार्ग कसा दिसणार ? आपण जर अन्याय सहन करूं लागलों तर आपल्याला सत्याकडे जातां येणार नाहीं. तेव्हां सत्याकडे जाण्याचा मार्ग हा असत्य किंवा हिंसा सहन करणें हा नाहीं. सत्याचरणानें व अहिंसेनेंच आपण सत्याकडे जाऊं शकतों.

गांधीवादाची ही भूमिका व हिंदुधर्मांत वर्णन केलेली ईश्वरप्राप्तीची भूमिका यांत कांहींच फरक नाहीं. त्यामुळें गांधीवादाला विरोध करणें म्हणजे एकप्रकारें हिंदुधर्माला विरोध करण्यासारखें होईल. गांधीवाद हा नेभळट बनाविणारा आहे असें म्हणणें म्हणजे हिंदुधर्म नेभळट बनविणारा आहे असें म्हणणें आहे. इतर धर्मांबद्दल हेंच म्हणतां येईल.

परमेश्वराची प्राप्ति किंवा सत्याची प्राप्ति कशी होऊं शकते ! ती व्रतानें, यम-नियमानें, उपासना वगैरे साधनांनीं होऊं शकते. गांधीहि दुसरें कांहींच सांगत नाहींत. यमनियमांचें पालन, उपासना ही गांधीवादांत प्रधान आहे, उपासना ही सर्व धर्मांत आहे. ख्रिश्चन मनुष्य दररोज न जमलें तर दर रविवारीं चर्चमध्यें प्रार्थनेला जातो, इस्लामधर्मीय तर दिवसांतून पांचवेळां नमाज पढतो आणि हिंदु संध्या, भजन, कीर्तन वगैरे करतो. उपासनेच्या जोडीला उपवासहि सर्व धर्मांत विहित आहेत. ब्रह्मचर्य, मौन हेहि यमनियमांचेच प्रकार आहेत.

गांधींनीं उपासनेचें फारच सुंदर विवेचन केलें आहे. ते म्हणतात, "उपासना म्हणजे ईश्वराच्या जवळ बसणें. मोठ्याजवळ बसण्याचा उद्देश तद्रूप होण्याचा असतो. परमेश्वर म्हणजे सत्य. म्हणून सत्यरूप होण्याला उपासना म्हणतात. सत्यरूप होण्याची तीव्र इच्छा करणें हीच प्रार्थना. सत्यरूप जें व्हावयाचें तें विकाररहित होण्याकरितां. निर्विकारी होण्याकरतां विकारी विचार उत्पन्न होतां कामा नयेत. मन कधीं रिकामें रहात नाहीं. एक तर तें विकाराचा विचार करील किंवा सत्याच्याकडे जाईल. राम, कृष्ण इत्यादि सत्याच्या मूर्ति आहेत.त्यांचें स्मरण म्हणजेच नामस्मरण. हें स्मरण जर अंतःकरणपूर्वक केलें तर आपण अवश्य तद्रूप होऊं. उपासना हा बुद्धीचा विषय नाहीं, श्रद्धेचा आहे. अन्नानें जसें शरीरपोषण होतें, तसें उपासनेनें आत्म्याचें. सत्यरूपी परमेश्वर प्राणिमात्राच्या आंत बसतो. म्हणून प्राणिमात्राच्या ठिकाणीं एकत्वाची भावना साध्य होणें जरूर आहे. याकरतां उपासना ही वैयक्तिक व सामुदायिक झाली पाहिजे. जीवमात्राच्या ठिकाणीं एकत्व सिद्ध करणें म्हणजे त्याची सेवा करणें म्हणून निष्कामसेवा हीहि उपासना होऊं शकते."

प्रार्थना व सेवा हे उप आसनेचे म्हणजे देवाच्या सन्निध जाण्याचे प्रकार असल्यामुळें गांधीवादी हा सकाळीं, संध्याकाळीं व विशिष्ट प्रसंगीं प्रार्थना करतो. प्रार्थना म्हणजे तोंडानें केलेली देवाच्या नांवाची बडबड नव्हे. अंतःकरणांतील सर्व शुद्ध भावना एकवटून तद्रूप होण्याचा तो प्रयत्न आहे.

उपासना ही ज्याप्रमाणें अंतःशुद्धीला कारण होते, त्याचप्रमाणें उपवास हाहि कारण होतो. आपण निरनिराळे फराळाचे पदार्थ खाऊन जसा उपास करतों, तसा उपास हा नव्हे. गांधींचा उपवास म्हणजे परमेश्वराच्या जवळ जाऊन बसण्याचा प्रयत्नच आहे. तो उपवास पाणी घेऊनच फक्त करावयाचा असतो. त्याची मर्यादा म. गांधी आपल्या स्फूर्तीप्रमाणें निरनिराळी ठेवतात. त्यांनीं प्राणांतिक उपवासहि केलेले आहेत. अशा उपवासांचें दडपण आरोपित व्यक्तीवर पडते व ती एक प्रकारची हिंसाच होते असा त्यावर आरोप येतो. गांधींचा जीव वांचविण्याकरतां आपण अमुक गोष्ट आपल्या इच्छेविरुद्ध केली असेंहि म्हटलें जातें. पण गांधीजी स्वतःतील अशुद्धि घालविण्याकरतां हें दिव्य करीत असतात. दुसऱ्यानें आपलें अनुकरण करूं नये, असा त्यांचा कटाक्ष असतो. अंतःप्रेरणेशिवाय उपवास करतां कामा नये, असेंहि ते म्हणतात. तेव्हां उपवास हें एक आत्मशुद्धीचें बलिष्ठ साधन आहे. तसेंच तें आत्मक्लेशाचेंहि बलिष्ठ साधन नाहीं काय ? वर जीं गांधीतत्त्वाचीं ११ लक्षणें दिलीं आहेत त्यांत उपासना व उपवास यांचाहि समावेश होऊं शकतो. गांधीवादाचें बाह्यलक्षण म्हणून आणखी एक गुण आपण वर्णन करूं शकूं. तो गुण नम्रता होय. गांधीवादीनें नम्र असावें असें म्हणण्याऐवजीं नम्रतेनें गांधीवादी असावें असें म्हणणें अधिक शोभेल. गांधीवादी हा कितीहि खडतर व्रतें व तपश्चर्या करीत असला तरी तो जनतेंतील संन्यासी व जनतेचा सेवक आहे. जनतेची सेवा करणारा हा सध्यांच्या ब्रिटिश नोकराप्रमाणें मालक असतां कामा नये. तसेंच तो परक्या देशांतून आलेल्याप्रमाणें निराळा वाटतां कामा नये. परमेश्वराशीं एकरूप होण्याची जशी तो महत्त्वाकांक्षा बाळगतो, तशीच त्यानें जनतेशीं एकरूप होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली पाहिजे. त्याकरतां तो तुटक, खुरटा, चढेल, अहंमन्य, बढाईखोर, आढ्यता बाळगणारा, असा असतां कामा नये. अर्थात् ही लोकांची अपेक्षा आहे. गांधीवादी हा जर तिरसट, रागीट, घमेंड बाळगणारा व इतरांना तुच्छ लेखणारा असेल तर त्याला गांधीवादाचा श्रीगणेशाहि समजला नाहीं असें म्हणावें लागेल. तत्त्वज्ञानी मनुष्य हा बहुतकरून भावनाशून्य

बनतो. त्याला कोणाच्या मृत्यूनें वाईट वाटत नाहीं, किंवा कोणाचें लग्न झालें तर चांगलें वाटत नाहीं. अर्थात् परिपूर्णावस्थेला गेलेल्या स्थितप्रज्ञाची गोष्टच वेगळी. पण जे अर्धवट असतात ते आपण हर्षविषादांच्या पलीकडचे आहों असा डौल आणतात. असे लोकच तत्त्वाचे मारेकरी असतात. जे सच्चे सेवक असतात त्यांच्याहि वर्तनांत हे रूक्षतेचे, माणुसकीच्या अभावाचे दोष येण्याचा संभव असतो. पण तत्त्वज्ञानावर जो आघात होतो तो अशांच्यामुळें होत नाहीं; तो ढोंगी लोकांमुळे होतो. ज्याला समाजांत वागतां येणार नाहीं, तो फार तर एकांतांत जाऊन बसेल; त्याचा उपद्रव समाजाला होणार नाहीं. पण खरी भीति असते ती अर्धवटांच्या वर्तनाची. म्हणून गांधी-वादाचें आचरण करणारांनीं आपल्याला सेवा करायची आहे हें केव्हांहि विसरूं नये. त्यांनीं आपल्या मर्यादा ओळखणें जास्त चांगलें. सेवा कर-णाराजवळ जिव्हाळा व प्रेम असावें लागतें. तसेंच खरा सेवक हा नम्र असावा लागतो. चंदन सुवासिक आहे किंवा लोणी मऊ आहे हें ज्या-प्रमाणें सांगावें लागत नाहीं, त्याप्रमाणें गांधीवादी हा नम्र आहे हें सांगावें लागता कामा नये. ' अंतरींचे धावें स्वभावें बाहेरी ' अशी त्या त्या गुणांची स्थिति असावी. अमुक मनुष्य विनयशील आहे ह्याचीं लक्षणें कांहीं ठरलेलीं नाहींत. मनुष्याच्या साध्या बोलण्या व चालण्या-वरून त्यानें गांधीवाद किती आत्मसात् केला आहे याची परीक्षा होऊं शकते. 'नम्र मनुष्याला आपल्या नम्रतेची जाणीवहि असतां कामा नये.'* इतका तो सहज–स्वभावधर्म झाला पाहिजे. खोट्या नम्रतेला आपल्या नम्रतेचें ज्ञान असतें. असा मनुष्य अत्यंत प्रयत्न करून आपला अहंकार व अभिमान लपविण्याची पराकाष्ठा करतो. पण त्यांचें ढोंग बाहेर पडल्याशिवाय रहात नाहीं. जो आपल्या मर्यादा ओळखतो व सांगतो कीं, गांधीवादापैकीं, इतका भाग किंवा अमुक प्रमेयांपैकीं इतका अंशच माझ्याकडून आचरला जाणें शक्य आहे तो खरा नम्र. जो पुष्कळ बड-बडतो पण ज्याच्या हातून काम अत्यल्प होतें तो नम्र नव्हे. खरा नम्र माणूसच खरी सेवा करूं शकेल व परिपूर्णावस्थेला जाऊं शकेल.अशा प्रकारें गांधीवादांतील मुख्य मुख्य लक्षणांचें थोडक्यांत स्वरूप आहे.

---

* गांधी–विचारदोहन १९

सामाजिक क्रांति. : : : : १

गांधीवादानें आध्यात्मिक जीवनाकडे निदान विचाराकडे देशांतील व परदेशांतील लोकांचें लक्ष वेधलें. तेवढ्यानें गांधीवाद संपला नाहीं. कारण व्यवहारापासून अलग असलेलें ध्येयमय जीवन म्हणजे अपुरें जीवन आहे. जो जगांतील धक्के खात नाहीं, ज्याला प्रापंचिक सुखदुःखांची कल्पना नाहीं त्याचें जीवन एकांगी व अपुरेंच रहाणार. विकार हेतु नसतांना जो निर्विकारी रहातो त्याला धीर म्हणत नाहींत. मुलाबाळांत नसणारा जर एखाद्या सांसारिकाला त्यांच्यावर न रागवण्याचा उपदेश करील, तर तो कोरडा उपदेश ठरेल. याचा अर्थ असा नव्हे कीं, जगांतील सर्वच अनुभव सर्वांना घेणें शक्य आहे. गांधीवादी हा जगांतील मनुष्य आहे, तो अरण्यांतील मनुष्य नाहीं. म्हणूनच गांधीवादाला आध्यात्मिक बाजूप्रमाणें सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक वगैरे बाजू आहेत. या प्रश्नांतून उद्भवणाऱ्या निरनिराळ्या विषयांवर गांधीवादानें प्रकाश पाडला आहे. पूर्वीचे साधुसंत व वेदांती हे जीवनाला माया म्हणत. त्यामुळें एका अध्यात्मापलीकडे इतर विषयांत ते लक्ष घालीत नसत. गांधीवादाचें तसें नाहीं.

गांधी हे जीवनाशीं संलग्न असणाऱ्या सर्व प्रश्नांची गंभीरपणें चर्चा करतात. त्यांत त्यांची बुद्धि गतानुगतिक (Conservative) नाहीं. तें अध्यात्मांत अहिंसेनें किंवा राजकारणांत सत्याग्रहानें जसे व जितक्या तीव्रतेनें लढतात, तितक्याच तीव्रतेनें इतर बाबींतहि लढतात. औद्योगिक किंवा आर्थिक बाबतींत त्यांनीं जर खादीचा आग्रह धरला नसता तर खादी मागेंच गतप्राण झाली असती. अस्पृश्यता–निवारणाचें तसेंच आहे, व इतर बाबींत तीच क्रांतिप्रियता दिसून येते.

सामाजिक बाबतींतहि गांधींनीं बरीच खळबळ उडवून दिली आहे. समाजकारणांत बंडखोरी करणें अत्यंत कठीण असतें. राजकारणांतील बंडखोरी ही लोकप्रियता वाढविते, पण समाजकारणांतलि बंडखोरी ही असलेली लोकप्रियता गाडून टाकते. अफगाणिस्थानच्या अमानुल्लाला याच सामाजिक क्रांतीनें पदभ्रष्ट केलें. गांधींच्या लोकप्रियतेला जर ओहोटी लागली नसली तर त्याला कारण त्यांची राजकारणांतील कामगिरी. या कामगिरीमुळें त्यांचे ' सामाजिक अपराध ' जनतेनें क्षम्य मानले. तुर्कस्थानांत केमालपाशानें आपला देश ग्रीकांच्या तडाख्यांतून सोडवला म्हणूनच त्याची सामाजिक क्रांति तुर्कस्थाननें सहन केली. तेव्हां कोठल्याही देशांत जुना धर्म व समाज हे अत्यंत पवित्र व अपरिवर्तनीय असें मानतात. त्यांत क्रांति करणारास पाखांडी म्हणतात.

गांधींनीं हरिजनांचा प्रश्न हातीं घेऊन जुन्या कल्पनांना जबर धक्का दिला. स्पृश्यांना वाटूं लागलें, गांधी काय आतां महार-मांगांना घेऊन देवळांत जातात, का त्यांच्याबरोबर जेवायला बसा म्हणून सांगतात, का आणखी कांहीं हुकूम सोडतात ! पण गांधींनीं सार्वजनिक ठिकाणच्या अस्पृश्यतेवरच हल्ला चढवला. देवळाच्या बाबतींत सुद्धां ते असें म्हणत नव्हते कीं, देवळांच्या मालकांची किंवा विश्वस्तांची इच्छा धुडकावून जबरदस्तीनें आंत प्रवेश करा. गांधी हे समाजक्रांतिकारक आहेत, पण ते अविवेकी व अव्यवहारी क्रांतिकारक नाहींत. समाजांत कोणत्या मर्यादेपर्यंत क्रांति झाली पाहिजे हें ज्याप्रमाणें ते सांगूं शकतात, त्याचप्रमाणें समाजाची क्रांति सहन करण्याची किती शक्ति आहे हेंहि ते ओळखूं शकतात. इष्टता व शक्यता यांच्या समन्वयानें तें सुंदर व्यवहार

साधतात. पण त्याबरोबरच जुन्या, वेडगळ व टाकाऊ समजुतींना धक्का दिलाच पाहिजे व त्या नष्ट केल्याच पाहिजेत असें त्यांचें स्पष्ट मत आहे.

सामाजिक जीवनांतील अधिष्ठात्री देवता म्हणजे स्त्री. स्त्रीवर्गाकडे अद्यापहि तुच्छतेनें व उपेक्षेनें बघितलें जातें. हिटलरसारखा माणूस स्त्रियांचें जग स्वयंपाकघर व माजघर यांच्या पलीकडे नाहीं असें म्हणतो. त्यांनीं उत्तम स्वयंपाक करावा व सुंदर अपत्यांना जन्म द्यावा एवढीच त्यांची कामगिरी असें जगांत क्रांति करूं इच्छिणारा हा माणूस म्हणतो. हिटलरची री ओढणारे कांहीं अनुहिटलर त्याचीच भाषा बोलत आहेत.

आपल्या कांहीं धर्मग्रंथांत तर स्त्रीला कधींच स्वातंत्र्य देऊं नये असें म्हटलें आहे. शुद्ध सनातनत्व म्हणजे स्त्रीला सतत गुलाम ठेवणें हेंच होय. आज जें काय थोडेसें स्त्री-स्वातंत्र्य आपल्याला पहावयास सांपडतें तें महाराष्ट्र गुजराथसारख्या भागांत व तेहि पुढारलेल्या वर्गांत. बंगाल-बिहारांतील हिंदु स्त्रिया ह्या अजूनपर्यंत तोंडावरील बुरखा टाकून देत नाहींत. त्यांनीं इंग्रजी अंमल पचवला आहे एवढेंच नव्हे, तर गांधींनाहि जुमानलें नाहीं. तेथील पुरुष सत्याग्रह करून तुरुंगांत जातील, पण स्त्रिया मात्र घरांतला चौक सोडून उंबरठ्यांत येणार नाहींत. हिंदु स्त्रियांची ही स्थिति. मग मुसलमान स्त्रियांची स्थिति किती भयंकर असली पाहिजे! बहुतेक मुसलमान स्त्रिया अद्यापपर्यंत गोषांतून बाहेर आलेल्या नाहींत. त्यांचे पुरुषहि त्यांचा गोषा निघावा याबद्दल प्रयत्न करीत नाहींत; आणि पाकिस्तान मागणाऱ्या जीनांनीं त्याबद्दल प्रयत्नहि केले नाहींत! अशा या स्त्रीवर्गाला जर कोणी मान्यतेला चढविलें असेल तर तें म० गांधींनीं. स्त्री-पुरुषांच्या समान हक्कांबद्दल हल्लीं बरेंचसें बोललें जातें. गांधी म्हणतात 'पुरुषाला ब्रह्मचर्य पाळण्याचा जितका अधिकार आहे, तितकाच स्त्रीला आहे. पुरुषांना मोहविण्याकरतां स्त्रियांनीं आपलें शरीर नटविण्याचें कारण नाहीं. खरी स्त्री आपल्या गुणांनीं आपलें हृदय सुशोभित करण्याचा प्रयत्न करील. स्त्री ही अबला नाहीं. ती पुरुषापेक्षांहि जास्त बलवान आहे, तिच्या ठिकाणीं अपार शक्ति आहे. ही शक्ति नितांत

श्रद्धा, तीव्र भावना व अत्यंत त्याग यांमुळें तिला प्राप्त झाली आहे. अशा स्त्रियांमुळेंच जगांत धर्माचें रक्षण झालें आहे.'*

स्त्रियांना पुरुषाइतकीच स्वतंत्रता दिली पाहिजे. त्यांच्या शिक्षणाची किंवा पालनपोषणाची जर आई वडिलांनीं हेळसांड केली तर तें पाप आहे. विवाहाच्या बाबतींतहि गांधींचे विचार असेच क्रांतिकारक आहेत. " ज्या स्त्री–पुरुषाला संतती असावी अशी इच्छा असेल, त्यांची ती इच्छा पूर्ण करण्याच्या शुद्ध विधीला विवाह असें म्हणतात. विवाह होतांक्षणींच आपल्याला भोगविलास करण्याचा परवाना मिळाला अशी समज पापमय आहे. " विवाह ठरविण्याच्या बाबतींत गांधींनीं जी एक सूचना केली आहे, ती तरुण–तरुणींना नापसंत होण्यासारखी वाटेल. ते म्हणतात कीं वधूवरांनीं स्वतःच्या जोडदाराची निवड करणें हें कधीं कधीं इष्ट नसतें. तरुण–तरुणी मानसिक वा शारीरिक भोगच्छेला बळी पडतात व त्यांच्या हातून योग्य निवड होत नाहीं. कामविकाराच्या तीव्रतेमध्यें झालेली निवड ही बरोबर ठरत नाहीं. तेव्हां वधूवरांनीं आपल्याला कोणत्या लक्षणांनीं युक्त अशा पुरुष स्त्रीशीं लग्न करावयाचें आहे याची कल्पना वडिलांना द्यावी व त्यांनीं कुलशील, रोग, व्याधी, वगैरेंची पूर्ण चौकशी करून लग्न ठरवावें. नंतर वधूवरांचा परस्परांशीं परिचय करून द्यावा आणि त्यांनीं त्या पसंतीला होकार दिला तरच लग्न करावें. गांधी हे अन्य वर्णीय विवाह करूं नयेत अशा मताचे नाहींत. तसेंच परदेशांतील किंवा परधर्मांतील लोकांबरोबर विवाह करूं नये असेंहि म्हणत नाहींत. या विवाहांचा हेतु पारमार्थिक कल्याणाचा असेल तरच तसे विवाह व तेहि अपवादात्मक व्हावेत असें त्यांचें म्हणणें. हीं त्यांचीं मतें स्त्रियांचा दर्जा, हक्क व योग्यता किती मोठी आहे हें दर्शविणारीं आहेत.

स्त्रियांना विवाहाच्या बाबतींत काय, शिक्षणाच्या बाबतींत काय किंवा सार्वजनिक सेवेच्या बाबतींत काय पुरुषाइतकाच हक्क आहे असें त्यांचें म्हणणें. ते स्त्रियांना पुरुषापेक्षांहि कांहीं कांहीं कामें करण्यास अधिक लायक समजतात. पतित स्त्रियांचा उद्धार स्त्रियाच जास्त परिणामकारक

* गांधी विचारदोहन.

रीतीनें करूं शकतात. त्याचप्रमाणें खादी उत्पत्तीचें कार्य,हरिजनसेवा, साक्षरता, ग्रामोद्योग, पिकेटिंग वगैरे कामें स्त्रिया जास्त प्रभावी करूं शकतील. तुरुंगांत जाण्यास किंवा लाठ्या खाण्यास स्त्रियांनीं कमी केलें नाहीं. हा गांधीतत्वाच्या शिकवणुकीचा परिणाम नव्हे काय ?

म. गांधींच्या शिकवणुकीनें आपलें सामाजिक जीवन बरेचसें बदललें हें कोणी नाकबूल करील असें वाटत नाहीं. त्या श्रीमंतीच्या,मोठेपणाच्या कल्पना गांधींनीं धुळीला मिळविल्या. पगडीपागोट्यांत, शेलेशालूंत आणि जरीच्या टोपींत असणारी सभ्य व कुलीनतेची कल्पना कोणाच्या डोक्यांत अद्याप शिल्लक असेल असें वाटत नाहीं. आज उलट खादी सदरा व खादीची टोपी घालणारा वृद्ध असो वा तरुण असो सभ्य समजला जातो. हा खादींतील साधेपणा राज्यकारभारापर्यंत जाऊन भिडला. कॉंग्रेसचे मंत्री सदराटोपींत काम करीत बसलेले जर फेरोजशहा मेथा किंवा नारायणराव चंदावरकर यांच्या नजरेला पडते, तर त्यांचा जळफळाट होता. दिवसेंदिवस साधेपणा हा अंगवळणीं पडत चालला आहे. लो. टिळक पगडी, अंगरखा व धोतर वापरीत व त्यालाच तेव्हां साधेपणा म्हणत असत. गांधींच्या काळांत साधेपणाची जागा बहुजन समाजाच्या सुखदुःखांशीं एकरूप व्हावें या विचारानें घेतली. त्यामुळें आपल्याला गांधीवादी हा कमींत कमी कपडे वापरणारा दिसतो. हे कपडे स्वतः तयार केलेले वापरावेत हा गांधीवादी आणखी एक निर्बंध आपल्यावर लादून घेतो.

रहाण्यांतहि असाच बदल गांधीयुगांत झाला आहे. सेवाग्राममधील गांधींची झोपडी पाहिली म्हणजे वरील विधानाची सत्यता पटेल. वर्ध्याच्या भर उन्हाळ्यांत पोटावर व डोक्यावर मातीच्या पट्ट्या ठेवून तो उन्हाळा सहन करण्याचें कठीण काम गांधी करतात. आज त्यांची योग्यता एवढी आहे कीं, कोणत्याहि उंच डोंगरावर त्यांना बंगले, मोटारी मिळतील. खुद्द वर्ध्यांत त्यांना रहावयास बंगले कमी आहेत असें नाहीं. पण वर्ध्यापासून तीन मैलांवर एका खेड्यांत म. गांधी कां रहातात ? गरीबांचा कैवारी हा श्रीमंतीच्या वैभवांत राहूं शकत नाहीं. त्यांची ती झोपडी, त्या झोपडींत पसरलेल्या त्या दोन तीन चटया व त्या चटयांवर येऊन बसणारे

लॉर्ड लोथियन, स्टॅफर्ड क्रिप्सपासून तों गोरगरिबांपर्यंत लोक पाहिले म्हणजे गांधींच्या ध्येयवादाची जाणीव होते.

त्यांच्या आहाराबद्दल अनेकांनीं मन मानेल तसे आघात केले आहेत. त्यांच्या शेळीची व खजुराची अलीकडे अलीकडेच थोडीशी टवाळी कमी होत आहे. आहाराच्या बाबतींत जर गांधी चटणी, भाकर खात नसले तर त्याला कारण त्यांना लवकर मरावयाचें नाहीं हेंच होय. प्रकृतीला झेपेल असा आहार ते घेतात. प्रकृतीच्या मानाप्रमाणें आहार घ्यावयास लागावा हा प्रकृतीचा दोष आहे. म्हणणारे म्हणतात, चटणी, भाकरी खाऊन मरण आलें तर ते त्याला गांधींनीं कां भ्यावें ? गांधी हे जगण्याकरतां खात आहेत, ते खाण्याकरतां जगत नाहींत. आपण ज्याप्रमाणें औषध घेतों, त्याचप्रमाणें ते आहारांतील पदार्थ घेतात. हेंच या आक्षेपाला उत्तर आहे. गांधी हे आहार व आरोग्याबद्दल सतत प्रयोग करीत असतात. खादी, हरिजन सेवेइतकाच आहार हा त्यांच्या आवडीचा विषय आहे असें सांगतात. त्यांनीं आहारासंबंधीं अनेक प्रयोग केले आहेत. त्यांतील कांहीं त्यांच्या अंगलटहि आले आहेत. पण हे प्रयोग करणें सतत चालू असतें. आहारावर आचार-विचार अवलंबून असतात. तामसी आहाराच्या मनुष्याला सात्त्विक विचार सुचणार नाहींत. मसाले नसणारे, फोडण्या नसणारे, कच्चे अगर वाफाळलेले पदार्थ व भाज्या या प्रकृतीला पोषक असतात. पाश्चात्य राष्ट्रांत निसर्गोपचाराच्या बाबतींत जे जे शोध लागले आहेत, त्यांचे त्यांचे प्रयोग गांधींच्या आश्रमांत स्वतंत्रपणेंच झालेले आहेत. सुप्रसिद्ध निसर्गशास्त्रज्ञ मॅकफेडन म्हणतो कीं, सूर्याच्या पाकशाळेंत सर्व पदार्थ शिजून तयार होत असतां तुम्ही आणखी आपल्या घरांत ते पदार्थ कां शिजवतां ? गांधीहि तसेंच म्हणतात. न शिजवलेलें अन्न, किंवा फळें यांचा आहार सर्व श्रेष्ठ आहे. हा आहार कसा घ्यावा ? गांधी म्हणतात, ज्याप्रमाणें आपण औषध घेतों, त्याप्रमाणें आपण शरीरधारणेकरतां आहार घ्यावा. पण पक्का आहार घेणारांनीं पाकाचें एक शास्त्रच बनविलें आहे. स्त्रियांचा सर्व वेळ ह्या पाकसिद्धांत जातो. त्याला एकच कारण आहे आणि तें म्हणजे जिभेची हौस पुरावणें. प्रकृतीचा कमकुवतपणा हाहि त्याला कारण नाहीं असें नाहीं. तसा

विचार केला तर पशुपक्षी हे रानावनांत हिंडतात व कच्चाच आहार घेतात. त्यांतील कांहींना पक्व आहाराची खोड लागली असली तर ती माणसांच्या सान्निध्यामुळें. मनुष्य हा एकेकाळीं कच्च्याच आहारावर रहात असे. ज्या वेळीं अग्नीचा शोधच लागला नव्हतां, त्या वेळीं कसली चूल व कसला स्वयंपाक ! आधुनिक काळांत तर पचनशक्ति कमी झाल्यामुळें कच्चा आहार पचेल का नाहीं याविषयीं शंका वाटते आणि प्रकृतीला कमी अधिक झालें तर पीडा नको ह्या बुद्धीनें कोणी तें दिव्य करीत नाहीं. पण जर कच्च्या अन्नाची संवय केली तर तें आरोग्याला खास पोषक होईल. अशा सूचना करणारे पाश्चात्य डॉक्टर्स हे मोठे शास्त्रज्ञ व संशोधक समजले जातात. पण गांधींनीं त्या सूचना केल्या कीं, रानटी अवस्थेकडे आम्हांला हा नेत आहे अशी ओरड करण्यांत येते.

दूध हें गांधींना तितकेसें पसंत नसलें तरी त्यांनीं त्याबद्दलचा विरोध सोडून दिला आहे, एवढेंच नव्हे तर आपल्या देशांतील लोकांना अधिक अधिक दूध दुभतें मिळालें पाहिजे असें ते म्हणतात. तेव्हां आहाराच्या साधेपणाबद्दल, सात्त्विकतेबद्दल गांधींचे विचार हे महत्त्वाचे आहेत. ग्रामोद्योगाचे पदार्थ खाण्याबद्दल त्यांचा कटाक्ष आहे. कारण त्यांत जीवन–द्रव्यें आहेत असें डॉक्टर्सहि म्हणतात. शिजवण्यानें, गिरणींत तांदूळ कांडण्यानें, व गहूं दळण्यानें पदार्थांतील जीवन–शक्ति जाते आणि दरिद्री हिंदुस्थानला ही शक्ति घालविणें शक्य नाहीं, म्हणून ते अन्य कारणांबरोबर याहि कारणाला प्राधान्य देतात. सामाजिक चालीरीति किंवा पोषाख यांत जितकी गांधींनीं क्रांति केली तितकी आहारांत झाली नाहीं हें खरें आहे. अर्थात् वरच्या वर्गाचा आहार बदलला आहे. पण खालच्या वर्गाला अद्याप पुरेसा आहारच मिळत नाहीं. तेव्हां त्यांना अमुक खा व तमुक खाऊं नका हें सांगणेंच कठीण आहे. त्यामुळें आहारशास्त्र हें सर्वमान्य झालें नाहीं. पण जो गांधीतत्त्वाचा अनुयायी आहे, त्यानें मात्र साधा आहार उचलला आहे. मद्यपानाबद्दलचा अगर इतर कमी अधिक शरीर व द्रव्यहानिकारक व्यसनांचा गांधीवादाचा निषेध हा तर उघडच आहे. कॉँग्रेस–मंत्रिमंडळाच्या अमदानींत त्यांनीं मद्यबंदी करून कॉँग्रेसवर मद्य-

व्यवसाय करणाऱ्या पारशी समाजाकडून आग पाखडून घेतली व तो वर्ग सर्वस्वीं कॉंग्रेसचा शत्रु झाला. पण ह्या अकारण व चुकीच्या शत्रुत्वाबद्दल त्यांनीं फिकीर केली नाहीं. जे न्याय्य, नीति प्रमाण व जनतेच्या हिताचें आहे तें करीत असतां सर्व जग उलटलें तरी चालेल पण आपण सत्याचा मार्ग सोडतां कामा नये ह्यावर त्यांचा कटाक्ष आहे. मद्यपानासारख्या व्यसनापासून हिंदी जनतेला वांचविण्याचे त्यांनीं केलेले प्रयत्न हे सरकारनें पुढें चालू ठेवले नाहींत. त्याचप्रमाणें कॉंग्रेस-कारभार नसणाऱ्या प्रांतांत मद्यपानबंदीचे प्रयत्नच झाले नाहींत.

समाजाच्या अंगांत भिनलेलीं निरनिराळ्या प्रकारचीं विषें व त्यांच्या मनांत रुजलेल्या श्रीमंतीच्या व परंपरेनें चालत आलेल्या कल्पना यांवर गांधीवादानें जोराचा आघात केला. आर्धी सामाजिक का आर्धी राजकीय अशी गांधींची भूमिका नाहीं. जेथें अन्याय, जेथें खुळेपणा, जेथें जुलूम दिसेल त्यावर हल्ला चढवावा आणि नव्या विचारांच्या प्रफुल्लतेनें समाज ताजातवाना व शुद्ध करावा अशी त्यांत दृष्टि आहे. त्याकरतां सर्वस्व पणाला लावावें लागतें व कदाचित् लोकांकडून धिक्कारूनहि घ्यावें लागतें. गांधी जर सामाजिक भानगडींत पडते ना, तर त्यांची राजकीय कामगिरी कदाचित् अधिक सफल झाली असती; पण त्यांत गांधीवाद निष्फळ ठरला असता.

आर्थिक क्रांति : : : : १०

मेरे लिए तो चरखा अहिंसा की प्रतिमा है। उसका आधार संकल्प है। रामनाम में कोई स्वतंत्र शक्ति नहीं है। वह कोई कुनैन की गोली नहीं है। कुनैन की गोली में स्वतंत्र शक्ति है। उसमें कोई विश्वास करे या न करे। वह 'अ' को मलेरिया हुआ तोभी काम देती है और 'ब' को हुआ तोभी देती है। रामनाम में ऐसी स्वतंत्र शक्ति नहीं है। मंत्र में शक्ति संकल्पसे आती है। चरखे में ऐसी कोई स्वतंत्र शक्ति नहीं कि वह आपको स्वराज्य दे। लेकिन अगर मै इस संकल्प को लेकर बैठ जाता हूं कि मै चरखे की मार्फत अहिंसा का पाठ पढूंगा, मै उससे स्वराज्य लूंगा, तो चरखा मेरे लिये स्वराज्य का साक्षात साधन बन जाता है।

सर्वोदय, जून १९३९
Speech at वृंदावन.

गांधींना जर अत्यंत हिणवण्याचे व त्यांची चेष्टा करण्याचे प्रयत्न कोठें होत असतील तर त्यांच्या आर्थिक दृष्टिकोणाबद्दल. "हा माणूस वेडा आहे, खुळा आहे, कापडाच्या गिरण्यांबरोबर खादीचा टिकाव लागणार नाहीं असें स्पष्ट दिसत असतां खादी खादी करीत हा बसला आहे ! खादीनें स्वराज्य मिळेल एवढेंच काय मोक्षहि मिळेल असें हा वेडा म्हणाल्याशिवाय रहाणार नाहीं" अशीहि टीका त्यांच्यावर होते.

खादीवर इतकी टीका झाली आहे कीं, यापेक्षां जास्त कठोर व कर्कश टीका होणें जवळजवळ अशक्य आहे. या साऱ्या टीकासागरांतून खादी ही जीव जगवूनच काय, पण आपलें ऐश्वर्य वाढवून बाहेर आली आहे. 'धुराडाला धुराड भिडवा' म्हणणारे एक इंचहि सूत काढूं शकले नाहींत पण खादी लाखों लोकांच्या पोटाला देऊं शकली.

अर्थशास्त्रावरील ग्रंथ त्यामुळें खोटे आहेत असें म्हणण्याचें कारण नाहीं. त्यांतील सिद्धांत हे चुकलेले आहेत असेंहि म्हणण्याचें धाडस कोण करील ? विमानांत बसून आपण ताशीं १५० मैलांच्या वेगानें जातों असें जर कोणी सांगितलें तर तें खोटें कसें मानावें ? पडद्यावर हुबेहुब माणसाचीं चित्रें हालचाल करतांना दिसतात, एवढेंच नव्हे तर त्यांचें बोलणें व गाणें स्पष्टपणें ऐकतां येतें ह्यावर विश्वास कां ठेऊं नये ? अर्थशास्त्राप्रमाणेंच भौतिकशास्त्रांतहि इतक्या गोष्टी आहेत कीं, त्यांची माहिती नसणें हें अडाणीपणाचें लक्षण ठरेल. मग त्यांतील सिद्धांत नाकारणें हें तर दूरच.

पण अर्थशास्त्रांतील सर्वच सिद्धांत बरोबर असले तरी ते प्रत्येक देशाला लागू झालेच पाहिजेत असा त्याचा अर्थ नाहीं. गिरणींतल्या कापडाच्या पुढें खादीचा टिकाव लागणार नाहीं, कारण थोडक्या वेळांत जास्ती सूत व जास्त कापड गिरणी काढूं शकते हा एक सिद्धांत आहे. जनता ही अन्य हेतूनें प्रेरित झाली नसल्यास जास्त किंमत देऊन वाईट (खादीसारखें जाडेंभरडें) कापड घ्यावयास तयार नसते, हा दुसरा मुद्दा. ४० कोटी लोकांना पुरेल इतकी खादी तयार होणें अशक्य आहे; पण गिरणींत तितकें कापड तयार होणें शक्य आहे. हें खादीविरोधाला तिसरें कारण. तेव्हां खादीऐवजीं स्वदेशी गिरणींचें कापड कसें पैदा करतां येईल याचा विचार गांधींनीं व काँग्रेसनें करावा, हा या तक्रारींचा निष्कर्ष. या व इतर सर्व आक्षेपांना गांधींनीं उत्तर दिलें आहे. खादी-वरील आक्षेपांचा समाचार घेण्यापूर्वी पाश्चात्य अर्थशास्त्राचाच समाचार आधीं घेतला पाहिजे. गांधीवादाच्या दृष्टीनें पाश्चात्य अर्थशास्त्र हें अनर्थ-शास्त्र आहे. तें अर्थशास्त्र स्वार्थावर अधिष्ठित आहे, सेवेवर नाहीं. आपल्या देशांत जे अर्थशास्त्राचे ग्रंथ येतात ते सर्व पाश्चात्य देशांतून

येतात. त्या अर्थशास्त्राचा जन्म परदेशांत झाला आहे. हें अर्थशास्त्र व त्यांतलि आधुनिक सिद्धांत यंत्रयुगामुळें निघाले आहेत. यंत्रयुगापूर्वी हे सिद्धांत आजच्या स्वरूपांत नव्हते. यंत्रयुगाला सुरवात झाल्यावर भांडवल, नफा, मालक, मजूर, पुरवठा, मागणी, मजुरीचे दर, कामाचे तास, सुट्टया, वगैरे निरनिराळे प्रश्न निघाले. संप, टाळेबंदी, समाजसत्तावाद यांचाहि जन्म यंत्रामुळेंच झाला.

पाश्चात्य राष्ट्रें निरनिराळ्या प्रकारचीं सुखें भोगावयास सांपडावीं या मताचीं आहेत. हीं सुखें कशीं भोगतां येतील हा त्यांच्यापुढें प्रश्न होता. अर्थात् सर्वांना सारखीं सुखें भोगतां येतील अशी त्यांनीं कधींच कल्पना केली नाहीं. ज्यांच्याजवळ भांडवल आहे किंवा जे आपले जीव धोक्यांत घालून भांडवल मिळवूं शकतात, त्यांनाच सुख भोगण्याचा हक्क आहे हा या अर्थशास्त्राच्या मुळाशीं स्वार्थी सिद्धांत आहे. या भांडवलाच्या मूर्तीवर जर स्वार्थाचें देवालय त्यांना बांधतां आलें नसतें तर त्यांचें अर्थशास्त्र आजचें स्वरूप धारण करूं शकलें नसतें. भांडवलाचा संग्रह करण्याची अमर्याद शक्ति दुर्बल व्यक्तीच्याहि अंगांत असूं शकते; पण कामाची निष्पत्ति करण्याची अमर्याद शक्ति बलिष्ठ माणसाच्या अंगीं असूं शकणार नाहीं. तुम्हीं लाखों रुपये जवळ ठेऊं शकाल पण लाख वार सूत काढा म्हटलें तर तें शक्य होत नाहीं. त्यामुळें कामाची वांटणी जशी करतां येते, तशी पैसेवाल्याच्या संपत्तीची वांटणी करतां येत नाहीं. अर्थशास्त्र जें बनतें तें भांडवलवाला म्हणेल तसें बनतें. या प्रवृत्तीला उतारा म्हणून समाजसत्तावाद जन्म पावतो. कारण संपत्तिवाला जें आपल्या हातून काम होत नाहीं तें हजारों मजूर कामाला लावून करून घेतो. ह्या मजुराला मालकाप्रमाणेंच सुखभोग लाभावेत ही समाजसत्तावादांत दृष्टि असते. तेव्हां मालक काय किंवा मजूर काय हे बाकीच्या जनतेचें धनशोषण करून स्वतःला सुखी करून घेणाऱ्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मालक मजुराचें रक्त शोषण करूं इच्छितो, पण स्वतंत्र व भांडवलशाहीप्रधान राष्ट्रांचे मालक व मजूर दोघेहि जण अर्थशास्त्राच्या, किंवा यांत्रिक उत्पादनाच्या नांवाखालीं आमच्यासारख्या मागासलेल्या देशांचें रक्त प्राशन करीत असतात.

हें अर्थशास्त्र ज्याप्रमाणें भोगविलासांच्या संस्कृतीवर उभारलेलें आहे, तसेंच तें अनीतीवर उभारलेलें आहे. त्यांत सेवेची भावना नसून सुखाची भावना आहे. जेथें सुख हेंच ध्येय असतें, तेथें त्याची भल्याबुऱ्या मार्गानें प्राप्ति करून घेणें हें क्रमप्राप्त ठरतें. मार्गाविषयींचा विधिनिषेध संपला म्हणजे कसली नीति व कसली अनीति !

जमिनींत एक गव्हाचा, ज्वारीचा किंवा अन्य धान्याचा दाणा पेरला म्हणजे त्यांतून निर्माण होणाऱ्या रोपट्याला शेंकडों दाणे येतात. तीच भावना पैसेवाल्यांची असते. एक रुपया पेरला म्हणजे त्या रुपयाच्या झाडाला हजारों रुपये यावेत ही त्याची बुद्धि असते. पण निसर्गांत ही प्रक्रिया सहज होते. तशी कृत्रिम व्यवहारांत होत नाहीं. म्हणूनच उत्पादनांत मिळणारा पैसा हा अनीतिमय असतो.

तेव्हां पाश्चात्य अर्थशास्त्राबद्दल गांधीवादाचे दोन मुख्य आक्षेप आहेत. एक तर त्या अर्थशास्त्राचा उद्देश सुख किंवा भोगविलास हा आहे आणि दुसरा तें अर्थशास्त्र अनीतीवर उभारलेलें आहे. या अर्थ-शास्त्राच्या वृक्षाला पुढें साम्राज्यशाहीसारखीं किंवा रशियांतील समाज-वादासारखीं फळें येतात. पण कसलेंहि फळ त्या वृक्षाला आलें तरी त्याचें मूळचें स्वरूप नष्ट होत नाहीं.

आक्षेपक विचारतात मग काय गांधींना अर्थशास्त्र जें हवें आहे तें दुःख देणारें हवें आहे ? कोणत्याहि देशांतील द्रव्यार्जनाचा हेतु हा दुःख प्राप्त करून घेण्याचा नसतो. सुखाकरतांच द्रव्यार्जन करतात. पण हिंदुस्थानांत जी सुखाची कल्पना आहे ती युरोपांत नाहीं. कांहीं देशांत दुसऱ्यांच्या घरादारांचा व बायकामुलांचा नायनाट करून स्वतः सुखी होण्याची प्रवृत्ति असते. हिंदुस्थानचे उद्योगधंदे आपल्या लष्करी शक्तीनें नष्ट करण्याचे इंग्लंडनें जे यशस्वी प्रयत्न केले व त्यामुळें इंग्लंडची जी आर्थिक भरभराट झाली त्या भरभराटीपासून होणारें सुख हें गांधी सुख समजत नाहींत. तसेंच दुसऱ्यांना बुडवून आपले उद्योगधंदे वाढविण्याच्या प्रयत्नांना गांधी नीतियुक्त प्रयत्न म्हणत नाहींत. त्यामुळेंच गांधींना पाश्चात्य अर्थशास्त्र हें मान्य नाहीं.

१८७७ सालीं सर जॉन स्ट्रॅची यांनीं आपलें आर्थिक पत्रक हिंदुस्थान सरकार पुढें सादर करतांना असे उद्गार काढले कीं, हिंदुस्थानचेंच हित पहाणें हें आमचें कर्तव्य नाहीं, तसेंच स्वतःच्या देशासंबंधींचें जें आपलें कर्तव्य आहे त्यापेक्षां उच्च कर्तव्य आपण मानीत नाहीं. यावरून व इतर पुराव्यांवरून इंग्रजांनीं हिंदुस्थानच्या कल्याणाकरतां येथील राज्यकारभार चालविला नाहीं ही गोष्ट उघड आहे.

न्यायमूर्ती रानड्यांनीं पाश्चात्य अर्थशास्त्राचे चांगले धिंडवडे उडविले व तें अर्थशास्त्र आम्हांला लागू नाहीं असें म्हटलें. त्याकरतां त्यांनीं जीं कारणें दिलीं तीं लक्षांत घेण्यासारखीं आहेत. हिंदुस्थानची व इंग्लंडची परिस्थिति सारखी नाहीं. "व्यक्तिनिष्ठा, स्पर्धा, भांडवल, मजूर वगैरे बाबतींत आम्ही पाश्चात्य राष्ट्रांपेक्षां वेगळे पडतों. आमच्याकडे कुटुंब व जात ह्यांना व्यक्तीपेक्षां जास्त महत्त्व आहे. स्वार्थ हा आमच्यांत नसतो असें नाहीं. पण धनोत्पादन हेंच आमच्या जीवनाला चालना देत नाहीं. पैशाच्या मागें लागणें हाच आमचा जीवित हेतु नसतो." म० गांधींनीं व न्यायमूर्ती रानड्यांनीं केलेलें हिंदुस्थानचें विश्लेषण हें फारसें भिन्न नाहीं. पण अर्थशास्त्री म्हणतात आम्हांला हिंदुस्थानचें अर्थशास्त्र वेगळें व पाश्चात्यांचें वेगळें असें धरून कसें चालतां येईल ? हिंदुस्थानच्या अर्थशास्त्राकडे आम्हांला पाश्चात्यांच्या चष्म्यांतूनच पहावें लागतें. अर्थशास्त्री हे स्वतंत्रपणें हिंदुस्थानचें अर्थशास्त्र निर्माण करूं शकत नसल्यामुळें आपण त्यांच्या अडचणीला बळी पडावयाचें कीं काय हा खरोखर प्रश्न आहे. हे अर्थशास्त्री स्वतंत्र दृष्टीनें हिंदुस्थानकडे पाहूं शकत नसल्यामुळें जें पाश्चात्य अर्थशास्त्राच्या परिभाषेंत बसत नाहीं, तें सर्व अशास्त्रीय असें म्हणतात. ते म्हणतात रानड्यांचा काळ गेला. आतां आपण पाश्चात्यांचें अनुकरण करूं लागलों आहों, तेव्हां उगाच कशाला त्यांच्यांत व आपल्यांत भेद मानतां !

तेव्हां आजच्या अर्थशास्त्रांत जर गांधींचें अर्थशास्त्र बसत नसलें तर तो दोष गांधींचा नसून पाश्चात्य अर्थशास्त्राचा आहे. त्यांच्या संस्कृतीचा प्राण सुखोपभोग हा आहे. तसेच तिकडील देश लहान, हवा अत्यंत थंड,

शेतीचें पीक कमी, अशी त्यांची स्थिति आहे. आपलें राष्ट्र श्रीमंत झालें म्हणजे झालें, मग तो पैसा कोठून व कसा येतो याचा विचार करण्याचें कारण नाहीं असें ते समजतात. त्यामुळें यंत्राला व पैशाला त्यांच्याकडे देवत्व आलें आहे. या अर्थसंचयाच्या प्रवृत्तीमुळें माणसामाणसांत समाजासमाजांत व राष्ट्राराष्ट्रांत प्रेम व सलोखा उत्पन्न होण्याऐवजीं स्पर्धा व द्वेष उत्पन्न होतो. त्यामुळें या देशांना आपलें अस्तित्व शस्त्राच्या सहाय्यावर टिकवावें लागतें.

हिंदुस्थानचा विचार करतांना आपली संस्कृति व आपली परिस्थिति ह्यांचा अवश्य विचार करावा लागतो. आमची संस्कृति अर्थप्रधान, सुखोपभोगप्रधान अशी नाहीं. जीवनाचा हेतु या पेक्षां आम्ही फार उच्च मानीत आलों. पैशाला मृत्तिकेसमान मानण्याचे धडे अजूनहि आम्हांला मिळत आहेत. गांधीजी म्हणतात "इंग्लंडांत गोमांसाचा चहा फार चांगला समजला जात असेल, पण धार्मिक हिंदुस्थानच्या उष्ण हवेंत तो विषासारखा आहे. जलाल दारू ही ब्रिटनच्या उत्तरेला आवश्यक असेल पण तसली दारू घेणारा हिंदुस्थानांत कामाला किंवा समाजांत वावरायला नालायक ठरतो. खुला व्यापार—फ्री ट्रेड—हा, जो देश उद्योग प्रधान झाला आहे, जेथील लोक मोठाल्या शहरांत रहात आहेत, जे दुसऱ्या राष्ट्रांच्या भक्ष्यावर जगण्यास कचरत नाहींत, आणि म्हणून ज्यांना आपला कृत्रिम व्यापार टिकविण्यास मोठें आरमार लागतें, असा व्यापार अर्थशास्त्रदृष्ट्या सयुक्तिक असेल. पण ह्याच खुल्या व्यापारानें हिंदुस्थानला गुलामगिरींत ठेवलें आहे व त्याला तो शाप झाला आहे."

हिंदुस्थानला स्वतःचें अर्थशास्त्र हवे आहे. त्या अर्थशास्त्रांत हिंदुस्थानच्या (१) परंपरेचा (२) राजकीय गुलामगिरीचा व (३) देशाचा-विस्तार, हवापाणी—विचार केलेला असावा, पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञ गांधींच्या खादीला व ग्रामोद्योगाला जसें अशास्त्रीय म्हणतात, तसेंच आम्ही त्यांचें अर्थशास्त्र हें मुळांतच चूक, सबब त्याज्य कां समजूं नये ?

हिंदुस्थान हा खेड्यांचा देश आहे. २५०० मैल लांब व २००० मैल रुंदीच्या या देशांत १८ लाख चौरस मैल जमीन आहे व एवढ्या

जमिनींत ७ लाख खेडीं वसलीं आहेत. हीं खेड्यांतील जनता आपापलीं गांवें सोडूं शकत नाहीं. कारण त्यांचें जीवन शेतीवर अवलंबून असतें. ह्या शेतींत धड त्यांचें पोटहि भरत नाहीं व पुरी उपासमारहि होत नाहीं. त्याला शहरांत जायला सांगायचें म्हणजे अर्धी—चतकोर भाकरी जी शेतींत मिळते तीलाहि आंचवणें आहे. शहरांत धंदे कमी व कामकरी जास्त. शहरांतील उद्योगधंदे वाढले तरी किती लोकांना ते काम देऊं शकतील ? तेव्हां हिंदुस्थानांतील शेतकरी हा आपल्या शेतीपासून विभक्त होऊं शकत नाहीं हा पहिला सिद्धांत आहे व तो ज्यांना कळला नाहीं त्यांना आमचें स्वतंत्र अर्थशास्त्र कळणें कठीण आहे.

हिंदुस्थान पुढें जे आर्थिक प्रश्न आहेत ते निराळे आहेत. आम्हांला हजार रुपये जवळ असणाराला पांच हजार रुपये कसे मिळतील याची चर्चा करायची नाहीं; पण जे कोट्यवधि लोक इंग्रजी राज्याच्या कृपेमुळें अर्धपोटीं रहात आहेत त्यांना कसें जगवतां येईल हा प्रश्न आहे. ही क्रिया अशास्त्रीय असेल, आणि पाश्चात्यांच्या सिद्धांताप्रमाणें चूकहि असेल. ते म्हणतील कीं जे अत्यंत लायक असतील तेच जगतील. इतर मेले तर त्यांची पर्वा कशाला ? त्यांच्या व आमच्या दृष्टींत सांस्कृतिक फरक आहे. अद्याप माणसें अन्नावांचून मरावींत असें आम्हांला वाटत नाहीं.म्हणून ज्याला हिंदुस्थानची सेवा—पुढारीपण नव्हे—करायची असेल त्यानें नुसत्या स्वराज्यस्वातंत्र्याची—परिभाषा बोलून चालणार नाहीं. या असंख्य जनसंमर्दाला जगविण्याचा मार्ग जो दाखवूं शकेल तोच राष्ट्राचा पुढारी होईल. म्हणून सत्याग्रह किंवा असहकारिता कशाकरतां ? ती स्वातंत्र्याकरतां, आणि स्वातंत्र्य हें गरिबांच्या पोटाचा प्रश्न सोडविण्याकरतां हवें आहे. पण गोरगरीब विचारतील, तुमच्या स्वराज्यांत आमच्या पोटाला अन्न मिळेल, याबद्दल कांहीं खात्री पटवा कीं ! काय सांगणार आम्ही त्यांना ? स्वातंत्र्य मिळाल्यावर आम्ही गिरण्या काढूं, कारखाने काढूं, ते राष्ट्राच्या मालकीचे करूं, आपल्या देशांत समाजसत्ता स्थापन करूं आणि तुम्हांला सुखी करूं ! हें चित्र सुंदर व रम्य आहे. पण त्यानें त्यांचें समाधान होणार नाहीं व आम्हांला स्वत:लाहि इतकें करतां येईल किंवा नाहीं याबद्दल खात्री नाहीं.

हा शेतकऱ्यांचा देश वांचवावयाचा असेल तर त्याला शेतीच्या धंद्याला जोडून धंदा दिला पाहिजे. तो खेड्यांत शेतकऱ्याच्या झोपडींत करतां आला पाहिजे व अन्नाप्रमाणें तो शरीरधारणेला उपयोगी पाहिजे. असा धंदा खादी उत्पन्न करण्यावांचून दुसरा नाहीं. असलाच तर कोणी दाखवून द्यावा.

हिंदुस्थान हा खेड्यांचा बनलेला देश आहे व येथील बहुसंख्य लोक शेतीवर उपजीविका करीत आहेत, हें अर्थशास्त्री नाकबूल करीत नाहींत. एक लाखावर लोकसंख्या असलेलीं फक्त ३९ शहरें आमचेकडे आहेत,* आणि शेतीवर ६५·९ टक्के लोक जगत आहेत.+ १० टक्के उद्योगधंद्यावर, ५।। टक्के व्यापारावर, १।। टक्का वहातुकीवर, ·।।· सैन्यावर, ·।।· टक्का सरकारी नोकरी, १।। टक्का बौद्धिक धंदे, ७।। टक्के घरगुती चाकऱ्या व बाकीचे किरकोळ व्यवसाय करून जगतात.

पण अमुक धंद्यावर अमुक लोक जगतात असें जरी येथें सांगितलें तरी ते पोटभर अन्न खातात असें नाहीं. हिंदुस्थानची संपत्ति व त्या संपत्तीची वांटणी कशी विषम आहे हें पाहिल्यावांचून त्यांच्या दारिद्र्याची कल्पना येणार नाहीं.

हिंदी लोकांचें दरमाणशीं उत्पन्न किती आहे, हें नक्की सांगणें कठीण आहे असें अर्थशास्त्री म्हणतात. पण जें उत्पन्न निरनिराळ्या लोकांनीं काढलें आहे तें खालीलप्रमाणें.

---

* Indian Economics, Jathar & Beri Page 52

\+ ,, ,, ,, 48

उत्पन्न काढणारा	कोणत्या वर्षाचें	उत्पन्न रुपये
दादाभाई नौरोजी	१८७०	२०.
लॉर्ड कर्झन	१९००	३०.
वाडिया व जोशी	१९१३–१४	४४–५–६.
शहा व खंबाटा	१९२१–२२	६७.
फिंडले शिरास	१९२२	११६.
,,	१९३२–३३	५८
विश्वेश्वरअय्या		८२ सामान्य वर्ष ५५ असामान्य वर्ष

१९३२ सालीं मंदीची लाट आल्यामुळें उत्पन्नाचा आंकडा कमी झाला. हे आंकडे कसे काढतात ? १९२१–२२ सालीं शहा व खंबाटांनीं काढलेले आंकडे घेऊं.

	कोटी रुपये.
शेतीचें उत्पन्न –	२०९७.८
जंगलाचें उत्पन्न –	२८
मासळी	३.२
उत्पादन	१८६.
खनिज संपत्ति	२८.७
इमारती	२०:३
	२३६४. .

याला लोकसंख्येनें (३२ कोट–१९२१–२२) भागलें म्हणजे माणशीं उत्पन्न ७४ येतें हें एकंदर उत्पन्न झालें. निवळ उत्पन्न काढण्याकरतां हिंदुस्थानांतून किती पैसा बाहेर जातो तें काढलें पाहिजे. शहा व खंबाटा यांनीं प्रत्येक हिंदी माणसाचे ७ रु. इंग्लंडला जातात असें काढले आहे. म्हणजे २२४ कोटी रुपये १९२१-२२ सालीं येथून परदेशीं जात असत. त्यांपैकीं

३२ कोट रुपये (होमचार्जेस) पेन्शन, पगार, व्याज वगैरे कारणाकरतां तिकडे पाठवावे लागत. या खेरीज (१) सरकारनें इंग्लंडांत गुंतवलेलें भांडवल, (२) परक्या व्यापाऱ्यांनीं येथें गुंतवलेल्या भांडवलावरील परदेशी जाणारा नफा (३) सरकारी नोकर, युरोपिअन व्यापारी, सामुदायिक भांडवलाच्या कंपन्या वगैरेकडून इंग्लंडांत जाणारा पैसा हा वजा केला तर २१४० कोट रुपये शिल्लक उरतात. म्हणजे सरासरी उत्पन्न ६७ रु. येतें. आतां या ६७ रुपयांतून ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रांतिक व मध्यवर्ती सरकारच्या खर्चाचे जवळ जवळ २७० कोटी रुपये व संस्थानचे (किती धरावेत याचा अंदाजच नाहीं.) वजा गेले म्हणजे ६१ रुपये सरासरी प्रत्येक माणसाचें उत्पन्न निघतें. १९२२ सालीं सरासरी हिंदी मनुष्यावर ६ रु. कर बसत होता. १९३५–३६ सालीं हा कर जवळ जवळ ५ रु. होतां.

या सर्व आंकड्यांचा अर्थ असा आहे कीं हिंदी माणसाचें एकूण उत्पन्न ७४ रुपये, त्यांतून त्याला ७ रुपये इंग्लंडला पाठवावे लागतात व ६ रु. येथील सरकारला द्यावे लागतात. उरलेल्या ६१ रुपयांत हिंदी माणसाला आपला प्रपंच हाकावा लागतो. पण प्रत्येक माणसाला जर ६१ रुपये सरसकट मिळते तर त्याला नुसतें अन्न तरी खावयाला मिळालें असतें. पण ६१ रु. हा आंकडा दिखावू आहे.

हिंदुस्थानचें उत्पन्न आपण २३६४ कोटी रुपये धरलें आहे. हें उत्पन्न विषमतेनें विभागलें गेलें आहे. या उत्पन्नांपैकीं १६४० कोटी रुपये उत्पन्न ४० टक्के लोकांच्या म्हणजे १३ कोटी लोकांच्या वांट्याला येतें. बाकीचें ८२५ कोटी रुपये ६० टक्के लोकांच्या म्हणजे १९ कोटी लोकांच्या वांट्याला येतें.* १९ कोटी लोकांचें सरासरी उत्पन्न ४३ रु. ८ आणे आहे. बाकीच्या १३ कोटी लोकांचा आपण विचार केला नाहीं तरी चालेल. कारण त्यांचा विचार करण्यास पाश्चात्य अर्थशास्त्र समर्थ आहे. हिंदी अर्थशास्त्रज्ञाला या १९ कोटी लोकांचा विचार केला पाहिजे. त्यांच्या या उत्पन्नांतून ७ रु. व ६ रु. वजा जातां बाकी ३० रु. उरतात. या ३० रुपयांत म्हणजे दरमहा माणशीं २॥ रु. उत्प-

---

* Jathar & Beri Indian Economics Page 148, Part II.

न्यांत गरीबांनीं कसें पोट भरावें व काय कपडे वापरावेत? ज्या देशात ४३ रुपये उत्पन्नांतून ७ रुपये परदेशी जातात व ६ रुपये सरकारी कराकरतां वसूल होतात, तो देश उपाशीं मरत असला तर आश्चर्य कसले ?

हिंदुस्थानला शेतीचें उत्पन्न वाढवणें शक्य आहे काय ? येथील सर्व शेतजमीन लागवडीस आणतात काय ? येथें एकूण ६७ कोटी ९१ लक्ष एकर जमीन आहे. त्यांतील १६ कोटी ७५ लक्ष ब्रह्मदेशाची जमीन काढून टाकली म्हणजे ५१ कोटी १६ लक्ष एकर जमीन रहाते. या ५१ कोटींपैकीं, २१ कोटी ३ लक्ष जमीन फक्त लागवडीस आहे. ७ कोटी एकर जमीन जंगलाकरतां, ९॥ कोटी जमीन लागवडीस न आणण्या-सारखी (घरें, नद्या, रेल्वे वगैरेमुळें), ४॥ कोटी पड असा एकंदर ४२ कोटी एकर जमीनीचा हिशेब झाला. आतां फक्त ९ कोट एकर जमीन अशी आहे कीं, तींत लागवड करतां येईल. ही जमीन आसाम, सिंध, पंजाब व मध्यप्रांतांत आहे. मुंबई प्रांतांत फार थोडी (८ लाख) जमीन लागवडीला शिल्लक आहे. जी ९ कोट एकर जमीन दिसते, ती अगदीं कमी दर्जाची आहे. ती पिकवायची असली तर तेथें कालवे वगैरे काढले पाहिजेत. पण कालवेच जर काढायचे असतील तर ते असल्या जमीनींत कां ? त्यापेक्षां चांगल्या जमीनींत ते काढतां येतील. तेव्हां खरें सांगायचें म्हणजे नवीन जमीन लागवड करण्यासारखी दिसतच नाहीं. याच्या उलट असलेली जमीन ही पोटाला पोटभर देऊं शकत नाहीं. इंग्लंडप्रमाणें दुसरे देश जिंकून तेथें आम्ही राज्यें स्थापलीं नाहींत, तेव्हां तोहि मार्ग बंदच आहे. तेव्हां ३२ कोटी लोकांना (आतां ४० कोटी लोकांना) फक्त २१ कोट एकर जमीन म्हणजे माणशी जवळजवळ ·॥· एकर जमीन आमचेकडे पडते.* २१ कोट जमीनीपैकीं ८० टक्के जमीन तांदुळ, ज्वारी, डाळ वगैरे धान्यांकरतां आणि २० टक्के जमीन गळिताचीं धान्यें (६ टक्के), कापूस (५॥), ज्यूट (१), जनावरांचा कडबा, (४।) चहा, कॉफी, अफू, नीळ, तंबाखू, (३), वगैरे करतां खर्चीं पडते.

---

* Ibid 168, Part I.

अशा स्थितींत हिंदुस्थानचा शेतकरी कसा जगावा ? नवे उद्योगधंदे, देशांतर, शेती, लष्कर वगैरेंत किती जागा आहे ? सध्यांच्या मोठ्या प्रमाणावरलि उद्योगधंद्यांत १८ लक्ष ४० हजार लोक कामाला आहेत. त्यांतलि ५ लक्ष १५ हजार मजूर ३९८ गिरण्यांत कापड तयार करीत आहेत.

हिंदुस्थानला स्वयंपूर्ण होण्याकरतां आणखी उद्योगधंदे वाढविण्यांत आले तर सात आठ लाखांवर लोकांना उद्योग मिळणार नाहीं. बहुजन समाज आजच्या सारखाच उद्योगरहित राहील. देशांतर, लष्करभरती, वगैरे उपाय थोडे फार अमलांत येतच असतात. बेकारी व उपासमारी नष्ट होण्याकरतां प्रत्येकाचे थोडेफार प्रयत्न चाललेच असतात. पण आपल्यापुढें प्रश्न आहे तो थोडया फार लाख लोकांचा नाहीं, कोट्यवधि लोकांचा आहे.

यंत्र हें श्रीमंताला अधिक श्रीमंत करतें, काम असणाऱ्या माणसाला पोटाला देतें, पण तसें करतांना अनेकांना उपाशी मारतें. एका माणसाचा प्रपंच यंत्रामुळें बऱ्यापैकीं चालतो, पण दहा माणसें अन्नान्न दशेला लागतात. अर्थात, तेवढ्यामुळें यंत्राचें आपण वैरी व्हावें असें कोणी म्हणत नाहीं. आपलें सर्व आयुष्यच यंत्रानें वेढलेलें आहे. हवेच्या बाहेर जाणें जितकें शक्य आहे तितकें यंत्राच्या बाहेर जाणें शक्य आहे. तेव्हां यंत्राला विरोध करून काय फायदा ? यंत्रामुळें आपल्या जीवनावर, संस्कृतीवर, शिक्षणावर (चांगला नव्हे) चांगलाच परिणाम झालेला आपण पहातों. पण आपल्यासारख्या दरिद्री देशाला नुसती यंत्राची स्तुती करून किंवा निंदा करून चालणार नाहीं. आपल्याला १९ कोटी लोकांच्या पोटाचा प्रश्न सोडवावयाचा आहे. त्यांचें निव्वळ उत्पन्न २॥ रुपये आहे. तें उत्पन्न कमींत कमी ५ रु. तरी करायचें आहे. हें उत्पन्न वाढविण्याचें मार्ग दोनच (१) शेती (२) खर्चांत बचत. यांशिवाय तिसरा मार्ग म्हणजे सरकारी कर कमी करणें. अमुक उत्पन्नांच्या खालीं उत्पन्न असणाऱ्या जमिनीवर सारा अल्प अगर मुळींच न घेणें हा एक मार्ग आहे. श्रीमंतांच्यापेक्षां गरीबच जास्त कर देतात. १००० रु. उत्पन्न असणारे, १०० कोटी रुपये, व त्यांपेक्षां कमी उत्पन्न असणारे, १५०

कोटी रुपये कर देतात, तेव्हां ह्या बाबतींत लक्ष घालण्यासारखें आहे. पण ती परावलंबी गोष्ट आहे.

शेतीच्या उत्पन्नांत वाढ होणें अवश्य आहे, हें तर उघड आहे. पण शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, शेतीविषयीं उदासीनता, अनास्था वगैरे गोष्टी त्याच्या आड येतात. अर्थात् त्याच्या जोडीला जर पाटाची व कालव्याच्या पाण्याची मदत मिळाली तर शेतकरी सुधारेल. पण हीहि परावलंबी गोष्ट आहे. देश स्वतंत्र होईपर्यंत ह्या व इतर सुधारणा होणार नाहींत. आजपर्यंत सरकारने सिंधमध्यें शें. ७३ टक्के, पंजाबांत ४४, सरहद्दप्रांत ३२, मद्रास ३० इतके टक्के जमीन कालव्याखालीं आणली आहे. मुंबईंत हें प्रमाण फक्त ४ पडतें. अर्थात् इकडे नद्यांचा अभाव असल्यामुळें हें प्रमाण फारसें वाढणार नाहीं. पण वाढ होणारच नाहीं असें नाहीं.

अशाप्रकारें उद्योगधंद्यांची वाढ, शेतीची वाढ, करांत कपात वगैरे गोष्टी पराधीन आहेत. स्वाधीनची गोष्ट एकच आहे. ती म्हणजे खर्चांत काटकसर करणें. जेथें खर्चच कमी तेथें खर्चांत काटकसर करायला जर कोणी सांगूं लागला तर लोक त्यांना हंसतील. ही काटकसर करणें सर्वस्वीं आपल्या हातीं आहे. ‘ स्वतःला लागणारें वस्त्र स्वतः तयार करणें ’ हीच ती काटकसर. पैसा वांचविणें हें पैसा मिळविण्यासारखेंच असतें. आपण सरासरी १६ वार कापड दरवर्षी विकत घेतों. या कापडाकरतां आपलें ६ रुपये खर्च होतात. १६ वारांची नक्की किंमत सांगतां येत नाहीं; पण ती ६ रुपये धरून चालण्यास हरकत नाहीं. तेव्हां ४३ रुपये उत्पन्नांतील जर कपड्याचे बरेचसे पैसे वांचले तर शेतकऱ्याला ते पैसे दुसऱ्या आवश्यक खर्चाकरतां लावतां येणार नाहींत का ? हे पैसे किती वांचतील ?

१६ वार कापड तयार करण्यास लागणारा कापूस हा शेतांतील कापूसच घेतला पाहिजे. खादी-भांडारांतील पेळू विकत घेऊन सूत काढणें हें कधींहि किफायतशीर होणार नाहीं. देव कापूस कोठेंहि लावतां येतो. त्याला फारशी जागाहि लागत नाहीं. इतक्या उपर कापूस विकत घ्यावा

लागलाच तर बारा आण्यांवर त्याला किंमत पडणार नाहीं. पण तें सूत विणून घ्यावयास मात्र २ रुपये खर्च येईल. तेव्हां २ रुपयांत किंवा २॥। रुपयांत शेतकरी आपल्याला लागणारें कापड तयार करूं शकेल. त्यामुळें प्रत्येकाच्या खर्चांत वर्षाला ३। रुपये बचत होईल. पांचजणांचें कुटुंब असलें तर १६ रुपये बचत होईल. ४३ रुपयांपैकीं सरकारचे व इंग्लंडचे १३ रुपये गेल्यावर जे ३० रुपये उरतात त्या ३० रुपयांत जर ३। रुपये बचत होत असली तर ती कमी आहे असें समजण्याचें कारण नाहीं. तेव्हां गांधींनीं खादीची चळवळ काढून शेतकऱ्यांना ३। रुपये वांचवतां येतील असा मार्ग दाखवून दिला आहे. शेतकरी आणखी किती कापड पैदा करूं शकेल व किती पैसा खादीवर मिळवूं शकेल, हें स्थानिक व अन्य परिस्थितीवर अवलंबून आहे. सामुदायिक शेतकऱ्यांचा विचार करतां फक्त ३। रुपयेच वांचूं शकतात एवढें निश्चित.

ज्यांना इतर धंदे नाहींत किंवा इतर धंदे करूनहि ज्यांना वेळ रहातो त्यांना खादी तयार करण्याचा चांगला धंदा उपलब्ध झाला आहे. या धंद्यांत ८ तासांच्या कामाला ३ आणे मजूरी मिळूं शकते. अर्थात् काम करणारा नवशिका असून चालणार नाहीं. महिन्यांतून कांहीं दिवस रजा वगैरे धरली तरी महिन्याला ५ रुपये म्हणजे वर्षाला ६० रुपये पडण्यास हरकत नाहीं. वर्षाला ६० रुपये प्राप्ति होणें म्हणजे सध्यांच्या सरासरी उत्पन्नापेक्षांहि जास्त प्राप्ति होणें आहे. अर्थात् देशांतील सर्वच जण सूत काढूं लागलें तर ही प्राप्ति होणार नाहीं. तेव्हां त्या दृष्टीनें हा मुद्दा मांडलेला नाहीं.

पण खादीमुळें सर्वच गरीब जनता (१९ कोट) आपला खर्च ३। रुपये वांचवूं शकेल. तसेंच कांहीं जण जर हा धंदा म्हणून करूं लागले तर त्यांना वर्षाला ६० रुपये मिळूं शकतील. दरिद्री हिंदुस्थानांत इतकें उत्पन्न कमी महत्त्वाचें नाहीं. ज्यांचें उत्पन्न वर्षाला १०० रुपयांपेक्षां जास्त आहे व ज्यांना काटकसरीची जरूरी नाहीं ते खादीच्या अर्थ-शास्त्राबद्दल भांडतील. पण ज्याला एक पैसा दिसणें कठीण आहे असा

अनेक कोटी गरिबांचा वर्ग खादीचा विरोधक असणें शक्य नाहीं. दुर्दैव एवढेंच कीं ज्या शेतकऱ्याकरतां गांधींनीं हा मार्ग दाखवला, त्यानें खादीकडे फारसें लक्ष वळाविलें नाहीं. त्यामुळें खादीला जें वस्त्रस्वावलंबनाचें स्वरूप यावयास पाहिजे आहे तें येत नाहीं. इतर धंद्यांप्रमाणें तो एक धंदा केला जात आहे. अर्थात् त्या धंद्यावर जवळ जवळ ३ लाख गोरगरीब पोट भरीत आहेत हें खरें आहे. पण प्रत्येक शेतकऱ्याच्या झोपडींत चरखा गेला पाहिजे व झोपडींत जशी भाजी आमटी शिजते, तसें कापडाकरतां सूतहि निघालें पाहिजे हा सिद्धांत यशस्वी होऊं शकत नाहीं. खादी ही गरिबांकरतां, खेड्यांकरतां व शेतकऱ्यांकरतां आहे. ती त्यांनीं विकत घ्यावयाची नाहीं, स्वतः पैदा करावयाची आहे व शक्य तर विकावयाची आहे.

यांत अशक्य काय आहे ? बुद्धिमान लोकांचा विरोध, स्वास्थ्यप्रियता, सुबकतेच्या व टिकाऊपणाच्या चुकीच्या कल्पना व यंत्रामुळें भांबावलेली बुद्धि ह्यामुळें होत आहे. यंत्रापुढें तुमची खादी काय टिकणार असा अर्थशास्त्री चटकन् सवाल करतो व सामान्य माणसाला तें खरेंहि वाटते. भारतीय अर्थशास्त्रावर ग्रंथ लिहिणारे प्रो. जठार व प्रो. बेरी आपल्या पुस्तकांत १९३९ च्या ताज्या आवृत्तींत म्हणतात. ‘ कापसापासून हातानें सूत काढणें हें आतां जवळजवळ पूर्णपणें नष्ट झालें आहे व त्यावर वेळ खर्ची घालण्याचीहि जरूरी नाहीं.’ [Hand Spinning of Cotton is now almost completely extinguished and it need not detain us. Page 73 Part I.] अर्थशास्त्रावर ग्रंथ लिहिणाऱ्या या लेखकांना सूतकताई नष्ट झाल्यामुळें त्यावर वेळ खर्चाची जरूरी वाटत नाहीं हें सत्य आहे काय? त्यांनीं अखिल भारतीय चरखा संघाचे अहवाल आणवले असते तर त्यांचा भ्रमनिरास झाला असता. पण ही एक विद्वानांत मनोवृत्तीच आहे. त्या मनोवृत्तीबद्दल त्यांना नावें ठेवण्यांत अर्थ काय ? खादीचा सर्वत्र प्रसार करून दाखविणें हेंच त्याला उत्तर होय.

पण हा बुद्धिमान् लोकांचा विरोध खादी प्रसाराला नडला व अद्यापहि नडत आहे. बुद्धिमान् वर्गाला खादी पटली म्हणजे तिचा

खालच्या वर्गांत शिरकाव होईल अशी आरंभीं आशा वाटत होती. पण या वर्गाला खादी पटली आहे असें वाटत नाहीं. इतकी शक्ति जर खेड्यांत खर्च केली असती तर त्याचा जास्त उपयोग झाला असता असें वाटतें. बुद्धिवंतांचें अर्थशास्त्र हें यंत्रावर अधिष्ठित झालें आहे. ते भांडवलशाहींतून भ्रमण करीत मजूरशाहींत व समाजसत्तावादाकडे जातें. गरिबांचें अर्थशास्त्र अद्याप लिहिलें जावयाचें आहे. त्या अर्थशास्त्राचें केंद्र खादी व्हावयास पाहिजे. म. गांधी हे विधायक कार्यावर अत्यंत जोर देतात. विधायक कार्याशिवाय सत्याग्रह व सत्याग्रहाशिवाय स्वराज्य मिळणार नाहीं असें म्हणतात. विधायक कार्य हा त्यांच्या स्वराज्याचा पाया आहे. त्यांचें स्वराज्य अहिंसेवर व सत्यावर उभारलेलें आहे. खादींत राष्ट्रीय पुनरुज्जीवनाची शक्ति आहे असें त्यांचें म्हणणें. (Spinning wheel is a force in national regeneration,)* या त्यांच्या म्हणण्यावर कसा विश्वास ठेवावा याचा लोकांना पेंच पडतो. पण जरा खोल विचार केला तर त्यांत कांहीं चूक आहे असें वाटत नाहीं.

समान पोषाखामुळें आपलेपणा वाटतो. कांहीं खादी वापरणारे अप्रामाणिक असले तरी खादी वापरणारांमध्यें एक प्रकारचा बंधुभाव निर्माण होतो. तो एक राष्ट्रीय कार्यकर्त्यांचा गणवेष आहे असें वाटतें. युनिफॉर्म घालणाऱ्या शिपायांना परस्परांबद्दल आपलेपणा वाटत नाहीं काय ? खादी वापरणाऱ्याबद्दल जनतेलाहि एक प्रकारचा आदर व विश्वास वाटतो. आणि स्वतः खादी वापरणाऱ्याला इतरांपेक्षां नैतिक दृष्ट्या आपण वेगळे आहों असें वाटूं लागतें. मनुष्याचा स्वभाव बदलण्याची शक्ति खादीच्या कापडांत जरी नसली तरी खादीचा उत्पादक हा नैतिकदृष्ट्या थोर पुरुष असल्यामुळें त्याचें ऐकणाऱ्यालाहि आपण नीतिमान व्हावें असें वाटत असतें. गरिबांच्या दुःखांत व दारिद्र्यांत आपण सहभागी आहों ही भावना आणि हिंदुस्थान परतंत्र आहे ही जाणिव खादीमुळें उत्पन्न होते. खादीकरतां जास्त पैसा देतांना आपण हिंदुस्थानच्या दारिद्र्याला किंवा खादीच्या धंद्याला देणगी देत आहों असें

*Young India 494.

वाटल्यावांचून रहात नाहीं. स्वतंत्र देशांत आणि परतंत्र देशांतहि अशा उद्योग-धंद्यांना संरक्षण वा मदत देत असतात.

खादी वापरणाऱ्यांत एक प्रकारची समानता येते. कोट्यावधि रुपये मिळविणारा व्यापारी आणि जवळ रुपयाहि नसणारा साधा कार्यकर्ता यांच्यांत पोषाखावरून तरी श्रीमंती गरीबी ओळखतां येणार नाहीं. तेव्हां गरीब–श्रीमंतांना खादी पोषाखाच्या बाबतींत तरी एका पातळीवर आणते.

पाश्चात्य राष्ट्रें व आतां आपणहि सुखाच्या मागें जात असल्यामुळें आपल्या गरजा वाढवीत असतो. शंभर नंबरच्या तलम सुती कापडांत सुख आहे अशी आपली कल्पना. याच काय पण इतर वस्तूहि आपण सुखाकरतां निर्माण करीत असतो. जरूरीपुरतें सर्वांना मिळावें ही स्पर्धेच्या दिवसांत आपली भावना नसते. उलट समाजाला अवश्य नसणाऱ्या वस्तू निर्माण केल्या जाऊन त्यांची गरज कृत्रिमतेनें वाढवली जाते. नखें मऊ व गुळगुळीत करण्याकरतां आणि चेहरा सुंदर दिसण्याकरतां औषधें निर्माण होतात. पण त्याच वेळीं गरिबांना अन्न नसतें याचा विचार कोणाला नसतो. तेव्हां कृत्रिमपणें जीवनाचा दर्जा वाढविण्याच्या युगांत जीवनाला अवश्य लागणारे पदार्थ सर्वांना मिळाले पाहिजेत हें सांगणारा माणूस रानटी अवस्थेंत आम्हांला घेऊन जात आहेत असें म्हणण्यांत येतें. हा वस्तुस्थितीचा विपर्यास आहे. कमी कापड वापरणें किंवा जाडें भरडें कपडे वापरणें म्हणजे रानटी स्थितींत जाणें नव्हे. गांधींनीं जर खादी वापरण्याबरोबर हिंसा करा असा उपदेश केला असता तर ती रानटी अवस्था झाली असती. पण गांधी उपदेश करीत आहेत सत्य अहिंसेचा म्हणजेच समाजाच्या अत्यंत पुढारलेल्या मनोरचनेचा, तेव्हां त्यांच्या प्रयत्नांना रानटी स्थिति म्हणणें म्हणजे वेडेपणा आहे.

आपल्याकडे अद्याप घरीं स्वयंपाक करतात. इंग्लंडांत भट्टींतून पाव आणतात, आणि अमेरिकेंत भोजनालयांतच जेवणाची पद्धत आहे. अशा देशांतील लोकांना घरीं स्वयंपाक करून जेवा हें सांगणें रानटीपणाचेंच

वाटेल काय ? कदाचित् वाटेल, पण आपल्याला तसें वाटणार नाहीं. आपण म्हणूं कीं घरांतच उत्तम रुचकर, स्वच्छ व आपल्या आवडीचें अन्न तयार करतां येतें. घरीं खादी केली तर त्यांत रानटीपणा काय आहे ? उलट खादीचें कापड आतां इतकें सुबक व टिकावू निघतें कीं, एकदां खादी वापरावयास लागल्यावर ती सोडवतच नाहीं.

कपड्यांत जर साधेपणा आला व गिरणी–मालकांना मिळणारे पैसे जर वांचले तर आपल्या औद्योगिक दृष्टींत बराच बदल होईल. समाजसत्तावाद केव्हां निर्माण होतो, ज्यावेळीं मोठ्या प्रमाणावर यंत्रांच्या सहाय्यानें मालाच्या राशीच्या राशी पडतात तेव्हां. भांडवलवाल्याचें वैभव जेव्हां मजुराचे डोळे दिपवून टाकते त्याच वेळीं असूयेचा प्रवेश त्याच्या हृदयांत होतो व शेवटीं गाडी समाजसत्तावादाच्या स्टेशनवर येऊन थांबते. कृत्रिम गरजा वाढवलेला मालक आणि कृत्रिम जगांत गरजेपुरतेंहि सामानसुमान न मिळणारा मजूर यांचा लढा सुरू झाला म्हणजेच जग हादरतें व जगांत क्रांतीचें वातावरण तयार होतें. म. गांधींनीं हिंसामय जगांत अत्यंत धैर्यानें जसा अहिंसेचा पुरस्कार केला आहे तसाच यंत्रमय जगांत चरख्याचा पुरस्कार धैर्यानें केला आहे. चरखा हा लाक्षणिक आहे. चरख्याचा सार्वत्रिक प्रसार झाला तर त्याच्यावर अवलंबून असणारे इतर धंदे हे हातानें करतां येतील. पण त्या चरख्याचा पुरस्कार करणारा पाश्चात्य माणूस यंत्रहीन समाजाची कल्पनाच ग्रहण करूं शकत नाहीं. एक वेळ हिंसा बंद होईल असें त्यांना वाटतें. पण यंत्रें बंद होतील अगर व्हावींत असें त्यांना वाटणार नाहीं. तेव्हां खादी वगैरेच्या गोष्टी त्यांना गप्पाच वाटतात.

पण उद्योगधंद्यांचें केंद्रीकरण झालें म्हणजे पैशाचेंहि केंद्रीकरण होतें आणि पैशाचेंहि केंद्रीकरण झालें म्हणजे राष्ट्राराष्ट्रांत स्पर्धा उत्पन्न होऊन त्याचें पर्यवसान युद्धांत होतें. तेव्हां उद्योगधंदे एका व्यक्तीच्या किंवा संघाच्या हातांत असतां कामा नयेत; म्हणजे जगांतील असंतोष जाईल असें कांहींचें मत आहे. पण गांधीवाद त्याहिपेक्षां दूरवर कां जाऊं शकणार नाहीं ? पांचशें कारखाने एका मालकाचे असण्याऐवजीं पांचशें मालकांचें असणें चांगलें, असें पाश्चात्य लेख-

कांना वाटतें. पण ही अधिक कारखाने असण्याची कल्पना कां जन्म पावते ? त्यांत फायदा जास्त म्हणून. दररोज दहा हजार वार कापड निघणाऱ्या एका गिरणीऐवजीं दहा वार कापड निघणारे माग चालू झाले तर? त्याच्या उलट क्रमानें एका सुताच्या गिरणींत एक कोट वार सूत निघण्याऐवजीं १००० वार सूत निघणारे चरखे फिरूं लागले तर ? मालकांचें केंद्रीकरण थांबेल. तसेंच गिरण्यांचें केंद्रीकरण थांबेल. त्यामुळें एका व्यक्तीच्या हातांत संपत्ति केंद्रीभूत होणार नाहीं, मालक-मजुरांचे लढेहि निर्माण होणार नाहींत आणि पैशाकरतां अगर गिऱ्हाइकी-करतां होणारीं युद्धें थांबतील.

अहिंसा यशस्वी होईल असा ज्यांचा विश्वास आहे, त्यांचा विश्वास हस्तव्यवसायावर कां असूं नये हें कळत नाहीं. किंबहुना अहिंसा जर यशस्वी व्हावयाची असली तर ज्यामुळें हिंसा होते तीं कारणें नष्ट केलीं पाहिजेत, म्हणजेच यंत्रप्रधान आर्थिक रचना बदलली पाहिजे. पर्वतप्राय मालाचे ढीग तयार करणाऱ्या गिरणीपासून उतरत उतरत आपल्याला ग्रामोद्योगाकडे आलें पाहिजे. यंत्रप्रधान आर्थिक रचना कायम आहे तोंपर्यंत हिंसेची पूजा होत रहाणार असें वाटतें, मग कोणी त्याविरुद्ध मतें प्रतिपादन करोत. त्यांत समन्वय होणार नाहीं.

यंत्रें हीं एकदम नष्ट होतील अशी कोणाचि समजूत करून घेत नाहीं. त्याचप्रमाणें पकड यंत्र अन् कर त्याचा नाश अशीहि वृत्ति धरून चालणार नाहीं. जें माणसाचें श्रम कमी करतें तें यंत्र होय. चरखा हेंहि यंत्र आहे, टकळी हेंहि यंत्र आहे आणि रोज कच्चें पक्कें अन्न पचवून त्याचें रक्त बनविणारें शरीर यंत्र नाहीं काय ? तेव्हां यंत्राला विरोध म्हणजे काय हें तरी स्पष्ट झालें पाहिजे. ठराविक संख्येच्या पलीकडे ज्याची संख्या वाढणें शक्य नाहीं, जें हातानें करतां येण्यासारखें नाहीं व ज्यावांचून जगणें कठीण आहे, अशा यंत्रांना विरोध नसावा. उदाहरणार्थ आगगाडीचीं एंजिनें, डबे वगैरे. आगगाड्या किंवा जहाजें यांची संख्या ठराविक मर्यादेपलीकडे जाऊं शकणार नाहीं. त्यांत स्पर्धाहि नाहीं. सूत–खादीप्रमाणें आगगाडीचे भाग हे हातानें करतां

येणारे नाहींत, अशा यंत्रांना नष्ट करण्याचे विचार हे एकदम करतां येणार नाहींत. यंत्रांच्या सहाय्यानेंच जर कांहीं औषधें तयार होत असतील तर अशा यंत्रांनाहि विरोध नसावा, तसाच छपाईलाहि.

गांधीवाद हा यंत्रविरोधी नाहीं किंबहुना खादी ही गिरण्यांना मारून नव्हे तर गिरण्यांच्या मदतीला जाऊन हिंदी माणसांचे देह झाकूं इच्छिते असें हा वाद म्हणतो. पण यंत्राला परिणामकारक विरोध केल्याशिवाय गांधीवादाचें तंत्र पुरें होईल असें वाटत नाहीं. यंत्राच्या मुळेंच आजचीं युद्धें होतात असें म्हटलें तर चमत्कारिक वाटेल. पण तें सत्य नाहीं का ? या युद्धांच्या मुळाशीं कोणते हेतू आहेत ? १९१४ चें महायुद्ध किंवा १९३९ चें महा महायुद्ध जर्मनीनें कां सुरूं केलें ? इंग्लंडनें जगभर आपलें साम्राज्य पसरवलें आणि सप्त सागरांवरून सोन्यांच्या थैल्याच्या थैल्या आपल्या जहाजांत भरून आणल्या. त्या सोन्यावर कारखाने बांधले आणि त्या कारखान्यांतला माल जुलमानें पराभूत राष्ट्रांना विकला. इंग्लंडमध्यें निघणाऱ्या सोन्याच्या धुरानें जर्मनीचे डोळे अधु केले. त्यांना वाटलें इंग्लंड किंवा फ्रान्सच काय पराक्रमी आहेत ! आम्हीं काय हातांत बांगड्या भरल्या आहेत ? या दोन राष्ट्रांना व त्याना सहाय्य करणाऱ्या राष्ट्रांना पराभूत केलें म्हणजे आपल्याहि देशांत संपत्तीचे महानद वाहूं लागतील. या संपत्तीकरतांच हीं युद्धें आहेत. ही संपत्ति गिरण्या आणि कारखाने चालवून तयार करावी लागते, आणि त्यांतलि माल आपल्या अंकित असणाऱ्या देशांना विकावा लागतो. तेव्हां यंत्रामागून लष्कर, युद्धें, साम्राज्य वगैरे येतें आणि मानवी जीविताचा व संस्कृतीचा पुरा नाश होतो. यांत्रिक संस्कृतींत ज्वालामुखीच्या तोंडाशीं बसल्यासारखी स्थिति असते. ज्या वेळीं ज्वालामुखी जागृत नसतो, त्यावेळीं तेथील आसपासची जमीन सुपीक असते व तेथें द्राक्षाचे मळेहि होतात. पण ज्वालामुखी पेटला कीं सर्व भस्म होतें. ज्यांना अल्पकालीन आत्यंतिक सुखें हवीं असतील त्यांनीं अवश्य पाश्चात्य संस्कृतीचे उपासक व्हावें; पण ज्याना चिरकालीन अल्प सुखें हवीं असतील त्यांना यांत्रिक संस्कृतीपासून अलिप्तच राहिले पाहिजे. खादी वापरण्याच्या व निर्माण करण्याच्या मागें ही भूमिका असली पाहिजे.

हिंदुस्थानसारख्या कंगाल व बेकार देशांत गोरगरिबांना चरखा हेंच असें एक साधन आहे कीं, जें त्यांच्या पदरांत दोन पैसे टाकूं शकेल. त्याचप्रमाणें अहिंसामय समाजरचना ही यंत्राच्या पुरस्कारानें होणें कठीण आहे. समाजसत्ता तेथें स्थापन झाली तरी त्यांत बदल होणार नाहीं. याशिवाय आणखी कांहीं कारणें खादी व चरख्याच्या प्रचाराकरतां दिलीं आहेत. त्यांचा एकत्र उल्लेख करूं.

(१) चरखा हा फार मोठा नसतो. तो घरांत तयार होऊं शकतो. (२) कापूसहि दारांत तयार होतो. (३) चरखा फिरवायला बुद्धि किंवा कौशल्य फारसें लागत नाहीं. (४) सूत कातायला कष्ट तर बिलकुल पडत नाहींत. लहान मुलें, म्हातारे व स्त्रियाहि चरखा फिरवूं शकतात. (५) प्रत्येक मनुष्य वस्त्र वापरीत असल्यामुळें कातलेलें सूत घरबसल्या विकलें जातें. (६) पावसावर या धंद्याचें जीवन अवलंबून नाहीं. (७) हातमाग व विणकर यांची वाढ होते. (८) सुतार, लोहार, रंगारी वगैरेंचे धंदे वाढतात. (९) खादीमुळें विषमधनविभागणींत समानता येते. हीं सर्व लक्षणें शेतकऱ्याला लागूं होण्यासारखीं असल्यामुळें त्याचाच उद्धार चरख्यामुळें होणार आहे. 'हें जर खरें तर म. गांधींचा श्रीमंत, सुशिक्षित, लोकांनीं व कॉंग्रेसकार्यकर्त्यांनीं खादी वापरावी असा आग्रह कां?' प्रश्न विचारणारे म्हणतात. त्याचें एकच उत्तर आहे. ज्याला खादीचें महत्त्व पटलें आहे, त्यानें स्वतःच्या उदाहरणानें तें इतरांना पटवून दिलें पाहिजे. आम्ही गरिबांचें कल्याण करूं म्हणणार आणि गरिबाच्या झोपडींत होणाऱ्या कपड्याऐवजीं श्रीमंतांच्या गिरणींत होणारें कापड वापरणार! ती आत्मवंचना व परवंचना होईल. म्हणून गरिबांच्याकरतां झटणाऱ्या कॉंग्रेसकार्यकर्त्यांनीं स्वतः सूत कातलें पाहिजे व खादी वापरली पाहिजे, असें गांधीजी म्हणतात. खादी न वापरणाराला याकरतांच कॉंग्रेसमध्यें अधिकारी होतां येत नाहीं.

म. गांधींनीं आपल्या लिखाणांतून वेळोवेळीं खादीसंबंधींचे कांहीं गैरसमज दूर केले आहेत. ते गैरसमज अर्थात् व्यावहारिक आहेत. पण हे असले गैरसमज नेहमीं करण्यांत येतात, व लोकांची

दिशाभूल केली जाते. "आम्ही काय आपले धंदे सोडून चरखे चालवावे ? वकील, डॉक्टर, शिक्षक, शेतकरी, कामगार यांनीं धंदे सोडावेत काय ?" गांधी असें म्हणत नाहींत. आपले धंदे सोडण्याचा गांधींनीं सल्ला दिलेला नाहीं. चरख्यानें पोट भरा असा त्यांचा प्रचार नाहीं. जर एखाद्या धंद्यांत तुम्हांला पोटभर मिळत असेल व तुमचा वेळ शिल्लक रहात नसेल तर तुम्ही आपला धंदा सोडून द्या असें गांधी म्हणत नाहींत. पण जर तुमच्याजवळ वेळ असेल व तुमचें पोट भरत नसेल तर तुम्ही चरखा अवश्य चालवला पाहिजे. खादी हा मुख्य धंदा नाहीं तो पूरक किंवा जोडधंदा आहे. गिरणीच्या बरोबर चरख्याला स्पर्धा करायची नाहीं. त्यामुळें चरख्याचा धंदा करणारा किंवा सूत काढणारा हा श्रीमान् होणार नाहीं. आपल्या देशांत पुष्कळ ठिकाणीं शेतकरी चार चार सहा सहा महिने रिकामा असतो. त्यांचा सर्व वेळ गुंतेल असें काम त्याला या काळांत नसतें. त्यावेळीं तो निष्कारण वेळ दवडीत असतो. अशा रिकामपणांत सूत काढणें हें वेळ जावयास व पैसा मिळविण्यास चांगलें साधन आहे. त्यामुळें त्याचें दारिद्र्य व बेकारी कमी होईल.

खादींत राजकारणहि आहे. कॉंग्रेससारखी संस्था नुसती भूतदयेनें प्रेरित झालेली संस्था नाहीं. इंग्रजांनीं हिंदुस्थान आपल्या हातांत जो ठेवला आहे तो हुकमी गिऱ्हाइक म्हणून. अनेक वर्षेंपर्यंत ते आपल्या देशांतील कापड येथें खपवून अफाट लूट नेत. त्यांनीं आमचा खादीचा धंदा मारला. हा धंदा अनेक प्रकारें ठार केला. सूत कातणारांवर इतकी सक्ती केली कीं, त्यांनीं आपले आंगठे तोडून टाकले. खादी विकणारांवर इतके कर बसविले कीं, इंग्लंडमधील कापड शेजारच्या गांवांतल्या खादी-पेक्षां स्वस्त पडावें. इंग्लंडमधील स्त्रिया हिंदुस्थानच्या खादीनें वेडावत. कांहीं केल्या त्या खादी सोडिनात. तेव्हां त्यांना गुंडांनीं रस्त्यांत नागवें करावें आणि त्यांच्या अंगावर तेजाब ओतावें. शेवटीं हिंदी खादीवर असह्य कर इंग्लंडांत बसविले. इतकेंहि करून खादीचा खप हटेना म्हणून शेवटीं खादी वापरणें हा गुन्हा केला. हिंदुस्थानांत आज पिस्तुल वापरणें जितका गुन्हा आहे तितकाच जवळ चरखा असणें हा गुन्हा केला गेला. या सर्वांचा शेवट खादीचा धंदा नष्ट होण्यांत झाला. तो आपोआप नष्ट

झाला नाहीं, तो नष्ट करण्यांत आला. म. गांधींच्या चळवळीपूर्वी कोठें कोठें या धंद्याचे अवशेष शिल्लक होते. त्यामुळेंच तो धंदा पुनरुज्जीवित करणें अशक्य वाटलें नाहीं.

तेव्हां इंग्रज व्यापाऱ्यांनीं आमचा धंदा मारून आपला धंदा येथें जोरावला. जर आपल्याला स्वराज्य पाहिजे असेल किंवा आपल्याला पारतंत्र्याची चीड आली असेल तर आपण इंग्लिश कापडावर बहिष्कार घातला पाहिजे असें पुढारी म्हणूं लागले. १९३०–३२ सालापर्यंत हिंदुस्थानांतून इंग्लंडला कापडाकरतां ६० कोट रुपये जात असत. हे ६० कोट रुपये आपण कसें थांबवणार ? कोणी म्हणाले, दुसऱ्या देशाचें कापड घ्या, किंवा आपल्या देशांत गिरण्या काढा. पण आमचेकडे गिरणीवाले स्वदेशी चळवळीनें शेफारले. त्यांना वाटलें आपण ठेवूं ती किंमत आपल्या मालाला येईल. त्यांच्या नफेबाजीमुळें स्वदेशीची चळवळ यशस्वी झाली नाहीं. १९२० सालीं बहिष्काराची चळवळ निघाल्याबरोबर गांधींना कांहीं तरी विधायक स्वरूपाचें कार्य पाहिजे होतें. आर्थिक स्वातंत्र्य हें हातांतलें आहे, तें तर पदरांत पाडून घेऊं या, असा अनेक आद्य पुढाऱ्यांचा हेतु असे. पण गांधींना हें आर्थिक स्वातंत्र्य खादीच्या द्वारें मिळवावयाचें आहे, गिरणीच्या द्वारें नाहीं. त्यामुळें त्यांनीं खादीचा पुरस्कार केला. या व इतर चळवळींमुळें, तसेंच जागातिक परिस्थितीमुळें आपण सध्यां कापडापुरते तरी बरेचसे स्वावलंबी झालों आहों. पूर्वी इंग्लंडचें कापड जें ६० कोटी रुपयांचें खपत असे तें आतां बिलकूल येत नाहीं. याचा अर्थ ज्या स्वदेशी चळवळीचा पुरस्कार करण्यांत आला, ती यशस्वी झाली. त्याचें श्रेय इतर अनेक गोष्टींना असलें तरी स्वदेशीची जनतेंतील भावना व खादीची चळवळ या गोष्टींना प्रामुख्यानें दिलें पाहिजे हें निर्विवाद आहे.

खादीनें आपण आणखी एक पाऊल पुढें टाकूं इच्छित आहों. येथील गिरण्यामुळें आपला पैसा आपल्या देशांत राहिला खरा; पण तो कांहीं श्रीमंत व्यक्तींच्या हातांत गेला. हा पैसा गरिबांच्याकडे आला पाहिजे. गांधीवादाचें राजकारण हेंच आहे. चरख्याच्या पुरस्काराशिवाय हा पैसा शेतकऱ्यांच्या हातांत कसा जाणार ?

यंत्रामुळें जशी एक संस्कृति निर्माण होते, तशी चरख्यामुळेंहि एक संस्कृति निर्माण होते. यंत्र हें धावपळ, जीवतोड, चढाओढ याचें प्रतीक आहे. या धावपळींत प्रथम मालाचा व नंतर द्रव्याचा संचय होतो. या दोन्ही संचयांकरतां सत्यासत्य, न्यायअन्याय बाजूला ठेवावा लागतो. माणूसकी विसरावी लागते. या यंत्रसंस्कृतींत या विसरलेल्या माणुसकीचें विस्मरण व्हावें म्हणून कोणत्या ना कोणत्या कृत्रिम उपायानें मनुष्य आपली करमणूक करतो. कधीं संवयी, कधीं हौशी तर कधीं व्यसनें त्याला जडवून घ्यावीं लागतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ज्या यंत्रांत तो काम करतो त्या यंत्राशीं तो एकरूप होतो. तो एक चालतें बोलतें यंत्र होतो. तशा प्रकारचें यंत्र ज्यांना व्हायचें नसेल व आधिभौतिक जीवनाबरोबर वहावत जावयाचें नसेल त्यांना यांत्रिक संस्कृतीपासून दूर राहिलें पाहिजे.

यंत्राच्या ह्या हिंसक स्वरूपामुळें शास्त्राचीहि हानि होईल असें आधुनिकांना वाटतें. यंत्राप्रमाणें शास्त्र हेंहि ठराविक मर्यादेपलीकडे गेलें म्हणजे नाशक होतें. आज हिटलरनें मनुष्य–संहाराकरतां जो शास्त्राचा उपयोग चालवला आहे तो कदाचित् त्यालाहि अन्य वेळीं मान्य होणार नाहीं. संहार हेंच शास्त्राचें आज मुख्य काम झालें आहे. युद्धाच्या काळांत माणसांचा नाश व शांततेच्या काळांत शक्तीचा नाश करणारें शास्त्र हें जपूनच हाताळलें पाहिजे. यंत्राप्रमाणें शास्त्र हें जीवनाला लपेटून राहिलें आहे. यंत्राचा नाश करणें जितकें शक्य तितकेंच शास्त्राचा. तसें म्हटलें तर रासायनिक किंवा अन्य शास्त्रांचा खादी–निष्पत्तींत वा ग्रामोद्योगांत उपयोग होत नाहीं असें नाहीं. पण तें दुधारी शस्त्र आहे. माणसाचा प्राण शास्त्रानें वांचवितां येतो व त्याच शास्त्रानें प्राण घेतांहि येतो. योग्य प्रमाणांत शास्त्रीय प्रक्रियेनें तयार केलेलें औषध दिलें म्हणजे रोगी जगतो व प्रमाणाबाहेर औषध दिलें कीं रोगी मरतो. जो नियम औषधाच्या बाबतींत तोच इतर बाबतींत लावला पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे शास्त्र किंवा यंत्र हें मनुष्याच्या सुखाचा, संस्कृतीचा वा जीवनाचा नाश करील असें असतां कामा नये. मनुष्य त्यांचा गुलाम होतां कामा नये, त्यांना मनुष्यानें आपल्या ताब्यांत ठेवलें पाहिजे.

ज्यांना खादीचें महत्त्व अन्य दृष्टीनें पटत नसेल त्यांना प्रत्यक्ष खादीनें काय कार्य झालें हेंच पाहिलें पाहिजे. त्याकडे वळण्यापूर्वी दोन अडचणींकडे आपण बघूं. गांधींना पुष्कळांनीं सांगितलें कीं, तुम्ही सुताऐवजीं मागाची मोहीम काढा. गिरणीचें सूत येथील कोष्टयांकडून विणून घेतलें म्हणजे कापडाचा पुष्कळसा प्रश्न सुटेल. अजूनपर्यंत पुष्कळांचें तेंच म्हणणें आहे. गिरणीच्या चढाओढींत कोष्टी उपाशीं मेले, त्यांचे माग बंद पडले, तेव्हां गांधींनीं हातमागाच्या कापडाला मान्यता द्यावी, असा आग्रह धरण्यांत आला होता. तसेंच हिंदुस्थाननें परक्या देशांत कापूस पाठवावयाचा व तेथून कापड तयार होऊन आल्यावर त्यावर बहिष्कार घालावयाचा, या ऐवजीं कापसाच्या निर्यातीलाच बंदी करावी म्हणजे झालें. या निर्यातीच्या प्रश्नाबद्दल गांधींनीं कधींच विरोध दर्शविला नाहीं. उलट संमतीच दिली आहे. आपल्या देशांत होणारा कापूस आपणच वस्त्रांतरित करावा हें त्यांना मान्य आहे.

हातमागाचें तसें नाहीं. गांधींचा हातमागाला विरोध नाहीं. पण गिरणीचें सूत व हातमागाची वीण याला त्यांचा विरोध आहे. यांत त्यांचा हेतु मागाला विरोध करण्याचा नसून गिरणी सुताला प्रोत्साहन देऊं नये असा आहे. मागाचा धंदा आपल्या देशांत कमी चालतो असें नाहीं. बायकांचीं दिखावू पातळें काढणारे महाराष्ट्रांतील कारखानदार जपानी सूत व इटलीचें रेशीम आणून हीं पातळें काढतात. त्यांना स्वदेशी, परदेशी ही भावनाच नाहीं. सर्रास व बहुतेक स्त्रिया परदेशी कापड वापरत असतात.

हातमागाला प्रोत्साहन जर मिळणार असेल तर हातसुतानेंच मिळेल. जितके अधिक कातकरी निर्माण होतील तितके अधिक माग सुरू होतील. गिरणीवाले आपल्या गिरण्यांतून जसें सूत काढूं शकतात, तसे ते विणूंहि शकतात, तेव्हां हातमागाला गिरणीवाल्यांचा विरोध राहील एवढेंच नव्हे तर गांधीसारख्यांनीं ही चळवळ हातीं घेतली तर ते एक सूत महाग तरी करतील किंवा मुळींच मिळूं तरी देणार नाहींत. आणि हें सर्व करून आपण काय करणार तर कांहीं कोष्टयांना काम मिळवून देणार.

पण काँग्रेसला सर्वांना काम द्यायचें आहे. तें हातसूत व हातमाग यांमुळेंच मिळेल; इतर मार्गानें मिळणार नाहीं.

गेल्या वीस वर्षांत खादीनें जी प्रगति केली आहे, तीच खरी तिच्या यशस्वितेची निशाणी आहे. म. गांधींचे इतर कार्यक्रम कोणाला मान्य होवोत वा न होवोत पण खादी ही अशी आहे कीं जिचा स्वीकार करण्यांत राजकारण आड येऊं नये. जे गांधींचा प्रत्येक कार्यक्रम त्याज्य समजतात अशा महाभागांचा प्रश्न वेगळा; पण सरकारी अधिकारी असो, किंवा संस्थानिक असो, खादीविषयीं कोणी नापसंती दाखविलि असें नाहीं. तसा विचार केला तर काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर असतां त्यांनीं खादीकरतां आर्थिक सहाय्य जें काय केलें असेल तेवढेंच; एरवीं जनतेच्या मदतीनेंच खादी दृढमूल झाली आहे. गांधींसारखा पुढारी, काँग्रेससारखी संस्था आणि गरीबांच्या पोटापाण्याचा प्रश्न, यांमुळें खादीचा फैलाव झाला. गिरणीच्या धंद्यांत ५ लाख मजूर पोट भरीत आहेत व ते सुमारें १२५ कोटी रुपयांचें कापड तयार करीत आहेत. त्याशिवाय बरेचसें हातमागावर कापड होतें. खादीच्या धंद्यांत सुमारें एक कोटी रुपयांचेंच कापड तयार होतें. पण या धंद्यांत सुमारें ३ लाख गोरगरीब पोट भरीत आहेत. हा आंकडा काय उपेक्षणीय आहे ? खादीच्या विरोधकांनीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, जें काम कोट्यवधि रुपयांचें भांडवल करूं शकलें नाहीं तें काम एक व्यक्ति करूं शकली. ३ लाख लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटणें ही गोष्ट कमी महत्त्वाची नाहीं.

आतां हें कबूल करावें लागतें कीं, गिरणींतल्या मजुराला जितकी मजुरी मिळते तितकी खादी काम करणाऱ्याला मिळत नाहीं. ३ लाख कार्यकर्ते एक कोटीची खादी निर्माण करणार व विकणार म्हणजे प्रत्येक जणाला महिना फार तर सरासरीनें दोन अडीच रुपये मिळूं शकतात. आपल्याला हा तनखा कमी वाटतो. पण जेथें एक आणाहि दिसत नाहीं व ज्यांच्या जीवनाला आणा दोन आणे म्हणजे रुपयाच्या जागीं असतात ते या मजुरीबद्दल म० गांधींना दुवा देणार नाहींत काय ? त्यांना ही मजुरी घरांत बसून मिळवतां येते. बायका, मुलें, म्हातारे आलटून

पालटून चरख्यावर बसतात व सूत कांततात. तेव्हां गोरगरिबांचा हा धंदा उपेक्षणीय नाहीं.

खादीनें सुबकपणांत व टिकाऊपणांत आतां फारच प्रगति केली आहे. डाक्याच्या मलमलीला मागें टाकील, निदान त्या मलमलीची बरोबरी करील अशी खादी आतां निघूं लागली आहे. चरख्यांतहि वारंवार शोध लागत आहे. पूर्वी खादी म्हणजे गोणपाट अशी जी कल्पना होती ती आतां पार जाऊन गिरणीच्या इतकें तलम कापड हातानें निघूं लागलें आहे. जुन्या कलेचें हें पुनरुज्जीवन पूर्णपणें झालें आहे यांत वादच नाहीं. खादीमध्यें अधिक प्रयोग व अधिक संशोधन करून ती गरीबांना जास्त पैसा कसा देईल याचें प्रयोग सतत चालू आहेत. ही कला व हा व्यवसाय यापुढें टिकणें अगर वाढणें अशक्य नाहीं. श्री. राजगोपालाचार्य यांनीं काँग्रेस-मंत्रिमंडळें अधिकारांत येण्यापूर्वीच खादीच्या धंद्याला सरकारी मदत मिळाली पाहिजे असें म्हटलें होतें. तेव्हां मंत्रिमंडळें कोणाचींहि असोत, या धंद्याला मदत मिळणें जरूर आहे.

खादीप्रमाणें इतर ग्रामोद्योग गांधींनीं सुरू केले. हातसडीचे तांदूळ, घरीं जात्यावर दळलेलें पीठ, मृतचर्माचीं पादत्राणें, हातकागद, गूळ, मध, हातघाण्याचें तेल यांचाहि पुरस्कार करण्यांत येत आहे. त्यांतील हेतु लोकांना शुद्ध स्वच्छ आरोग्यदायक पदार्थ मिळावेत हा आहेच पण खेड्यांतील जनतेला उद्योग मिळावा हाहि त्यांत हेतु आहे.

खादी वापरणें ही एक संस्कृति आहे. कांहींना स्वतःचें अन्न तयार करणें, स्वतःचें कपडे स्वतः धुणें ही एक स्वावलंबनपर संस्कृतीची बाब वाटते, तशी स्वतःचें कापड स्वतः तयार करणें हीहि सांस्कृतिक बाब वाटते. श्री. कुमारप्पा ह्यांचें प्रतिपादन या प्रश्नावर चांगलाच प्रकाश पाडणारें आहे. ते म्हणतात कीं, पाश्चात्य अर्थशास्त्र प्रत्येक गोष्टीचें मूल्य पैशानें मोजतें. पण हिंदुस्थाननें प्रत्येक गोष्ट पैशानेंच मोजतां येतें असें मान्य केलें नाहीं. हिंदुस्थाननें वस्तूंचें मूल्यमापन

सांस्कृतिक दृष्टीनें केलें. पैशापेक्षां माणसाला आम्ही अधिक किंमत दिली. चातुर्वर्ण्यांतील ब्राह्मण ह्याची समाजांत कितीहि मोठी योग्यता असली तरी तो दरिद्रीच होता. ज्याच्याजवळ पैसा तो मोठा किंवा मोठेपणा हा पैशाशिवाय येत नाहीं हा सिद्धांत हिंदुस्थाननें मानला नाहीं.

खादीला अधिक किंमत का, तर ती स्वातंत्र्याची प्रतीक आहे व लक्षावधि लोकांच्या हिताकडे पहाते म्हणून. विलायती कपडा हा आपल्या रक्तावर व आपल्या स्वातंत्र्याच्या होमावर निर्माण होतो, म्हणून तो स्वस्त मानतां येत नाहीं. पाश्चात्यांना गिरणीचें कापड स्वस्त पडतें; पण अशा पैशाचा विनियोग जो युद्धावर केला जातो, त्यामुळें वरवर वाटणारा हा स्वस्तपणा शेवटीं महागच असतो. अहिंसावृत्तीच्या लोकांनीं जास्त पैसा देऊन घेतलेली खादी ही हिंसावृत्तीच्या लोकांनीं कमी पैसा देऊन घेतलेल्या गिरणीच्या कापडापेक्षां स्वस्तच असते. पाश्चात्य देशांत मुख्य उत्पादन युद्धसामुग्रीचें असतें. बाकीच्या वस्तूंची उत्पत्ति ही दुय्यम असते.

शहरांत रहाणारे लोकच यांत्रिक उद्योगधंद्यांना मदत करीत असतात. ती मदत कशी होते याची गांधी–विचार–दोहनांत (१०५ पान) मजेशीर माहिती दिली आहे. आपण शहरांतले लोक खेड्यांतील लोकांकडून आलल्या बाभळीच्या काड्यांऐवजीं दंतमंजनें, पेस्ट व टूथ ब्रश वापरतों. महाराष्ट्रांत बाभळीच्या किंवा लिंबाच्या काड्यांचा प्रसार नाहीं; पण इतरत्र पुष्कळ आहे. आपण लांकडाच्या पलंगाऐवजीं लोखंडाचे पलंग वापरूं लागलों. या लोखंडी पलंगांत ना कौशल्य ना सौंदर्य. साध्या खाटेपेक्षां किती तरी महाग हे पलंग असतात. घरावर कौलाऐवजीं पत्रे घालतात. वाखाच्या किंवा काथ्याच्या दोऱ्यांऐवजीं तारा व खेड्यांतील चटयांऐवजीं चीनी जपानी चटया वापरतात. तसेंच बांबूच्या सूपटोपल्यांऐवजीं लोखंडाचीं सुपें, टोपल्या, डबे, घमेलीं वगैरे वापरण्यांत येतात. गांवांतल्या लोहारांनीं बनविलेलीं कुलपें, कड्या, कोयंडे आपल्याला चालत नाहींत. यंत्रानें बनविलेल्या या जिनसा मोहक वाटतात. दागिन्यांचें असेंच झालें आहे. सोनारानें घडवलेल्या

दागिन्यांऐवजीं यंत्रावर बनाविलेले दागिने बायकांना आवडतात. रींठा, शिककाईऐवजीं सुगंधी साबण, देशी शोभेच्या दारूऐवजीं विलायती दारू, आपण वापरतों. या वस्तु जर आपण आपल्या गांवांत, खेड्यांत तयार झालेल्या वापरूं लागलों तर त्या बिचाऱ्यांना दोन पैसे मिळणार नाहींत का ?

पण हा विवेक करावयास एक दृष्टि लागते. ग्रामीण अर्थशास्त्राकडे आपलें लक्ष वेधलें पाहिजे. यांत्रिक संस्कृतींतील दोष आपल्याला पटले पाहिजेत व ते पटण्यास आपली विचारशक्ति शुद्ध व निर्दोष झाली पाहिजे.

अहिंसा, खादी, ग्रामोद्योग अशा निरनिराळ्या स्वरूपांत जरी गांधीवाद दिसत असला तरी तो मुळांत एकच आहे. आर्थिक किंवा राजकीय क्रांति करून गांधींना नुसता पैशाचा किंवा मनुष्यांच्या हक्कांचा प्रश्न सोडवावयाचा नाहीं. आपण आपलें सारें जीवन एका विशिष्ट तत्त्वज्ञानानें व उच्च ध्येयानें घालवावें असें त्यांना वाटतें. तेव्हां खादी किंवा ग्रामोद्योग यांकडे आपण उपयुक्तता, गरज, दारिद्र्य वगैरे दृष्टीनें जरी पहात असलों तरी त्याच्या मागें एक तत्त्वज्ञान आहे व तें ज्याला समजेल तो या चळवळींना विरोध करणार नाहीं.

जीवनांत पैसा हेंच सर्वस्व नसतें. पाश्चात्यांच्या दृष्टीनें आम्ही पैशाकडे पाहिलें नाहीं. खेड्यांची रचना पाहिली तरी अद्याप तेथें परस्परांची सेवा करण्याची भावना आहे. बलुतेदार हे गांवची सेवा करणारेच आहेत. तेव्हां हिंदुस्थानसारख्या देशांत खेडीं स्वावलंबी होणें अशक्य नाहीं. याच दृष्टीनें म. गांधींनीं आंखलेल्या आर्थिक कार्यक्रमाचा आपण विचार केला पाहिजे.

संस्कृति : : : ११

गांधीवादाची चर्चा करतांना संस्कृतीचा विचार हा अवश्य केला पाहिजे. कारण प्रत्येक तत्त्वज्ञान आपल्याबरोबर किंवा आपल्या मागून एक नवी संस्कृति निर्माण करीत असतें. तत्त्वज्ञानाची शिकवण ही नुसती डोक्याला शिणवणारी कसरत नाहीं. तींत समाजांत क्रांति करण्याची शक्ति असते. आजपर्यंत जे जे मोठे तत्त्वज्ञ होऊन गेले त्यांनीं त्यांनीं जगांत क्रांति केली. तेव्हां गांधीवादाचें मूल्यमापन करावयास आपल्याला संस्कृतीचाहि परामर्ष घेतला पाहिजे.

एखादा विशिष्ट सिद्धांत समाजांत प्रसृत झाला म्हणजे जनतेंत खळबळ उडते. क्रिया व प्रतिक्रियेला सुरवात होते आणि या संघर्षांत जें शाश्वत व चिरंतन असतें तेंच टिकतें. म. गांधींनीं सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. या सत्याग्रहामुळें समाजांत खळबळ उडाली. संपत्तीवाले हे संपत्तीचा उपयोग सर्वस्वीं स्वतःकरतां करूं शकत नाहींत, ते स्वतः-च्या संपत्तीचे विश्वस्त आहेत; मोठ्या अधिकाराची जागा ही लोकांवर सत्ता गाजवण्याकरतां नसून ती सेवेकरतां आहे असें गांधीवादानें शिकवलें;

तसेंच खादी वापरणारा हा आपल्या साधेपणानें नुसत्या कपड्याच्या बाबतींतच नव्हे, पण इतर सर्व बाबतींत बदल घडवीत असतों; हेंहि गांधीवाद सांगतो. वाचतांना ह्या गोष्टी साध्या वाटतात, पण त्याचें आचरण करूं गेल्यास प्रत्येकाच्या जीवनांत विलक्षण बदल होतो असें प्रत्ययास येईल. या क्रांतीचे संस्कार मनावर, बुद्धीवर व शरीरावर झालेले दिसतात. बहुसंख्य जनतेच्या मनावर असे संस्कार झालेले दिसूं लागले म्हणजे आपण त्या तत्त्वज्ञानामुळें विशिष्ट संस्कृति निर्माण झाली असें समजतों.

आजची आपली संस्कृति ही अनेक संस्कृतींचें मिश्रण आहे. ती शुद्ध हिंदु, किंवा इस्लाम किंवा ख्रिस्ती संस्कृति नाहीं. गंगानदी जरी मुळांत गंगा नदी असली तरी वाटेंत तिला इतके प्रवाह मिळतात कीं, प्रयाग पलीकडच्या गंगेचा नांवापलीकडे मूळच्या पाण्याशीं संबंध नसतो; आणि समुद्राला मिळाल्यावर तिचें नामरूपहि अदृश्य होतें. तसेंच हिंदु संस्कृतीचें झालें आहे. आज हिंदु संस्कृति इतकी संमिश्र झाली आहे कीं, तिला हिंदु संस्कृति म्हणणेंहि चूक होईल. त्यामुळेंच एखाद्याला हिंदु संस्कृतींत निर्वैरता, अहिंसा, सत्य वगैरे होते असें सांगितलें तर तें अविश्वसनीय वाटतें. हा त्याचा दोष नाहीं. हा मनावर झालेल्या अनेक संस्कृतींच्या परिणामाचा दोष आहे. प्रत्येक संस्कृतीचीं प्रतिरूपें हीं जीवनांत ज्याप्रमाणें अनुभवावयास सांपडतात, त्याचप्रमाणें वाङ्मय, चित्रकला, शिल्पकला, संगीत वगैरेंतहि पहावयास सांपडतात. जें अंतःकरणावर परिणाम करतें, तेंच चित्रकाराच्या कुंचल्यावाटें किंवा लेखकाच्या लेखणीवाटे बाहेर उमटतें. 'धर्म व कला हीं संस्कृतीच्या रूपाचीं दोन निरनिराळीं साधनें आहेत' असें एक लेखक म्हणतो. तेव्हां संस्कृतीचें संशोधन जर करावयाचें असेल तर धर्म धुंडला पाहिजे आणि चित्रकला, शिल्पकला वगैरे कलांचें संशोधन केलें पाहिजे. आपण धर्म पुष्कळ जाणतों; पण कलेकडे आपलें लक्ष नसतें. कलेचा व जीवनाचा संबंध नाहीं असें कांहीं म्हणतात पण ती चूक आहे. जीवनाचें प्रतिबिंब कलेंत उमटलेलें दिसतें. कला ही जीवनापासून कधींच दूर जाऊं शकत नाहीं. धर्म हा जीवनाशीं जितका संबद्ध असतो तितकीच कलाहि असते. काय

आपण असें म्हणणार कीं, अजंटा किंवा वेरूळची चित्रकला ही जीवनाशीं संबद्ध नसलेल्या भावनांचें प्रतीक आहे ? त्या काळच्या चित्रकारांनीं आपलें सर्वस्व त्या कलेंत ओतलें आहे. आपण आंधळे आहोंत. आपल्याला तीं चित्रें कशीं पहावीं हें कळत नाहीं. हिंदुस्थानांत हजारों लाखों अशीं देवालयें आहेत कीं जीं त्या काळच्या संस्कृतीचे जीवंत इतिहास आहेत असें म्हणतां येईल. लेखक जितक्या तन्मयतेनें व उत्कटतेनें आपले अंतरिक भाव आपल्या लेखनांत उमटवतो, तितकेंच आत्मजाणीवेचे साक्षात्कार आपल्याला या कलांत पहावयास सांपडतात.

धर्म व कला ह्यांत आपल्याला संस्कृति व्यक्तस्वरूपांत व अव्यक्त स्वरूपांतहि पहावयास सांपडते. संस्कृति ही नुसत्या उपदेशानें निर्माण होतें असें म्हणणें सर्वस्वीं बरोबर नाहीं. कारण मनुष्य हा जसा स्वतःच्या मनोव्यापाराचा घटक आहे तसा परिस्थितीचाहि घटक आहे. उत्तर-ध्रुवाच्या थंडींतल्या माणसाला जर गांधी चरख्याचा उपदेश करूं लागले तर गांधी शहाणे ठरतील. चरख्याची संस्कृति तेथें कशी रूढ व्हावी ? याचा अर्थ सभोंवतालची परिस्थिति ही संस्कृति घडविण्यास मदत करीत असते.

आर्यांचे पूर्वज उत्तर–ध्रुवावर रहात असत. तेथें हिमप्रलयांतील बर्फ साठूं लागल्यामुळें ते खालीं उतरले. त्यांची एक शाखा युरपकडे व दुसरी आशियाकडे गेली. या दोन शाखेंतील माणसें जरी एकाच मनाचीं असलीं तरी दोघांच्या वृत्तींत फरक पडत गेला. आशिया खंडांत जे आर्य आले त्यांच्या दृष्टीला अफाट जमीन दिसली. खाण्यापिण्याचे पदार्थ मिळवण्यास ह्या शाखेला कांहींच परिश्रम पडत नसत. पण तशी स्थिति युरपमधल्या शाखेची नव्हती. त्या काळचे ग्रीक लोक हे नदीच्या लहान लहान खोऱ्यांत वस्ती करून राहिले. या खोऱ्यांच्या सभोंवार डोंगराच्या रांगा असत. त्यांच्या दृष्टीला अफाट जमीन दिसेना आणि जीवनाचीं साधनेंहि भारतीयांच्याप्रमाणें विपुल व समृद्ध दृष्टीस पडेनात. स्वाभाविकपणेंच त्यांचें जीवन संकुचित झालें. अल्पशा जमिनीच्या तुकड्यावर त्यांना उपजीविका करावी लागे, त्यामुळें शारिरीक कष्ट जास्त पडत आणि बुद्धिमत्तेलाहि जास्त ताण द्यावा लागे. वाटेल तेथें व वाटेल

तसें पेरावें आणि अमुप पीक काढावें अशी या आर्यांची स्थिति नव्हती. त्यांची राज्येंहि त्यामुळें छोटीं छोटीं बनलीं. राज्याचा विस्तार ते कसा करणार ? त्यांच्या छोट्या राज्यांत अधिक एकोपा व अधिक बंधुभाव दिसून येऊं लागला. त्यांचा संसार आटोपशीर असला तरी त्यामुळें त्यांची संघटित शक्ति वाढत गेली.

भारताकडे वळलेल्या आर्यांचें असें झालें नाहीं. येथील अफाट मुलखांत ते आर्य वाटेल तसे पसरले. सांपडेल ती भूमि त्यांनीं व्यापली. त्यांच्यामध्यें बंधुभाव नव्हता असें कसें म्हणतां येईल ? पण त्या बंधुत्वाला धार नव्हती. सगळीकडेच विस्कळीतपणा दिसत असे. परचक्र आलें तर युरोपीय आर्य जसे एकजीवानें प्रतिकार करीत तसा प्रतिकार रानोमाळ पसरलेल्या व विस्कळीत असलेल्या या भारतीय आर्यांना करणें अशक्य होतें. हिंदुस्थानची भूमि, सुजला, सुफला व सस्यशामला होती. हा कदाचित् वर असेल पण ता शाप असूं शकणार नाहीं असें नाहीं. सृष्टि हिंदुस्थानवर सदा प्रसन्न मुद्रेनें पहात असे. तीन ऋतू नियमितपणें आपली कामगिरी बजावीत. त्यांचें स्वरूपहि अत्यंत रौद्र नाहीं किंवा सौम्य नाहीं, इतपत असते.* थोडे कष्ट करावेत आणि पुष्कळ पीक घ्यावें, इतकी सृष्टीची समृद्धता येथें होती.

अशा या सृष्टीचा भारतीयांच्या जीवनावर कांहींच परिणाम झाला नसेल काय ? भारतीयांची संस्कृति जी घडत गेली, तिला या देशाची नैसर्गिक परिस्थिति कारण झाली यांत वाद नाहीं. ज्यांनीं आपलें जीवन घनदाट अरण्यांत घालविलें, अशा द्रष्ट्यांच्या बुद्धीला कसले विचार सुचावेत ? ज्यांनीं वृक्षांच्या सावलींत आणि झुडपांच्या गर्दींत पिढ्यान्‌पिढ्या काढल्या त्यांनीं कोणतें तत्त्वज्ञान निर्माण करावें ? भारतीयांनीं एका विशिष्ट विचारसरणीचा पुरस्कार केला, त्यांची एक विशिष्ट संस्कृति बनली आणि त्यांचें तत्त्वज्ञान हें व्यक्तिनिष्ठ होत गेलें. या संस्कृतीला जर अरण्यांतील किंवा कृषि–संस्कृति असें नांव दिलें तर तें चुकेल का ?

---

* Influence of Islam on Indian Culture. Pages 229–33.

एखादा कवि निसर्गाच्या सन्निध सतत बसूं लागला तर त्याच्या काव्यांत कसले विचार येतील ? कोठें धडपड नाहीं, गडबड नाहीं, सर्वत्र प्रसन्नता व शांति नांदत आहे अशा वेळीं अंतःकरणांत कोणत्या विचारांचे पडसाद उठतील ? ज्यांचें जीवन एखाद्या विस्तीर्ण नदीप्रमाणें संथ व सतत चालू असतें आणि ज्यांचें जीवन एखाद्या ओहोळाप्रमाणें खडबडीत खडकावरून खळखळ चाललें असतें त्यांच्या विचारांत अवश्य वैषम्य दिसेल. भारतीय आर्यांचें जीवन हें संथपणें आणि युरोपीय आर्यांचें जीवन हें ठेंचाळत चाललें होतें. एकाच्या जीवनांतील प्रसन्नतेचें पर्यवसान अध्यात्मांत आणि दुसऱ्याच्या जीवनांतील खळबळाटाचें पर्यवसान आधिभौतिक वादांत झालें. भारतीय आर्यांना सृष्टीनें कशाची दीक्षा दिली ? सृष्टि म्हणूं लागली ' मी जी इतकी समृद्ध दिसते, त्या माझ्या मुळाशीं कोणतें तत्त्व आहे याचा तूं विचार केला आहेस का ? ' रोजच्या रोज हाच प्रश्न भारतीय आर्यांच्या पुढें असे. पाश्चात्य आर्य सृष्टीच्या सान्निध असे, पण ती त्याला सुलभतेनें कांहीं देत नसे. सृष्टि त्याला विचारी, ' तुला पाहिजे तितकीं साधनें सुलभतेनें उपलब्ध होत नाहींत, याचा तूं कधीं विचार करतोस का ' रोजच्या रोज हा प्रश्न त्याला पडे आणि तो जमिनींतून आणखी कसें काढतां येईल याचा विचार करी. सहकार्याचें महत्त्व त्या आर्यांला कळूं लागलें. एकाच्या कष्टापेक्षां सामुदायिक कष्टानें अधिक कार्य होऊं शकतें असा धडा त्या आर्यांनीं घेतला. त्यामुळें पाश्चात्य समाज हा व्यक्तिनिष्ठ न होतां समष्टिनिष्ठ झाला.

भारतीय आर्यांच्या जीवनांत आणखी एक विशेष दिसतो. जशी भूमि अफाट तसा कालहि अमर्याद आहे, असें ते मानीत गेले. अमुक काम अमुक वेळांत झालें नाहीं म्हणून त्यांना विषाद वाटत नसे किंवा त्याबद्दल गर्दीहि होत नसे. या कालाला मृत्यूचीहि मर्यादा त्यांनीं घातली नाहीं. आत्मा अमर आहे, तेव्हां या जन्मांत एखादी सिद्धि झाली नाहीं तर पुढें होईल, असें ते म्हणत. काल हा अनंत आहे या समजुतीनें त्यांनीं कशाबद्दलच गर्दी केली नाहीं. ब्रह्मदेवाचा दिवस केवढा मोठा आहे ! परागतीला जावयास किती जन्म घ्यावे लागतात ?

या कालाच्या कल्पनेमुळें जी प्रतिक्रिया झाली ती मात्र या संस्कृतीला घातक झाली.

सृष्टीच्या सान्निध्यांत सतत रहाणाऱ्या आपल्या पूर्वजांच्या मनावर आणखी कांहीं विकार झाले असले पाहिजेत. कदाचित् वारंवार तेच ते देखावे पहात गेल्यानें त्याचें मन उदासवाणें, अनुत्साही असें झालें असेल आणि त्यांतून संसार त्यागाची वृत्ति जन्मली असेल. गूढ अंतः संवेदनांचा जन्म याच परिस्थितीमुळें झाला. सृष्टीच्या गूढाचा अंतःकरणांतील सूक्ष्म नादानें छडा लावण्याकरतां सारा बुद्धिवान वर्ग झटूं लागला व तेंच आमच्या संस्कृतीचें मूळ आहे यांत वाद नाहीं. सृष्टीच्या मुळाशीं असलेलें जें अविनाशी सत् तत्त्व तें बुद्धीनें समजून घेणें हाच या संस्कृतीचा विशेष आहे. पाश्चात्य संस्कृति व पौर्वात्य संस्कृति यांच्यांत फरक काय आहे ह्या प्रश्नाचें उत्तर आपण काय देऊं ? पौर्वात्य संस्कृति ही ज्ञानेच्छा प्रधान आहे तर पाश्चात्य संस्कृति कर्मेच्छा प्रधान आहे.

रवींद्रनाथ टागोर हे युरोपिअन संस्कृतीचें रहस्य काय आहे याचा विचार करीत होते. तेथील लोक परस्परांशीं इतक्या क्रूरपणानें कां लढतात, राष्ट्रांराष्ट्रांमध्यें इतकी भीषण युद्धें कां होतात, त्यांच्या वैयक्तिक व कौटुंबिक जीवनांत इतका अनियंत्रितपणा कां दिसतो, उलट सामाजिक व राजकीय संस्थांत इतकी शिस्त व सुव्यवस्था कां दिसते, उद्योगधंद्यांत व शास्त्रांत यशस्वी झालेल्या त्यांच्या विश्लेषणात्मक बुद्धिमत्तेचें वैशिष्ट्य काय असा विचार करणाऱ्या टागोरांना उत्तर सांपडलें. युरोपिअनांच्या शहरांभोंवतीं जी तटबंदी असते आणि जे पाण्याचे खंदक असतात, त्यांतच त्यांची संस्कृति दिसते असें ते म्हणतात. या तटामुळें व खंदकांमुळें ते शत्रूला तुच्छ लेखीत, आपल्या गांवाच्या रक्षणाकरतां लढत, त्याचें रक्षण करीत व त्यांत सुव्यवस्था स्थापीत.

संस्कृतीच्या घडणीला आणखी एक विचार कारणीभूत होतो. आपल्या मनावर परिणाम व्हावयास अंतःसंवेदना आणि निसर्ग ह्यांप्रमाणेंच स्वपक्षियांचे किंवा विपक्षियांचे विचार हेहि कारणीभूत होतात.

भारतीय आर्य जेव्हां येथें आले तेव्हां मूळचे रहिवाशी येथेंच रहात होते. त्यांच्या बरोबर कुठें कुठें युद्धें करावीं लागलीं आणि त्यांना जिकावें लागले. या युद्धांतील विजयांप्रमाणें त्यांना संस्कृति स्थापण्याकरतांहि लढावें लागले. अनार्य झाले म्हणून त्यांना कांहीं विचार नसत, किंवा त्यांना संस्कृति नव्हती असें नाहीं. अनार्यांची संस्कृति ही बाहेरून आलेल्या आर्यांच्या संस्कृतीप्रमाणें सुधारलेली नसेल, ती कमी प्रतीची, राकट, उग्र, ओबडधोबड असेल.पण युद्धामध्यें लढणाऱ्याला ज्या प्रमाणें दोन घाव द्यावे लागतात, त्याप्रमाणें घाव खावेहि लागतात. आमच्या आर्यांच्या विचारांवर या अनार्यांच्या आचारविचारांचा परिणाम झाला नसेल, असें कसें म्हणावें ? तेव्हां अगदीं मूळची म्हणून आपण जी संस्कृति समजतों तीहि शुद्ध भारतीय संस्कृति आहे असें समजण्याचें कारण नाहीं. वेदांमध्यें आर्य व अनार्यांच्या लढ्यांचा इतिहास आपणांस वाचावयास सांपडतों. या अनार्यांवर मिळविलेल्या विजयांला ज्या देवतांचें सहाय्य कारणीभूत झाले, त्यांची प्रार्थना आपल्याला प्रारंभींच्या मंडलांतून वाचावयास मिळते. पुढील मंडलांतून सुस्थित झालेल्या व जीवनाचा विचार करूं लागलेल्या आर्यांचा इतिहास आढळतो. अशा प्रकारें भारतिय आर्यांच्या विचारांवर झालेल्या परिणामांचें थोडक्यांत स्वरूप आहे.

* * *

वैदिक संस्कृतीचा शेवट ख्रि. पू. सहाव्या व सातव्या शतकांत झाला. वेद व उपनिषदें संपलीं आणि समाजांत क्षात्रतेजाचें वर्चस्व झालें. रणांगणावर पराक्रम गाजवावे आणि त्या करतां शस्त्रविद्या शिकावी असा काळ आला.या शतकांत जगांतील निरनिराळ्या देशांत दळणवळण वाढलें. एकीकडे ग्रीस, रोम, मिसर व दुसरीकडे चीन वगैरे देशांकडून नव्या कल्पना भारतवर्षांत येऊं लागल्या. आमच्या देशांतूनहि तिकडे कल्पनांची निर्यात होऊं लागली. शास्त्र, कला, तत्त्वज्ञान, काव्य, व्याकरण, ज्योतिष, गणित, वैद्यक, छंदःशास्त्र, व्युत्पत्तिशास्त्र, युद्धकला, राज्यशासन, गायन, शिल्पकला वगैरेंचा उदय याच सुमारास झाल्यामुळें संस्कृतीच्या दृष्टीनें

यानंतरचा काल अत्यंत महत्त्वाचा आहे. स्मृति, पुराणें, विष्णुभक्ति, शिवभक्ति वगैरे याच कालांत जन्मास आल्या.

खि. पू. ६ व्या शतकापासून तों खि. नं. ८ व्या शतकापर्यंत हा काळ टिकला. बुद्ध धर्म बाहेरील जगांत पसरत गेला आणि येथेंहि त्यानें बरेंच क्षेत्र व्यापलें. जैन धर्म बाहेर पसरला नाहीं; आंतमध्येंच त्याचा प्रसार झाला. या कालखंडांत असलेल्या निरनिराळ्या तत्त्वज्ञानांचा विचार केला तरी त्यांत एक सामान्य गोष्ट दिसून येते. कर्मांमुळें मनुष्य बांधला जातो व कर्मांच्या नाशामुळें तो मुक्त होतो, हा सिद्धांत स्थापन झाला. तेव्हां मनुष्यानें कर्मबंध तोडून टाकणें हेंच त्याचें जीवित ध्येय आहे असें सर्व दर्शनें सांगूं लागलीं. भक्तिमार्गाचा विकास याच कालांत झाला. वासुदेवभक्ति हीच सर्वस्व समजली जाऊं लागली; नारायणीय, पांच रात्र किंवा सात्वत धर्म याच काळांत प्रसृत झाले.

या १४०० वर्षांच्या काळांत तीन प्रकारचे धर्म व मतें विद्यमान होतीं. एक वेदांमध्यें सांगितलेला धर्म आचरणारा कर्ममार्गीयांचा वर्ग. या धर्मांचे लोक यज्ञयाग करीत. या यज्ञयागानें व सत्कृत्यानें मोक्ष मिळतो असें ते समजत. वैदिक धर्म मानणारा जो खालचा वर्ग तो शक्तींचा व रुद्राचा उपासक असे. या देवतांना संतुष्ट करणें हेंच त्याचें जीवितध्येय. या आराधनेला विकृत स्वरूपें पुढें येत गेलीं व तीं धर्माच्या नांवाखालीं! पण वरचा वर्ग जर यज्ञदेवतेला संतुष्ट करण्याकरतां अजाला बळी देई, तर खालच्या वर्गानें देवीला प्रसन्न करण्याकरतां कोंबडी, बकरी किंवा रेडा कां मारूं नये? आज जो आचार धर्म आपल्याला दिसतो तो वैदिक धर्माचा अवशेष आहे. वरच्या वर्गाकडून यज्ञ फारसे होत नाहींत व यज्ञीय हिंसाहि होत नाहीं. पण वेदप्रणीत आचार, गृहकृत्यें वगैरे अद्यापहि वरच्या वर्गांत आपणांला पहावयास सांपडतात. तसेंच खालच्या वर्गांत जारण व मारण, मंत्र-तंत्र, आणि शक्तींची उपासना हींहि पूर्ववत् पहावयास सांपडतात. विचारांच्या बाबतींत आपण नंतर फार बदललों, पण आचारांत नावीन्य आलें नाहीं. ईश्वरी नियमानुसार आपल्याला मोक्ष मिळतो अशी या पंथीयांची कल्पना. असा हा कर्ममार्गीयांचा वर्ग होता.

ज्ञानमार्गाचा अवलंब करणारा दुसरा वर्ग या कालांत होता. तो संन्याश्यांचा, यतींचा, विद्वान लोकांचा वर्ग होता. मोक्ष मिळवण्याकरतां यज्ञयाग करणें, प्रापंचिक कृत्येंच काय, पण प्रपंच करणें ज्ञानमार्गीयांना मान्य नसे. मोक्षाकरतां आत्मचिंतन, ध्यान, धारणा, समाधि यांचा अवलंब करावा असें ते म्हणत. हे संन्यासधर्मीय फार अल्प असत. पण त्यांच्या सिद्धांतांचा परिणाम बुद्धिमान् वर्गावर विलक्षण होई व त्यांच्याकडून खालपर्यंत तीं तत्त्वें पसरत.

तिसरा भक्तिमार्ग. त्या कालखंडांत भक्तिमार्ग अगदींच कमी प्रसृत झाला. लोकांना त्याबद्दल मोठी आस्था अगर आतुरता नव्हती. भक्तिमार्गाचा वृक्ष जो बहरला व ज्यानें हिंदुस्थान हादरून सोडलें, तें या नंतरच्या कालांत.

अशा प्रकारें वेदकालापासून तों इ. स. ८०० पर्यंत हिंदु संस्कृतीच्या स्थित्यंतराचा इतिहास आहे. कर्ममार्ग, ज्ञानमार्ग व उपासनामार्ग हे तीन मार्ग जरी निरनिराळे दिसत असले, तरी त्या मार्गांचें प्राप्तव्य एकच होतें. मोक्षप्राप्ति हा भारतीय संस्कृतीचा ध्येयबिंदु होता. कर्ममार्गाचा अवलंब करणाऱ्यांना प्रसंगोपात समाजांतील उलथापालथींना तोंड द्यावें लागलें तरी त्यांची परमार्थावरील पक्कड सुटली नव्हती.

इ. स. च्या ८ व्या शतकांत इस्लाम धर्माचा प्रसार हिंदुस्थानांत होऊं लागला. इस्लाम धर्म हा एकेश्वरी धर्म, व अल्ला हा एकच देव आहे असें ते मानणारे. हिंदु किंवा वैदिक धर्म हा ज्याप्रमाणें निसर्गाच्या सान्निध्यांत आणि शीतल वातावरणांत जन्मला, तशी इस्लाम धर्माची स्थिति नव्हती. तो रखरखीत प्रदेशांत जन्माला आला. त्या रखरखीत भूभागांत पाऊसहि कमीच पडे. ज्या भागांत इस्लाम धर्म पसरला तो भाग कमी पावसाचा होता. निसर्गाचा परिणाम जसा पौर्वात्य व पाश्चात्य संस्कृतींवर झाला, तसा परिणाम इस्लाम धर्मावर व संस्कृतीवरहि झाला. इस्लाम धर्मक्षेत्रांत जमीनी विस्तीर्ण, ऋतु नियमित, आकाश तारागणांनीं चमचमणारें पण पीकपाणी कमी. त्यांना जीवनाकरतां अत्यंत धडपड करावी लागे; बागा आणि शेतीकरतां अत्यंत काबाडकष्ट करावे लागत.

निसर्गाच्या या विरोधामुळें तेथील मनुष्य टेकीस येई व म्हणे ' परमेश्वरा, तूं समर्थ, तूंच सर्व शक्तीवान् आहेस. आम्हीं माणसें किती क्षुद्र आहोंत. ' निसर्गाला आणि देवालाहि तेथलि मनुष्य शरण गेला. इस्लाम म्हणजेच शरण जाणें. इस्लाम धर्मीयांचा मूर्तींवर विश्वास नसला, शुद्ध तार्किक विचारच त्यांना पसंत पडत असले, विलक्षण उत्साह व तितकाच आळस वगैरे गुण त्यांच्यांत आले असले तर त्याला निसर्गच कारणभूत झाला आहे.

इस्लाम धर्म हा एकेश्वरी धर्म आहे. तो एकच जन्म व अर्थात एकच मृत्यु मानतो. त्यांच्यांत परधर्माबद्दल सहिष्णुता नाहीं. ते धर्मांत अगर समाजांत उच्चनीचता मानीत नाहींत. हिंदु धर्मांत चातुवर्ण्य हे परस्परांचे पूरक व पोषक असले तरी त्यांत विषमता आहे. तशी विषमता इस्लाम धर्मांत नाहीं हें त्यांचें अभिनंदनीय वैशिष्टय आहे.

या इस्लाम संस्कृतीचा हिंदु संस्कृतीवर कितपत परिणाम झाला ? हा परिणाम झाला असल्यास त्यामुळें हिंदु संस्कृतींत काय बदल झाले हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याच प्रमाणें हिंदु संस्कृतीचा इस्लाम संस्कृतीवर काय परिणाम झाला हाहि महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नांचीं उत्तरें केवळ अनुमानानें देतां येतील.

इस्लाम धर्म ज्या नैसर्गिक भूमींत निर्माण झाला ती भूमि किती खडतर होती हें आपण पाहिलें. त्यामुळें इस्लाम धर्माचे अनुयायी व उपदेशक बाहेरील जगांत पसरले. हिंदुस्थानांत तर अरबांचा प्रवेश आठव्या शतकांत झाला. पहिला प्रवेश व्यापाराकरतां झाला. नंतर धर्म आला.

हा धर्म अत्यंत साधा व सोपा आहे. देव एक आहे. या देवाची दररोज प्रार्थना केली पाहिजे. उपास, दानधर्म, मक्केची यात्रा आणि महंमद पैगंबरावर ईश्वराचा प्रेषित म्हणून श्रद्धा एवढयाच इस्लामच्या धार्मिक आज्ञा आहेत. ईश्वरावर पूर्णपणें विश्वास ठेवणें व त्याला अनन्य-भावानें शरण जाणें हेंच त्याच्या कृपेचें साधन आहे असें ते मानतात.

महंमद पैगंबराच्या मृत्यूनंतर इस्लाम धर्मांत अनेक पंथ निघाले व त्या प्रत्येक पंथाचें तत्त्वज्ञानहि निर्माण झालें. ह्या पंथांपैकीं कांहीं प्रमुख

पंथांचा विचार केल्याखेरीज इस्लाम धर्म व संस्कृतीची कल्पना पूर्णत्वानें येणार नाहीं. त्यांतील कांहीं पंथांचें तत्त्वज्ञान हिंदु तत्त्वज्ञानाशीं बरेंच जुळतें आहे. त्यावरून व अवांतर पुराव्यावरून हिंदु तत्त्वज्ञान मुसलमानांच्या प्रांतांत प्रविष्ट झालें होतें याबद्दल शंका नाहीं.

इस्लाम धर्मांत पहिले चार पंथ जे निघाले, त्याला कारण राजकारण झालें. त्यांतील शिआ पंथ हा विचारणीय आहे. तो इराणांत पसरला. या शिआंत घुलात नांवाचा उपपंथ आहे. त्यांतलि सिद्धांत हे हिंदुधर्मांतील सिद्धांतांशीं तंतोतंत जुळतात. ‘ मनुष्याला देवत्वाप्रत नेतां येते आणि देवाला माणसाच्या दर्जावर आणतां येते, देव माणसाच्या शरीरांत प्रवेश करतो. ’ वगैरे त्यांचे सिद्धांत होते.

मुताझला नांवाचा बुद्धिवादी यतींचा दुसरा एक पंथ निघाला. अंतःप्रवृत्ति प्रमाण मानणारा हा पंथ होता. अक्कल किंवा बुद्धि ही धार्मिक ज्ञानाचा मुख्य उगम ते मानीत. देवाला ते निर्गुण, निराकार समजत. यामुळें त्यांचे व इतर मुसलमानांचे जमेना. ईश्वर हा ज्ञान, शक्ति वगैरे गुणांनीं युक्त आहे असें जुने लोक समजत. शंकराचार्यांच्या अद्वैत वेदांताशीं या पंथाचें साम्य आहे. न्याय व एकत्व हे ते मान्य करीत. देवालासुद्धां न्याय ओलांडतां येत नाहीं, कारण न्याय जगांत इतका ओतप्रोत भरला आहे असें ते म्हणत. देवाची शक्तीहि न्यायानें मर्यादित आहे असें त्यांचें मत. कुराण हा देवाचा कायमचा, अचुक व अनुत्पन्न शब्द आहे असें ते समजत नसत. त्यांचा देव निर्गुण, निराकार असा आहे. या बुद्धिवाद्यांना विरोध करणारे नवे नवे पंथ निघाले. पण त्यांचा विचार करण्याची जरूरी नाहीं. अल् गझाली हा अत्यंत मोठा धर्मज्ञ होऊन गेला. त्याला मुसलमान लोक अधिकारी म्हणतात. त्याच्या एवढा बुद्धिवान तत्त्वज्ञ अरबांत झाला नाहीं असें पाश्चात्य पंडीत म्हणतात. तो १०५७ मध्यें जन्मला व १११२ मध्यें मरण पावला. त्यानें धर्मग्रंथांचा, तर्कशास्त्राचा, तत्त्वज्ञानाचा, भौतिकशास्त्रांचा अभ्यास केला होता. त्याला विद्वान् म्हणून मान देत. पण त्याला जुन्या विचारांत कोठेंच शांति मिळेना. म्हणून त्याचा सर्व धर्मांवरील विश्वास उडाला.

पण या मनःस्थितींतून त्याची उन्नति झाली. तो समाधि लावूं लागला. या समाधीमुळें त्याला अंतःसंवेदना झाली व शांति मिळाली. त्यानें तत्त्वज्ञानाविरुद्ध ग्रंथ लिहिला. बुद्धीनें आत्मज्ञान होत नाहीं, समाधीनें होतें असें त्याचें मत. तो म्हणे साध्या ज्ञानानें देवाचें सापेक्ष स्वरूप कळेल. पण देव अगाध आहे. ह्या अगाधत्वाचें ज्ञान कोणाच्या तरी कृपेनें होऊं शकेल.

अशाप्रकारें मुताझला पंथाचा गझालीनें पूर्ण इन्कार केला. बुद्धीनें कांहीं होत नाहीं, असें या पंथानें सांगून टाकलें व हिंदूंच्या समाधि, योग वगैरेंवर भर दिला.

मुताझलाच्या बौद्धिक वादांतून अनेक शाखा पसरल्या. नास्तिक, निरीश्वर-वादी, शुद्ध तत्त्ववादी, गूढ संवेदनावादी, वगैरे प्रकार त्यानंतर दिसूं लागले. उमरखय्याम हा वरील वर्गांत अंतर्भूत होतो.

यानंतर नमूद करण्यासारखा महत्त्वाचा पंथ म्हणजे सुफींचा. १२ व्या शतकापासून सुफी पंथाचा पगडा मुसलमानांवर जास्त जास्त बसत गेला. हिंदु संस्कृति ही ज्याप्रमाणें अनेक संस्कृतींचें मिश्रण झाली आहे, त्या प्रमाणें सुफी पंथाचे आहे. कुराण व महंमदाचें जीवन यांतून हा पंथ निघाला. ख्रिश्चन धर्म, हिंदु धर्म, बुद्ध धर्म झोराष्ट्र धर्म वगैरेंनीं ह्या पंथाला कल्पना पुरवल्या. ख्रिश्चन धर्मानें जप, ध्यान, प्रार्थना, वैयक्तिक हिताच्या बाबींपासून अलिप्तता, ईश्वरावर सर्व भार; भौतिक वस्तूंचा त्याग, दुःख व व्याधि यांबद्दल बेफिकीरी, तसेच निंदास्तुतीबद्दल बेपर्वाई हे विचार व आचार पुरवले. जगाबद्दलचा तिरस्कार, आणि परमार्थाबद्दलची आवड हींहि ख्रिश्चन तत्त्ववेत्त्यांपासून त्यांनीं ग्रहण केलीं. हिंदूंचें व मुसलमानांचें व्यापारानिमित्त फार दळणवळण असे. अफगाणिस्थान, बलुचिस्थान, खोरासन हे देश इस्लाम होण्यापूर्वी हिंदु अगर बुद्ध धर्मीय होते. अरबांनीं तर फार पूर्वी सुश्रुत, चरक, हितोपदेश, चाणक्याचे ग्रंथ, युद्धकला, ज्योतिष वगैरेंचीं भाषांतरें केलीं होतीं. अल-किंदी यानें भारतीय धर्मासंबंधीं एक पुस्तक लिहिलें होतें. इतरांनींहि धर्म व तत्त्वज्ञानाबद्दल असेच ग्रंथ लिहिले होते. अल्-बिरुणी हा गीतेवर लिहिणारा त्यांतलाच लेखक होता.

हिंदुस्थानांतील यति हे जोडीनें प्रवास करीत व एके ठिकाणीं दोन रात्रींवर रहात नसत. या साधूंपासून मुसलमान चार गोष्टी शिकले. स्वच्छता, शुद्धि, सत्य व दारिद्र्य. जपाकरतां माळेचा उपयोग याच साधूंनीं त्यांना शिकविला. बुद्धापासून निर्वाण, व हिंदूंपासून योगविद्या सुफी पंथीयांनीं घेतली.

सुफीपंथ हा नवव्या शतकापर्यंत फारसा ज्ञात नव्हता. तो वाट चांचपडत होता. पण नवव्या शतकानंतर त्यांत अध्यात्म आलें व मठवासाची कल्पनाहि रुजली. या पंथांतील मुख्य कल्पना ' ईश्वराला सर्वभावानें शरण जाणें ' ही आहे. परलोकावर त्यांचा जास्त विश्वास. त्याकरतां पुण्यसंचयाकडे प्रवृत्ति. पापाबद्दल त्यांच्या कल्पना फारच जाज्वल्य असत. ईश्वरी कोपाला ते अत्यंत भीत. धर्माच्या बाह्य विधींना ते बिलकुल महत्त्व देत नसत. त्यांच्यांत भावनेचा आवेगहि भयंकर असे. ' हे परमेश्वरा, माझें अंतःकरण मी तुझ्याशीं बोलण्याकरतां राखून ठेवलें आहे, आणि माझें शरीर जें माझ्याजवळ येऊं इच्छितात त्यांच्याकरतां आहे. ' असें एकजण म्हणतो.

पण पुढें पुढें सुफी पंथांतील भावनांचा उद्वेग शांत झाला. नव्या नव्या कल्पनांच्या बहरामुळें सुफीपंथ चांगलाच फुलला. त्यांत कितीतरी नवे नवे तत्त्वज्ञ, धर्मज्ञ निघाले ! त्यांतील एकाच पंथाचा आपण विचार करूं. हुसेन बिन मनसुर अल् हिलाज यानें आपल्या विचारानें इस्लामधर्मांत फारच मोठी खळबळ उडवली. हा प्रथम सुफी होता. पण त्यानें सुफी वस्त्रें फेंकून दिलीं. तो स्वतःला देवाचा प्रेषित समजूं लागला व तसा उपदेश करूं लागला. तो हिंदुस्थानांत आला होता. त्याची बंडखोरी असह्य होऊन त्याला पकडण्यांत आलें व त्याचा छळ करून त्याला ठार करण्यांत आले. स्वतःचे डोळे काढून त्यानें दिले व आपल्या अंगाची कातडी त्यानें स्वतःच सोलली. ह्या हुसेन मन्सुरनें असें काय भयंकर शिकविलें ? तो म्हणतो सृष्टीच्या आरंभीं देव आपल्या स्वरूपांत लीन झालेला होता. तो स्वतःशीं बोलत असे, आपल्याच वैभवाचें वर्णन करीत असे. प्रेम ही त्याच्या आत्मगौरवाची अत्यंत साधी भाषा असे. देव जेव्हां पूर्ण अलिप्त होता, तेव्हां तो प्रेमानें दीप्तिमान होता. या

दीप्तीपासून त्याचे अनेक गुण व अनेक नांवें प्रसृत झालीं आहेत. निरतिशय आनंद अनुभवण्याकरतां देवानें आपल्या पूर्वीच्या नामरूपात्मक स्वरूपांतून (अझल) स्वतःला निर्माण केलें. हाच ॲडम होय. लाहुतचा नासुत म्हणजे निर्गुण, निराकार, परमेश्वराचा सगुण व साकार परमेश्वर झाला. मन्सुरनें देवाचा व माणसाचा संबंध असा लावला. मनुष्याच्या आत्म्यांत ईश्वरचा आत्मा प्रविष्ट होणें म्हणजेच 'पुरुषांकडून बुद्धि' प्रकाशित होणें होय. 'मी ज्यावर प्रेम करतों तदाकार मी होतों. आणि ज्याच्यावर मी प्रेम करतों तो माझा होतों.' मन्सुर हा हिंदुतत्त्वज्ञांप्रमाणें 'अनल् हक्' 'अहं ब्रह्मास्मि' असें म्हणत असे, पण सगुण व निर्गुण परमेश्वरांत तो भेद मानीच.

गूढवादाचे आणखी दोन पुरस्कर्ते होते. एक म्हणे कीं, परब्रह्म हें प्रकाशमय (नुर) आहे; दुसरा म्हणे कीं तें ज्ञानमय आहे. पहिल्या वादाचा निर्माता शेक साहेब सुरावर्दी हा होता. त्याच्या निर्भीड विचारांमुळें त्याला अलेपोच्या काझींनीं धिक्कारला व सलादीनच्या हुकुमानें त्याला ठार मारला. सर्व सृष्ट वस्तूंचें अखेरचें तत्त्व शाश्वत प्रकाश आहे असें तो म्हणे. हा प्रकाश स्वयंभू, स्वयं व्यक्त होणारा व अनिर्बंध आहे. प्रकाशाच्या दोन जाति आहेत. पहिली ज्ञानमय आहे. दुसरीला आकार आहे. माणसाच्या आत्म्यांत ज्ञानमय प्रकाश रहातो. हा आत्मा अधिकाधिक प्रकाशाच्या मागें लागतो. जास्त प्रकाश मिळावा व अंधकारापासून आपण मुक्त व्हावें, ही त्यांत बुद्धि असते. हा प्रकाश, ज्ञान व कर्म यांपासून प्राप्त होतो. मानवी मनाचे तीन प्रकार. सत्त्व, रज व तम असे आहेत. व्यक्तीचा आत्मा प्रगतिमान असतो. एका जन्मानंतर दुसरा जन्म घेत घेत तो मुक्त होतो. असे सर्व आत्मे मुक्त झाले म्हणजे प्रलय होतो व पुनः जगच्चक्राला सुरवात होते. अशा प्रकारचा प्रकाशवाद झाला.

ज्ञानमय मार्गाचा अध्वर्यू इब्न अल्–अराबी हा होता. तो सुफी तत्त्वज्ञानाचा मोठा अधिकारी. परमेश्वर अणुरेणूंत भरला आहे. मनुष्य हा परमेश्वराचा अवतार आहे आणि परमेश्वर हें मनुष्याचें आद्यतत्त्व आहे. मनुष्य ज्या ज्या गुणांचा आरोप परमेश्वरावर करतो, ते ते गुण

त्याच्यांत असतात. जेव्हां तो देवाचें चिंतन करतो, तेव्हां स्वतःचेंच चिंतन करतो आणि देव जेव्हां स्वतःचें चिंतन करतो, तेव्हां माणसाचें चिंतन तो करतो. तेव्हां ईश्वराचें ज्ञान होणें हेंच माणसाचें जीवितध्येय आहे. जोंवर शरीर आहे तोंवर तदाकार होणें शक्य नाहीं. ज्ञान हें श्रद्धेनें व चिंतनानें प्राप्त होतें. त्याकरतां बुद्धींतील तार्किक शक्ति गेली पाहिजे. ज्ञानाचा शेवट समाधि लागणें आणि नामरूपात्मक विचार नष्ट होणें.

इब्न अल्–अराबीच्या ग्रंथांवर अब्दुल करीम अल्–जिली यानें भाष्यें लिहिलीं. तो दीडशें वर्षांनंतर (१४०६) होऊन गेला. तो मोठासा विद्वान नव्हता. त्याचा इन्सान-इ-कमिल-पूर्ण मनुष्य-हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. तो एकेश्वरवादी होता. एकच ध्येय, एकच श्रद्धा, एकच पूजा आणि एकच सत् तत्त्व तो मानीत असे. त्यानें हिंदुधर्माचा परिचय करून घेतला होता. ब्रह्म व अब्राहम तो एकच मानी. त्यानें अद्वैतवेदांतपर एक पुस्तक लिहिलें होतें. हा अद्वैतवेदांत इस्लामपासून भिन्न नाहीं, असेंहि तो म्हणे.

अशा प्रकारचा हा सुफी पंथ आहे. त्यांत व हिंदु वेदांतांत पुष्कळ साम्य आहे. एकीकडच्या कल्पना दुसरीकडे तंतोतंत जुळतात असें वाटतें. सुफी पंथाच्या आचरणांत सुद्धां आपल्याला असेंच साम्य दिसतें.

देवप्राप्ति तीन टप्प्यांनीं होते, असें ते म्हणतात. परमार्थेच्छूनें प्रथम आपल्या पातकाबद्दल पश्चात्ताप केला पाहिजे. नंतर त्याच्यांत श्रद्धा(इमान) उत्पन्न झाली पाहिजे. नंतर सत्कृत्यें, ईश्वरेच्छा प्रमाण मानणें, नियम पाळणें, स्वच्छता, प्रार्थना, उपास, दानधर्म व यात्रा (हाज) ह्यांचा मार्ग अनुसरला पाहिजे. उपास, मौन व एकांत या तपश्चर्येनें चित्तशुद्धि होते. अज्ञान, गर्व, अहंकार, द्वेष, क्रोध वगैरे या तपाचरणानें नष्ट होतात.

दुसऱ्या अवस्थेंत ब्रम्हज्ञान होतें. या अवस्थेंत तर्कनिष्ठ बुद्धि नष्ट करावयाची असते. ती परमेश्वराच्या ज्ञाना आड येते. या स्थितींत आत्मा अस्थिर होतो, त्याला चैन पडत नाहीं. शेवटीं परमेश्वर त्याच्यावर कृपा करतो आणि त्याला ब्रह्मज्ञान होतें. या अवस्थेंत भिन्नपणा ही माया

आहे, सजीव प्राण्यांबद्दल व सत्कृत्यांच्या फलाबद्दल आसक्ति धरणें हें निरुपयोगी आहे असें त्याला कळून येते. हा ज्ञान प्राप्त झालेला कर्म संन्यासी होतो पण एवढ्यानें पूर्णावस्था होत नाहीं. तिसऱ्या अवस्थेंत परमात्म्याशीं त्याचें पूर्ण ऐक्य होतें. त्याचें मन, बुद्धि, इच्छा, भावना, वगैरे सर्व परमात्म्यामध्यें लीन होतात. तो फानांतून बाकांत म्हणजे जीवात्म्यांतून परमात्म्यांत जातो. मन्सुरनें म्हटल्याप्रमाणें ‘ अनल् हक् ’ किंवा ‘ अहं ब्रह्मास्मि ’ हीच ती अवस्था होय.

सुफी पंथाचें वाङ्मय फार विविध व समृद्ध आहे. कितीतरी साधु-संतांच्या कथा त्यांत वर्णन केल्या आहेत ! या पंथानें गुरूला शरण गेलें पाहिजे असें शिकविलें. समाधि लावण्याकरतां त्या पंथानें योजना केली. हिंदु तत्त्वज्ञानांत ज्याप्रमाणें ध्यान, धारणा आहे, तसेंच सुफी पंथांत आहे. योगांतील प्राणायाम त्यांच्यांत आहे. शिब्ली म्हणतो ‘तसावुफ’ म्हणजे इंद्रिय निग्रह करणें व प्राणायाम करणें. सुफी पंथ म्हणजेच तसावुफ होय. ला, इलाह, लाइलाह हे शब्द विजेच्या प्रवाहाप्रमाणें अंतकरणांतून सर्व शरीरांत व तेथून ब्रह्मरंध्रांत व ब्रह्मरंध्रांतून स्वर्गापर्यंत जातात व त्याचक्रमानें परत येतात अशी या शब्दांची मंत्रशक्ति ते मानतात. गायन व नृत्य यांनीं समाधि लागते असें एक पंथ म्हणतो. त्यांचे धर्मगुरु नृत्य, गायन हे अधार्मिक मानतात. पण गझालीनें नृत्यगीताला निषिद्ध म्हणूं नये असें सांगितलें. ‘ गायनानें अंतःकरण भट्टींतील अग्नींत वितळविलेल्या चांदीप्रमाणें शुद्ध होतें व समाधि लागते ’ असें गझाली म्हणतो. गातां गातां मनुष्य बेभान होतो व ईश्वराशीं तादात्म्य पावतो.

जमालुद्दीन रुमी यानें मौलवींचा पंथ स्थापन केला. त्यानें नृत्य, गीतांवर अत्यंत भर दिला. ‘ मी नाचत नाहीं; प्रेम नाचतें ’ असें देवाच्या प्रेमानें वेडावलेले मौलवी म्हणतात. अशा प्रकारें इस्लाम धर्म व त्यांतील तत्त्वज्ञान यांचा थोडक्यांत इतिहास आहे.

या तत्त्वज्ञानाचा आपण विचार करूं लागलों म्हणजे वेदांतांत जशीं षड्दर्शनें आहेत, त्यांपैकींच हें एखादें दर्शन असावें असें वाटतें. सुफी–सफा–स्वच्छ–निर्मळ असणारा हा तत्त्वज्ञांचा पंथ वेदांतापेक्षां कसा

निराळा समजावा ? त्यांत ध्यान, धारणा, समाधि, योग, तपश्चर्या, कर्म-संन्यास, जीवात्मा, परमात्मा, ज्ञान, आनंद, कैवल्य, मोक्ष वगैरे सर्व कांहीं आहे. इस्लामी संस्कृति ही हिंदु संस्कृतीपासून भिन्न होती असें म्हणणारे म्हणोत; पण परमार्थाचा विचार करतां दोन्ही धर्मांतील पुरुषार्थ प्रेम, ज्ञान व मोक्ष हाच होता यांबद्दल शंका नाहीं. कर्म फलाचा त्याग करावयास आणि नातेवाईकांबद्दल अगर अन्य बांधवांबद्दल आसक्ति न धरावयास सांगणारीं तत्त्वें हीं निराळ्या संस्कृतींची आहेत असें म्हणणें चूक होईल. या तत्त्वप्रतिपादनांत सारींच उसनवारी हिंदुधर्माची आहे असें नाहीं. पण येथील तत्त्वज्ञानाचा बराचसा परिणाम या निरनिराळ्या पंथांवर झाला होता यांत शंका नाहीं.

हिंदु धर्म व हिंदु तत्त्वज्ञान यांवर इस्लामच्या तत्त्वांचा किती परिणाम झाला होता हेंहि अवलोकन करणें अवश्य आहे.

आठव्या शतकापूर्वी उत्तर हिंदुस्थाननें आपल्याकडे तत्त्वज्ञानाचें नेतृत्व घेतलें होतें. पण त्यानंतर तेथें पुष्कळ घडामोडी झाल्या; कलह माजले आणि तें नेतृत्व दक्षिणेकडे आलें. वैष्णव व शैव पंथ, शंकराचार्य, रामानुजाचार्य, निंबार्क, वल्लभाचार्य, मध्वाचार्य, हे सर्व दक्षिणेंतलेच. ज्ञानेश्वरापासून तों तुकारामापर्यंत जे साधु संत झाले ते याच भागांतले. या आठव्या शतकांत चहूंकडे देवळांदेवळांतून आणि घराघरांतून ब्रह्मचर्चा चालू असे. या चर्चेमुळेंच बुद्धधर्माचा पुरा पाडाव झाला. निरीश्वरवादी बुद्धधर्माची जागा शिव व विष्णुभक्तीनें घेतली. हा काळ ईश्वरभक्तीनें ओथंबलेल्या काव्याचा होता. ब्रह्मज्ञान जें थोड्या विद्वान लोकांपुरतेंच कोंडून ठेवलें होतें, तें या कालांतील साधुसंतांनीं मुक्त केलें व गोरगरिब, अशिक्षितांच्या घरापर्यंत नेऊन भिडवलें. बुद्धधर्माला त्यांनीं पराभूत केलें; पण बुद्धधर्मांतील अनेक गोष्टी या भागवतांनीं घेतल्या. जगाची क्षणभंगुरता, मानवी जीवनाची निरर्थकता, वासनांवर विजय, संन्यासवृत्ति, मूर्तिपूजा, यात्रा, उपास, देवालयें, मठ व त्यांतील निर्बंध, व सर्व जातींत आध्यात्मिक दृष्ट्या असणारी समता हीं बुद्ध धर्मापासून हिंदुधर्मानें घेतलीं. तसेंच जैन धर्मांतून अहिंसावृत्ति व प्राणिमात्रांबद्दल दया हीं त्या धर्मानें ग्रहण केलीं.

· या विचारांचे प्रतिबिंब तामील प्रांतांत होऊन गेलेल्या वैष्णव व शैव साधुसंतांच्या काव्यांत पहावयास सांपडतें. तेथील साधुसंतांनीं बुद्ध धर्मावर व जैनधर्मावर प्रचंड हल्ला चढवला व त्या धर्माला आपल्या प्रांतांतून घालवून दिले. आद्य शंकराचार्य हे या लढवय्यांपैकीं आद्य लढवय्ये होते. मलबार किनाऱ्यावर अलवार नदीच्या कांठीं कलादी खेड्यांत त्यांचा जन्म झाला. फार लवकरच ते विरक्त झाले. ते अत्यंत बुद्धिवान होते हें सांगण्याची जरूरीच नाहीं. परमहंसपदाला पोहोंचल्यावर त्यांनीं अनेक बुद्धीवंतांचा वादांत पराभव केला. त्यांच्याइतका ज्ञात बुद्धिवान पुरुष हिंदुधर्मांत झाला नाहीं असें म्हणणें चूक ठरेल असें वाटत नाहीं. विस्कळित झालेल्या, कर्मविपाकाच्या आणि वितंडवादांच्या गर्तेत पडलेल्या हिंदुधर्माला वांचवण्याचें श्रेय याच आचार्यांना आहे. त्यांच्या वेळीं वेदाचा व वेदांताचा अर्थ वाटेल तसा केला जाई. शंकराचार्यांनीं आपल्या सूक्ष्म, विवेचक व अत्यंत तीक्ष्ण बुद्धीनें वेदांताला सुसंबद्ध स्वरूप दिलें. प्रतिपक्षाला नामोहरम करणारा त्यांचा युक्तिवाद बिनतोड असे.

शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाचें पूर्णतः वर्णन करणें येथें अशक्य आहे. पण थोडक्यांत परिचय करून देणें जरूर आहे.* हिंदुधर्मांचें वैशिष्ट्य अद्वैत आहे. देव एक आहे; अनेक देव नाहींत. परमेश्वर हाच सत्य आहे, बाकीची सर्व माया आहे. परमेश्वर निर्गुण व निराकार आहे. तो ज्ञाता नाहीं; पण ज्ञानमय आहे. जग हा आभास आहे व तें मायेच्या तत्त्वांतून निर्माण झालें आहे. माया ही नामरूपात्मक व्यक्तींना जन्म देते. व्यक्ति जरी निरनिराळ्या दिसत असल्या तरी त्या तत्त्वतः एकच आहेत. विश्वाचा पसारा ही माया आहे व ब्रह्म हें सत् आहे. मायेमुळें विश्व हें सत्य आहे असें वाटतें. या विश्वाचा देव ईश्वर आहे व तो गुणांनीं मंडित आहे. तोच विश्वाची उत्पत्ति करतो व संहार करतो. जीवात्म्याला ह्याच ईश्वराकडून शासन किंवा कृपा लाभते. अशा प्रकारें एक खरें जग व दुसरें मायारूपी जग आहे. तसेंच ज्ञानाचें. एका ज्ञानानें परब्रह्म कळतें आणि दुसऱ्या ज्ञानानें ईश्वराची कृपा संपादन करतां येते. मोक्षप्राप्तीकरतां मनाच्या व्यापारावर पूर्ण नियंत्रण ठेवतां

* Influence of Islam etc. Page 97.

आलें पाहिजे व ते व्यापार बंद झाले पाहिजेत. त्या स्थितींतच समाधि लागते आणि जीवात्मा व परमात्मा यांचें ऐक्य होऊन मोक्ष मिळतो.

रामानुजाचार्य (१०१६) हे वैष्णव होते. त्यांनीं शंकराचार्यांच्या अद्वैतावर व मायावादावर खड्ग उगारलें. भक्तीची स्थापना त्यांना वेदांतांत करावयाची होती. त्यांचा परमेश्वर हा विशिष्ट गुणांनीं युक्त आहे. अत्यंत श्रेष्ठ गुण ईश्वराच्या ठिकाणीं आहेत. त्याची शक्ति अपार आहे. त्यानेंच प्रकृति व जीव निर्माण केले. प्रत्येक कल्पाचे शेवटीं प्रलय होतो व अत्यंत सूक्ष्म अशी वस्तु जिला तम म्हणतात ती रहाते. पण ती निराळी नसते. ती ब्रम्ह्यांतच विलीन होते. नंतर ब्रह्म पुनः सृष्टीची उत्पत्ति करतो. ध्यान व अर्चनाकरतां ईश्वर पांच स्वरूपांत व्यक्त होतो. (१) वैकुंठांत असलेल्या नारायणाच्या स्वरूपांत (२) वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध या व्यूहाचे स्वरूपांत (३) अवतारांचे स्वरूपांत, (४) अंतर्यामी; समाधि योगानें दिसणारा (५) प्रतिमा व मूर्तींच्या स्वरूपांत. आत्म्याला देवाच्या भक्तीनें मोक्ष मिळतो. यज्ञ व कर्मानें चित्त-शुद्धि होते. नंतर ज्ञान व शेवटीं भक्तीचा लाभ होतो. मोक्षप्राप्ति म्हणजे ईश्वराच्या संन्निध वास व आनंदाचा उपभोग. शूद्राकरतां भक्ति नसून प्रपत्ति आहे असें यांचें मत. तिसरे आचार्य निंबार्क हे रामानुजांचे समकालीन होते. यांनीं भेदाभेद नांवाचें तत्त्वज्ञान सांगितलें. ईश्वर, जीवात्मा व विश्व हे तीनहि भिन्न असून त्यांत अभेद आहे. शरणागती-(प्रपत्ति) ला व राधा कृष्णाच्या पूजेला त्यांनीं महत्त्व दिलें. ते तेलंगणी ब्राह्मण. पण त्यांचा जन्म वृंदावनला गेला. तेथून राधाकृष्ण भक्ति उत्तरेस व बंगाल्यांत पसरली. मध्वाचार्य (११९९–१२७८) हे शंकराचार्यांच्या अद्वैता विरुद्ध व रामानुजाचार्यांच्या विशिष्टाद्वैता विरुद्ध होते. ते शुद्ध द्वैती होते. ईश्वर व जगत् निराळे आहेत. ईश्वर हा अत्यंत शक्तिवान आहे व त्याच्याच कृपेमुळें मनुष्य मुक्त होतो. अशा प्रकारें दक्षिण हिंदुस्थानांत निरनिराळे तत्त्वज्ञ होऊन गेले. त्यांतलि कांहीं तत्त्वज्ञ सोडले तर बाकीच्या तत्त्वज्ञांचा भर भक्ति-मार्गावर होता यांत बिलकूल शंका नाहीं. विष्णुभक्ति व शिव-

Ibid—101.

भक्ति ही दक्षिणेंत अत्यंत प्रभावी झाली होती. या भक्तीचें मूळ कशांत आहे ? भगवत् गीतेंत भक्तीचें महात्म्य वर्णन केलेलें आपण वाचतों. पण गीतेंत गुरूभक्ति कुठें आहे ? गुरूला परमेश्वरासमान मानण्याचा जो उपक्रम शैवांत रूढ झाला त्याला पूर्वीच्या ग्रंथांत आधार नाहीं. तेव्हां ही भक्ति व गुरु भक्ति कोठून आली ?

कांहींजण म्हणतात खिश्चन धर्मांतून ही भक्ति आली. दक्षिणेंत खिश्चन मिशनऱ्यांनीं ती कल्पना नेली. कांहीं म्हणतात ती कल्पना इस्लाम धर्मांतून आली. तर कांहीं म्हणतात कीं, अंतर्गत कारणांमुळेंच भक्तिमार्गाचा उदय झाला. खिश्चन धर्माचे पक्षपाती आपला मुद्दा फारसा ताणूं इच्छित नाहींत असें दिसतें. तसेंच अंतर्गत कारणांचे पुरस्कर्ते हेहि विशेष आग्रह धरत नाहींत. तेव्हां एकच धर्म रहातो, तो म्हणजे इस्लाम. या धर्माचा परिणाम हिंदु धर्मावर झाला नसेल असें म्हणवत नाहीं. अर्थात् भक्तिमार्गाचें मूळ हें त्या काळच्या साधुसंतांना आपल्याच धर्मग्रंथांत सांपडलें यांत वाद नाहीं. पण मुसलमान धर्मांत दिसणारी धर्म प्रेमाची वृत्ति ही हिंदूंनीं आत्मसात् केली. मुसलमान जितक्या श्रद्धेनें व भक्तीनें अल्लाची प्रार्थना व भक्ति करीत तितक्याच प्रेमानें हिंदूहि शिवभक्ति किंवा विष्णुभक्ति करूं लागले. तेव्हां हिंदूंनीं मुसलमानांपासून गुरूभक्तीची व ईश्वरभक्तीची कल्पना घेतली असावी आणि ही कल्पना घेतल्यानंतर त्यांनीं आपलें तत्त्वज्ञान भक्तिमार्गावर नेऊन बसवलें असावें.*

दक्षिणेंतील साधु मंडळामध्यें एकेश्वरी पंथावर भर दिसून येतो. तसेंच देहभान हरपून देवाची पूजा होत असलेली दिसते. परमेश्वराला अनन्य भावानें शरण जाणें (प्रपत्ति) आणि गुरुभक्ति करणें आढळून येतें. हें सर्व इस्लाम धर्मापासून घेतलें गेलें असें कांहींजण म्हणतात. इस्लाम म्हणजे प्रपत्ति होय. अल्लाचा भक्त जसा दुसरा देव मानीत नाहीं, तसा विष्णुभक्त किंवा शिवभक्त मानीत नाहीं. इस्लाम धर्मांत मूर्तिपूजा नव्हती, हिंदूंत होती हें मात्र विसरतां कामा नये. रामानुजाचार्यांनीं शूद्रांकरतां प्रपत्तीचा मार्ग सांगितला व तो त्यांनीं इस्लाम धर्मापासून घेतला असावा.

* Ibid 107-8,114.

शंकराचार्यांना शंकराचे अवतार मानीत. हे व इतर गुरु मानण्याची पद्धत सुफी पंथांतून घेतली असावी. शंकराचार्यांचा अद्वैत वेदांत हाहि एकेश्वरी पंथाचा परिणाम आहे, असें म्हटलें जातें. खुद्द शंकराचार्य ज्या भागांत जन्मले, त्या भागाचा राजा मुसलमान झाला होता, अशी एक दंतकथा आहे. इतरांनीं त्याचें अनुकरण करूं नये म्हणून शंकराचार्य हे शंकराचे अवतार आहेत, अशी लोकवार्ता प्रसृत करण्यांत आली, असाहि एक प्रवाद आहे.* वर भक्तीसंबंधीं केलेलें विधान हें अनुमान म्हणून मांडलें आहे, सिद्धांत म्हणून नाहीं. त्याबद्दल संशोधन होणें जरूर आहे.

अशा प्रकारें १३ व्या शतकापर्यंत हिंदु व मुसलमान यांची परस्परांवर क्रिया व प्रतिक्रिया चालू होती. मुसलमानांनीं हिंदु तत्त्वज्ञानांतील उच्च उच्च तत्त्वें ग्रहण केलीं आणि हिंदूंनीं मुसलमानांपासून परमेश्वराची नितांत भक्ति हीं आत्मसात् केलीं. त्यांत कोणी कोणावर आक्रमण केलें नव्हतें. जेथून जें चांगलें असेल तें घ्यावें एवढीच त्यांत दृष्टि होती. पण १३ व्या शतकांत मुसलमान हे राज्यकर्ते झाले. त्यांनीं हिंदुस्थान बराचसा जिंकला. या जयामुळें व त्यांनीं केलेल्या क्रूर हत्येमुळें परस्परांच्या संस्कृतीवर होणारे प्रेमाचे परिणाम संपले. अर्थात ज्यांनीं राजकारणांत कधींच लक्ष घातलें नाहीं ते देवाण घेवाण करीत राहिलेच. पण सामान्य जनसमुदाय हा पुष्कळसा बदलला. संस्कृतीचा होत जाणारा विकास हा पारतंत्र्यामुळें विलयाला जातो. पूर्वी राजांच्या पदरीं असणारे पंडित व शास्त्री हे उघड्यावर पडले. वाङ्मय, कला, वगैरे राजाश्रयाच्या अभावीं मागें पडल्या. पण मुसलमानांच्या अमदानींत अशा कांहीं गोष्टी घडल्या कीं ज्या आमच्या संस्कृतीचें उच्चाटन करूं शकल्या नाहींत. अफगाणांतून लुटारू येत, राज्यें स्थापत पण त्यांचा प्रवेश गांवोगांव होऊं शकला नाहीं. दिल्लीचा बादशहा कोणी का असेना गांवचा बादशहा बदलत नसे. या वैशिष्ट्यामुळें आमच्या संस्कृतीचा नाश व्हावा तितक्या प्रमाणांत झाला नाहीं. जे मुसलमान येथें स्थाइक झाले, त्यांनीं आपल्याबरोबर बाहेरील देशांतून नोकर चाकर आणले नव्हते. येथील हिंदु सैनिक व

* Ibid. Page 107.

हिंदु सेनापतींचीच नेमणूक ते हिंदूंना जिंकण्याकरतां करीत. हिंदूंनीं जसा इंग्रजांकरतां हिंदुस्थान जिंकला, तसा हिंदूंनीं मुसलमानांकरतां हिंदुस्थान जिंकला व राखला. गझनीच्या महंमदाचा सेनापति तिलक नांवाचा होता. त्यानें महमंदाच्या मुसलमान सेनापतीचें बंड मोडलें! हिंदूंनीं त्यांचा राज्यकारभार चालवला, नाणीं पाडलीं, त्यांच्या करतां राजवाडे बांधले, हिशेब ठेवले, गांवचा बंदोबस्त केला. ब्राह्मण न्यायाधीश मुसलमान बादशहाला हिंदु कायदा शिकवीत व न्याय देत. जे म्हणतात कीं इस्लाम संस्क्ृति हिंदु संस्कृतीहून भिन्न आहे त्यांनीं आपल्या संस्कृतीची व्याख्या तरी करावी.

येथें आलेल्या व स्थाइक झालेल्या मुसलमानांना कळून चुकलें कीं, राज्यें जिंकतां येतात पण संस्कृति जिंकतां येत नाहीं. शासितांनाहि समजलें कीं पूर्वीचा मनु गेला, आतां बदलले पाहिजे. त्याचा परिणाम दोघांवरहि झाला. ज्यांनीं धर्म बदलला त्यांनीं आचार, व्यवहार कुठें बदलले? धर्मांतरानें संस्कृति बदलत नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. संस्कृति ही वाडवडिलांची ठेव आहे. धर्म बदलण्यानें वाडवडील बदलत नाहींत. स्वतःचा विश्वास बदलतो. तेव्हां ज्यांनीं ज्यांनीं धर्मांतर केले त्यांनीं, वाङ्मय, कला, तत्त्वज्ञान हीं आपली संपत्ति आहे असें मानण्यास काय हरकत आहे? कालिदासाबद्दल हिंदूंनाच अभिमान वाटावा व मुसलमानांना वाटूं नये असें नाहीं. भास्कराचार्यांबद्दलहि असेंच म्हणतां येईल. आणि अजंठ्याच्या लेण्यांबद्दल? ताजमहाल हा मुसलमान जितका आपला समजतात तितका हिंदूंनींहि आपला कां समजूं नये? ख्रिस्ती बांधवांनासुद्धां हाच नियम लागूं आहे. तेव्हां मुसलमानांच्या राज्यस्थापनेनंतर हिंदुस्थानांत एक मिश्र संस्कृति निर्माण झाली. ती हिंदु-मुस्लिम संस्कृति होय. हिंदु धर्म, कला, शास्त्र, वाङ्मय यांत इस्लामच्या तत्त्वांचा प्रवेश झाला. आणि मुसलमानांच्यांतहि हिंदु तत्त्वांचा प्रवेश झाला. दोघांच्याहि मनोवृत्तींत, आचारविचारांत स्थित्यंतर झालें. हिंदु साधुसंतांनीं जुने विचार टाकले व नवे घेतले तसेंच सुफींनीं व मुसलमान साधु संतांनीं हिंदूंच्या तत्त्वांचेच काय पण कांहींनीं हिंदु देवांचीहि भक्ति आरंभली. इमारतींची, देवळांची, मशीदींची

बांधणी ही शुद्ध हिंदु किंवा शुद्ध अरबी राहिली नाहीं. देवळांत मुसलमान बांधणी व मशीदींत हिंदु बांधणी आली. चित्रकलेंतहि तोच प्रकार. राजपुताना किंवा तंजावर येथलि राजवाड्यांतील व मुसलमानांच्या राजवाड्यांतील चित्रें एकाच नमुन्याचीं असत. फरक असलाच तो चित्रकारांत. पण राजांच्यामुळें चित्रकार बदलले असें नाहीं. ही चित्रकला अर्थात मिश्र होती. वाङ्मयाचें तसेंच झालें. हिंदूंनीं संस्कृतचा व मुसलमानांनीं फारशी किंवा अरबीचा पुरस्कार केला नाहीं. देशभाषा वाढल्या. मुसलमानांनीं येथलि भाषा स्वीकारली व तींत योग्य ते बदल करून उर्दू भाषा बनवली. ही उर्दू दोघांनींहि मान्य केली. या दोन भाषांचा विषयानुरूप उपयोग होत असे. जेथें साधी, सरळ, गोड, स्वाभाविक व जुन्या भावना व्यक्त करणारी भाषा हवी असेल तेथें हिंदी वापरत आणि जेथें गुंतागुंतीची, अत्युक्तींची, जोरदार, अलंकार वगैरेंची भाषा हवी असेल तेथें उर्दू वापरत. पुष्कळ मुसलमान कवींनीं हिंदींत काव्यें लिहिलीं आहेत. आणि हिंदूंनीं उर्दूत लिहिलीं आहेत.

ज्योतिष, गणित, वैद्यक, उद्योगधंदे व कलाकौशल्य यांतहि अशीच देवघेव झाली. सामाजिक बाबतींत मात्र मुसलमानांपासून हिंदु लोकांनीं फारसा फायदा करून घेतला नाहीं. मुसलमान हे जातीभेद किंवा सामाजिक विषमता मानीत नाहींत. हिंदूंनीं ही सामाजिक समता आत्मसात् केली नाहीं. पारमार्थिक दृष्ट्या ईश्वराचे दास हे उच्चनीचता मानीत नसत. पण लौकिक दृष्ट्या जातीभेदाची तटबंदी भक्कमच राहिली. उलट आमच्यांतून जे धर्मांतर करून गेले, त्यांनीं उच्चनीचता इस्लाम समाजांत नेली. धर्मांतरित मुसलमानांनीं चालीरीति, पोषाख, खाणेंपिणें, लग्नविधि, नामकरण, मृताचे संस्कार वगैरेंमध्यें बदल केला नाहीं. धर्म बदलला म्हणून पूर्वींचे संस्कार बदलत नाहींत. हिंदु धर्मांतील हे सर्व आचार अजूनहि आपल्याला मुसलमानांत हिंदूंप्रमाणेंच पदावयास सांपडतील. अर्थात् सुधारलेले मुसलमान हे सुधारलेल्या हिंदूंप्रमाणेंच अपवाद मानले पाहिजेत. कोठल्याहि संस्कृतीचें मूल्यमापन हें विशिष्ट वर्गाच्या चालीरीतींवरून करणें चूक ठरेल. समाजांत अगर देशांत जे शीलवान,

चारित्र्यवान् व तत्त्वनिष्ठ असतात त्यांच्यावरून संस्कृति ठरत असते. असे लोक थोडेच असतात.

* * * *

रामानंद हा मोठा सत्पुरुष उत्तरेस (अलाहाबाद-प्रयाग) झाला. त्याचा जन्म १२९९ इ. मध्यें झाला, त्यानें दक्षिणेंतील विष्णुभक्ति ऐवजीं रामभक्ति रूढ केली व ती शूद्रासह चारहि वर्णांना शिकवली. त्यानें जातिभेद मोडला. जेवणें, खाणें व अन्न शिजवणें यांत त्यांनीं भेदाभेद मानला नाहीं. मुसलमानहि त्याचे शिष्य होते. रामानंद हा मोठा क्रांतिकारक संत होता. त्यांच्या शिष्यांत एक जुन्या संप्रदायाचे व दुसरे क्रांतिकारक असे शिष्य होते. कबीर हा क्रांतिकारक आणि तुळशीदास हा जुन्याचा अभिमानी होता. तुळशीदासाची रामभक्ति हीं अवर्णनीय आहे. त्यानें अगदीं घरोघर आपल्या रामायणाद्वारें रामनाम नेऊन पोहोंचवलें. कबीर हा बंडखोर संत होता. विणकाम करीत करीत व बायकोमुलांच्या संगतींत तो शिष्यांना आत्मप्रतीति सांगे. त्याला जुने आचार, विचार, विधि, कर्मकांड वगैरे कांहींच मान्य नसे. आत्मानुभवावर त्याचा भक्तिमार्ग आधारलेला आहे. पण त्याशिवाय हिंदु व मुसलमानांच्या ऐक्याचा तो मोठा पुरस्कर्ता आहे. त्याच्यामागें दोन्ही धर्मांच्या शिष्यांचा मोठा परिवार असे. तो मेल्यावर त्याला पुरावा का जाळावा याबद्दल भांडणें झालीं. तो दोन्ही धर्मांतील अंधभक्तीबद्दल कडक लिहीं, सुफी मतांचा त्याच्यावर फार परिणाम झाला होता.

त्यावेळीं दोन्ही धर्मांतील लोक परस्परांचा भयंकर रक्तपात करीत. कबीरानें त्यांना मानवी प्राण्यांबद्दल आदर बाळगा आणि रक्तपातापासून अलिप्त रहा असें सांगितलें. त्यानें मुसलमानांना कुराण, पैगंबर, दानधर्म, उपास, यात्रा वगैरेंतील अंधभक्ति विरुद्ध आणि हिंदूंना जातिभेद, अस्पृश्यता, देव, देवळें, जप, यज्ञ, अवतार वगैरे विरुद्ध उपदेश केला. तो या उभय धर्मांत तडजोड घडवून आणणारा पहिला नेता होता.

कबीरानंतर झालेल्या साधुसंतांनींहि उभय धर्मांत सलोखा करण्याचा प्रयत्न केला. वेद व कुराणें, राम व रहीम एक आहेत अशी त्यांची शिकवण असे. या शिकवणीला आक्रमक मुसलमान सत्तेकडून पाठिंबा न मिळाल्यामुळें ह्या संतांच्या प्रयत्नांना यश आलें नाहीं. दादूनें देवाला 'अल्ला' 'राम' म्हटलें आहे. मलुकदास म्हणतो 'माला व तसबीर; संध्या व नमाज; राम व रहिम एकच आहे.'

कबीराप्रमाणें शीख धर्म संस्थापक गुरु नानक यानें धर्मांत क्रांति केली. त्याच्यावर इस्लाम धर्मांतील सुफी पंथाचाच परिणाम झाला होता.

परंपरावादी व क्रांतिवादी यांच्यांत आणखी एक फरक दिसतो. पहिले सगुण उपासक व दुसरे निर्गुण उपासक होते. हे निर्गुण उपासक व सुफी पंथी यांच्यांत फारसा फरक नसल्यामुळें दोघेहि एकत्र येत. सगुणोपासकांची परंपरा तुळशीदास, सुरदास आणि आपल्याकडे नामदेव, ज्ञानदेव, तुकाराम, वगैरे संतांनीं वाढवली. बंगालमध्यें चैतन्य हा सत्पुरुष होऊन गेला. त्यानें दोन्ही धर्मांत समन्वय करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या उपदेशावर यवनांचा परिणाम झाला होता. बंगालमध्यें उभय धर्मांच्या समन्वयाकरतां 'सत्यपिर' नांवाचा देव काढला होता व ह्या समन्वयी धर्माचा पुरस्कार हुसेनशहा बादशहानें केला होता. अकबराच्या पूर्वी हा बादशहा झाला. त्यामुळें हिंदुमुसलमान ऐक्याचा पहिला बादशहा हाच होता असें दिसतें.

इंग्रजांच्या संस्कृतीचा परिणाम हिंदु-मुसलमानांच्या संमिश्र संस्कृतीवर होण्यापूर्वीचा हा इतिहास आहे. ह्या इतिहासाचा व गांधीवादाचा संबंध काय असा प्रश्न विचारला जाणें स्वाभाविक आहे. गांधीवाद हा एकाएकीं कोठून तरी उपस्थित झाला नसून तो गेल्या चार पांच हजार वर्षांच्या संस्कृतीवर अधिष्ठित झाला आहे हेंच या इतिहासावरून दाखवावयाचें आहे. इंग्रजांची सत्ता हिंदुस्थानांत स्थापन होण्यापूर्वी किंवा नंतर जीव, जगत्, परमात्मा, परमेश्वर, मोक्ष, वगैरेंबद्दल चर्चा होत असे. मुसलमान धर्म हिंदुस्थानांत आला व त्यांतील सुफी पंथानें वेदांताची परिभाषा उचलली; तसेंच हिंदु धर्मानें इस्लाम धर्मांतील अत्युत्कट भक्तीची कल्पना आत्मसात् केली.

ह्या एका धर्माच्या दुसऱ्या धर्मावर होत असलेल्या परिणामामुळें मूळच्या कल्पनेला कोठेंच बाध येत नव्हता. हिंदुस्थानची संस्कृति ही आध्यात्मिक व ज्ञानप्रधान संस्कृति होती. ऐहिक जीवनापेक्षां श्रेष्ठतर अवस्था आहे व ती ज्ञानानेंच प्राप्त होते, हा मूळचा सिद्धांत. हीं मोक्षाचीं साधनें प्रथम कर्ममार्ग नंतर ज्ञानमार्ग व शेवटीं भक्तिमार्ग अशीं कालानुक्रमें बदलत गेलीं. पण मूलतत्त्वांत केव्हांहि बदल झाला नाहीं. हिंदुधर्मावर व संस्कृतीवर अन्य धर्मांचे व अन्य संस्कृतींचे हल्ले झाले; पण या सर्व हल्ल्यांना तोंड देऊन व कधीं कधीं स्वतःच्या धार्मिक आचरणांत व व्यवहारांत बदल करून हिंदुधर्म जो जिवंत राहिला तो मुळांतील तेजस्वी तत्त्वज्ञानामुळें. मोक्षप्रधान संस्कृति ही हिंदुस्थानची अत्यंत मौल्यवान अशी संपत्ति आहे. या संपत्तीचें संरक्षण स्वार्थत्यागपूर्वक झालें आहे. म. गांधी हे एक त्या संस्कृतीचे संरक्षक आहेत.

हिंदु धर्मानें जैन व बुद्ध धर्मापासून अहिंसा घेतली, इस्लाम धर्मापासून नितांत भक्ति घेतली आणि ख्रिश्चन धर्मापासून त्याला सेवा व प्रेम घ्यावयाचें आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हीं पुरुषार्थाचीं चार लक्षणें समजलीं जातात. तीं सर्व धर्मांना समान आहेत. भारतीय संस्कृतीनें जर प्रथमपासून कशाचें अत्यंत परिश्रमपूर्वक रक्षण केलें असलें तर तें अर्थाचें नाहीं किंवा कामाचेंहि नाहीं. धर्माचें रक्षणहि भारतीय संस्कृतीला करतां आलें नाहीं. पण मोक्षाचें म्हणजे मोक्षमार्गाचें रक्षण करणारे तत्त्वज्ञ या संस्कृतींत असंख्य झाले. याचा अर्थ भारतीय संस्कृति ही कामप्रधान किंवा अर्थप्रधान संस्कृति नसून ती धर्मप्रधान व मोक्षप्रधान संस्कृति आहे असा होतो. हिंदूंची धर्माच्या बाबतींतील अत्यंत ताठरवृत्ति हीच धर्मांतराला कारणीभूत झाली असेल; अर्थात् धर्मांतराचें तें एक कारण होतें. इस्लामधर्म हिंदूंतील लोक घेऊन वाढला, तर हिंदुधर्म रोडावला गेला; पण या वाढतोडींत भारतीय संस्कृति अभेद्य राहिली. ती संस्कृति वेदकालीन आर्यांची जितकी आहे तितकीच इंग्रजांच्या किंवा मुसलमानांच्या काळांतील लोकांची संस्कृति आहे. हिंदु संस्कृति, इस्लाम संस्कृति, बुद्ध जैन संस्कृति, ख्रिश्चन संस्कृति यांचा उगम कोठेंहि झालेला असला तरी त्या सर्वांचा अंतर्भाव भारतीय संस्कृतींत होतो.

कालचा हिंदु हा उद्यांचा ख्रिश्चन किंवा मुसलमान झाला तर तो माझी संस्कृति परक्या देशांतील आहे असें कसें म्हणूं शकेल ? देशांतील लोक कोणत्याहि धर्माचे असले तरी त्यांची संस्कृति भिन्न असणार नाहीं. इंग्लंडमध्यें जन्म घालविणारा एकादा इंग्रज हिंदु झाला तरी केवळ धर्मामुळें त्याची संस्कृति भारतीय होणार नाहीं.तसेंच मुसलमानांचें. येथील मुसलमानांची एक व तुर्कस्थानमधील मुसलमानांची एक संस्कृति असें असूं शकणार नाहीं. मनावर, शरीरावर, बुद्धीवर, आचार विचारांवर आदर्श व्यक्तीकडून जे व्यक्त व अव्यक्त संस्कार होतात,त्यालाच संस्कृति म्हणतात. राजकारण, अर्थकारण, धर्मकारण, शास्त्र, केला, वाङ्मय वगैरेंमध्यें हे संस्कार दृग्गोचर होत असतात. ते संस्कार धर्मांतरानें बदलत नाहींत. हिंदूचा ख्रिश्चन झाल्याबरोबर कांटे चमच्यानें जेवणें त्याला जमणार नाहीं व तो जर शाकाहारी असला तर धर्मांतर करूनहि मांसाला स्पर्श करणार नाहीं.

मोक्षप्रधान संस्कृति असें भारतीय संस्कृतीचें जें स्वरूप वर्णन केलें, त्याचा अर्थ फार खोलवर जाणारा आहे. या संस्कृतीमुळें राजकारण, समाजकारण, शिक्षण, नीतिमत्ता, चालीरीती, धर्म, अर्थकारण वगैरेंवर परिणाम होत असतो. तो परिणाम अर्थप्रधान संस्कृतीपासून भिन्न असतो आणि कामप्रधान संस्कृतीपासून भिन्न असतो. मोक्षप्रधान संस्कृतींत वाढलेला माणूस हा विशिष्ट मनोरचनेचा असला पाहिजे असें आपण समजतों. तो पापभीरू, स्वधर्मरत, ऐहिक जीवनांत रस न घेणारा, उदासीन, कर्ममार्गी असला तरी अनासक्त; ज्ञानमार्गी असला तरी अनहंकारी, आणि भक्तिमार्गी असला तरी ज्ञान व कर्माला पारखा नसलेला असावा अशी अपेक्षा आपण करतों. खऱ्या मोक्षप्रधान संस्कृतींत वास्तविक पारतंत्र्य येतां कामा नये. पण हिंदुस्थान हा शतकानुशतकें पारतंत्र्यांत पडलेला दिसतो. त्यावरून मोक्षप्रधान संस्कृतींत पारतंत्र्य हें सहचारी असतें असा तरी आपण अर्थ केला पाहिजे किंवा आपलें तरी कांहीं चुकलें असलें पाहिजे. मोक्षप्रधान संस्कृतींत पारतंत्र्य येतें हें खोटें आहे. आपल्या पूर्वजांनींच कांहींतरी चूक केली असली पाहिजे. ते मोक्षाच्या मागें लागले, पण त्यांनीं ऐहिक जीवनाकडे लक्ष दिलें नाहीं. त्याचा परिणाम काय झाला ? हिंदुस्थान शतकानुशतकें पारतंत्र्यांत राहिला.

अर्थ व कामप्रधान संस्कृतींतील लोकांपेक्षां आत्मरक्षणाचें निराळें तंत्र या देशांत निर्माण झालें नाहीं. परक्यांची स्वारी आली असतां अगर परक्यांवर स्वारी करावयाची असतां कोणत्या शस्त्रास्त्रांची सिद्धता करावी, याचें जसें शास्त्रीय तंत्र युरोपांत पूर्ण होत गेलें तसें इकडे झालें नाहीं. त्याला कारण संस्कृतींत फरक हेंच होय. आमच्या संस्कृतीला साजेसें असें जर कोणतें तंत्र निर्माण होऊं शकलें असतें, तर तें नैतिक प्रतिकाराचें. हा नैतिक प्रतिकार अहिंसेशिवाय व्यक्त होऊं शकला नसता. पण तसा प्रयत्न झाला नाहीं. त्यामुळें संस्कृति आध्यात्मिक, आणि प्रतिकाराचीं साधनें भौतिक, अशी विसंगति निर्माण झाली व त्याचा शेवट पारतंत्र्यांत झाला. जशी संस्कृति तशी तीं संस्कृति टिक-वण्याचीं साधनें असावीं लागतात. पाश्चात्यांच्या संस्कृतीमध्यें जर आध्यात्मिक प्रतिकाराची योजना झाली असती तर तो प्रतिकार कधींहि यशस्वी झाला नसता. त्यांची सुख, भोग, विलासप्रियता हीं आध्यात्मिक प्रतिक्रियेला पारखींच आहेत.

भारतीय संस्कृतीचा तीन संस्कृतींशीं झगडा झाला. एक बुद्ध, दुसरा इस्लाम व तिसरा ख्रिश्चन. यांपैकीं बुद्धाची संस्कृति ही फारशी उपद्रव देणारी झाली नाहीं. त्या संस्कृतींतील चांगला भाग आम्ही घेतला व वाईट टाकून दिला, आणि धर्माला तर हद्दपार केलें. तसें इस्लाम व ख्रिश्चन संस्कृतींचें झालें नाहीं. या दोन्ही संस्कृतींचे बरेचसे परिणाम आपल्या जीवनावर झाले आहेत. ते परिणाम दूर करणें जवळ जवळ अशक्य आहे. भाषेंतले शब्द काढून टाकण्याचें एक वेळ जमेल पण वृत्तींत भिनलेले संस्कार कसे जातील ? पुनः हे संस्कार इतके एकजीव झाले आहेत कीं हिंदूंचे संस्कार कोणते व मुसलमानांचे कोणते हें सांगणेंहि कठीण आहे. गंगायमुनांचें पाणी प्रयागमध्यें फार तर निराळें दाखवतां येईल पण पुढें ? हिंदूंचे व मुसलमानांचे सोळा संस्कार हे इतके सारखे वाटतात कीं मूळ कोणते व नक्कल कोणती हें सांगणें कठीण आहे.*

---

* टीपः—'कानून–इ–इस्लाम' या पुस्तकांतील मुसलमानांचे म्हणून जे कांहीं कपडे, खेळ, वाद्यें, पक्वान्नें दिलीं आहेत त्यांचा येथें नुसता नामनिर्देश करतों. १ टोपी, २ पगडी, ३ मंदील, ४ झगा, ५ कलगी तुरा, ६ अंगरखा, ७ चादर,

[टीप पुढील पानावर पहा.]

पण ज्या चालीरीती किंवा बाह्य गोष्टी आपल्या मूलभूत संस्कृतीला धक्का पोहोंचवूं शकत नाहींत,त्यांचा स्वीकार करणें अगर इन्कार करणें,हें महत्त्वाचें नसतें. मुसलमानांची परदेशांतून आलेली संस्कृति आपल्या घरादारांत शिरली व आपण तिचें प्रेमानें स्वागतहि केलें. आज आपण काय करीत आहों ? पाश्चात्य चालीरीतींचा जितक्या आतुरतेनें आपण स्वीकार करतों तितका स्वतःच्या करीत नाहीं. तोच इतिहास इस्लामच्या बाबतींत घडला; पण इस्लाम संस्कृतीपासून जर हिंदूंनीं कांहीं गोष्टी घेतल्या असत्या तर खरोखर चांगलें झालें असतें. हिंदूंनीं त्यांच्यापासून आपसांतील असणारी विलक्षण एकी घेतली नाहीं किंवा उच्चनीचतेचा अभाव घेतला नाहीं किंवा त्यांत नसणारे जातिभेद हेहि घेतले नाहींत. आपल्या धर्माबद्दल मुसलमान किती कडवा असतो ! त्यांत अविवेक नसतो असें नाहीं. या माथेफिरूपणामुळें त्यांचेंहि नुकसान झालें आहे; पण तो प्रश्न वेगळा. एका मुसलमानाला दुसऱ्या मुसलमानाबद्दल किती आपलेपणा वाटतो ! तेव्हां त्याच्यापासून हे गुण आम्हीं घेतले नाहींत. कारण आमची जाति व धर्मभावना आणि उच्चनीचता आड आली. इस्लामपासून हिंदूंनीं थोडीशी विलासी वृत्ति घेतली हें खरें;पण त्याबरोबर मुसलमान राज्यकर्त्यांतला क्रूरपणा हा हिंदूंमध्यें जाऊं शकला नाहीं. या एका बाबतींत हिंदु संस्कृति ही निराळी आणि निःसंशय श्रेष्ठ ठरते.

ख्रिश्चन संस्कृतीचें असेंच झालें. ख्रिश्चन धर्मीय राज्यकर्ते म्हणूनच येथें आले. पण मुसलमानांइतके धर्मप्रसाराचें वेड त्या राज्यकर्त्यांत नव्हतें. म्हणून इस्लामधर्मीयांनीं जशीं धर्माकरतां क्रूर कृत्यें केलीं तशीं इंग्रजांनीं केलीं नाहींत. पण इंग्रजांनीं व्यापाराकरतां क्रूर कृत्यें केलीं. त्यांनीं अत्यंत रानटीपणानें येथील व्यापार नष्ट केला. त्यांची संस्कृति अर्थ व कामप्रधान. सुख – पैशाचें व शरीराचें – त्यांना हवें आहे. त्यामुळें धर्म व मोक्ष मागें पडला. अर्थकामानें धर्ममोक्षावर विजय मिळ-

[मागील पानावरून पुढें चालू]

८ लंगोटी, ९ चोळी, १० साडी, ११ नथ, १२ अंगठी, १३ कमरपट्टा, १४ खिचडी, १५ जिलबी, १६ शिरा, १७ झांज, १८ मृदुंग, १९ सारंगी, २० गलीदांडू. ह्या शब्दांच्या मागें कांहीं निर्देश आहे.

विला. तेव्हां बुद्ध व इस्लामप्रमाणें ह्या नव्या संस्कृतीशीं दीडदोनशें वर्षें हिंदु संस्कृतीचा झगडा सुरूं आहे. या पाश्चात्य संस्कृतीच्या मुळाशीं यंत्र आहे. ते यंत्रदेवतेचे उपासक आहेत असें म्हणणें चूक ठरणार नाहीं.

ह्या पाश्चात्य संस्कृतीच्याच आहारीं आज सर्व जग जवळ जवळ गेलें आहे. त्या संस्कृतींतील दुर्गुण हे फार लवकर हिंदुस्थानांत उतरले. इंग्रजा माणूस हा बाहेर लोकशाहीच्या गप्पा मारतो; पण घरांत तो सुलतान—डिक्टेटर—असतो. त्याच्यामध्यें असलेली व्यक्तिनिष्ठा व अहंकार, यांचा हिंदुस्थाननें स्वीकार केला आणि जुनी व्यवस्था मोडून टाकली. व्यक्तिस्वातंत्र्याच्या आणि स्वतंत्र विचाराच्या गप्पा मारायला आम्ही सुरवात केली; पण संघशक्तीचें महत्त्व कधीं समजून घेतलें नाहीं. पाश्चात्य माणूस हा बोलतांना भांडतो, पण काम करतांना भांडत नाहीं. एकदां बोलून झालें आणि बहुमतानें एकादी गोष्ट करावयाची ठरली म्हणजे त्याचा विरोध संपतो. आमचा विरोध कधींच संपत नाहीं. तो संस्थेच्या दुफळीला कारणीभूत होतो. संघामध्यें शक्ति आहे याची जाणीव थोडीबहुत आम्हांला होऊं लागली आहे व स्वतःचें मत—ज्याला कांहीं गृहस्थ बुद्धि गहाण ठेवणें म्हणतात — विसरण्याचे धडे आम्हांला मिळत आहेत. अद्यापपर्यंत आम्हांला पाश्चात्यांपासून कितीतरी गोष्टी शिकावयाच्या आहेत व कितीतरी विसरावयाच्या आहेत. आम्हांला त्यांच्यांतील परिश्रमबुद्धि, चिकाटी, शास्त्रीय शोधांची आवड, व्यवहारांतील सचोटी, लोकशाहीवरील व देशावरील प्रेम ह्या व इतर गोष्टी शिकावयाच्या आहेत. पण शास्त्रीय ज्ञानाचा त्यांच्याकडून होत असलेला अमानुषपणें उपयोग आम्हांला विसरायचा आहे. नीतिअनितीची — खासगी नव्हे सार्वजनिक — ओढाताण, वर्तनांतील ढोंगीपणा, वृत्तपत्रांतून चाललेला असत्याचा प्रचार, मानव्याबद्दलच्या त्यांच्या राक्षसी कल्पना, पैशांची चाललेली पूजा आणि मनुष्यसंहाराकरतां सतत चाललेला स्वतःच्या पैशाचा व श्रमाचा संहार ह्या गोष्टी आमच्या संस्कृतीला हानिकारक व विघातक आहेत.

पण आतां हा झगडा टाळायचा म्हटला तरी टळणार नाहीं. पाश्चात्य संस्कृतीनें आपला फास आमच्या संस्कृतीवर टाकलाच आहे. या झग-

ड्यांत कोणाचा जय होतो, हेंहि ठरावयाचें आहे. ही पाश्चात्य संस्कृति रशियांत समाजसत्तावादाचें आणि जर्मनींत नाझीपंथाचें असें सोज्वल व राक्षसी स्वरूप धारण करून उभी आहे. या दोघांमध्यें नीतिमत्तेचें आणि लोकशाहीचें स्वरूप धारण केलेला साम्राज्यवाद उभा आहे. सध्यांच्या युद्धानंतर शांततामय प्रवृत्ति वाढेल आणि अहिंसावृत्तीची प्रतिष्ठापना होईल असें वाटेनासें झालें आहे. अद्यापपर्यंत संहारक युद्धाची शास्त्रीय परिसीमा कोठें गांठली गेली आहे ? विषारी वायु अजून सुटायला सुरवात झाली नाहीं आणि बाटल्यांत जपून वाढवलेले रोगजंतु मोकळे झाले नाहींत. मनुष्यसंहार हा अजून काळपुरुषांच्या तोंडांतून जिव्हारस थबथबा गळूं लागेल इतका झाला नाहीं. अद्याप विमानी-युद्धें कळसाला पोहोंचलीं नाहींत. रोग बरा व्हायचा असला म्हणजे तो खूप वाढावा लागतो. रोगाची वाढ पुरी झाली म्हणजे एक रोग तरी मरतो किंवा रोगी तरी मरतो. पाश्चात्य संस्कृतीचा नायनाट व्हायला अद्याप क्रूरता व अमानुषता हीं मूर्धाभिषिक्त झालीं नाहींत. त्या संस्कृतींत बदल होण्याचीं चिन्हेंहि दिसत नाहींत. हिटलरला चर्चिल व चर्चिलला हिटलर राक्षस, व नरपशु वाटतात. पण दोघांपैकीं एकालाहि हिंसावृत्ति अमानुष वाटत नाहीं. हा वृत्तींत बदल झाला नाहीं तोंपर्यंत पाश्चात्य संस्कृतीचा शेवट लवकर होईल अशी आशा कोणी बाळगूं नये. मग रूझवेल्ट-चर्चिल कितीहि शांततेच्या गप्पा मारोत.

पाश्चात्य संस्कृतीच्या पकडींतून सुटण्याचा गांधीवादानें प्रयत्न चालविला आहे. राजकीय दृष्ट्या गांधींनीं काय केलें आहे तो प्रश्न वेगळा; पण या भागांत जो भारतीय संस्कृतीचा व तिच्यांत अंतर्भूत झालेल्या अन्य संस्कृतींचा इतिहास दिला आहे, त्यावरून गांधीवाद हा जुन्या संस्कृतींतील उत्तम उत्तम गुणांचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न आहे, हें सिद्ध होईल. कोणाला गांधीवादांत असणाऱ्या अहिंसेमुळें म० गांधी जैन धर्माचे वाटतात, कोणाला ते ख्रिश्चन धर्माचे वाटतात. या दोन्ही धर्मांकडे उपेक्षेनें पहाणाऱ्यांना स्वतःच्या धर्मापेक्षां निराळा असणारा हा धर्म अधर्म वाटतो. आमच्या हिंदु धर्मांत किंवा आमच्या मुसलमान धर्मांत अहिंसा नाहीं, तेव्हां आम्ही अहिंसावादी बनून स्वतःला दुबळे

करणार नाहीं, असें ते म्हणतात. हिंदु धर्मांत हिंसा आहे,मुसलमान धर्मांत हिंसा आहे. तेव्हां आमचा शस्त्रावर, हिंसेवर व रक्तपातावर विश्वास आहे असें त्यांचें प्रतिपादन. हें प्रतिपादन ठीक आहे. त्यांच्या मार्गा-आड येण्याची कोणाची शक्ति आहे? मी हिंसा करणार व तरवार गाजवणार असें म्हणणाऱ्याच्या आड गांधीवाद येऊन काय करणार? त्यांचा मार्ग अर्थप्रधान व कामप्रधान पाश्चात्य संस्कृतीचा आहे. तो मोक्षप्रधान भारतीय संस्कृतीचा नाहीं. कारण भारतीय संस्कृतीनें आपलें आद्य तत्त्व, ज्ञानेच्छा व मोक्षप्राप्ति हें मानलें आहे. मोक्षाच्या मार्गाला लागलेला मुमुक्षु हा हिंसाप्रधान गोष्टी करील असें वाटत नाहीं. स्थितप्रज्ञ, मुमुक्षु किंवा भक्त कसा असावा? जो कोणाचाहि द्वेष न करणारा, जो करुणापूर्ण, जो कर्मफलत्यागी, स्तुति व निंदा तुल्य मानणारा, स्थिरबुद्धि, अनासक्त असा हा मोक्षमार्गी असतो. अशाच्या हातून हिंसा होणारच नाहीं. गांधीजी पण म्हणतात, 'कर्मफलाचा त्याग हा सत्य व अहिंसेशिवाय शक्यच नाहीं.'

ही मोक्षप्रधान संस्कृति जिच्यांत अनासक्ति, कर्मफल त्याग, वासना राहित्य, अहिंसा व सत्य वगैरे अंतर्भूत होतात, ती संस्कृति हिंदुस्थानांत शतकानुशतकें चालू आहे. समाज जरा आपल्या ध्येयापासून चळला म्हणजे त्याला ताळ्यावर आणण्याकरतां व धर्मराज्याची स्थापना करण्या-करतां अर्जुनासारख्यांना श्रीकृष्णाच्या सांगण्यावरून युद्धेंहि करावीं लागलीं आहेत.* ते व्यावहारिकांचें राजकारण अगर धर्मकारण होतें, तपस्व्यांचें नव्हतें. त्यावेळीं अहिंसेच्या प्रतिकाराची कल्पना जर प्रचारांत असती तर श्रीकृष्णानें अर्जुनाला आपल्या नातलगांना ठार मार, त्यांना ठार मारणें ही हिंसा नाहीं असें सांगितलें नसतें आणि

* श्री. द. के. केळकर यांनीं आपल्या संस्कृति संगमांत हिंदुस्थानांतील राजकारणाची जो शहारे आणणारा इतिहास दिला आहे, त्यावरून लेखकाला व वाचकांनाहि हिंदु संस्कृति ही आध्यात्मिक संस्कृति कशी म्हणावी हा विचार पडतो. पण राजे किंवा धर्म गुरु किंवा व्यापारी हे संस्कृतीचें आदर्श नसतात, हिंदुस्थानांत ते आदर्श होऊं शकले नाहींत म्हणूनच आपली दुर्दशा झाली.

अर्जुनानेंहि माझ्या भावांच्या, मामांच्या, रक्तांत भिजलेले सुखभोग भोगण्याची मला इच्छा नाहीं असें म्हटलें नसतें. श्रीकृष्ण सर्वज्ञ होता, परमेश्वर होता, मग त्यानें अहिंसेचा प्रतिकार शोधून कां काढला नाहीं, असा आक्षेपक प्रश्न विचारतील. त्याला उत्तर काय देणार ? अर्जुनाला आजच्या युद्धांतील टँक्स्, मशीनगन्स, बॉम्ब्स, विमानें, पाणबुड्या श्रीकृष्णांनीं कां दिली नाहींत हा त्यावर प्रतिप्रश्न विचारतां येईल. किंबहुना भगवान् श्रीकृष्ण हे जर सर्व शक्तिमान होते तर त्यांनीं कौरवांना इच्छामात्रेंकरून नष्ट कां करून टाकलें नाहीं ? त्या काळांत अहिंसेच्या प्रतिकाराची कल्पना नव्हती एवढें खरें. ती जर असती तर गीतेंतील हिंसेचें प्रतिपादन करतांना भगवंताना या हिंसेभोंवतीं निषेधाची इतकी कुंपणें उभारावींच लागलीं नसतीं. युद्ध कर असें सांगतांना तत्त्वज्ञानालाच त्यांनीं सुरवात केली.कोण कोणाला मारणार; आणि कोण मरणार ? देह हा मर्त्यच आहे; सुखदुःखें समान मान आणि लाग युद्धाला, वगैरे वेदांत अहिंसेच्या प्रतिकाराला लागला नसता. कालानुरूप मार्ग बदलतात. कालच्या हिंसेचीं साधनें हीं आज अडगळींत पडतात. तसेंच आजची हिंसेची पद्धत उद्यां निरुपयोगी कां वाटणार नाहीं ?

म. गांधी हे नुसते तत्त्वज्ञ असते तर ते अरविंद बाबू,किंवा राम कृष्ण परमहंस, किंवा विवेकानंद,किंवा रवींद्रनाथ टागोर यांच्याप्रमाणें एकांतात बसले असते व आपल्या क्रियाशून्य आचरणानें अत्यंत पूज्य ठरले असते. पण ते भारतीय संस्कृतींत किंवा जगांत असणारा अहिंसेच्या प्रतिकाराचा अपुरेपणा काढून टाकण्याकरतां पुढें आले आहेत. भारतीय संस्कृतींत वाढलेल्यांनीं हिंसेचा उपक्रम करून पाहिला पण कुठेंच जमेना. आज बुद्धाचे गुलाम तर उद्यां मुसलमानांचे गुलाम तर परवा इंग्रजांचे गुलाम अशी व्यावहारिक दृष्ट्या आमची स्थिति झाली.

पूर्वीच्या संस्कृतीचें स्मरणहि नव्या पिढींतल्या लोकांना नको आहे. अर्थात त्यांच्यामुळें आमची संस्कृति जगणार किंवा मरणार नाहीं. पण पाश्चात्यांच्या वळणावर चाललेली ही गाडी आमची धार्मिक,आध्यात्मिक, आर्थिक व सांस्कृतिक हानि करीत आहे हें निश्चित. या साऱ्या संकटांतून सोडविण्याची शक्ति जर कोणांत असेल तर ती भारतीय संस्कृतींत

म्हणजेच आजच्या गांधीवादांत आहे. हा वाद माणसांत माणुसकी निर्माण करतो आणि त्याचीच आज सर्वत्र उणीव आहे. माणसेंहि देवत्व पावण्याऐवजी सैतान होत आहेत. गांधीवाद हा भारतीय संस्कृतीचें संपूर्ण स्वरूप आहे. आणि भारतीय संस्कृति म्हणजे आर्य संस्कृति, अनार्य संस्कृति, वेदोपनिषदांतील संस्कृति, बुद्ध,जैन संस्कृति, इस्लाम व खिश्चन संस्कृति या सर्व संस्कृतींतील उत्तमोत्तम तत्त्वज्ञान आहे. ह्या संस्कृति व धर्म वेगळे नाहींत, ते एक आहेत. तें एकीकरण आपल्याला गांधी तत्त्वज्ञानांत पहावयास सांपडतें. कदाचित् आपल्याला हें पटणार नाहीं; कारण कोणतीहि अत्यंत शुद्ध व अत्यंत पवित्र वस्तु व्यावहारिकांस पटत नसते. त्यामुळें गांधीवाद कदाचित् रूढ होणार नाहींहि. पण एवढी गोष्ट आपल्याला निश्चितपणें कबूल करावी लागेल कीं, गांधीवाद हा भारतीय संस्कृतीचा आधुनिक काळांतील एक उज्ज्वल प्रकाश आहे. त्यानें ती संस्कृति खडबडून जागी केली आहे व जगालाहि विचार करायला लावलें आहे.

समाजसत्ता व गांधीवाद : : १२

मुझे यंत्रोंपर कोअी इतराज नहीं है, बल्कि यंत्रों के खब्त पर। मिहनत बचानेवाले यंत्रोंका खब्त आज हमपर सवार है। हम परिश्रम बचाने चले जाते है, और नतीजा यह होता है कि हजारों लोक बेकार हो जाते है और रोटी के लिये मुंहताज होकर कुत्ते के मौत मरते हैं। मैं श्रम और समय मानवता के किसी खास टुकडे के लिये नहीं बल्कि सबके लिये बचाना चाहता हूं। मैं मुठ्ठीभर लोगोंके हाथोंमें संपत्तीका संग्रह नहीं देखना चाहता, बल्कि सभी के हाथों में।

फेब्रुवारी १९३८. म. गांधी.

मागील भागांत पाश्चात्य संस्कृति ही अर्थप्रधान व कामप्रधान आहे असें सांगितलें. वास्तविकपणें अर्थ किंवा काम यांबद्दल वैषम्य वाटण्याचें कारण नाहीं. संस्कृतीच्या मूलभूत स्वरूपावरून तेथील आजच्या लोकांची योग्यता ठरविणें बरोबर होणार नाहीं. नुसती संस्कृति उच्च दर्जाची असेल व जनता हीन दर्जाला गेली असेल तर संस्कृति मोठी होती, एवढ्याकरतां जनतेचें कौतुक करणें चूक होईल. अर्थप्रधान व कामप्रधान संस्कृति म्हटली कीं तेथील लोक दुराचारी, पतित, स्वार्थी

असतात असें मानण्याचें कारण नाहीं. व्यवहारांत द्रव्यार्जन हें करावेंच लागतें आणि जगच्चक्र चालू ठेवावयाचें असल्यास काम हा चालू रहातोच. पण अर्थसंपादन काय किंवा काम काय दोहोंमध्यें विवेक नसेल आणि अनासक्त बुद्धि नसेल तर तो पुरुषार्थ समाजाला घातक होईल. एरवीं अर्थप्रधान व कामप्रधान संस्कृतीला भिण्याचें कारण काय ?

धर्माचा उपयोग नुसता मोक्षाकरतां आहे असें नाहीं. धर्माचा उपयोग आर्थिक नियंत्रणाकरतां केला पाहिजे. व्यापार व उत्पत्ति यांत धर्माचें पालन होऊं शकत नाहीं, असें व्यापारी व उत्पादक म्हणतील. सारा समाज जोंवर सुधारत नाहीं, तोंवर आम्ही सुधारणार नाहीं असें व्यापारी म्हणूं शकतात. त्यांच्या दृष्टीनें विचार केल्यास त्यांत काय चूक आहे ? पण धार्मिक दृष्टीनें विचार केला तर त्यांचें म्हणणें चूकच आहे. ' जो धर्म व्यवहारांत आणला जाऊं शकत नाहीं, तो धर्म नाहीं.' तसेंच ' अनासक्तीनें जें कर्म केलें जात नाहीं, तें कर्म त्याज्य आहे. '* तेव्हां व्यापार करायचा असला तर तो अनासक्तीनें केला पाहिजे व धार्मिक बुद्धीनें केला पाहिजे. हीं बंधनें पाळणारी संस्कृति जरी अर्थ-प्रधान व कामप्रधान असली तरी ती समाजाच्या ऐश्वर्याला व श्रेयसालाच कारणीभूत होईल.

समाजसत्तावादाचा गांधीवादाच्या दृष्टीनें विचार करण्यापूर्वी समाज व व्यक्ति यांच्या अन्योन्य संबंधाबद्दल उल्लेख करणें जरूर आहे. देशांत महत्त्व कोणाला ? व्यक्तीला का संस्थेला ? राज्यसंस्थेंत अगर अन्य संस्थेंत अत्यंत निर्दोष असे नियम केले असें आपण समजूं. पण त्या नियमांचें पालन करणाऱ्या व्यक्ति जर चारित्र्यहीन असतील तर ती संस्था कोलमडून पडल्याशिवाय रहाणार नाहीं. तेव्हां आपण व्यक्तीकडे वळतों. व्यक्ति ही अत्यंत श्रेष्ठ व चारित्र्यसंपन्न असेल आणि संस्था तितकी सुधारलेली नसेल तर समाजांत काय स्थिति होईल ? आपण उदाहरणच घेऊं. आज काल समाजसत्तावाद नांदत असलेल्या राष्ट्रांत निर्दोष राज्यपद्धति आहे, असें राज्यशास्त्रज्ञ सांगतात. पण या पद्धतीचे घटक जर त्या पद्धतीच्या

* अनासक्ति योग—गांधीजी.

मूळावरच आघात करणारे असतील म्हणजे ते अर्थ संचय करणारे, स्वार्थी, विषमता पाळणारे आणि साम्राज्यशाही धोरणाचे असतील तर तीं राज्य पद्धत टिकावूं होणार नाहीं. स्टॉलीनसारखा रशियाचा कुल-मुखत्यार. पण त्यानें आपली सत्ता कायम टिकवण्याकरतां हजारों नव्हे, लाखों लोकांची कत्तल केली. तो इतिहास अत्यंत भयप्रद व चांगलासा उजेडांत आलेला नाहीं. व्यक्तिधर्मांतून राष्ट्रधर्म हा वाद निर्माण करूं इच्छितो. इतर वाद हे राष्ट्रधर्मांतून व्यक्तिधर्माकडे येतात. जर समाज-सत्तावाद टिकवण्यास व फोफावण्यास लाखों लोकांच्या रक्तमांसांच्या खताची जरूरी लागते तर असलीं राज्यें चांगलीं म्हणून त्यांची स्तुति करण्याची अवश्यकता काय ?

गांधीवाद हा व्यक्तिनिष्ठवाद आहे. तो व्यक्तीच्या सुधारणेकडे अत्यंत लक्ष देतो. ब्रिटिशांची राज्यपद्धति सैतानी आहे पण ब्रिटिश लोक सैतानी आहेत असें गांधी म्हणत नाहींत. त्या व्यक्तींचें हृदय-परिवर्तन घडवून आणणें हा राज्यकारभारांत सुधारणा घडविण्याचा मार्ग. हें हृदय-परिवर्तन करणाऱ्या व्यक्ति आदर्श असल्या पाहिजेत. तेव्हां असलेलें राज्य टिकविणें असो किंवा गेलेलें राज्य परत मिळविणें असो; व्यक्तींचें श्रेष्ठत्व हेंच या वादांत महत्त्वाचें आहे.

समाजसत्तावाद निर्माण व्हावयाला मुख्य कारण जें झालें आहे तें खासगी संपत्तीचा संग्रह. संपत्ति निर्माण करणारीं साधनें हींहि संपत्तीच आहेत. या संपत्तीची व संपत्तीच्या साधनांची मालकी ही समाजाची असावी असें समाजसत्तावाद म्हणतो. गांधीवाद खाजगी व्यक्तींना नीतिनियमा-नुसार संपत्ति संपादन करूं देईल. पण ती संपत्ति त्याच्या जवळ एक निधि-धारक (ट्रस्टी) म्हणून ठेवील. या संपत्तीचा विनियोग त्यानें जनतेच्या करतां केला पाहिजे, स्वतःसाठीं करतां काम नये असा गांधींचा स्पष्ट निर्देश आहे. ही संपत्ति स्वतःकरतां वापरतां येत नसल्यामुळें तो श्रीमंत माणूस इतरांना पिळून काढणार नाहीं अशी अपेक्षा आहे. अर्थात् कायद्यानें या गोष्टी कराव्या असें गांधी म्हणत नाहींत. श्रीमंत व्यक्ति इतक्या नीतिमान नसल्यामुळें त्या जनतेची पिळवणूक करणें काय, किंवा कामगारांचें रक्तशोषण करणें काय, किंवा सार्वजनिक निधि म्हणून

तो धारण करणें काय, या बाबतींत बिलकूल विश्वासार्ह नसतात. म्हणून हा निधिधारकत्वाचा सिद्धांत फोल आहे असा त्यावर समाजसत्तावादी आक्षेप घेतात. त्यांचा तो आक्षेप सर्वस्वीं खोटा आहे, असें कोण म्हणेल ? पण गांधीवादाला कायद्यानें मनुष्याचें शील किंवा चारित्र्य सुधारतें असें वाटत नाहीं. त्यामुळें समाजसत्तावाद्यांनीं जरी संपत्तीचें नियंत्रण करण्याकरतां कायदे केले असले तरी तसले कायदे समाजांत कायमची बदल घडवून आणूं शकणार नाहींत, असें गांधीवाद म्हणतो. अर्थात् गांधीवादाला संपत्तीच्या नियमनाकरतां अद्याप परिणामकारक होईल, असा उपाय सांपडला नाहीं. आणि गांधीवाद जोंपर्यंत संपूर्णतया यंत्राचा विरोधक बनला नाहीं, तोंपर्यंत त्याला असा उपाय सांपडणेंहि कठीण आहे. यंत्र पूर्वकालांत श्रीमंत लोक होते व ते धनसंचय करीत होते. पण तो श्रीमंत वर्ग राष्ट्राला मारक होत नव्हता. आजच्या श्रीमंतांच्या मानानें ते भिकारीच होते. आजच्या यंत्रयुगांतील श्रीमंत माणूस सबंध राज्यचें राज्य चालवतो. रूझवेल्ट काय, चर्चिल काय किंवा हिटलर काय हे त्यांच्या मागें असलेल्या कोट्याधीशांच्या सल्ल्यानें चालतात. युद्धांत कोटी कोटी रुपयांचीं शस्त्रास्त्रें व दारुगोळा खपतो. हे मृत्यूचे व्यापारी आपल्या मुत्सद्यांना युद्धें करावयास आणि झुंझावयास भाग पाडतात. चिमूटभर श्रीमंतांच्या हातांत जर्मन, इंग्लंड, अमेरिकेसारखीं राष्ट्रें आहेत व त्यांच्याच कारवाईमुळें हीं युद्धें होत असतात. इंग्लंड किंवा अमेरिकेचा एखादा मोठा भांडवलवाला हिंदुस्थानांतील सारे भांडवलवाले एका सौद्यांत रोखीनें खरेदी करील ! एकट्या इंग्लंडनें २ वर्षें हें युद्ध चालवलें व रोज २० कोट रुपये खर्च केला. गेल्या दोन वर्षांत इंग्लंडचें १५००० कोटी रुपये या युद्धापायीं गेले. त्याशिवाय किती घरेंदारें, जहाजें आणि कारखाने यांचें नुकसान झालें असेल याचा हिशेबच नाहीं. हिंदुस्थानांतहि हे प्रश्न येतील. येथें असंख्य कारखाने निघणार आहेत आणि लष्कराकरतां शस्त्रसामुग्रीहि तयार होणार आहे. अर्थात् हिंदुस्थान स्वतंत्र झाला तरच ह्या गोष्टी होतील. पण येथें आज ना उद्यां पाश्चात्य राष्ट्रांतील परिस्थिति अवश्य निर्माण होईल. त्या वेळीं हिंदुस्थान भांडवलशाही राष्ट्र होणार, का समाजसत्तावादी राष्ट्र होणार

का गांधीवादी राष्ट्र होणार हा प्रश्न उद्भवल्याशिवाय रहाणार नाहीं. आजच भांडवलशाही का समाजसत्ताशाही या वादाचे चटके बसूं लागले आहेत. जसजशी संपत्ति वाढत जाईल व जसजसे आपण श्रीमंत होत जाऊं तसतसे हे प्रश्न आपल्यापुढें उभे राहतील.

गांधीवाद त्याला काय उत्तर देणार हा प्रश्न आहे. गांधीवाद वैयक्तिक चारित्र्यावर भर देतो हें वर सांगितलेंच. पण एखादी व्यक्ति जरी पिळवणूक करणारी असली तरी निधिधारणेचें तत्त्व यशस्वी होणार नाहीं. समाजांत जसजशी सत्य व अहिंसेचीं तत्त्वें प्रसृत होतील तसतशीं उच्च दर्जाचीं माणसें निर्माण होतील व हा सिद्धांत यशस्वी होईल.

पण यंत्रें चालवा, त्यांपासून प्रचंड संपत्ति निर्माण करा व ती संपत्ति 'निधिधारक' म्हणून स्वतःजवळ ठेवा, याऐवजीं यंत्रांना सर्वस्वीं विरोध केला तर ? गांधीवाद हा यंत्रविरोधी वाद नाहीं असें सांगितलें जातें. आगगाड्या, मोटारी, मोठालीं जहाजें, विमानें, साखरेचे कारखाने, छापखाने, लोखंडाचे कारखाने, खाणी, वगैरेंना विरोध करावयाचें म्हटलें तर तें शक्य नाहीं. याकरतां गांधीवाद जर तडजोड म्हणून यंत्रविरोध करीत नसेल तर गोष्ट वेगळी. तो व्यवहार म्हटला जाईल. कदाचित् तडजोडीकरतां हे मोठाले धंदे राष्ट्राला आपल्या मालकीचेहि करावे लागतील. त्या धंद्यांची मालकी जर राष्ट्राकडे गेली तर तेवढ्यापुरता समाजसत्तावाद राष्ट्राला मान्य करावा लागेल. इतर धंद्यांच्या बाबतींत काय करणार ? यंत्रांना परवानगी देणार का बंदी करणार ? अर्थात् कायद्यानें ह्या गोष्टी करण्याविरुद्ध गांधीवाद असल्यामुळें तो फारतर बिनयंत्रानें चालविल्या जाणाऱ्या धंद्यांना संरक्षण व उत्तेजन देईल. त्यामुळें हस्तव्यवसाय वाढतील, ग्रामोद्योगाचें पुनरुज्जीवन होईल आणि संपत्तीच्या साधनांचें केंद्रीकरण न होतां विकेंद्रीकरण होईल. तेव्हां मुख्य मुख्य उद्योगधंदे राष्ट्राच्या मालकीचे व इतर धंदे बिनयंत्राचे असा जर भेद केला तर खासगी व्यक्ति ह्या भयंकर श्रीमंत होणार नाहींत. कोणते धंदे राष्ट्राच्या मालकीचे करावयाचे व कोणते हातानें करावयाचे याचें स्पष्ट निदर्शन व्हावयास पाहिजे. उदाहरणार्थ खादीचा धंदा घेतला तर त्याला संरक्षण म्हणून देशी गिरण्यांवर सपाटून जकात बसवली पाहिजेत. गिर-

णीचा माल खादीच्या मालापेक्षां महाग केला पाहिजे. त्यामुळें चढा-ओढीचें तत्त्व दूर पडेल; पण त्याला इलाज नाहीं.

अशा प्रकारें एक तर अनासक्त वृत्तीची शीलवान माणसें तयार होणें हा एक संपत्तीच्या दुष्परिणामाविरुद्ध उपाय आहे किंवा दुसरा यंत्राविरुद्ध हस्तव्यवसायांना उत्तेजन देण्याचा उपाय आहे. पहिला उपाय परिणाम-कारक व्हावयास फार काल वाट पहावी लागेल, आणि तितकी वाट पाहूनहि अपेक्षेप्रमाणें फल येईलच असें सांगवत नाहीं. दुसरा उपाय हा बराचसा यशस्वी होईल. त्यामुळें हस्तव्यवसाय व यंत्रें यांच्यामध्यें युद्धें होतील हें खरें, पण सरकार जर दारिद्र्याच्या नाशाकरतां यंत्राला विरोध करील तर त्यांत अपयश येणार नाहीं. पण याहि मार्गांत लहानसहान यंत्रांचें उच्चाटन होईल असें नाहीं. कारण हस्तव्यवसायांना मिळालेल्या संरक्षणाविरुद्ध यंत्रें लढत राहतील हें निश्चित आहे.

पण केव्हां ना केव्हां असा वाद निघण्याचा संभव आहे कीं जो सर्वच लहान-मोठ्या यंत्रांचा विरोधक होईल. वास्तविक गांधीवादानेंच यंत्राला सर्वस्वीं विरोध करावयास हवा. तो विरोध आगगाडीला जितका करावयास हवा, तितका साध्या यंत्रालाहि करावयास हवा. ज्या वेळीं असत्य व हिंसा यांचे यांत्रिक संस्कृतीमध्यें असणारे सूक्ष्म जंतु नष्ट होतील त्यावेळीं यंत्रें हीं संहारक न ठरतां संरक्षक ठरतील. पण ही शक्यता दिसत नाहीं. गांधीवादांतील ' पूर्ण मनुष्य ' लवकर निर्माण होणें जितकें शक्य आहे, तितकेंच यंत्रें हीं संरक्षक होणें शक्य आहे. यंत्रांतील मानवी जीवनाची व उद्योगधंद्याची संहारक शक्ति लक्षांत घेऊनच यंत्रांना विरोधी असें तत्त्वज्ञान पुढें मागें निर्माण होईल.

समाजसत्तावाद हा यंत्रविरोधी नाहीं एवढेंच नव्हे तर यांत्रिक उत्पाद-दनाशिवाय समाजसत्तावाद मूळ धरूंच शकत नाहीं. गांधीवाद हा बरा-चसा यंत्रविरोधी आहे. त्यामुळें गांधीवाद व समाजसत्तावाद यांत तडजोड होणें कठीण आहे. तसेंच समाजसत्तावाद हा एक बौद्धिक, व आधिभौतिक वाद आहे. गांधीवादाची उभारणी सर्वस्वीं आध्यात्मिक जीवनावर आहे. गांधीवाद ईश्वर मानतो, आत्मा मानतो, मोक्ष मानतो,

पापपुण्य, अनासक्ति, प्रार्थना, वगैरे मानतो; तसा समाजवादाचा विश्वास नाहीं. समाजवाद बुध्दीला पटेल तीच गोष्ट खरी मानतो. या मूलभूत फरकामुळें दोन्ही वादांची तडजोड होणें कठीण आहे.

गांधीवादी साधनाबद्दल अत्यंत सावध असतात तसें समाजवादी नसतात. अहिंसेनें ध्येय साध्य होवो किंवा हिंसेनें होवो, सत्यानें होवो अगर असत्यानें होवो, त्याबद्दल गांधीवाद जसा व जितका आग्रह धरील तसा समाजवाद धरणार नाहीं. गांधीवादाला सर्व मानवी जीवन बदलावयाचें आहे. पण समाजवादाला भांडवलशाही व साम्राज्यशाही नष्ट करावयाची आहे. त्यांना असें वाटतें कीं, ऐतिहासिक प्रवृत्ति बदलली, परिस्थिति पालटली म्हणजे समाज सुधारेल. परिस्थिति बदलणें हें ते महत्त्वाचें कार्य समजतात. ही परिस्थिति लोकांच्यामध्यें असलेला असंतोष व विरोध भडकवून बदलतां येते. भविष्यकालीन राज्य तुमचें आहे व तें राज्य तुमच्या सर्व आशा-आकांक्षा पुरें करील असें कामगार व शेतकऱ्यांना सांगितलें जातें. समाजसत्तावाद्यांचें स्वराज्य हें आधिभौतिक सुखाचें उच्च स्थान आहे. प्रत्येक माणसाला सिनेमा, शिक्षण, हक्काची रजा, उत्तम अन्न, हवा खाण्याच्या ठिकाणीं जाण्याला परवानगी, नीटनेटके कपडे, सुखाचीं वहानें वगैरे समाजसत्ता राज्यपद्धतींत मिळतील. गांधीवादांत काय आहे? संयम, कष्ट आणि सेवा.

समाजसत्तावादांत गरीब, श्रीमंत असे वर्गभेद केले जातात. धनिक वर्गाचें उच्चाटन हें या सिद्धांताच्या यशस्वितेला आवश्यक मानलें जातें. वर्गकलहापासून समाजसत्तावाद अलिप्त राहूं शकणार नाहीं. पण गांधीवाद हा वर्ग समन्वय करणारा वाद आहे. तो माणसामाणसांत भेद पाडण्याऐवजीं त्यांच्यांत सलोखा व सख्य घडवून आणूं इच्छितो. व्यक्तीच्या चारित्रांत त्यागानें व सेवेनें फरक घडवून आणतां येतो असा गांधीवादाचा विश्वास. तेव्हां वर्गकलह व वर्गसमन्वय अशीं या दोन वादांचीं परस्परविरोधी स्वरूपें असल्यामुळें त्यांच्यांत तडजोड होणें कठीण आहे.

आज हिंदुस्थानांत गांधीवादी व समाजसत्तावादी हे दोघेहि आपापल्या तत्त्वज्ञानाला मुरड घालून कॉंग्रेसच्या समायिक बैठकीवर

बसले आहेत. ते गांधींच्या नेतृत्वाखालीं सरकारबरोबर लढतहि आहेत. पण त्यांच्यांत मौलिक भेद नाहींत असें नाहीं. समाजसत्तावादी आज खादी वापरत असला तरी गरिबीवर तो खरा उपाय नाहीं असें म्हणतोच. दोघांचींहि अंतःकरणें गरिबांची गरिबी पाहून व्यथित होतात. पण समाजसत्तावादी आपलें अंतःकरण जास्त तुटतें असें म्हणतो आणि आपला मार्ग जास्त शास्त्रशुद्ध आहे असें सांगतो. समाजसत्तावाद्यांच्या भावना शुद्ध व कळकळीच्या नाहींत असें कोणी म्हणत नाहीं. त्यांच्यातहि उच्च नीतिमत्तेचीं माणसें आहेत. पण दोन्ही वादांत मूलग्राही व महत्त्वाचे फरक आहेत.

गांधीवादी हा कितीहि अपरिग्रही असला व आपण संपत्तीचें निधिधारक आहों असें मानत असला तरी तो रूढ अर्थानें समाजसत्तावादी ठरत नाहीं. कारण समाजसत्तावाद हा एक शास्त्रीय वाद आहे. तो जरी पूर्णावस्थेला गेला नसला तरी जीवनाचें एक तत्त्वज्ञान त्या वादानें निर्माण केलें आहे. जगांतील बहुतेक देश या वादाकडे फक्त आर्थिक दृष्टीनें बघतात आणि विद्यमान आर्थिक शास्त्रामध्यें तो परिपूर्णावस्थेला गेला आहे असें समजतात. प्रत्येक दरिद्री माणूस हा समाजसत्तावादी नसतो. तो जर खासगी संपत्तीचा पुरस्कार करीत असेल तर त्याचें दारिद्य त्याची समाजवादीवृत्ति सिद्ध करणार नाहीं. गांधीवाद हाहि असाच एक जीवनाचा वाद आहे. तोहि शास्त्रीय दृष्ट्या पूर्णत्वाला जात आहे. या वादांत जुन्या अध्यात्मशास्त्राला उजळा देण्यापेक्षां नवें असें कांहींच नाहीं. गांधींनीं त्याला व्यवहारांत आणून सोडला व सामान्य जीवनाचा दर्जा खूपच उंचविण्याचा प्रयत्न केला. समाजसत्तावादी हे कितीहि नीतिमान असले, तरी ते गांधीवादांतील श्रद्धा आत्मसात् करूं शकत नाहींत. बुद्धिग्राह्य तेंच सत्य असा त्यांचा मार्ग आहे. गांधी हे श्रद्धा मानीत असले तरी बुद्धिप्रामाण्य मानीत नाहींत असें नाहीं. ते तर्ककर्कश नाहींत हाच दोघांत फरक.

समाजसत्तावादानें गांधीवाद पत्करावयाचा म्हणजे आध्यात्मिक विचारसरणीचा स्वीकार करावयाचा. त्याचप्रमाणें गांधीवादानें समाज-

सत्तावादाचा स्वीकार करावयाचा म्हणजे आधिभौतिक भूमिकेवर यावयाचें. अशा प्रकारची तडजोड ही काल्पनिकच ठरेल. तशा तडजोडींत जिवंतपणाचा अभाव दिसून येईल. वर दिलेल्या सर्व कारणांचा विचार करतां प्रत्येक वाद हा स्वतंत्रपणेंच वाढत जाणार आहे. साध्य, साधन वगैरेमध्यें मूलभूत फरक दृष्टीस पडत असल्यामुळें त्यांच्यांत सलोखा राहिला म्हणजे पुष्कळ झालें. जगांत जर अहिंसा व सत्य नांदावयाचें असेल तर व्यक्तींचें चारित्र्य सुधारणें हें अधिक जरूर आहे. अशा चारित्र्यसंपन्न व्यक्तींचा समाज बनत गेला म्हणजेच परस्परांना परस्परांबद्दल जिव्हाळा व प्रेम वाटेल, भावना जागृत होतील आणि कर्तव्यबुद्धि कार्यक्षम होईल. कायद्यानें एखादी सुधारणा होण्याऐवजीं प्रेमानें झालेली बरी.

अहिंसेचें स्वातंत्र्य : : १३

A spirit of self help, a sense of self confidence, and a consciousness of the nation's inherent strength are to be created in the people.

K. G. Mashruwalla.

विधायक कार्यक्रमाला म० गांधी अहिंसात्मक स्वातंत्र्य म्हणतात. पुष्कळांना विधायक कार्यक्रमाचा आणि स्वातंत्र्याचा संबंध नाहीं असें वाटतें. स्वातंत्र्याचा अर्थ ते ब्रिटिशांच्या पारतंत्र्यांतून मुक्तता असा करतात. असें पारतंत्र्य घालवण्याकरतां पूर्वी कांहीं राष्ट्रांनीं गुप्त कट केले, हातांत शस्त्रें घेतलीं. आतां आपल्याला तें शक्य वाटत नाहीं म्हणून म्हणा, किंवा सशस्त्र बंडाचे पुढारीपण घेणारा कोणी नाहीं म्हणून म्हणा, किंवा गांधींचा मार्ग बुद्धीला पटला आणि तो आचरला गेला म्हणून म्हणा कॉंग्रेसनें अहिंसावादाचा स्वीकार केला. ह्या अहिंसात्मक

कायदेभंगाच्या पलीकडे मात्र जाण्याची कोणाची तयारी नाहीं. सामुदायिक कायदेभंग केला म्हणजे पूर्ण स्वराज्य आपल्याला मिळेल असें काँग्रेसमधील बऱ्याच जणांना वाटतें. पण म० गांधींना तसें वाटत नाहीं.

म० गांधींनीं कायदेभंगाचे तीन प्रकार केले आहेत. (१) स्थानिक गाऱ्हाणें दूर करण्याकरतां, (२) स्थानिक जागृति करावी म्हणून आत्मनाशाच्या तयारीनें केलेला आणि (३) स्वातंत्र्याकरतां. पहिल्या व दुसऱ्या प्रकाराला विधायक कार्यक्रमाची जरूरी नाहीं. चंपारण्यांत गांधी जे सत्याग्रहाला प्रवृत्त झाले ते आत्मार्पण करण्याच्या बुद्धीनें. त्या वेळीं चंपारण्यांत विधायक कार्य किती झालें आहे, याचा विचार त्यांनीं केला नव्हता. तशी स्थिति स्वातंत्र्याकरतां करावयाच्या कायदेभंगाची नाहीं.

स्वातंत्र्याकरतां कायदेभंग करणें याला गांधी म्हणतात अर्थहि नाहीं. कायदेभंगाचा अंतिम हेतु किंवा अंतिम परिणाम स्वातंत्र्य होऊं शकेल. पण हा परिणाम व्हावा म्हणून स्वातंत्र्याच्या लढ्याला योग्य स्वरूप दिलें पाहिजे. १९३० चा लढा हा मिठाचा प्रश्न हातीं घेऊन आणि १९४० चा लढा भाषण-स्वातंत्र्याचा प्रश्न हातीं घेऊन लढवला गेला. ह्या दोन्ही लढयांचा हेतु स्वातंत्र्यप्राप्ति होता. एखाद्या विशिष्ट प्रश्नावर शक्तिसर्वस्व वेचलें म्हणजे जनता लढण्याला प्रवृत्त होते आणि अधिकारीहि डळमळूं लागतात. ह्या क्रमानें जर आपण एकेक जागा जिंकत गेलों व अधिकाऱ्यांना नमवीत गेलों तर त्याचा शेवट स्वातंत्र्यांत होतो. अधिकारी वर्गाचें नीतिधैर्य नष्ट करणें आणि जनतेचें नीतिधैर्य वाढविणें हा या लढ्याचा उद्देश असतो.

जनतेला स्वातंत्र्याकरतां कराव्या लागणाऱ्या ह्या लढ्याचा क्रम मान्य होतो. पण त्यांना जर कांहीं पटत नसेल तर विधायक कार्यक्रम. म. गांधी तर विधायक कार्यक्रमाला इतकें महत्त्व देतात कीं, तो कार्यक्रम पुरा केला म्हणजे कायदेभंग करण्याची जरूरीच नाहीं असें त्यांना वाटतें. विधायक कार्यक्रम म्हणजेच अहिंसेचें स्वराज्य आहे. अशा प्रकारचा विधायक कार्यक्रम राष्ट्र किंवा व्यक्ति पूर्णांशानें पार पाडूं शकत नाहींत, म्हणूनच कायदेभंगाची जरूरी लागते.

तेव्हां विधायक कार्यक्रमाची अपूर्णता ही कायदेभंगाला कारणीभूत होते. पण कायदेभंगाला जर विधायक कार्यक्रमाचा पाया नसेल तर तो कायदेभंग यशस्वी होणार नाहीं. सशस्त्र युद्ध यशस्वी होण्याला सुद्धां विधायक कार्यक्रम लागतो. जेव्हां आठ दहा नागरिक कारखान्यांत किंवा शेतावर राबतात, तेव्हां एक शिपाई लढूं शकतो. युद्धाच्या सामानाची उणीव भासूं लागली म्हणजे मोठा योद्धा असला तरी त्याला माघार घ्यावी लागते. अहिंसेचें युद्ध हें पूर्व-तयारीशिवाय व जनतेच्या पाठिंब्याशिवाय लढतां येईल ही समजच चुकीची आहे. जनतेचा पाठिंबा हा नुसता तोंडाचा पाठिंबा नसावा. तसाच तो आंधळेपणानें दिलेला पाठिंबा नसावा. तो बुद्धीला पटलेला आणि उघड्या डोळ्यानें दिलेला पाठिंबा असावा.

विधायक कार्यक्रमाची परिपूर्णता झाली म्हणजे स्वातंत्र्याकरतां लढ-ण्याची जरूरी नाहीं असें जे महात्माजी म्हणतात, त्याचा अर्थ समजून घेतला पाहिजे. स्वातंत्र्य हें कशाकरतां हवें असतें ? कोठल्याहि राष्ट्रां-तील व्यक्तींच्या कांहीं गरजा असतात व कांहीं मूलभूत हक्क असतात. प्रत्येक माणसाला अन्न, वस्त्र, घर, शिक्षण, यांची जरूरी असते. तसेंच त्याला लेखन, भाषण, संघटना स्वातंत्र्य लागतें. आर्थिक व सामाजिक समतेचीहि त्याला जरूरी असते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे व्यक्तीच्या किंवा समाजाच्या विकासाला पूर्ण वाव मिळणें याचाच अर्थ स्वातंत्र्य मिळणें होय. या विकासाच्या आड स्वकीय किंवा परकीय आले म्हणजे संघर्षाला सुरवात होते. पारतंत्र्यामध्यें अनेक कायद्यांच्या आणि शास्त्रां-च्या सिद्धतेनें ही विकासाची प्रक्रिया गुदमरून टाकली जाते, म्हणूनच समाज क्रांतीकडे झुकूं लागतो.

विधायक कार्यक्रम करणें याचा अर्थ आत्मविकासाची प्रक्रिया पुरी पाडणें. पण त्या नंतर असा एखादा प्रसंग येईल कीं, ज्या वेळीं अधि-काऱ्यांबरोबर दोन हात करावे लागतील. हा लढा पूर्ण अहिंसेनें लढणें अगदीं शक्य आहे व त्यांत यश मिळणें सुलभ आहे. आदर्श विधायक कार्यक्रम झाला म्हणजे काय होईल याचा आपण विचार करूं. जर समाजांत हिंदु–मुसलमान, स्पृश्य-अस्पृश्य यांचीं भांडणें नसतील, एवढेंच

नव्हे तर त्यांचें हार्दिक ऐक्य होईल, गरीब व श्रीमंत हे परस्परांना न लुबाडतां आर्थिक समता प्रस्थापित करतील, मृतावस्थेला पोहोंचलेल्या खेड्यांत नवचैतन्य संचरून तीं जर स्वयंपूर्ण होतील, देशांतील गोरगरीब वर्ग हा धर्मादायाच्या पैशावर नव्हे, पण काम मिळून जर प्राथमिक गरजा पुऱ्या पाडूं शकेल, जर निरक्षरता व अज्ञान यांचें उच्चाटन होईल, प्रत्येकाला आपल्या हक्काची जाणीव होऊन त्याच्या ठिकाणीं हे हक्क रक्षण करण्याला लागणारें आत्मबल संचरेल व आपल्या देशांतील बांधवांकरतां वाटेल तो त्याग करण्याची त्याची मानसिक वाढ होईल, तर त्या व्यक्तीवर, समाजावर किंवा राष्ट्रावर आक्रमण करणारी किंवा केलेली सत्ता कितीहि बलाढ्य असली तरी ती सत्ता टिकणार नाहीं. अशा प्रकारची आदर्श स्थिति येणें कठीण असतें. त्या स्थितींत निर्भयता असते व आत्यंतिक त्यागाला तयारी असते. विधायक कार्यक्रम याचा अर्थ व्यक्तीला किंवा व्यक्तिसमूहाला लागणाऱ्या वस्तूंची स्वयंपूर्णता असा संकुचित घेतला जाईल तर ती चूक होईल. या वस्तूंचें उत्पादन हें विशिष्ट जाणिवेनें झालें पाहिजे. एखाद्या गांवांत एकादा श्रीमंत गृहस्थ भांडवल घेऊन आला, त्यानें तेथें सारीं शेतें खरेदी केलीं, यांत्रिक माग घातले, लोकांना शिक्षण दिलें, स्पृश्यास्पृश्य, हिंदुमुसलमान हे भेद पैशाच्या मदतीनें मिटवले आणि इतर सुधारणा केल्या तर तें गांव आदर्श झालें असें आपण म्हणूं शकणार नाहीं. कारण त्या कार्यांत स्वावलंबन नाहीं, त्या कार्यामुळें निर्भयता, त्याग किंवा परस्परांबद्दल प्रेम हें उत्पन्न होऊं शकणार नाहीं. म्हणून त्याला विधायक कार्य असें गांधींच्या अर्थानें म्हणतां येणार नाहीं. ज्या कार्यानें आत्मविकासाची जाणीव होणार नाहीं तें विधायक कार्य नव्हे. सरकारी प्रयत्नानें आपण कोठें कोठें सहकारी पतपेढ्या, शेती सुधारणा मंडळें, शिक्षणप्रसाराच्या योजना वगैरे निघालेल्या पहातों, पण अशा प्रयत्नांचा परिणाम काय होतो हेंहि आपण पहातोंच. महात्माजी खादीचा प्रचार करतात व त्यानें स्वराज्य मिळेल असें सांगतात. त्यावर कांहींजण असें विचारतात कीं, पूर्वी आमच्या खेड्यांत चरखे व माग चालू असत, मग आम्ही परतंत्र कां झालों? त्याचें उत्तर

एकच. वस्तूंचें उत्पादन हें जर विशिष्ट भावनेनें झालें नसेल तर तें निरुपयोगी ठरेल. म्हणून महात्माजी म्हणतात, एखाद्या विधवेनें हातांत चरखा घेणें आणि पं. जवाहरलालनें चरखा घेणें यांत फरक आहे. ' विधवेला चरखा चार पैसे देईल, पण पं. जवाहरलाल यांच्या हातांतील चरखा हें स्वातंत्र्याचें साधन होईल. ' तेव्हां ज्या विधायक कार्यानें शक्तीची वाढ होणार नाहीं तें विधायक कार्यच नव्हें. विधायक कार्य करून आपण आपली शक्ति वाढवावयाची आहे आणि ती शक्ति निरनिराळीं कार्यें करून दृढ करावयाची आहे. विधायक कार्यानें आपण आपली शक्ति संघटित करणार आहों हें ज्याला पटलें नाहीं, तो विधायक कार्य करूंच शकणार नाहीं. परस्परांबद्दलच्या सद्भावना किंवा प्रेम हा या कार्याचा पाया आहे. ह्या सद्भावना व्यक्त करण्याचें साधन म्हणजे विधायक कार्यक्रम. त्या कार्यक्रमामधून स्वावलंबन, सहकार्य, स्वयंपूर्णता हीं निर्माण झालीं पाहिजेत. त्यांतून त्यागाची तयारी, निर्भयता आणि प्रतिकार-शक्ति हीं दृष्टीस पडली पाहिजे, आणि या सर्वांचा परिणाम स्वातंत्र्यांत झाला पाहिजे.

तेव्हां विधायक कार्यक्रमाचा प्रचार करणारांनीं ह्या गोष्टी लक्षांत ठेवावयास हव्या. हें विधायक कार्य जितक्या प्रमाणांत यशस्वी होईल, तितक्या प्रमाणांत स्वराज्य जवळ आणतां येईल. विधायक कार्यकर्ते हे शांति-सेनेचे शिपाई होतात आणि जितके शिपाई जास्त, तितकी यशाची खात्री अधिक. गांवागांवांतून जर ही स्वावलंबी वृत्ति संचरली, तर परक्या सरकारची सत्ता लुळी पडेल आणि अशा गांवांवर कितीहि जुलूम केले तरी त्यांच्या वृत्तीचा कणा मोडणार नाहीं. अशीं आदर्श गांवें निर्माण करणें हेंच विधायक कार्यानें साधावयाचें आहे.

हिंदुस्थान हा खेड्यांचा देश आहे. या खेड्यांना इंग्रजी अमलांत कीड लागली आहे. त्यांच्याकडे सरकार पहात नाहीं व त्यांच्या पुनर्घटनेचा विचार करीत नाहीं. त्यामुळें बहुतेक हिंदुस्थान मृत्युशय्येवर पडलेल्या एखाद्या आसन्नमरण रोग्याप्रमाणें झाला आहे. खेड्यांतील बुद्धिमत्ता, खेड्यांतील कौशल्य, तेथील कार्यकर्तृत्व यांचा नाश झाला आहे. तेथील निवडक माणसें शहरांत रहातात. त्यामुळें खेड्यांत चांगल्या माणसांचा अभाव

झाला आहे व या अभावामुळें खेड्यांत समाज विघातक अशा लोकांचें प्राबल्य झालें आहे. ही स्थिति सुधारावयाची असेल तर कर्तृत्ववान् माणसें खेड्यांत गेलीं पाहिजेत व तेथील जीवनाची घडी बसविली पाहिजे. शहरांत रहाणारा माणूस हें काम करूं शकणार नाहीं. सेवाग्राममध्यें गांधींचा रहाण्याचा उद्देश हाच आहे. सात लाख खेडीं व जास्तींत जास्त ५० मोठीं शहरें असा हा देश आहे.

गांधींच्या विधायक कार्यक्रमांतील कलमें हीं आर्थिक, सामाजिक व धार्मिक जीवन व्यापणारीं आहेत. त्या कलमांत वाढ करतां येणार नाहीं असें नाहीं. तशी वाढ कोणी केली तर त्याला गांधींचा विरोधहि होणार नाहीं. त्या कार्यक्रमाचा मूळ घटक खेडें हा आहे. खेड्यांत अजूनहि भयंकर अज्ञान व भयंकर दारिद्र्य आहे. समुद्राच्या पृष्ठभागावर जरी लाटांचा खळखळाट झाला, तरी आंतमध्यें जसा संथपणा असतो, तशी खेड्यांची स्थिति आहे. किती राज्यें आलीं आणि गेलीं तरी आमच्या खेड्यांवर त्याचा परिणाम झाला नाहीं. कांहींना आपल्यावर परक्यांचें राज्य आहे हेंहि माहीत नाहीं. शहरांतल्या बऱ्यावाईट संवयी तेथें गेल्या आहेत. शहरें व खेडीं ह्यांचें दळणवळण वहातुकीच्या साधनांमुळें वाढलें आहे, व पूर्वीचा अलिप्तपणा आतां जात चालला आहे हें खरें आहे. पण तेथें आळस, निराशा, उदासीनता व कार्यकर्तृत्वाचा अभाव हा अद्याप आहे तसाच आहे. जीवनाकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोण हा भीतिप्रद आहे. जीवन ही शिक्षा आहे असें समजणारे किती तरी लोक सांपडतील. ही खेड्यांतील जनता म्हणजेच हिंदुस्थान असल्यामुळें हिंदुस्थानांत जागृति करणें म्हणजे खेड्यांत जागृति करणें होय. ह्या जनतेकरतां स्वराज्याची अत्यंत निकड आहे.

खादी, ग्रामोद्योग हे गांधींच्या विधायक कार्यक्रमाचे मध्यबिंदु आहेत. शहरांत नसलेले व खेड्यांत असलेले असे दोन प्रश्न आहेत. शहरांत **हिंदु–मुसलमानांचे लढे** आहेत पण खेड्यांत नाहींत. तसेंच शहरांतून **अस्पृश्यता** नष्ट होत चालली असली, तरी खेड्यांत तिचा प्रभाव कमी झालेला नाहीं. **प्रौढ–शिक्षण** आणि **धंद्याच्या द्वारें शिक्षण** (Basic education) ह्याचाहि खेड्यांना जास्तींत जास्त उपयोग

आहे. राष्ट्रभाषा व स्वभाषा यांची जरूरी शहरांना जास्त आहे. स्त्रियांच्या समान हक्काला मान्यता, तसेंच आर्थिक समता हे शहर व खेड्यांना सारखेच लागूं पडणारे प्रश्न आहेत. खेड्यांचें आरोग्य व खेड्यांची स्वच्छता हे तर सर्वस्वी खेड्यांचे प्रश्न आहेत. दारूबंदी ही सर्वत्र सारखीच आहे.

अशा प्रकारें गांधींनीं ही जी तेरा कलमी यादी दिली आहे, ती खेड्यांच्या करतांच प्रामुख्यानें दिली आहे. त्यांनीं शेतकरी, कामकरी व विद्यार्थी यांच्याकरतां स्वतंत्र कार्यक्रम न देतां त्यांना हाच कार्यक्रम करण्यास सांगितलें आहे.

स्वराज्याच्या इमारतीचे हे तेरा मजले आहेत. यापेक्षां जास्त मजले बांधूं नयेत असें गांधी म्हणत नाहींत. या इमारतीचा पहिला मजला खादी आहे असें ते वारंवार बजावून सांगतात. त्यामुळें बाकीचे प्रश्न सोपे होतील अशी त्यांची धारणा आहे.

हा तेरा कलमी कार्यक्रम पार पाडला म्हणजे आपण स्वराज्य मिळवूं आणि मिळवलेलें स्वराज्य राखूं असें त्यांना वाटतें. ह्या कार्यक्रमाशिवाय स्वराज्य-प्राप्तीकरतां केले जाणारे प्रयत्न म्हणजे हातांवरून वारे गेलेल्या माणसानें चमचा उचलण्याचा प्रयत्न करण्यापैकीं आहे असें गांधी म्हणतात. तेव्हां हा कार्यक्रम विशिष्ट भावनेनें करावयाचा आहे; खेड्यांच्या पुनर्घटनेचा उद्देश त्यांत ठेवावयाचा आहे, आणि आर्थिक क्रांतीला सहाय्यभूत असणाऱ्या व समता स्थापन करणाऱ्या खादीला मध्यबिंदु कल्पावयाचें आहे. गांधींच्या विधायक कार्यक्रमाचें थोडक्यांत असें स्वरूप आहे.

युयुत्सु गांधीवाद : : १४

It is only by means of well and widely organised movements of non-violence that the populations of the world can hope to avoid that enslavement to the State which in so many countries is already an accomplished fact and which the threat of war and the advance of technology are in process of accomplishing elsewhere. Violence will merely produce the ordinary results of violence and the last state of the country will be worse than the first. This being so, non-violence presents the only hope of salvation.

A. HUXLEY
Ends and means
155-156

मै कहता हूं कि जीवन की जितनी विभूतियां हैं सब में अहिंसा का उपयोग है। याद रहे कि सत्य और अहिंसा मठवासी संन्यासियों के लिये ही नहीं हैं। अदालते, धारा सभायें और इतर व्यवहारोंमें भी ये सनातन सिद्धांत लागू होते हैं।

सर्वोदय–१-१९३८

म. गांधी हे अहिंसावादाचे पुरस्कर्ते म्हणून जसे ओळखले जातात. तसेच राजकारणाचे पुढारी म्हणून ओळखले जातात. राजकारणांत गांधींनीं अहिंसा आणली म्हणून त्यांचें महात्मेपण जास्त प्रासिद्धीला आलें. हिंदुस्थानांत म. गांधी हे राजकीय लढा लढत आहेत, म्हणून त्याच्यामागें असंख्य लोक आहेत. ते जर राजकारणांत आले नसते तर त्यांच्या लोकप्रियतेची व्याप्ति इतकी झाली नसती. या त्यांच्या लोकप्रियतेचें रहस्य ' अहिंसात्मक प्रातिकार ' यांतच आहे. गांधींनीं आतांपर्यंत अहिंसात्मक प्रतिकाराचे अनेक लढे लढवले. पण पुष्कळांना अद्याप हा मार्ग यशस्वी होईल, अशी खात्री वाटत नाहीं. त्यांना स्वाभाविकपणें असेंच वाटतें कीं, निःशस्त्र लोकांना कोणतीहि सशस्त्र सत्ता सहज जिंकू शकेल. इराण, अफगाणिस्थानसारखीं छोटींशीं सशस्त्र राष्ट्रेंहि हिंदुस्थानसारख्या मोठ्या राष्ट्राला पादाक्रांत करूं शकतील असा त्यांचा विश्वास आहे. निःशस्त्र राष्ट्र हें सशस्त्र जेत्या राष्ट्राच्या पकडींतून स्वतंत्र होऊं शकणार नाहीं, असेंहि त्यांना वाटतें. तेव्हां पारतंत्र्यांतून स्वातंत्र्यांत जाणें आणि स्वतंत्र झाल्यावर तें स्वातंत्र्य शस्त्रांशिवाय टिकवणें अशक्य आहे, असें बऱ्याच जणांचें म्हणणें आहे.

गांधीवादाची उपयुक्तता तशीच परीक्षा अहिंसात्मक प्रतिकारांत होणार आहे. हिंसेऐवजीं अहिंसेनें कार्य होऊं शकलें तर जगांतलें कोठलेंहि सुष्ट अगर दुष्ट राष्ट्र आपल्या लोकांचे प्राण रणांगणावर जाऊं देणार नाहीं. लोकांच्या तोंडचा घास काढून आज सर्व राष्ट्रें संहारक साधनें पुष्ट करीत आहेत. तेव्हां शांततेच्या काळांत लोकांना उपाशीं मारायचें आणि लढाईच्या काळांत त्यांचे प्राण घ्यायचे ही मोठीशी स्पृहणीय गोष्ट आहे असें त्यांचें मत नाहीं. प्राण घेण्यांत कोणालाहि आनंद होत नाहीं. पण प्राण घेतल्यानें लवकर काम होतें म्हणून लढाया व युद्धें केलीं जातात. पाश्चात्य राष्ट्रांत शांततावाद्यांचा एक पंथ आहे. हा पंथ रक्तपात टाळावेत या मताचा आहे. पण तो अहिंसावादाइतका विचारानें पुढें गेलेला नाहीं, आणि आचाराला तर त्यानें सुरवातहि केलेली नाहीं. निःशस्त्रीकरण करणें, राष्ट्रसंघासारखी संस्था स्थापणें, आंतरराष्ट्रीय सैन्य उभारणें, निःपक्षपाती वृत्तीचा आंतरराष्ट्रीय

न्यायाधीश नेमणें वगैरे पुष्कळ सूचना युद्धें टाळण्याकरतां करण्यांत येतात. पण ह्या सर्व योजना जरी प्रामाणिक असल्या तरी प्रतिपक्षाचें बल अशा युक्त्यांनीं कमी करावें हा त्यांत उद्देश नसतो असें नाहीं. तेव्हां जगांतील प्रत्येक राष्ट्राची वृत्ति जोंवर युद्धाकडे कललेली आहे तोंवर अशा शांतता स्थापनेच्या प्रयत्नांना यश येण्याची फारशी आशा नाहीं. त्यामुळें युद्ध हें अटळ आहे असें समजून चालणें जरूर आहे. युद्धें कमी होण्याऐवजीं युद्धाचीं संहारक साधनें हीं जास्त जास्त भीषण होत जाणार हेंहि धरून चाललें पाहिजे. अशा स्थितींत अहिंसात्मक प्रतिकार कसा टिकाव धरणार हा खरोखर विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

अहिंसात्मक प्रतिकार करणें याचा अर्थ स्वतःचें नुकसान होऊं न देतां यश पदरांत पडणें असा करतां कामा नये. हा प्रतिकार करणारांना पहिली गोष्ट कोणती करावयास हवी असेल तर आत्यंतिक त्यागाची. जीवनाबद्दलची आशा सोडल्याशिवाय असा प्रतिकार करतांच येणें शक्य नाहीं. हिंसात्मक प्रतिकारापेक्षांहि अहिंसात्मक प्रतिकारांत पहिल्या पहिल्यानें अधिक प्राणहानि होण्याचा संभव असतो. तेव्हां देहत्यागाला जो तयार होऊं शकतो, तोच अहिंसात्मक सैन्यांतला शिपाई होऊं शकतो. या दलांत हिंसादलाप्रमाणेंच शिस्त पाहिजे. आणि तिसरा गुण म्हणजे संयम पाहिजे. प्रतिपक्षी आपल्याला हिंसेला प्रवृत्त करण्याचा सतत प्रयत्न करीत राहील, त्या करतां तो चिडवील, राग उत्पन्न करील, द्वेष व तिरस्कार निर्माण करील. ह्या सर्व क्षोभजनक प्रकारांपासून अलिप्त राहावयाचें असेल तर संयम केला पाहिजे. अक्रोधानें क्रोध जिंकला पाहिजे. लढणाऱ्या शिपायांत प्राणत्यागाची तयारी व शिस्त असते. त्याचप्रमाणें अहिंसेनें लढणाऱ्या शिपायांत प्राणत्यागाची तयारी व शिस्त असणें जरूर असतें.

अहिंसात्मक प्रतिकार करणारांनीं परस्परांत पूर्ण अहिंसा वाढवली पाहिजे. जर आपसांत वागतांना हिंसावृत्ति असेल तर तो लढा कधींहि यशदायी होणार नाहीं. समाजाच्या घटकांनीं कोणत्याहि अधिकाराच्या जागेचा लोभ धरतां कामा नये, दुसऱ्यावर सत्ता गाज-

वण्याची इच्छा करतां कामा नये व त्यांच्यावर जबरदस्ती करतां कामा नये. मृत्यूला तयार असणारा मनुष्य भित्रा नसतो असें समजूं नये. भीतीवर जय मिळण्यास मनावर ताबा लागतो. तो ताबा नीतिमत्तेच्या वाढीशिवाय येत नाहीं. हिंसात्मक युद्धांत शिपाई बेभान होऊन लढत असतात. त्यांच्या मेंदूंत एक प्रकारची विकृति झालेली असते. अहिंसात्मक युद्धांतहि असा कैफ चढतो. भावनेचा प्रचंड सळसळाट दोन्ही प्रकारांत सारखाच बेभान करीत असतो. पण अहिंसात्मक प्रतिकार हा पुष्कळ वेळां अगदीं भावनारहित वातावरणांत करावा लागतो. त्या वेळीं तुमच्या प्रतिकाराला उत्तेजन देण्याऐवजीं विरोधच होत असतो. अशा वेळीं श्रद्धा हीच मदतीला येते. या श्रद्धेच्या बळावर तुम्ही प्रतिकार करीत रहातां. लोक तुम्हांला वेडे म्हणतात, तुमची निर्भर्त्सना करतात, किंबहुना तुमचा छळहि करतात. पण या सर्व संकटांना तोंड देऊन अंतरात्म्याच्या शांत प्रकाशांत आपण आपला मार्ग आक्रमत राहिलें पाहिजे.

आपसांत पूर्ण अहिंसेचें वातावरण हवें असतें असें वर सांगितलें. हें वातावरण कसें निर्माण होईल ? जेथें एकमेकांच्या स्वार्थाचा संघर्ष होतो तेथें हिंसावृत्तीची ज्वाला पेट घेते. हिंसेचें मूळ अर्थ व काम आहे. मोक्षाकरतां कोणी कोणाची हिंसा करीत नाहीं. पण धर्माकरतां हिंसा होते. तेव्हां धर्म, अर्थ व काम या तीन हिंसेच्या प्रेरक कारणांचा जर बंदोबस्त करतां आला तर आपसांत पूर्ण ऐक्य व अहिंसावृत्ति निर्माण होईल. चरख्याची संस्कृति ही आर्थिक कारणांकरतां जळणारीं अंतःकरणें शमवूं शकेल. चरख्याची संस्कृति याचा अर्थ भांडवलशाही प्रवृत्ति ज्या यंत्राच्या संस्कृतीनें वाढणार नाहीं अशी संस्कृति. प्रत्येकानें स्वतःच्या गरजा स्वतः अगर आपसांत शरीरश्रम करून भागवण्याचा निश्चय केला तर कोणाहिजवळ हेवा वाटण्याइकी संपत्ति जमणार नाहीं. आज परस्परांत जीं भांडणें होतात त्याला मुख्य कारण पैसा आहे. वास्तविक पैसा हा श्रमाच्या मोबदल्याचें एक साधन आहे. पण आज तेंच साध्य झालें आहे. अनेक लोकांचे श्रम पैशाच्या रूपानें पेटीत कोंडून ठेवतां येतात अशी आजची स्थिति आहे. मनु-

ष्याचा स्वभाव जरूरीपुरते श्रम करावेत या वृत्तीचा नाहीं. कारण तो दारिद्याला भीत असतो. पुढल्या वर्षी पाऊस पडला नाहीं, किंवा हात-पाय चालले नाहींत किंवा आलेलें पीक रोगांनीं खावून टाकलें तर आपण कसें जगणार अशी भीति त्याला वाटत असते. तेव्हां पैशाचा संग्रह केला पाहिजे असें तत्त्व सर्वमान्य होतें. त्या संग्रहाला नंतर मर्यादा उरत नाहींत व माणसांतली माणुसकी नष्ट होते. जगांत चाल-लेलीं युद्धें व क्रांत्या या अर्थसंपादन व अर्थसंचयांमुळें होत असतात. हा अनर्थ टाळावयाचा असेल तर चरख्याकडे वळलें पाहिजे. चरख्याचा अर्थ जरूर तितकें अन्नवस्त्र ज्या साधनानें मिळवितां येतें, ज्यांत स्पर्धा नसते, पण सहकार्य असतें, ज्यामुळें इतर हस्तव्यवसाय सुरू होऊं शक-तात असें साधन हा होय. पैशावर ताबा म्हणजे एका विशिष्ट प्रवृत्तीवर ताबा. हा ताबा मिळाल्यावर चैन किंवा विलास यांचें क्षेत्र संकुचित होतें. जितका पैसा जास्त, तितकी विलासप्रियता अधिक. त्याच्या उलट पैशाच्या मागें जितकें जितकें जास्त लागावें लागतें तितके तितके श्रम अधिक करावे लागतात व ते श्रम करूनहि दारिद्र्य वाढतच असतें. तेव्हां अर्थप्रधान संस्कृति ही गरीबाला जमीनदोस्त करते व श्रीमंताला चढेल करते आणि दोघांनाहि उच्च विचारांपासून दूर ठेवते.

अर्थाप्रमाणेंच कामाचेंहि आहे. अर्थावर काम अवलंबून असतो. म. गांधींनीं कामाच्या बाबतींत ब्रह्मचर्य, संयम वगैरे उपाय सांगितले आहेत. आधुनिक वाङ्मय हें कामवृत्ति वाढवीत असतें. धर्माच्या बाबतींत गांधी समभाव ठेवावा असें सांगतात. हिंदुस्थानांत धार्मिक भांडणें हीं इतकीं विकोपाला गेलेलीं आहेत कीं, त्या एकाच कारणामुळें परकी सत्ता येथून हलूं शकत नाहीं. तेव्हां अर्थप्रधान संस्कृतीला पायबंद घालण्याकरतां ग्रामोद्योग, चरखा व वर्ग–समन्वय; काम–प्रधान प्रवृत्तीला संयम व मनोनिग्रह; आणि धर्म–प्रधान संस्कृतीच्या दुष्परिणामाकरतां समानत्वाची भावना गांधींनीं सांगितली आहे.

तीन संस्कृतींतील ह्या विकृति टाळल्या म्हणजे आपसांत पूर्ण अहिंसेची, ऐक्याची भावना वाढत जाईल. हीच वृत्ति त्या राष्ट्राचें सामर्थ्य होतें. अशा राष्ट्रावर स्वारी करण्यास परकें राष्ट्र बहुतकरून

येणार नाहीं आणि आलें तर त्या राष्ट्राला आक्रमक राष्ट्राचा पुरा समाचार घेतां येईल. जपान, जर्मनीसारखें राष्ट्र हिंदुस्थानवर चाल करून आलें तर हिंदुस्थान अहिंसेनें कसा प्रतिकार करील असा प्रश्न नेहमीं विचारला जातो. हिंदुस्थानचें आजचें स्वरूप लक्षांत घेतलें म्हणजे हा प्रतिकार करणें जमणार नाहीं असें म्हणावें लागतें. त्याचें कारण उघड आहे. एखाद्याच्या मानेवर जर भारी वजनाचें पोतें फार वेळ ठेवलें असलें तर तो तें पोतें आपलें सारें बळ एकवटून फेकून देऊं शकेल, पण दुसरा एखादा त्याहीपेक्षां जास्त वजनाचें पोतें त्याच्या मानेवर ठेवण्यास आला तर तो खचलेला माणूस त्याला प्रतिकार करूं शकणार नाहीं. हिंदुस्थानचें असेंच झालें आहे. अद्याप हिंदुस्थान परतंत्र आहे, एवढेंच नव्हे तर तो निःशस्त्र असूनहि स्वतंत्र होण्याचा मार्ग हिंसा का अहिंसा याबद्दल चर्चा करीत आहे. कांहीं जण नुसत्या ब्रिटिशांच्या मनधरणीनें स्वतंत्र होऊं असें मानतात; तर कांहींना स्वातंत्र्य हें झेपणारें नसल्यामुळें पारतंत्र्यच चांगलें वाटतें. दुसरे कांहीं धर्माची भांडणें भांडत आहेत व ते स्वतःला काय मिळावें यापेक्षां दुसऱ्याला काय मिळूं नये याकडेच जास्त लक्ष देतात. अशा प्रकारच्या देशापुढें स्वातंत्र्याचा प्रश्न टाकणेंहि धाडसाचें वाटतें. पारतंत्र्यामुळें औदार्य, प्रामाणिकपणा, राष्ट्रीयवृत्ति अगर देशावरील प्रेम यांचा बराच अभाव येथें दिसतो. इंग्लंड, जर्मनी किंवा रशियाकडे दृष्टि फेकली तर तेथें एक चर्चिल किंवा एक हिटलर किंवा एक स्टॅलिन सर्वांच्या अंतःकरणांत संचरलेला दिसतो. तेव्हां हिंदुस्थानावर हिटलरची स्वारी झाली तर हिंदुस्थान अहिंसेनें यशस्वी प्रतिकार करील काय हा प्रश्न विचारण्यापूर्वी कोणत्या गुणांनीं युक्त असलेला हिंदुस्थान हा प्रतिप्रश्न विचारणें जरूर आहे. आजचा हिंदुस्थान मात्र वरील कारणाकरतां प्रतिकार करूं शकणार नाहीं.

हिंसेच्या युद्धांत ज्याप्रमाणें राष्ट्राला तयारी करण्याकरतां अनेक वर्षें लागतात, त्याप्रमाणें अहिंसेच्या युद्धालाहि लागतात. अहिंसेची हेटाळणी करून व त्या मार्गानें कांहीं होणार नाहीं असा अजाण माणसानेंहि सिद्धांत सांगून अहिंसेचा मार्ग यशस्वी होत नसतो. त्यांत कमींत कमी,

पुढाऱ्यांची आज्ञा मानण्याची तयारी व कराव्या लागणाऱ्या त्यागाला सिद्धता एवढ्या गोष्टी पाहिजेत. ही तयारी जर झाली तर अहिंसेनें प्रतिकार करतां येईल व त्यांत यशहि मिळेल. अहिंसा ही एक प्रबळ शक्ति आहे; ही शक्ति ज्याच्या अंगांत असेल तो मरेल, पण वांकणार नाहीं, एवढी जाणीव प्रतिकार करणाऱ्यांत असली पाहिजे.

जर्मनी हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर उतरणार नाहीं असें नाहीं. विमानें, जहाजें नष्ट करण्याचीं साधनें हिंदुस्थानजवळ नाहींत. तो आल्यावर भयंकर प्राणहानीहि करील. असे करण्याचा उद्देश भीति उत्पन्न करण्याचा असेल, पण त्यानंतरच लढ्याला सुरवात होईल. बॉंब-गोळ्यांनीं मुलूख जिंकतां येतात, पण माणसें जिंकतां येत नाहींत हें हिंदुस्थानला सिद्ध करावें लागेल. आणि माणसें जर जिंकतां आलीं नाहींत, तर जिंकलेले मुलूखहि सोडून द्यावे लागतात. फ्रान्समध्यें किंवा नॉर्वेमध्यें जर्मनसत्ता असण्याचें कारण त्यानें तेथील माणसें जिंकलीं हें होय. फ्रेंच लोक प्राणहरणाला भ्याले व शरण आले. तसे हिंदुस्थानचे लोक शरण आले तर फ्रान्सची जी दशा झाली ती आमची होईल. पण हिंदुस्थान जर जर्मनीशीं कोणत्याहि प्रकारचें सहकार्य करणार नाहीं, त्यांना लागणारी लूट, किंवा कच्चा माल प्राण गेला तरीहि देणार नसेल तरच हा लढा लढतां येईल. हीच खरी परीक्षेची वेळ असते व त्यांत माणसें टिकाव धरूं शकत नाहींत. भित्रा माणूस जिवाच्या भयानें व लुच्चा माणूस स्वार्थाच्या लोभानें खचतो. अशीं भित्रीं व लुच्चीं माणसें निवडून काढून दूर ठेवावीं लागतील. शत्रूच्या सामदंडाला जर तीं बळी पडलीं तर अपयशाची पाऊलवाट पडूं लागेल. ही फितुरी होऊं नये म्हणूनच चारित्र्याचा दर्जा वाढवावा लागतो. येणाऱ्या शत्रूला आपण आंत घेऊन जर वेढा दिला तरच त्याचें अंतःकरण बदलेल किंवा तो नाइलाज होऊन मुलूख सोडून तरी जाईल. हें अहिंसेच्या युद्धाचें अत्यंत स्थूल स्वरूप आहे. त्यांत मुख्य दृष्टि एकच आहे. हिंसेचा लढा शस्त्रांनीं लढावा लागतो, तसा अहिंसेचा लढा प्रबळ इच्छाशक्तीनें लढावा लागतो. ही तयारी ज्या राष्ट्राची असेल तें राष्ट्र यश संपादन करील.

हिंसाप्रधान सत्ता आक्रमण करून प्रेतांचे खच पाडते. ही भीषण प्राणहानि पाहिल्यावर मनुष्य शरण येतो. त्याला असें वाटतें कीं, हिंसात्मक बलांत आपण कमी ठरलों, तेव्हां वेडेपणा करून प्राण घालविण्यापेक्षां शहाणपणा करून शरण गेलेलें बरें. या शरणागतीमुळें त्याचे प्राण वाचतात पण नैतिक दृष्ट्या त्याचे प्राण जातात. ज्याचे शारीरिक बल जास्त त्याचें राज्य व त्याची सत्ता असा जगांतील नियम आहे. ज्याचें नैतिक बल जास्त त्याची सत्ता असा नियम नाहीं. शारीरिक बलाला नैतिक बलाची थोडीशी जोड दिली म्हणजे झालें असें समजण्यांत येतें. निदान खोट्या नैतिक बलाचा तरी देखावा शस्त्रप्रधान राष्ट्रांना करावा लागतो. गांधीवाद असें म्हणेल कीं, ज्याचें नीतिबल जास्त त्याची सत्ता असा नियम प्रस्थापित व्हावयास हवा. हा नियम प्रस्थापित करण्यास शस्त्रबल उपयोगी पडणार नाहीं, नीतिबलाचाच उपयोग करावा लागेल. तेव्हां हिटलरबरोबर किंवा कोणत्याहि शस्त्रधारी सत्तेबरोबर अहिंसावाद्यांचे युद्ध झालें तर त्या शस्त्रयुद्धांत शस्त्ररहित सत्तेचा जय कसा होईल ? पण या शस्त्राच्या युद्धानंतर जो अहिंसेच्या साधनानें नैतिक लढा होईल त्या लढ्यांत अहिंसात्मक शक्तीचा जयच झाला पाहिजे.

तेव्हां अहिंसात्मक लढा म्हणजे मशिनगन्स किंवा बॉंब वर्षाव करणारीं विमानें चालून आलीं असतां त्यांना हातांत काठ्याहि न घेतां प्रतिकार करणें असा नाहीं. पहिला शस्त्रांचा हल्ला हा सहन करावाच लागेल. कदाचित् तें एकपक्षीय युद्ध असल्यामुळें त्यांत मनुष्य व द्रव्यहानि कमी होईल, कदाचित जास्तहि होईल. त्यांत निरपराधी लोक बळी पडतील. आजच्या युद्धांत नागरी जनताच विमानांना बळी पडते व ती बिनलढाऊ असते. तेव्हां हिंसात्मक युद्धाला हिंसेनें तोंड देतांना जितकी मनुष्यहानि होते, तितकीच किंवा बिलकूल प्रतिकार न केल्यामुळें कमी होईल. त्यानंतर अहिंसेचा शिस्तवार व आत्मक्लेश सहन करून प्रतिकार होईल. त्यांत सारे नागरिक सैनिक होईल व प्रत्येक घर हें शत्रुविरुद्ध लढवावे लागेल. तुमच्या इच्छाशक्ति विरुद्ध परका शत्रु राज्य कसें स्थापणार ? तुमचें राज्य त्याला संपत्तीकरतां हवें असतें. तुमच्या देशांतून सोनें, रुपें, धान्य अगर इतर कच्चा माल नेतां यावा

आणि तुमचा देश त्याच्या पक्का मालाकरतां गिऱ्हाईक म्हणून मिळावा हा त्याचा हेतु असतो. जर या अहिंसात्मक युद्धांत जनतेनें कच्चा माल जरूरीपेक्षां जास्त पिकवला नाहीं अगर पिकला तरी खुशीनें देण्याचें नाकारलें तर परकी सत्ता आपल्या देशांतील मजूर आणून तुमच्यावर सक्ति करूं शकणार नाहीं. पण परक्या देशांतून मजूर आणलें तरी त्यांचें जीवित अशक्य करून टाकण्याची शक्ति जर प्रभावी झाली तर ते तेथें राहूं शकणार नाहींत.

ही अहिंसात्मक युद्धाची कल्पना आतांपर्यंत झालेल्या लढयांवरून केली आहे. ती कल्पना अनुभवाप्रमाणें बदलत जाईल व सशस्त्र युद्धाचें जसें शास्त्र बनतें तसें निःशस्त्र युद्धाचेंहि शास्त्र बनेल. हिटलरजवळ प्रत्येक देशाचा अत्यंत सूक्ष्म असा नकाशा आहे. एवढेंच नव्हें, तर कोठल्या गांवीं किती पाऊस पडेल, हवा कशी असेल याचीं अचुक भविष्यें करणारे शास्त्रज्ञ आहेत. ही सर्व माहिती नैतिक किंवा अहिंसात्मक लढयाला लागेल व शत्रूला कसें तोंड द्यावयाचें याच्या योजनाहि आंखाव्या लागतील. त्याकरतां शांति-दलेंहि उभारावीं लागतील. तीं दलें आजच्याप्रमाणें असणार नाहींत. त्यांतील सैनिक हे आत्मक्लेशाला किती तयार आहेत यांवर त्यांची निवड अवलंबून राहील. पण अशीं दलें उभारल्याशिवाय अहिंसेच्या मार्गानें लढा लढतां येईल ही कल्पना करणेंहि चूक आहे.

जगांत अशीं युद्धें कोठें झालीं नाहींत हें खरें आहे. पण हिंसेच्या अतिरेकानंतर एक तर लढणारीं राष्ट्रें नष्ट झालीं पाहिजेत किंवा हिंसेपासून परावृत्त झालीं पाहिजेत. ज्यावेळीं एक राष्ट्र हिंसाप्रधान व दुसरें अहिंसा-प्रधान असेल त्यावेळीं वर सांगितल्याप्रमाणें लढे होतील. पण जेव्हां दोन्ही राष्ट्रें अहिंसाप्रधान असतील तेव्हां जर दोन्ही राष्ट्रांनीं अहिंसेनें प्रतिकार करण्याचें ठरविलें तर त्यांत सत्य कोणाचें, असत्य कोणाचें, न्याय्य कोण अन्याय्य कोण हें परक्याला समजणें कठीण जाईल. पण अहिंसात्मक साधनांचें एक वैशिष्टय आहे. ह्या साधनांवर ज्याचा विश्वास असतो त्यांच्या सूक्ष्म शक्ति व माणुसकी जागृत झालेली असते. त्यामुळें अशा दोन राष्ट्रांत अहिंसात्मक लढयाचे प्रसंग येणार

नाहींत. आलेच तर त्यांचा निर्णय त्रयस्थाकडून करून घेतला जाईल व तो निर्णय समाधानकारक वाटला नाहीं आणि लढ्याचा प्रसंग आलाच, तर त्याचे परिणाम प्राण अगर संपत्ति यांचा नाश होण्यांत होणार नाहींत, हें निश्चित आहे.

म. गांधी हेच या अहिंसात्मक लढ्याचे प्रणेते आहेत. त्यांनीं या लढ्याचें एक शास्त्र बनविलें आहे. अजून तें शास्त्र संरक्षक स्वरूपाचें आहे, आक्रमक स्वरूपाचें नाहीं. इंग्रजांच्या बरोबरच आतांपर्यंत म. गांधींनीं लढे लढविले व ते लढे निरनिराळे अन्याय दूर करण्याकरतां लढविण्यांत आले. १९३० सालचा मिठाचा कायदेभंग हा मिठाकरतां असला तरी तो मुख्यतः स्वराज्याकरतां होता. १९३२ चा लढा हा सर्वस्वीं हिंदुस्थानवर लादला होता. तेव्हां तो संरक्षणपरच होता. १९४० चा लढा हाहि स्वातंत्र्याकरतां असला तरी भाषण–स्वातंत्र्य हें त्यांत प्रधान होतें. याखेरीज खेडा, चंपारण्य, बार्डोली द. आफ्रिका वगैरे ठिकाणचे लढे हे स्थानिक गाऱ्हाण्यांकरतां होते.

या लढ्यांतील बऱ्याच लढ्यांत गांधींना यश मिळालें. १९३० सालीं तर देशाला अभिमान वाटेल अशा प्रकारची बरोबरच्या नात्यानें सरकार बरोबर तडजोड झाली. अत्यंत नैराश्याच्या कालांत गांधींना मिळत गेलेलें यश हें लोकांच्या आशा व आकांक्षा पल्लवित करीत गेलें. पण लोकांना यश तेवढें हवें असतें आणि त्याग नको असतो; किंवा ज्या मार्गानें यश मिळतें त्या मार्गाचा अवलंब करावयास नको असतो. तथापि जो पुढारी सतत विजय मिळवतो, त्याच्या मागें जनता जाते हें खरें. गांधींचें असेंच झालें. द. आफ्रिकेंत यश मिळवून आल्यामुळें गांधींचें नांव आधींच मोठें झालें होतें. पैशाला मोठेपणांत स्थान असतें हें खरें आहे. पण व्हिक्टर ससून किंवा टाटा हे महात्मा होऊं शकत नाहींत. तेव्हां स्वतःजवळ पैसा असणें अगर पैसेवाली माणसें स्वतःच्या आसपास असणें यांचा व मोठेपणाचा कांहीं संबंध नाहीं. पुढारीपण हें कार्यानें व पराक्रमानें मिळतें, तें नुसत्या लेखणीनें, पैशानें किंवा वाणीनें किंवा पूर्वजांच्या पुण्याईनें मिळत नाहीं. तें टिकविण्यासहि सतत पराक्रम करावा लागतो व जनतेला विजय मिळवून द्यावे लागतात.

द्वेषानेंहि पुढारीपण मिळतें. द्वेषांतूनहि विजय निर्माण होत असतात पण ते अल्पकाळ टिकणारे असतात आणि त्यामुळें समाजाची प्रगति होत नाहीं.

म. गांधींनीं आपल्या अहिंसाप्रधान साधनांनीं जे यशस्वी लढे लढविले, त्याची एक पद्धतहि त्यांनीं घालून दिली. ते अगदीं साधा प्रश्न घेतात व त्यावर सारी शक्ति खर्च करतात. तो प्रश्न नैतिक असतो व कोणलाहि तो कळूं शकतो. १९३० चा स्वराज्याचा लढा साध्या मिठाच्या करानें सुरू झाला; किंवा बार्डोलीचा लढा फेर चौकशी करा या मागणीनें सुरूं झाला. तिसऱ्या माणसाला असें वाटतें कीं, प्रश्न किती लहान व त्यावर शक्ति किती खर्च होत आहे. वास्तविकपणें गाऱ्हाणें लहान का मोठें हा प्रश्न नसतो. तें सत्य का असत्य, योग्य का अयोग्य हा प्रश्न असतो. राज्यकर्ते न्याय्य गाऱ्हाणें असूनहि पड घेत नाहींत. कारण त्यामुळें त्यांची प्रतिष्ठा जाते आणि प्रतिष्ठेवर जेथें राज्यें चालतात तेथें कसला न्यायअन्यायाचा विचार ! अहिंसेच्या मार्गानें हीच अहंकाराची वृत्ति नष्ट करावयाची असते व अन्याय करणाराला स्वतःच्या अन्यायाची शरम वाटावयास लावावयाची असते व त्याचें अंतःकरण बदलावयाचें असतें. या अहिंसात्मक लढयाला कधींहि एकदम सुरवात होत नाहीं. प्रतिपक्षाला भरपूर वेळ देऊन, त्याच्या अडीअडचणींचा विचार करून, त्याला काळवेळ कळवून, उघडपणें हा लढा लढविला जातो. गुप्तपणा व क्लेश सोसण्याबद्दल नाराजी त्यांत असत नाहीं. स्वतःचा बचाव न करतां शिक्षा आनंदानें सोसली जाते. या लढयाचीं अनेक स्वरूपें आहेत.

१ तडजोड २ चळवळ ३ सभा मिरवणुकी ४ निर्वाणीचा खलिता ५ हरताळ ६ उपासानें आत्मशुद्धि ७ निरोधन ८ बहिष्कार ९ करबंदी १० देशत्याग. ११ असहकार १२ सत्याग्रह १३ कायदेभंग.* सर्व उपाय संपले म्हणजे कायदेभंग होतो. तोहि वैयक्तिक व नंतर सामुदायिक असा असतो. असहकार, निःशस्त्र प्रतिकार, सत्याग्रह व कायदेभंग हे जवळजवळ सारखेच प्रकार आहेत. पण त्यांत फरक आहे व तो म. गांधींनीं स्वतःच सांगितला आहे.

---

* War without violence by K. Shridharani.

सत्याग्रह म्हणजे सत्य शक्ति. त्याला आत्मबलहि म्हणतां येतें. त्यांत हिंसा वर्ज्य आहे. कारण माणसाला पूर्ण सत्य कळत नाहीं आणि म्हणून तो शिक्षा देण्यास लायक नाहीं. हें दुर्बलाचें शस्त्र नाहीं. निःशस्त्र प्रतिकार हें दुर्बलाचें शस्त्र आहे. कारण निःशस्त्र प्रतिकारांत हिंसेला पूर्ण बंदी नाहीं. प्रसंगानुरूप हिंसेला परवानगी मिळते, म्हणून तें शस्त्र गांधीवादांत अंतर्भूत नाहीं. कायदेभंग म्हणजे अनैतिक कायद्यांचा नम्रतापूर्वक भंग. सत्याग्रहाची कायदेभंग ही एक शाखा आहे. असहकारिता याचा अर्थ अनैतिक लाचार (Corrupt) अशा राज्यसत्तेचें सहकार्य काढून घेणें. त्यांत कायदेभंगासारखा जालीम उपाय नसतो. कायदेभंगाप्रमाणें असहकारिता हीहि सत्याग्रहाचीच एक शाखा आहे.

म. गांधींचा सत्याग्रही हा रचनात्मक कार्य करणारा आहे. पण कायदेभंग करणारा हा सत्याग्रही असतोच असें नाहीं. ‘ कायदेभंगाला ’ गांधीजी म्हणतात ‘ खास तयारी करावी लागते. सत्याग्रहांत रचनात्मक कामहि अंतर्भूत होतें. जो सूत कांतीत नाहीं, तो सत्याग्रही होऊं शकतो; पण तो सविनय कायदेभंगांत येऊं शकत नाहीं. ’ पुढें गांधीजी म्हणतात.* ‘ कायदेभंगांत कोट्यवधि लोक सामील होऊं शकत नाहींत. ज्यांनीं आत्मशुद्धि केली आहे तेच कायदेभंग करूं शकतात. अशांनाच कोणते कायदे केव्हां व कसें मोडावें हें कळतें. जो स्वेच्छेनें सर्व कायदे पाळतो, धर्मभावनेनें जाणूनबुजून पाळतो, त्यालाच कायदेभंगाचा अधिकार प्राप्त होतो. ही विषारी गोळी प्राशन करण्याची गोष्ट आहे. जो ज्ञानपूर्वक ही गोळी घेणार नाहीं तो मरण पावेल. कायदेभंग ही साधी गोष्ट नाहीं. प्रत्येकाला कायदेभंग करतां येणार नाहीं. सर्वजण सत्याचा आग्रह धरतात. पण आजचे कायदेभंग करणारे सत्याचे आग्रही नाहींत. सच्चे कायदेभंग करणारे सोडले तर बाकीचे सविनय कायदेभंग करणारे नाहींत, अविनयभंग करणारे आहेत. ते क्रोधवश होऊन हिंसायुक्त कायदेभंग करतात. ते चांगले असतीलहि. माझ्याहिपेक्षां थोर असतील. पण ते आपल्या तंत्रांत बसत नाहींत. ’ सत्याग्रही हा सूत कांतणारा

*४ सर्वोदय जुलै १९३९

नसला तरी चालेल, पण सविनय कायदेभंग करणारानें सूत कातलेंच पाहिजे, असें गांधीजींनीं वर म्हटलें आहे. पण त्याच प्रसंगीं गांधीजी म्हणतात, "जे लोक सत्याग्रही होऊं इच्छितात पण जे चरख्यावर विश्वास ठेवीत नाहींत, त्यांना मी सांगेन कीं, तुम्ही सत्याग्रहाला विसरून जा.* " ह्यावरून दोन वाक्यें विसंगत वाटतात पण तीं तशीं नाहींत. सत्याग्रही हा रचनात्मक कार्य करणारा व चरख्यावर विश्वास ठेवणारा असावा लागतो. पण कायदेभंग करणाऱ्या सत्याग्रहीनें हा विश्वास दररोज सूत कातून व्यक्त करावा लागतो. सत्याग्रहीची भूमिका हा कायदेभंग करणाऱ्यापेक्षां व्यापक आहे.

हिंदुस्थानला सत्याग्रहाच्या सहाय्यानेंच आपलें स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यावयाचें आहे. सत्याग्रह हा (१) अन्यायाच्या गाऱ्हाण्यांकरतां (२) दृढ होणारी अगर झालेली परसत्ता संपविण्याकरतां व (३) अहिंसाप्रधान स्वतंत्र राष्ट्रावर चाल करून आलेल्या सत्तेचा पराभव करण्याकरतां असतो. या तीनपैकीं पहिल्या दोन जातीचे सत्याग्रह येथें झाले आहेत. पहिल्या प्रकारच्या सत्याग्रहांत यश येतें हें अनेक वेळां सिद्ध झालें आहे. दुसऱ्या प्रकारांत अद्याप यश आलें नाहीं. तिसरा प्रकार फार दूर आहे. पण गांधींनीं सांगितलेल्या सूचना अंमलांत आणल्या तर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा झगडा तरी फार वेळ लांबणार नाहीं. पण प्रश्न सिद्धांताचा आहे. जो सिद्धांत एका विशिष्ट गाऱ्हाण्याला लागू होतो, तो इतर ठिकाणीं कां लागू होऊं नये ? परिस्थिति बदलेल त्याप्रमाणें अहिंसाप्रधान सत्याग्रहीला आणखी नवे नियम पाळावे लागतील. पण ज्याचें आत्मबल जागृत झालें व ज्याची आत्यंतिक त्यागालाहि तयारी झाली तो सत्याग्रहाच्या कोणत्याहि प्रयोगाला तोंड देईल व यश मिळवील. गांधीजींची श्रद्धा या सत्याग्रहावर इतकी आहे कीं, ते अशा लढयांना अनेक सत्याग्रही लागतात असें मानीतच नाहींत. 'एको बली अकम्पयत्' असें ते म्हणतात. त्यांचा सत्याग्रही खालीं वर्णन केल्याप्रमाणें असतो.

*१८ सदर जून १९३९.

(१) ईश्वरावर सजीव श्रद्धा असणारा (२) सत्य व अहिंसेला धर्म मानणारा. (३) मनुष्यांत सुप्त सात्विकता आहे यावर विश्वास ठेवणारा. (४) आपल्या सत्य व अहिंसेनें मनुष्यांतील सात्विकता जागृत करूं पहाणारा (५) ध्येयाकरतां प्राण देणारा (६) खादीधारी व सूत कांतणारा (हिंदुस्थानकरतां हा नियम आवश्यक आहे) (७) निर्व्यसनी असणारा.*

---

* गांधी विचार दोहन, ८५

गुण व दोष : : : १५

गांधीवादामध्यें दोष आहेत असें म्हणतां येणार नाहीं. कारण जगांतील सर्व माणसांचें हित करावें, कोणाचीहि हिंसा करूं नये, कोणाला लुबाडूं नये, सर्वांना सुख मिळावें, सत्याचरण करावें आणि मोक्ष प्राप्त करून घ्यावा असें ज्या तत्त्वज्ञानाचें ध्येय आहे, तो वाद दोषयुक्त आहे असें कोणी सत्प्रवृत्त म्हणणार नाहीं. जगांतलीं सर्व सुखें माझ्या देशाला असावीं, इतर देशांना मीं गुलाम करावें, त्यांची संपत्ति लुटून माझ्या देशांत आणावी आणि या माझ्या इच्छेआड कोणी येईल त्याचा नायनाट मी करावा असें म्हणणाऱ्याला गांधीवाद पटणार नाहीं. अशा तमोगुणी किंवा रजोगुणी माणसांचे कांहीं निर्विकारमय व सुज्ञ विचारांचे क्षण असतात. त्या क्षणाला तो गांधीवादी बनतो, निदान विचारापुरता तरी गांधीवाद त्याला पटतो. आचारांत गांधीवाद आणणें हें अत्यंत कठीण आहे आणि जोंपर्यंत सीझर व नेपोलिअन् यांची पूजा होत राहील, तोंपर्यंत सीझर व नेपोलिअन अवश्य उठतील आणि लोकांचें जीवित दुःखी करतील*

---

* Ends and means--Aldoux Huxley.

या हिंसाप्रधान प्रवृत्तीविरुद्ध गांधीवादाला झगडावयाचें आहे म्हणूनच तो झगडा अत्यंत कठीण आहे. पिढ्यान्‌पिढ्या मनावर, शरीरावर, व बुद्धीवर हिंसात्मक प्रतिकाराचे व हिंसात्मक आक्रमणाचे संस्कार झाले असल्यामुळें 'आंतला माणूस' (Inner–man) गुदमरून गेला आहे. त्या आंतल्या माणसाला व्यक्त होण्याला सवडच नाहीं. बाहेरचा माणूस बावरला आहे, वेडावला आहे, तो आपल्याच भाईबंदांना मारत सुटला आहे, कोणाला लुटतो आहे, लुबाडतो आहे. अशीं शतकानुशतकें गेलीं आहेत व चाललीं आहेत. पण सर्वांच्या ठिकाणचा 'आंतला माणूस' जागा होत नाहीं. तो माणूस सात्विक प्रवृत्तीचाच आहे, आसुरी प्रवृत्तीचा नाहीं. ह्या आंतल्या माणसाला जागें करण्याचा गांधीवादाचा प्रयत्न आहे. हा आंतला माणूस जागा झाला म्हणजेच जगांत खरी क्रांति होईल. त्याला कधींच जागृति येत नाहीं असें नाहीं. पण त्याच्या भोंवतीं वेढून बसलेले स्वार्थाचे सर्प त्याला दंश करून गुंगी आणतात व त्याचा सूक्ष्म आवाज बाहेर उमटूं देत नाहींत. या स्वार्थांना दूर लोटून अंतर्नाद कधीं कधीं ऐकूं येतो. तो नाद प्रत्येक माणसाला केव्हां ना केव्हां अनुभवावयास सांपडतो. पण आपण पुनः जागतिक विचारांत ह्या अंतर्नादाला थोपटून झोपवतो.

आंतल्या माणसाचा हा नाद काल्पनिक नाहीं. म. गांधींची हेटाळणी करण्यासारखेंहि त्यांत कांहीं नाहीं. ज्याला अंतःप्रेरणा अगर अंतःस्फूर्ति होत नसेल व ज्याचें अंतकरण सद्विचाराची जाणीव करून देत नसेल असा मनुष्यच सांपडणें अशक्य. तेव्हां गांधीवादाचा प्रयत्न मूलतः सत्प्रवृत्त असलेल्या 'आंतल्या माणसाला' जागें करण्याचा आहे. टोपलींत बंद करून ठेवलेला नाग गारोड्याच्या पुंगीनें डोलूं लागतो; श्रीकृष्णाचा पावा ऐकून सारी चराचर सृष्टि खेंचली जात असे. युद्धाच्या नौबती वाजल्या कीं शिपायाच्या अंगांत स्फुरण चढतें हे सर्व प्रकार आपण पहातों किंवा ऐकतों. बाहेरच्या सुरांचें आंतल्या सुरांशीं मेलन झालें म्हणजे एकजिनसीपणा निर्माण होतो. आपला 'आंतला माणूस' हा सत्यप्रिय आहे, तो अहिंसेचा भोक्ता आहे, तो परक्यावर सेवाधर्मानें उपकार करूं इच्छितो'

तो सर्वांचें कल्याण व्हावें असें म्हणतो. आपण या गुणांची जोपासना करून आंतला माणूस जागा करूं शकणार नाहीं ? गांधीवादाचा विसाव्या शतकांतील जनतेला हा सवाल आहे. त्या प्रश्नाचें नकारार्थी उत्तर येणें शक्यच नाहीं. कारण आपण जगांतील हिंसाप्रवृत्ति, दुष्ट वृत्ति, वगैरेंचा तिरस्कार करतों. अर्थात् ज्याचा आपण तिरस्कार करतों त्याचाच आपण न कळत पुरस्कार करीत असतों हें आपल्या लक्षांत येत नाहीं. आपल्याला सद्गुणांची चाड असते हें ज्याअर्थी आपण दुर्गुणाच्या द्वेषानें सिद्ध करतों, त्याअर्थी हें आत्मनिरीक्षण करणें अत्यंत जरूर आहे. ह्या आत्मनिरीक्षणाशिवाय आपल्याला आपले दोष कळणार नाहींत आणि त्या दोषांची कल्पना आल्याशिवाय कशाचा नाश केला पाहिजे हें आपल्याला समजणार नाहीं. गांधीवाद हा आंतला माणूस जागा करण्याकरतां त्याच्या भोंवतीं सांचलेल्या घाणीचा उकिरडा उपसून काढण्याचा प्रयत्न करतो. ती घाण उपासानें, आत्मक्लेशानें, ईश्वराच्या उपासनेनें तर कधीं सेवेनें दूर होऊं शकते. रविवारीं चर्चमध्यें जाणारा ख्रिश्चन, दररोज पांचदां नमाज पढणारा मुसलमान, किंवा भजन करणारा हिंदु कशाकरतां हे प्रकार करतो ? गांधीवाद नवें असें कांहीं सांगत नाहीं किंवा शिकवत नाहीं. प्रत्येक धर्मांतील पुराणपुरुषांनीं व प्रत्येकाच्या वाडवडिलांनीं ज्या गोष्टी आपल्याला सांगितल्या त्याच गोष्टींचें स्मरण गांधीवाद करून देत आहे. फार दिवसांत एखादा आवाज ऐकला नसला म्हणजे तो प्रथमतः अपरिचित वाटतो. तसें आपलें झालें आहे. पण ती अपरिचयाची भावना क्षणिक असते. तो आवाज आपल्याला लवकरच ओळखतां येतो.

अर्थात् जे अगदीं ठणठणीत जडवादी आहेत, किंवा ज्यांचा गांधीवादापेक्षां गांधीवर अधिक राग आहे, अथवा ज्यांचें तत्त्वज्ञान निराळ्या प्रकारचें आहे त्यांना हा आंतला माणूस, आंतला नाद, आत्मनिरीक्षण वगैरे सर्व थोतांड व चेष्टेचा विषय वाटेल. पण त्यांच्या बद्दलहि गांधीवाद कधीं निराश किंवा हताश होणार नाहीं. मनुष्य हा मुळांत चांगला आहे असें म्हटल्यानंतर त्याला जागा करणें एवढेंच काम रहातें. कांहीं रोग भयंकर हट्टी असतात. ते साध्या औषधानें बरे होत नाहींत व

त्यांना डोसहि मोठा लागतो. तेव्हां जे पूर्ण नास्तिक असतात ते देवावर जरी विश्वास ठेवीत नसले तरी कशावर तरी विश्वास ठेवीत असतात. त्यांच्या त्या सद्भावना जागृत करणें म्हणजेच आंतला माणूस जागृत करणें होय. त्यांच्यांत बदल व्हावयास वेळ लागेल पण शेवटीं प्रयत्न यशस्वीच झाला पाहिजे.

गांधीवादानें गेल्या वीस वर्षांत राजकीय दृष्ट्या किती यश संपादन केलें हा प्रश्न गौण आहे; पण या वादानें किती जणांच्या जीवनांत क्रांति घडवून आणली हा महत्त्वाचा प्रश्न आहे. या दृष्टीनें विचार केला तर आपल्याला गांधीवाद यशस्वी झाला आहे असेंच दिसून येईल. ही क्रांतीची क्रिया सुरू आहे व तिचें मापन करणें आजच शक्य होणार नाहीं.

ह्या यशाच्या आड जर कांहीं गोष्टी येत असल्या तर त्याचाहि विचार केला पाहिजे व त्या गोष्टी दूर केल्या पाहिजेत. अर्थात् आंधळ्याला सर्वच काळें दिसतें, त्याप्रमाणें हें निरिक्षण नसावें. कांहीं जणांना गांधीवादांत कांहींच चांगलें दिसत नाहीं. त्या वादानें हिंदुस्थानचें वाटोळें केलें व त्याला मागें खेंचलें असें त्यांचें मत आहे. त्यांच्या बरोबर भांडण्यांत काय अर्थ ?

गांधीवादाचा राजकारणाशीं संयोग झाला असल्यामुळें राजकारणांतील बऱ्या वाईट गोष्टींची झळ या वादाला लागली आहे. राजकारण हा मुळीं अस्वच्छ व्यवसाय. त्यांत मुळांतच घाण आहे. सत्तेबद्दल चढाओढ, परस्परांचा द्वेष वगैरे राजकारणांत प्रविष्ट होतात व तो सज्जनांचा मार्ग न रहातां दिखावू सज्जनांचा धंदा होतो. अशा या राजकारणाला उच्च भूमिकेवर न्यावें ही म. गांधींची इच्छा. ही इच्छा प्रत्यक्षांत आणण्याकरतां व राजकीय जीवनाचें शुद्धीकरण करण्याकरतां गांधींनीं आपली सारी हयात घालवली. या त्यांच्या प्रयत्नांत पुष्कळांना गांधी हे कधीं हटवादी, तर कधीं ढोंगी, कधीं भोळे तर कधीं पहिल्याप्रतीचे लुच्चे असे वाटले. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे राजकारणांतील छायाप्रकाशाची बाधा गांधीवादाला लागली; त्यामुळें गांधीवाद थोडासा डागाळला एवढें खरें. पण गांधीवाद हा राजकारणापासून अलिप्त राहू

इच्छित नाहीं. किंबहुना समाजांतील कोणत्याहि प्रश्नापासून दूर राहूं पहात नाहीं. त्यामुळें राजकीय व सामाजिक जीवनांतील चटके गांधी-वादाला अवश्य सहन केले पाहिजेत. अशा प्रकारें गांधीवादाला राज-कारण वगैरेमुळें वैगुण्य आलें. दुसरें, गांधींच्या जीवनांतील प्रयोगांची सूक्ष्मता आकलन न झाल्यामुळें कांहींना गांधीवाद पटत असूनहि गांधी ढोंगी वाटले. आणि तिसरें, गांधीवादाचें अनुकरण करणाऱ्यांमध्यें समाजाला दोष दिसल्यामुळें गांधीवाद हा गर्हणीय वाटला. अशा प्रकारचे हे त्रिदोष आहेत. याचीं कांहीं उदाहरणें बघूं.

एरवीं गांधींचें तत्त्वज्ञान मान्य असणारांना गांधी हरिजन चळवळ करूं लागल्याबरोबर धर्मबुडवे वाटले. सरकारशीं झगडा करणारे गांधी हिंदु-मुसलमानांच्या एकीच्या धोरणामुळें जातीनिष्ठांना शत्रुवत् वाटूं लागले. कौन्सिलांतील कॉंग्रेस मंत्रिमंडळाची कामगिरी पसंत असणाऱ्यांना गांधींची सत्याग्रहाची उठावणी ही मूर्खपणाची वाटली. उलट सामुदायिक सत्याग्रह करण्याची जरूरी असतांना गांधीजी वैयक्तिक सत्याग्रह व तोहि मर्यादित करतात म्हणून जहाल रागावले. गांधींचा नीतिवाद मान्य असणाऱ्यांना दारुबंदीमुळें बसलेला चिमटा इतका दुस्सह झाला कीं, गांधी हा त्यांना असुर वाटूं लागला. गांधींची खादीची किंवा जगांतील शांततेची चळवळ वरवर पसंत असणाऱ्या सत्तेला गांधी जेव्हां कायदेभंग पुकारतात तेव्हां ते कट्टर शत्रु वाटतात. गरीबांचा कळवळा दाखवणारे जमीनदार सावकार जेव्हां कॉंग्रेस कुळकायदा व सावकार-नियंत्रण करतें तेव्हां इंग्रज राज्यापेक्षांहि दुष्ट वाटतें. कामगारांना ट्रेड डिस्प्यूट बिल हें काळा कायदा वाटतें आणि गिरणी–मालकांना तें बिल आपला घात करणारें वाटतें. अशा प्रकारें सरकार, जातिनिष्ठ, सनातनी, जहालपक्षीय, प्रागतिक, जमीनदार, दारुमक्तेदार, कामगार, मालक किंबहुना ज्याच्या ज्याच्या पैशाला, प्रतिष्ठेला, सत्तेला किंवा प्रज्ञेला धक्का बसतो ते ते गांधीवादाचे शत्रु होतात. पण सार्वत्रिक लोकप्रियता मिळेल ही आशाहि गांधीवादानें धरूं नये. कठोर कर्तव्य हें नेहमीं कटूच असतें. कदाचित् गांधीवाद हा इतका संपुष्टांत येईल कीं, शेवटीं एकटे गांधीच त्याचे अनुयायी रहातील, अशी भीति गांधींनीं एकदां प्रगट केलीच होती. त्याचें कारण उघड आहे.

जनतेला शुद्ध तत्त्वज्ञान झेपत नाहीं. कारण समाज हा स्वार्थाच्या पकडींतून सुटलेला नसतो. त्याला आपल्या दुर्गुणांकडे डोळेझांक करणारा पण आपला उद्धार करणारा पुढारी हवा असतो. तसे पुढारी गांधी नाहींत हें खरें. गांधींच्याबद्दल विचार केला तर ते स्थिर नसून प्रागतिक आहेत हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. दिवसेंदिवस त्यांच्या विचारांत प्रगति होत आहे. कालचा विचार त्यांना आज चुकीचा वाटतो आणि आजचा उद्यां चूक वाटण्याचा संभव असतो. पण त्यांच्या हातून जर एखादी चूक झाली तर ती कबूल करण्याचें औदार्य त्यांचे ठिकाणीं आहे. दुर्दैव असें आहे कीं समाजाला प्रामाणिकपणें चूक कबूल करणारा चालत नाहीं. त्याला झालेली चूक अप्रामाणिकपणें दडवणारा चारित्र्यहीन खपतो. अशाला वाटेल तें सहाय्यहि केलें जातें पण तितकी उदार बुद्धि प्रामाणिक माणसाबद्दल नसते. त्यामुळें गांधींना लोकक्षोभाच्या आगींत होरपळावें लागतें. गांधी हे एक साधक आहेत, सिद्ध नाहींत. अनुभवानें व प्रयोगानें ते आपले आचार व विचार बदलतात. अर्थात् मूलभूत नैतिक तत्त्वांत ते बदल करीत नाहींत. जो प्रामणिकपणें आत्मविकासाचा प्रयत्न करीत आहे व जो आपला अनुभव सर्वांना देऊं इच्छित आहे त्याच्याबद्दल अविश्वास दाखविणें हें आपल्या विकृतीचें द्योतक आहे. तथापि हा अविश्वास इतक्या थराला गेला आहे कीं, गांधी म्हणजे एक रासपुटीनसारखा भोगेच्छाप्रधान ढोंगी बुवा आहे व त्याचा नायनाट करणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे असें कधीं उघड तर कधीं प्रच्छन्नपणें सांगितलें जातें. अर्थात् गांधी त्यांच्या क्रोधाला व मत्सराला जबाबदार नाहींत. अशांची नष्ट होत जाणारी आत्मप्रतिष्ठाच ही दुष्ट वृत्ति पोषीत असते. याहिउपर येशु ख्रिस्ताप्रमाणें स्वतःच्या तत्त्वाचरणांत मरण्याचा प्रसंग आला तरी गांधी त्याला थोडीच दाद देतात !

गांधींच्या राजकीय, सामाजिक कार्याबद्दल व गांधी व्यक्तीबद्दल होत असलेले गैरसमज हे अस्थानीं आहेत. हेतूंवरून तर असे आरोप करणें हें माणुसकीविरुद्ध होईल. पण तशी स्थिति गांधीवादी म्हणविणारांची नाहीं. गांधीवादाचे अनुयायी हे आपल्या आचरणानें त्या तत्त्वज्ञानाला

व त्या तत्त्वज्ञानाच्या संशोधक व्यक्तीला मोठेपणा किंवा कमीपणाहि आणूं शकतील. लोकवादाची व व्यक्तीची योग्यता अनुयायांवरून ठरवतात. म्हणून अनुयायी म्हणविणारांनीं आपली शक्ति ओळखावी व नम्रपणें होईल तितकें काम करावें. काँग्रेस पुढारी हा निराळा व गांधी-वादी हा निराळा असाहि भेद केला जातो. पण हा भेद व्यवहाराला ठीक असला तरी तत्त्वाला ठीक नाहीं. गांधी–तत्त्वाप्रमाणें आंखलेला कार्यक्रम अंमलांत आणणारे काँग्रेस–मंत्री जर निःशस्त्र प्रजेवर गोळीबार करूं लागले तर गांधीवाद किंवा गांधी व्यक्ति ह्या आरोपांतून कशी सुटणार ? त्याबद्दल टीकेचे आघात गांधींनाच सहन करावे लागतलि व टीकाकारांचा आरोप खोटा आहे असें म्हणतां येणार नाहीं. अर्थात् राजकारणांत अहिंसा एकदम येणार नाहीं वगैरे वगैरे अनेक युक्तिवाद आत्मसमर्थनार्थ दिले जातील. पण तें बुद्धिमत्तेचें लक्षण आहे इतकेंच म्हणतां येईल. तेव्हां एक तर काँग्रेसनें आपल्याला वेळीं अवेळीं जनतेच्या रक्षणाकरतां हिंसा करावी लागेल असें जाहीर करावें व गांधींना काँग्रेसपासून सर्वस्वीं मुक्त करावें किंवा गांधींनीं काँग्रेसचा संबंध सोडून द्यावा. वस्तुस्थिति अशी आहे कीं, गांधी किंवा काँग्रेस ही निराळी होऊंच शकणार नाहीं. म्हणून गांधी काँग्रेसला सुधारत रहातलि व तिला शक्य तितक्या शुद्ध तत्त्वज्ञानाच्या भूमिकेवर नेतील. काँग्रेसनें स्वातंत्र्या-करतां हिंसेनें प्रतिकार करूं असें म्हटलेंच आहे. तसेंच खासगी संरक्षणा-करतां हिंसा होणें शक्य आहे असेंहि म्हटलें आहे. महात्माजी भित्रेपणा-पेक्षां हिंसा मी पसंत करीन असें सांगतातहि. तेव्हां टीकाकारांनीं ह्या हिंसाअहिंसेच्या मर्यादा समजून घेऊन टीका करावी.

गांधींच्या जीवनांत तडजोडीला महत्त्वाचें स्थान आहे. मनुष्य चुकीनें सुधारतो हें त्यांना मान्य आहे. ते स्वतःहि चुका करतात. गेल्या महायुद्धांत इंग्रजांना पैशाची व माणसांची मदत करणारे गांधी ह्या मदतीबद्दल पस्तावले. " मी स्वतःला (ब्रिटिश) साम्राज्याचा एक नागरिक म्हणून समजण्यांत चूक केली. '* त्यांना असें वाटलें कीं, आपल्या मदतीच्या मोबदल्यांत स्वराज्य मिळेल. पण तें फसलें. तथापि

* Young India 659.

ही मदत करणें अहिंसाविरोधी आहे असें त्यांना तेव्हां वाटलें नाहीं. " मला अहिंसेच्या दृष्टीनें माझ्या कृत्यांबद्दल पश्चात्ताप वाटत नाहीं. कारण स्वराज्यांत सुद्धां ज्याच्या हातांत शस्त्रें आहेत, त्यांना शस्त्रें घेण्यास व देशाकरतां लढण्याचा सल्ला देण्यास मी मागेंपुढें पहाणार नाहीं. " * ते आतां हा सल्ला देतील किंवा नाहीं, हा प्रश्न आहे. पण गांधी तडजोडीकरतां कांहीं गोष्टी सांगत असले तरी त्यांचें लक्ष शुद्ध तत्त्वावर असतें. आणि राष्ट्राच्या किंवा समाजाच्या कुवतीप्रमाणें ते हीं तत्त्वें सांगत असतात. पण गांधीवादांत अशी विसंगति सांपडत नाहीं. म. गांधींच्या भाषणांत अगर लिखाणांत बरेच वेळां विसंगति दिसते. पण ती खरी नसते. सूक्ष्मदृष्टीनें विचार केला तर वाटणारी विसंगति ही भ्रामक आहे अशी खात्री पटते. महात्माजी प्रत्येक ओळ विचारपूर्वक लिहितात हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पण हिंदुमुसलमानांच्या ऐक्याशिवाय स्वराज्य नाहीं, अस्पृश्यता नष्ट केल्याशिवाय स्वराज्य नाहीं, किंवा खादीशिवाय स्वराज्य नाहीं असें म्हणणारे गांधीजी ब्रिटिश सरकारबरोबर स्वराज्याचा लढा करण्याचा प्रसंग आला तर त्या त्या कार्यक्रमाच्या पूर्ततेकरतां थांबत नाहींत. तेव्हां त्यांच्या लिखाणांत वाटणारी विसंगति हें त्यांच्या अप्रमाणिकपणाचें द्योतक आहे, असें समजण्याचें कारण नाहीं. त्याचप्रमाणें या विसंगतींतून सुसंगतपणा निर्माण करण्याचा हट्टहि कोणी धरूं नये. ती एक बौद्धिक करामत होईल. पुष्कळ वेळां लेखक किंवा वक्ता हा विशिष्ट मताचा त्या त्या वेळीं जोरदारपणें पुरस्कार करूं लागला म्हणजे तोलून मोजून विधानें करीत नाहीं. त्यांत अत्युक्ति असते. गांधी हे तर 'सत्याचे प्रयोग' करीत असल्यामुळें त्यांच्या बुद्धीला होणारीं सत्य दर्शनें तो वेळोवेळ प्रकट करतात. गांधींच्या विचाराप्रमाणें आचारांचाहि फार गाजावाजा केला जातो. त्यांचें जीवित एका मोठ्या ठणठणीत प्रकाशाखालीं आहे, यांत वाद नाहीं. त्यांच्या क्षुल्लक आचरणाचा जगभर डांगोरा पिटला जातो. अशा प्रकारच्या माणसाला खासगी जीवनच नसतें. जो आपल्या बायकोनें चार आणे जवळ ठेवले म्हणून वर्तमानपत्रांत तिच्यावर गहजब करतो, तो धन-

* Young India 661

संचय करीत असेल असें म्हणणें अक्षम्य आहे. त्यांच्या खाण्यापिण्या-बद्दल, त्यांच्या स्त्रियांशीं येणाऱ्या संबंधाबद्दल असेंच भयंकर लिहिलें जातें. त्या लिखाणामुळें विष पसरत नाहीं असें नाहीं. पण मुळांत सत्य नसल्या-मुळें अशा विषारी प्रचाराचा काय परिणाम होणार ! गांधींच्याबद्दल वाचूं नये इतकें वाईट लिहिणारे आहेत. पण गांधींनीं त्यांना कधीं उत्तरें दिलीं नाहींत. वाळकें गवत नसलेल्या जागीं जर विस्तव टाकला तर तो जसा विझून जातो, तशी या टीकाकारांची स्थिति झाली आहे. तीच स्थिति त्यांच्या राजकीय सहकाऱ्यांची झाली. गांधींनीं राजकारणाचा विचका केला, वाटोळें केलें, स्मशान केलें असे म्हणणारे कितीतरी थोर पुरुष होऊन गेले. पण हे सर्व थोर पुरुष आज राजकीय क्षितिजावर नाहींत आणि जे कधींतरी उगवतात त्यांचा प्रकाश इतका लुकलुक करणारा आहे कीं तो उघड्या डोळ्यांला दिसतच नाहीं. कोणी जातिसंस्था काढल्या, कोणी सरकारी नोकऱ्या पत्करल्या, कोणी कार्यनिवृत्त झाले, तर कोणी नुसते कोरडे उपदेशक राहिले. पण म. गांधी हे १९२० सालीं जे राजकारणांत आले ते आजहि प्रमुख स्थान पटकावून आहेत. हा गर्वाचा प्रश्न नाहीं, किंवा अहंकाराचा नाहीं. त्यांच्या आचरणांत जर ढोंगीपणा असता किंवा राष्ट्राला मार्ग दाखविण्याची धमक नसती, किंवा वाऱ्याप्रमाणें पाठ फिरवत ते बसले असते आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या तत्त्वाकरतां ते जगत आहेत त्या तत्त्वाशीं त्यांनीं प्रतारणा केली असती तर इतिहासांत अवेळीं लुप्त झालेल्या सहकाऱ्यांप्रमाणें गांधीहि जीवंत असून मृत झाले असते. त्यांच्याजवळ प्रामाणिकपणा आहे, धडाडी आहे, आत्यंतिक त्यागाची, प्रायोपवेशनें करून प्राण-त्यागाची तयारी आहे, म्हणूनच ते अग्रभागीं आहेत. इतरांच्या दृष्टीनें ते वेडे असतील पण लुच्चे नाहींत.

इतर सांप्रदायांप्रमाणें गांधी-तत्त्वाज्ञानाला एक धोका आहे. हा धोका प्रत्येक सांप्रदायाला असतो. कोणत्याहि सांप्रदायाची शुद्धि अगर प्रगति त्या सांप्रदायांतील अनुयायावर अवलंबून रहाते. हे अनुयायीच त्या तत्त्वाचे शत्रु होतात. वास्तविकपणें कोणत्याहि तत्त्वज्ञानाचा सांप्रदाय झाला म्हणजे त्यांत अशुद्धि येऊं लागते. सांचलेलें पाणी आणि जिवंत झरा

यांत जी समानता असते तीच सांप्रदाय व आद्यतत्त्व यांत असतें. सांप्रदाय हा आचारप्रधान कर्मठांकडून टिकवला जातो. ते मूळ तत्त्वज्ञानांत आपल्या बुद्धीनें भर घालणें हा तत्त्वद्रोह मानतात. त्यामुळें नवे प्रसंग आले म्हणजे नवा मार्ग शोधून काढण्याऐवजीं आपल्या जुन्या ग्रंथांत सर्व कांहीं आहे अशा आत्मसंतोषांत तत्त्वाची ओढाताण करतात. त्या सांप्रदायांतील माणसें आचाररत होतात आणि तत्त्व बाजूला ठेवून कर्मठपणालाच प्राधान्य देतात. या कर्मठपणांत जिवंतपणा नसतो, मृतावस्था असते. आचारांत जर श्रद्धेची विद्युच्छक्ति असेल तर सारें जीवन प्रभावी होईल. ज्या धर्मांत कर्मठपणा प्रधान झाला तें धर्म निष्प्रभ झाले. श्रद्धेप्रमाणेंच बुद्धीचा अंत हाहि या सांप्रदायिकत्वाला कारणीभूत होतो. आजहि पुष्कळ गांधींचे अनुयायी असे आहेत, कीं जे श्रद्धेशिवाय किंवा बुद्धीशिवाय गांधींचा कार्यक्रम करीत आहेत. अशा अनुयायांकडून गांधीवादाची जोपासना कशी व्हावी ? तें त्या तत्त्वज्ञानाच्या गौरवाला कारणीभूत होण्याऐवजीं तें तत्त्वज्ञान स्वतःच्या वर्तनानें हास्यास्पद करण्याला कारणीभूत होतात. नुसत्या आचरणानें त्या तत्त्वज्ञानाला तेज चढत नाहीं. दगडांत देव नाहीं हें समजलें पाहिजे; पण त्याबरोबरच देव जर सर्व चराचर वस्तूंत भरला आहे तर तो दगडांत कां नसावा हेंहि कळलें पाहिजे. ' आदम खुदा नहीं, लेकिन आदम खुदासे जुदा नहीं ' अशी एक यथार्थ म्हण आहे. तेव्हां छाया व प्रकाश यांचा अन्योन्यसंबंध समजणें आणि छायेला प्रकाश म्हणून न कवटाळणें हेंच बुद्धीच्या जिवंतपणाचें लक्षण आहे.

सांप्रदायिकत्वाप्रमाणेंच ढोंगीपणा, आचरटपणा, चढेलपणा हे अक्षम्य दोष नव्या तत्त्वज्ञानांत येतात. तसे ते गांधीवादांतही आले आहेत. फाजील विनय हा अविनयाइतकाच भयंकर असतो. गांधींनीं याविरुद्ध लिहिलें आहे. गांधीवादांत जर विनय नसेल तर मग तो कोणत्या वादांत असावा ? गांधीवादी हा नुसता डोकें असणारा पण अंतःकरण नसणारा कोरडा ठणठणीत प्राणी असतां कामा नये. गांधी हेच या वादाचे आदर्श. कोणतीहि आपत्ति पाहून त्यांचें हृदय द्रवतें. कोणताहि व्याधिग्रस्त मनुष्य पाहिला कीं त्यांचें अंतःकरण पिळवटून येतें. महा-

रोग्याची शुश्रूषाहि हातानें करणारे पोटभरू कांहीं असतील. पण ती माणुसकीची सेवा म्हणून करणारे किती गांधी असतील ? अहिंसा काय, हरिजन सेवा काय, खादीची चळवळ, किंवा अन्य चळवळी काय, या सर्वांची उभारणी अंतःकरणाच्या तळमळीवर, गोरगरिबांच्या वेदनावर म्हणजेच शुद्ध, पवित्र व उच्च भावनांवर झाली आहे, हे गांधीवाद्यांनीं विसरूं नये. गांधीवादांतून भावना जर काढून टाकली तर ख्रिश्चन धर्माप्रमाणें त्याची स्थिति व्हावयाची. ख्रिश्चन धर्म हा दयेचा, प्रेमाचा, सहिष्णुतेचा, व वात्सल्याचा धर्म समजतात. पण त्या धर्माचे अनुयायी काय धिंगाणा घालीत आहेत, हें युरपच्या रक्तानें सतत वहाणाऱ्या भूमीवरून दिसतें.

गांधीवादांतील आचरणाच्या मागें असणारा प्रामाणिक गांधीवादी हा इतर सांप्रदायांतील कर्मठांप्रमाणें भावनाशून्य होत जाण्याची भीति असते एवढेंच नव्हे तर त्याला दुसऱ्याच्या भावनाहि कळेनाशा होतात. संन्यासमार्गीय तत्त्वज्ञांना विकार व विषय यांच्यावर विजय मिळवावयाचा असतो, तेव्हां ते जर ज्ञानानें ज्ञेय जाणून घेण्याच्या प्रयत्नांत भावना जिंकत असतील तर तें योग्यच होईल. पण गांधीवाद हा संन्यासमार्गीयांचा वाद नाहीं. सेवा हें या मार्गाचें मुख्य साधन आहे. या मार्गांत प्रार्थनेला महत्त्वाचें स्थान आहे. या साध्यसाधनांचा विचार केला म्हणजे हा पंथ ज्ञान किंवा कर्ममार्गापेक्षां भक्तिमार्गाच्या अधिक जवळचा वाटतो. भक्तिमार्ग हा ज्याप्रमाणें भावनेशिवाय असूंच शकणार नाहीं, त्याप्रमाणें गांधीवाद हा भावनेशिवाय असूं शकणार नाहीं. त्यामुळें खरा गांधीवादी हा हृदयशून्य, भावनारहित असूं शकणार नाहीं.

ढोंगीपणा, अति नम्रता वगैरेंचा उल्लेख वर केला आहे. पुष्कळजण जाणूनबुजून ढोंग करतात, पण पुष्कळांच्या हातून न कळत ढोंग होत असतें. जाणूनबुजून ढोंग करणारा सतत टिकूं शकत नाहीं. पण न कळत ढोंग करणारा हा तापदायक होतो. तो आपल्या आचरणांतच दंग असतो. त्यामुळें स्वाभाविकपणेंच इतरांना तुच्छ लेखण्याची वृत्ति

त्यांत असते. ही वृत्ति तत्त्वज्ञानाबद्दलचा आदर व जिव्हाळा वाढविण्या-ऐवजीं तिटकारा उत्पन्न करते.

वर सांगितलेले दोष हे फक्त नमुन्यादाखल आहेत. यापेक्षां कितीतरी अधिक दोष मनुष्याच्या स्वभावांत येतात. अशा दोषापांसून मुक्त होण्याकरतां आत्मनिरीक्षण करावयाचें असतें व अंतःकरणाची शुद्धि करावयाची असते. ती शुद्धि प्रेमानें, सेवेनेंच करतां येईल.

अशा प्रकारें गांधीवाद, गांधी व गांधी अनुयायी यांच्याबद्दलची परिस्थिति आहे. गांधीवाद हा निर्दोष आहे. गांधी हें विकास पावत जाणारे सच्चे साधक आहेत. गांधींच्या अनुयायांतहि प्रामाणिकपणा आहे; पण त्यांतलि कांहींच्यांत कळत वा न कळत सामान्य दोष दिसून येतात आणि त्यामुळेंच स्वपक्षीय असोत वा परपक्षीय असोत दोघांवरहि या वर्तनाचा अनुकूल परिणाम होत नाहीं. अशांच्या दोषांमुळें गांधी व गांधीवाद यांच्यावर प्रखर टीका होते. या समजुतलिा मोजमाप लावतां येणार नाहीं. आत्मनिरीक्षण हीच त्याची कसोटी आहे.

उपसंहार : : : १६

राजनैतिक आदर्श
सुसंस्कृत अराजकता.

मेरी दृष्टीसे राजनैतिक सत्ता हमारा ध्येय नहीं हो सकता। जिन साधनों की बदौलत जीवन के प्रत्येक विभाग में अपनी उन्नति करने की शक्ति लोगों में आती है उनमे से राजनैतिक सत्ता एक है। राष्ट्र के प्रतिनिधियों द्वारा राष्ट्रीय जीवन का नियमन करने की शक्तीका ही नाम राजनैतिक सत्ता है। यदि राष्ट्रीय जीवन इतना पूर्ण हो जाय कि वह स्वयंनियंत्रित रहे तो प्रतिनिधित्व की आवश्यकता ही नही रहती। वह एक सुसंकृत अराजकता की अवस्था होगी, जिसमें प्रत्येक व्यक्ति अपनाही शासक होगा। वह अपना नियमन आप ही इस तरह करेगा कि जिससे उसके पड़ोसी के हित में बाधा न हो। आदर्श स्थिति में राजसंस्था ही नही रहेगी तो फिर राजनैतिक सत्ता कहा से आयेगी ?

—म. गांधीजी.

सर्वोदय १९३९

गांधीवादाचें राजकीय प्राप्तव्य अराजकता आहे, हें वाचून कांहींना आश्चर्याचा धक्का बसेल. गांधीवादाचें धार्मिक किंवा आध्यात्मिक प्राप्तव्य

मोक्ष आहे हें वाचून कोणालाच धक्का बसत नाहीं. आपण आपली प्रज्ञा जर थोडीशी प्रज्वलित केली तर आध्यात्मिक मोक्ष आणि राजकीय अराजकता यांत फारसा फरक नाहीं हें समजून येईल.

अराजकता हीच खरोखर कोठल्याहि राज्यकारभाराची परिपूर्णावस्था असते. सामान्य जनतेला आपला कारभार आपल्याला करतां येत नाहीं म्हणून त्यांना वाट दाखविण्याकरतां किंवा त्यांच्या प्रयत्नांचें एकीकरण करण्याकरतां किंवा नियंत्रण करण्याकरितां एखादी स्वतंत्र संस्था लागत असते. शहरांतला पोलीस गाड्या, माणसें वगैरेंचें नियंत्रण करतो-तसेंच तो चोरी, मारामाऱ्या, असल्या गुन्ह्यांचा तपास करून अपराध्यांवर खटले भरतो. खेडोपाडीं अशींच स्थिति असते. पोलीस जर नसतील तर चोरांचें फावेल व जनतेचें जीवित अशक्य होईल. तसेंच लष्कर जर नसेल तर एका देशाला दुसऱ्या देशापासून बचाव करतां येणार नाहीं. न्यायाधीश जर नसतील तर खऱ्या-खोट्यांचा निवाडा होणार नाहीं. शाळा जर नसतील तर विद्यार्थ्यांना शिकवील कोण ? आणि रेल्वे नसतील तर मालाची व माणसाची ने–आण कशी होणार ? दुष्काळ पडला तर सरकार कोठून तरी धान्य आणतें. आग लागली तर ती आग विझवण्याचें काम सत्ताधारी करतात. या सर्व गोष्टींचा विचार केला कीं, सरकार हें हवा, पाण्याप्रमाणेंच आवश्यक वाटतें. हवेशिवाय जसा मनुष्य जगूं शकत नाहीं, तसा सरकार-शिवायहि तो जगणार नाहीं अशी आजची स्थिति आहे. आजचें जीवित हें इतकें भानगडीचें व गुंतागुंतीचें झालें आहे कीं, राजसत्तेशिवाय समाज कसा चालूं शकेल याची आपल्याला कल्पनाहि करवत नाहीं. जर गुंतागुंतीचें जीवित हें सुटें होत होत साधेंसुधें होईल तर राजसत्ता नष्ट करतां येईल. मनुष्यानें आपले व्यवहार वाढवीत वाढवीत इतक्या थराला नेले आहेत कीं, त्याची उतरती भांजणी केव्हां सुरू होईल हें सांगवत नाहीं. अर्थात् या गुंतागुंतीच्या जीवनाचें केंद्र पैसा आहे. पैशामुळेंच वासना, इच्छा यांची वाढ होते, आणि शहाणपणानें लोकांना फसवण्याचे व स्वतः श्रीमंत होण्याचे उद्योग करावे लागतात. राजसत्ता ही अशा स्वार्थी लोकांची आद्य संस्था आज बनली आहे.

तेव्हां म. गांधींनीं म्हटलेली सुसंस्कृत अराजकता स्थापन करावयाची असेल तर मनुष्य हा अत्यंत साधा व स्वावलंबी झाला पाहिजे. त्यानें आपल्या गरजा कमी केल्या पाहिजेत आणि यंत्राशिवाय आपण जगूं शकतों हें सिद्ध झालें पाहिजे. त्याचप्रमाणें आजच्या सांघिक जीवनाची मर्यादाहि समजून घेतली पाहिजे. मनुष्य हा स्वयं-शासित, संयमी व स्वावलंबी झाला तरच सांस्कृतिक अराजकता निर्माण होईल. तेव्हां मनुष्याची आत्मीयता ही इतकी वाढली पाहिजे कीं, त्याला स्वतःमध्यें व शेजाऱ्यामध्यें फरक वाटतां कामा नये. शेजारी उपाशी राहिला तर आपल्याला जेवतां येणार नाहीं असें त्याला वाटलें पाहिजे. ज्या ठिकाणीं ही भावना येईल तेथें दुसऱ्याचें अनहित करण्याचे विचार कधींच येणार नाहींत.

मनुष्याची परिपूर्णता जसजशी होत जाईल तसतशी राज्यसंस्था ही कमी कमी शासक होत जाईल व शेवटीं ती नष्ट होईल. आध्यात्मिक मोक्षाला अधिकारी होणारा, हा राजकीय मोक्षाला अधिकारी होणाऱ्या-पेक्षां श्रेष्ठ दर्जाचा असला तरी दोघांचा मार्ग एकच आहे. आध्यात्मिक मोक्षांत सत्य, अहिंसा वगैरेंची जितकी जरूरी असते तितकीच राजकीय मोक्षांतहि असते. एकाला जगाशीं कोणतेंच कर्तव्य नसतें. दुसरा मनानें व आचरणानें जवळजवळ त्याच स्थितीला यावा लागतो. तेव्हां गांधी-वादानें अपेक्षिलेली परिपूर्णावस्था जर माणसांत येईल तर तो जगाच्या नाशाला कारणीभूत झालेल्या शासनसंस्थेचा विध्वंस करील. एवढेंच नव्हे तर तो आत्मिक मोक्षहि प्राप्त करून घेईल.

ह्या परिपूर्णावस्थेचा आधार व्यक्ति आहे, विशिष्ट समाजपद्धति किंवा राज्यपद्धति नाहीं. कारण विशिष्ट राज्यपद्धतींतून अराजकता निर्माण होऊं शकते व ती समाजाच्या सुखाला कारणीभूत होते असाहि एक सिद्धांत आहे. पण गांधीवाद हा व्यक्तिनिष्ठ आहे. व्यक्ति सुधारली पाहिजे म्हणजे व्यक्तींचाच बनलेला समाज सुधारतो हें खरें आहे. ही व्यक्ति कशी सुधारणार ? ती सत्याचरणानें, अहिंसेनें, त्याचप्रमाणें स्वाव-लंबनानें सुधारते. म्हणून सत्य, अहिंसा आणि स्वावलंबन म्हणजे चरखा, ग्रामोद्योग वगैरे विधायक कार्यक्रमाचा उपक्रम म. गांधींनीं प्रतिपादलेला

विधायक कार्यक्रम हा सांस्कृतिक अराजकतेचा मुख्य आधार आहे. ह्या विधायक कार्यक्रमामुळें युद्ध असो अगर शांतता असो आपण परावलंबी असत नाहीं. या कार्यक्रमामुळें आर्थिक व्यवहाराकरतां तरी कोणत्याहि सत्तेवर अवलंबून रहावें लागत नाहीं. गिरण्या असोत वा नसोत, मोटारी, रेल्वे असोत वा नसोत यांपैकीं कशाचीहि गरज विधायक कार्यक्रमानें स्वावलंबी जीवन व्यतीत करणारांस सामान्यतः लागत नाहीं. हा कार्यक्रम जर संपूर्णतः अंमलांत आणला तर सामाजिक, धार्मिक, आर्थिक वगैरे बाबतींत क्रांति होते, नवी दृष्टि येते आणि नव्या पद्धतीचा जीवनक्रम सुरू होतो.

म्हणूनच गांधीवाद हें जीवनशास्त्र आहे. त्यांत नुसत्या आध्यात्मिक, नुसत्या राजकीय, किंवा सामाजिक प्रश्नांचा विचार केला नसून व्यक्तीच्या साऱ्या जीवनाचा विचार केला आहे. हें जीवन कशावर आधारलेलें आहे, त्याची वाढ कशी होते, त्यामुळें सर्वत्र क्रांति कां होते आणि त्या जीवनाची परिणति काय हें गांधीवाद सांगतो म्हणूनच त्याला जीवनशास्त्र म्हणतां येईल.

आतांपर्यंत केलेल्या चर्चेवरून गांधीवाद हा एक असामान्य वाटणारा आचार व बुद्धिवाद आहे हें तर स्पष्टच आहे. जगाच्या सुरवातीला निर्माण झालेलीं माणसें आजच्यासारखींच आपल्या भाईबंदांच्या जिवावर उठणारी व असत्याचरणी होतीं कीं काय हें इतिहासाच्या अभावीं सांगतां येत नाहीं.* जर ती प्रेमपूर्ण व सत्यप्रिय असतील तर आजचें आपलें जीवन हें मूळापासून चांगलेंच चळलें आहे हें कबूल करावयास हरकत नाहीं. पण जर तें तसें नसेल तर आपण त्या ध्येयमय जीवनाची प्रतिष्ठापना करण्याची महत्त्वाकांक्षा कां बाळगूं नये ! व्यक्तीचा विकास हा सतत होतच असतो. गांधीवाद ही त्या विकासाची परिपूर्णावस्था आहे असें अहिंसात्मक प्रवृत्तीच्या माणसांना वाटतें. कोणत्या नांवानें या प्रवृत्तीच्या पूर्णावस्थेला संबोधावें हा प्रश्न नाहीं. त्याला अहिंसावाद म्हणा, शांतिवाद म्हणा, किंवा अन्य नांवानें संबोधा.

---

* अद्यापहि ज्यांना जग रानटी म्हणतें अशा एस्किमोंना युद्ध म्हणजे काय हें माहीत नाहीं.

अल्डस हक्सले म्हणतात. ' माझ्या वाचकांना शिणविण्याचा धोका पत्करूनहि मी हजाराव्या वेळीं सांगतों कीं, फळावरून झाड ओळखावें. पौर्वात्य गूढवाद्यांच्या सिद्धांतांशीं ज्याच्या सिद्धांतांचें साम्य आहे तो क्लाउडचा कर्ता एकहार्ट आपल्या सिद्धांतांचें फळ शांति, सहिष्णुता व औदार्य आहे असें सांगतो. '

ही शांति, ही सहिष्णुता व हें औदार्य प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर त्याला संयम व त्यागाची जरूरी आहे असें गांधीवाद सांगेल. एका संयमांत व त्यागांत जगाचें सारें चक्र उलटाविण्याची शक्ति आहे. पण त्यांत स्वार्थ आडवा येऊन पडतो व मनुष्याची नैसर्गिक बुद्धि ही कृत्रिम बनते.

समाजाच्या वैषम्याला कारणीभूत झालेला प्रश्न एकच आहे. तो म्हणजे स्वामित्वाची भावना. पैसा, जमीन, दागदागिने, घरें-दारें, गुरेंढोरें वगैरेंना आपण संपत्ति समजतों. एवढेंच नव्हे स्त्रियांनाहि संपत्ति समजतों. हा मालकीचा प्रश्न जसा जगाच्या सुखाला कारणीभूत झाला आहे, तसा दुःखालाहि कारणीभूत झाला आहे. अल्डस हक्स्ले हे ब्रह्मचर्य पाळलें म्हणजे स्त्रियांचा प्रश्न संपला आणि अपरिग्रह व्रत घेतलें म्हणजे संपत्तीचा प्रश्न संपला असें मानणारे संन्यासी नाहींत. व्यावहारिक दृष्टया त्यांना हे प्रश्न सोडवावयाचे आहेत. ते म्हणतात कीं, स्त्रियांचा प्रश्न हा खालीलप्रमाणें सोडावितां येईल. ' विवाहापूर्वी स्त्रीपुरुष हे शुद्ध आहेत असें राज्यसंस्थेनें मान्य करावें, एकपत्नीव्रताला व एकपतिव्रताला आणि उभयतां कायद्याच्या दृष्टीनें सारखें आहे याला सरकारनें कबूली द्यावी. ' याशिवाय त्यांनीं जीवनाच्या प्रश्नांत उभयतांनीं कोणती दृष्टि ठेवावी याचें विवरण केलें आहे. दुसरा प्रश्न संपत्तीच्या मालकीचा. हाच प्रश्न अत्यंत कठीण आहे. संपत्तीमुळेंच महत्त्वाकांक्षा, अधिकाराची लालसा आणि सामाजिक प्रतिष्ठा वगैरे भावना येतात. अर्थात् संपत्ति हेंच जगांतील प्रयत्नांचें मूळ नसतें. सेवा, कीर्ति, कर्तव्याची जाणीव यांमुळेंहि मनुष्य आपलें जीवित उदात्त करतो. पण सामान्यतः ज्याला अनर्थ म्हणतां येतील ते या चुकीच्या अर्थशास्त्रामुळें झाले आहेत. ते अनर्थ टाळावयाचे असतील तर ' अना-

सक्ति ' हाच एक उपाय आहे असें हक्स्ले यांना कबूल करावें लागलें. ते म्हणतात, ' आदर्श पुरुष कोणाला म्हणावें ? जो अनासक्त असतो त्याला. जो शारीरिक विषय व वासनांना अनासक्त असतो; जो सत्ता व संपत्तीच्या मोहाला अनासक्त असतो; जो राग आणि द्वेषाला अनासक्त असतो; जो आपल्या एकमेव प्रेमाला अनासक्त असतो; जो संपत्ति, कीर्ति व सामाजिक दर्जा याला अनासक्त असतो; जो शास्त्र, कला, औदार्याला अनासक्त असतो; तोच आदर्श पुरुष होय. ' * अनासक्ति याचा अर्थ हक्स्ले आसक्तीचा अभाव एवढाच घेत नाहींत. औदार्य, बुद्धिमत्ता, शौर्य, धैर्य वगैरेंची वाढ अनासक्तींत असते असें ते म्हणतात. त्यांनीं चांगल्या व वाईटाची केलेली व्याख्याहि आपल्या कल्पनांशीं जुळणारी आहे. एकत्वाला चांगलें म्हणावें व भिन्नत्वाला वाईट म्हणावें. माझें घर, माझी संपत्ति, माझीं बायकामुलें, वगैरे कल्पना भिन्नत्वाच्या आहेत व त्या कल्पनांमुळें मनुष्य पापाला प्रवृत्त होतो. पण + जीवात्मा व परमात्मा एक आहे; मनुष्यमात्रांना परस्परांची सेवा करावयाची आहे, देवाची प्राप्ति एकत्वाशिवाय होत नाहीं, ह्या कल्पना चांगल्या आहेत. म्हणून एकत्व हें चांगलें व भिन्नत्व हें पाप आहे असें त्यांचें म्हणणें. तेव्हां जगाच्या अनर्थाला कारणीभूत झालेले संपत्तीच्या मालकीचे, अधिकारलालसेचे, महत्त्वाकांक्षेचे प्रश्न अनासक्तीनें व एकत्वाच्या भावनेनें सोडवितां येतील असेंच हक्स्ले यांचें निदान आहे. अर्थात् ते त्याकरतां चरखा किंवा ग्रामोद्योगासारखा उपाय सांगत नाहींत. ते म्हणतात, ' जर समता हवी असेल तर त्याकरतां असा समाज घडविला जावा ' कीं, ज्यांत सर्व उत्पत्तींचीं साधनें हीं सहकारी तत्त्वाप्रमाणें सामुदायिक मालकीचीं असावींत. तेथें सत्तेची विभागणी केली जावी, आणि तेथें संघ असे बनावेत कीं, ते लहानलहान पण असंख्य असावेत. ते परस्परावलंबी व शक्य तोंवर स्वयंशासित असावेत. त्यांतील घटक स्त्रीपुरुष हे परस्परांना जबाबदार असावेत. × जरी हक्स्ले हे गांधींच्या अहिंसावादाइतके उच्च शिखराला, अर्थात कल्पनेनें पोहोंचलेले

* Ends and means Page 3.

+ Page 303. × Page 169.

नाहींत तरी ते युद्धाच्या विरुद्ध आहेत. त्यांना शांति हवी आहे, अनत्याचार हवा आहे आणि सत्याबद्दल तर बोलावयास नकोच नको. पण इतर पाश्चात्त्य तत्त्वज्ञांप्रमाणें त्यांच्याहि सत्य–अहिंसेच्या कल्पना समर्याद आहेत. हक्स्ले यांचें मत काय आहे हें वर एवढ्याचकरतां सांगितलें कीं, ते एक पाश्चात्य गृहस्थ आहेत. पाश्चात्यांचीं मतें हीं बुद्धिमान्, व्यवहारी, शास्त्रज्ञ अशांचीं मतें म्हणून आपल्याकडील पंडित कधीं कधीं मान्य करतात. त्यांच्या बुद्धीला असले विचार पटत नसले म्हणजे त्या पाश्चात्यालाहि ते वेडाच म्हणतात. पाश्चात्यांना वेडे म्हटलें म्हणजे आम्हांलाहि वाटतें कीं, वेड्यांची पैदास फक्त हिंदुस्थानांतच होत नाहीं, ती युरप–अमेरिकेंतहि होते. अर्थात् हक्स्लेचा आधार देऊन गांधीवाद पटवावा ही त्यांत इच्छा नाहीं. कारण गांधीवाद ग्राह्य का अग्राह्य हें शेवटीं स्वतःच्या जाणिवेनेंच ठरणार आहे.

पण गांधीवाद चुकीचा आहे हें ठरविण्याकरतां तरी त्याचा अभ्यास झाला पाहिजे. बुद्धिवंतांनीं असें सांगितलें पाहिजे कीं, आम्हांला सत्य काय, अहिंसा काय, अपरिग्रह काय, भूतमात्रावरील प्रेम काय, कांहीं कांहीं आम्हांला यांतलें मान्य नाहीं. पण बुद्धिमान् तसें कधींहि सांगणार नाहींत. ते जर तसें सांगतील तर त्यांची, आई पत्नी, मुलेंबाळें वगैरे सर्वजण विशिष्ट स्वार्थाकरतां एकत्र आलेल्या व्यक्ति ठरतील. मग प्रेम कसलें, दया कसली आणि माया कसली ? पण मनुष्य हा इतका भावनाशून्य झाला नाहीं. तो आईला पूज्य मानतो आणि आपल्या पत्नीलाहि गृहदेवता म्हणून संबोधतो. ह्याच भावनेला दैवी भावना म्हणतात. त्या दैवी भावनांचें आचरण हातून होत नाहीं म्हणून मनुष्य एक तर पशु बनतो अगर त्या दैवी भावनांचें आचरण आपल्या हातून अधिकाधिक व्हावें म्हणून तो अनासक्त परमार्थी होतो आणि साऱ्या विश्वावर प्रेम करण्याकरतां वेडा होतो. तेव्हां बुद्धिमंतांनीं माणसाचा पशु होणें आवडतें का माणसाचें अतिमाणूस (Super man) होणें पसंत पडतें, हें त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें पाहिजे. गांधीवादांत अमुक दोष तमुक दोष आहेत हें आजवर आपण ऐकत आलों. कोणत्या वादांत दोष नाहींत ? मनुष्याची बुद्धि इतकी

विचित्र व तल्लख आहे कीं, ती सूर्योदयाचे वेळीं उमलणाऱ्या आणि चहूंकडे सुगंधच सुगंध पसरवणाऱ्या गुलाबांच्या फुलांतहि दोष काढूं शकेल. प्रत्येक वाद हा त्यागी लोकांकरतां असतो, तो अव्यवहार्य असतो, त्याचें आचरण करणारे ढोंगी असतात वगैरे दूषणें आपण काय ऐकत नाहीं ? आत्मा अमर आहे असें मानणाऱ्या आपल्याच देशांत चार्वाक निर्माण झाले व कसला आत्मा आणि कसला पुनर्जन्म असें म्हणालेच कीं नाहीं ? पण चार्वाकाचीं मतें समजून घेण्याचा प्रयत्न कोणी फारसा करीत नाहीं. आद्य शंकराचार्य किंवा इतर आचार्यांच्या मतांबद्दल ज्ञानलालसा उत्पन्न होते व त्यांच्याच ग्रंथांचें अध्ययन होतें.

गांधीवादाची व आपल्या इकडील अध्यात्म्याची सांगड घातली तर बुद्धिमान् म्हणतील गांधीवाद नवें काय सांगत आहे ! आमच्या ग्रंथांत सर्व कांहीं आहे. ज्यांना त्यांतील अहिंसा पटत नसेल ते म्हणतील गांधी हा प्रच्छन्न बुद्धधर्मी किंवा जैनधर्मी किंवा ख्रिश्चनधर्मी आहे. या तीनहि धर्मांत अहिंसा आहे व त्या धर्मांचें व आमच्या सनातन धर्माचें वांकडें असल्यामुळें गांधीवाद म्हणजे शत्रुवत् असणाऱ्या त्या तीन धर्मांचा आमच्या धर्मावर झालेला हल्ला होय असें परंपराप्रियपंडित म्हणतील.

अशा प्रकारें गांधीवादाचा चटकन् निकाल लावणारे लोक आपल्याला सांपडतील. वास्तविकपणें अनेक बुद्धिवादी न कळत आपल्या बुद्धीशींच प्रतारणा करीत असतात. या बुद्धिवाद्यांपैकीं जे ईश्वर, प्रेम, सत्य असत्य वगैरे कांहीं मानीत नाहींत त्यांच्याबद्दल कोण काय बोलणार ? त्यांनीं सर्व विश्व जिंकलें तरी त्यांना आत्मिक समाधान लाभणार नाहीं. सारें युरप जिंकणाऱ्या हिटलरला कसलें आत्मिक समाधान मिळणार आहे ? तेव्हां अशा वृत्तीच्या लोकांचे म. गांधी पुढारी होऊं शकणार नाहींत. त्यांचा पुढारी हिटलर, किंवा स्टॅालिन किंवा चर्चिलच होऊं शकेल. दर दहा दहा वीस वीस वर्षांनीं युरपची सारी पिढीचीपिढी गारद झालेली त्यांना पहावते, पण आपली प्रतिष्ठा सोडवत नाहीं. आपल्या देशाला अत्यंत सुखाचे दिवस लाभावेत म्हणून ते स्वतःच्या देशबांधवांचें

रक्तचरक्त सांडीत आहेत. या हत्येंतून नवें जग तें निर्माण करणार आणि इतरांच्या नाशावर आपल्या सुखाचे मनोरे बांधणार ! ज्यांना हें सुख हवें असेल तें गांधीवाद कधींच पसंत करणार नाहींत. ते हजारों शंका काढतील, गांधींच्या आचरणांत कोठें मुंगी शिरली कीं काय हें बघतील आणि त्यांना फेंकून देण्याकरतां उठाव करतील. खोटा पराक्रम हाच खरा पराक्रम आज समजला जात आहे. खोटें राष्ट्रीयत्व हेंच खरें राष्ट्रीयत्व म्हणून लोकांच्या डोक्यावर लादण्यांत येत आहे आणि हिंसेनें लोकांच्या प्राणांचा कत्तलखाना चालला आहे. ज्या पराक्रमांत दीन-दुबळ्यांच्या संरक्षणाची हिंमत नाहीं, जें राष्ट्रीयत्व आपल्या लोकांच्या कल्याणाकरतां दुसऱ्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य हिरावून घेतें आणि जी हिंसा जगाची मालकी मिळविण्याकरतां केली जाते अशा हिंसेंत, राष्ट्रीयत्वांत व पराक्रमांत काय समर्थनीय आहे ? एक काळ असा होता कीं जेव्हां अन्यायाच्या प्रतिकारार्थ शस्त्र उचललें जात असे. आज न्यायाच्या प्रतिकारार्थ शस्त्र उचललें जात आहे. आज जगांत संरक्षक हिंसा राहिली नसून आक्रमक हिंसा धिंगाणा घालीत आहे. ही स्थिति कोणाला मान्य आहे हें तरी कळलें पाहिजे.

पूर्ण हिंसा नाहीं, अगर पूर्ण अहिंसा नाहीं, असा मधला मार्ग निघूंच शकणार नाहीं. घ्यायची असेल तर गांधी म्हणतात त्याप्रमाणें पूर्ण अहिंसा व पूर्ण सत्य हें राजकारणांत आणि ऐहिक व्यवहारांत घेतलें पाहिजे; किंवा हिटलर, चर्चिल, स्टॅलिनप्रमाणें पूर्ण हिंसा व पूर्ण असत्य याचे तरी अनुयायी बनलें पाहिजे. यांत तडजोड होणार नाहीं. हिंसेचे व अहिंसेचे मार्ग अगदीं स्वतंत्र व परस्पर विरुद्ध आहेत.

अहिंसेचा मार्ग यशस्वी कसा होईल याबद्दल कांहीं जणांना प्रामाणिक-पणें शंका वाटते. साऱ्या जगांत हिंसेचा झंझावात सुटला आहे, त्या सोसाट्याच्या वाऱ्यानें प्रचंड वृक्ष उन्मळून पडताहेत अशा स्थितींत रानांत सांपडलेल्या प्रवाशानें घेतलेलें अहिंसेचें हें निरांजन विझल्या-वांचून कसें राहील हा त्यांचा प्रश्न आहे. या तुफानाला भिऊन सर्वजण पळून जातील आणि एखादाच विश्वासाच्या आवरणाचें पांघरूण घालून

त्या ज्योतीचें रक्षण करण्याचा प्रयत्न करील. कदाचित् तें निरांजन विझेलहि. पण त्यामुळें निरुत्साही होण्याचें कारण काय ? आपला मार्ग बरोबर असला म्हणजे अंतःकरणांतील उज्ज्वल दीप्तीच्या प्रकाशांत आपण पुढें पुढें जाऊं शकूं. तेव्हां प्रश्न मार्गाबद्दल आहे. तो ज्यांना पसंत असेल त्यांनीं अडचणींना आणि संकटांना भिण्याचें कारण नाहीं. चांगल्या मार्गांत अडचणी नसतात आणि वाईट मार्गांतच असतात असें थोडेंच आहे ?

जगांत अहिंसाच प्रभावी व यशस्वी होईल अशी ग्वाही कोण देऊं शकेल ? सत्य व अहिंसेपेक्षां हिंसा व असत्याचा मार्ग जवळचा जरी वाटला तरी तो अखेरीस नाशाला कारणीभूत होणार आहे हें ज्यांच्या बुद्धीला, मनाला, अंतःकरणाला पटेल तेच गांधीवादाचे अनुयायी होतील. अहिंसावाद हा जरी राज्यावर अधिष्ठित झाला नाहीं तरी त्या मार्गाचें आचरण करणाऱ्याला भिण्याचें कारण काय ? जगांतील सर्व लोकांना खायला मिळत नाहीं म्हणून आपण आपल्या जवळची शिदोरी फेकून देत नाहीं; किंवा जगांत पुष्कळ लोकांना कपडे नाहींत म्हणून आपण आपल्या कपड्यांचा त्याग करीत नाहीं. तसेंच जग अहिंसा पाळत नाहीं म्हणून पटलेली अहिंसा आपण सोडून देण्याचें कारण नाहीं किंवा अहिंसा जगांत यशस्वीच होणार नाहीं म्हणून आपणहि तिचा त्याग करण्याचें कारण नाहीं. अर्थात् ज्यांना अहिंसा पटत नसेल त्यांच्याबद्दल कांहींच म्हणावयाचें नाहीं.

जगांत आजवर जे तत्त्वज्ञ व धर्मसंस्थापक होऊन गेले, त्यांनीं आपलीं तत्त्वें यशस्वी होणार नाहींत म्हणून त्यांचा प्रचार करण्याचें किंवा आचार करण्याचें थांबविलें नाहीं. कांहींजण आपल्या अंधःकारमय निवासांतून बाहेर पडणार नाहींत या भीतीनें सूर्य प्रकाशावयाचा थांबत नाहीं. तेव्हां कोणत्याहि तत्त्वाच्या आचार-प्रचाराला यशाची शक्याशक्यता बाधक होत नाहीं.

अहिंसावाद अथवा गांधीवाद हा या पुढील काळांत यशस्वी होणार नाहीं हें तरी कोणीं सांगावें ? कदाचित् आत्यंतिक प्राणहानीमुळें भयानें

थरथरा कांपणारी मनुष्यजात हिंसेचा तीव्रतेनें त्यागहि करील. माणसांतला उच्च माणूस हा जागृत झालाच पाहिजे. तो ज्वालामुखीप्रमाणें जागृत होणार नाहीं. सायंकाळीं पारिजातकाचीं किंवा रातराणीचीं फुलें उमलून आपल्या निशिगंधानें सर्व सृष्टि आनंदमय करतात तशी या उच्च माणसाची जागृति असेल. हिंसेचा अतिरेक हा जरी ह्या जागृतीला कारणीभूत होणार असला तरी जगांत नव्या सृष्टीला सुरवात झाल्याशिवाय रहाणार नाहीं. निदान तशी आशा करूं या आणि आपल्यापुरती तरी आपली उंची वाढवूं या. काळ अनंत आहे आणि त्या काळाचे निर्माते आपणच आहोंत. ज्यांच्या बुद्धिमत्तेनें हिंसेची प्रचंड उभारणी केली त्यांना अहिंसेची उभारणी करतां येणार नाहीं का ? कोणाला गांधीवादांतील अध्यात्म पटेल, कोणाला पटणार नाहीं. पण मनुष्यमनुष्यांतील गाऱ्हाण्यांचा निरास करण्याचें सामर्थ्य रक्तहीन प्रतिकारांत आहे हें तरी जगाला पटवूं या. आपण मोठे अभिमानानें म्हणत असतों कीं, हिंदुस्थान जगाचा मार्गदर्शक होणार आहे. तें मार्गदर्शन आपण हिंसेनें काय करणार ? अहिंसा हेंच आमचें वैशिष्टय आहे.

हें गांधीवादाचें किंवा अहिंसावादाचें समालोचन ज्ञानेश्वरींतील चर्चेनें संपविणें अत्यंत युक्त होणार आहे. तेव्हां अहिंसेबद्दल ज्ञानेश्वरांचें म्हणणें काय आहे तें पाहूं या. तेराव्या अध्यायांत ज्ञानेश्वरांनीं अहिंसेवर अत्यंत उत्तम प्रवचन केलें आहे. प्रथम त्यांनीं हिंसेलाच अहिंसा कशी म्हणतात हें दाखविलें आहे. ' यज्ञकर्मांत हिंसा करून तिच्यापासून अहिंसा निर्माण करण्याचा चमत्कारिक निर्णय मीमांसकांनीं घेतला आहे. ' ही व ह्या प्रकारची अहिंसा खोटी आहे. ज्ञानेश्वरांनी अहिंसेची व्याख्या ' जिया (अहिंसा) उठलिया आंतुल । ज्ञान दिसे ', म्हणजे जी अहिंसा अंतःकरणांत उत्पन्न झाली असतां स्पष्ट ज्ञान दिसतें अशी केली आहे. ज्याच्या ठिकाणीं अहिंसा मुरली आहे त्याचें वर्णन ज्ञानेश्वरांनीं फारच बहारीचें केलें आहे. या अहिंसकाचें आचरण ते उपमांवर उपमा देऊन सांगतात. बगळा ज्याप्रमाणें पाण्याच्या लाटा किंवा पाण्याचा संथपणा बिघडवूं न देतां आपल्या भक्ष्यावर हळूच पाऊल टाकतो; किंवा भुंगा

ज्याप्रमाणें कमलांतील केसर दुखावतील म्हणून त्यावर हळूंच पाय ठेवतो, त्याप्रमाणें परमाणूंतसुद्धां अति सूक्ष्म जीव भरलेले आहेत हे जाणून ते न मरावे म्हणून जो जमिनीवर बेतानें पाऊल टाकतो, ज्याच्या पायामुळें जीवांना त्रास न होतां सुख होतें, तोच खरा अहिंसक. (तैसेनि मार्दवें पाय । भूमीवरी न्यसतु जाय । लागती तेथ होय । जीवा सुख ॥) अशाच्या वाणींतहि मूर्तिमंत दया भरलेली असते. त्याच्या तोंडांतून अक्षरें बाहेर पडण्यापूर्वी तोंडावर स्नेहभाव दिसूं लागतो व पोटांत दया उत्पन्न होऊन नंतर कृपेनें भरलेले शब्द बाहेर पडतात. कोणाला दुःख होईल म्हणून बहुतकरून तो कमीच बोलतो. पण कोणाच्या विनंतीनें तो बोलूं लागलाच तर आपल्यापुढें नादब्रह्म उभें रहावें किंवा गंगोदक उसळावें त्याप्रमाणें खरे, मऊ, मोजके व रसाळ असे अमृताच्या लाटांप्रमाणें त्याच्या तोंडून शब्द निघतात. त्याचे हात, पाय, डोळे वगैरे इंद्रियें निर्व्यापार झालेलीं असतात. वाऱ्याला धक्का लागेल किंवा आकाशाला नख लागेल असें वाटून तो हात हलवीत नाहीं. अशाला हातांत काठीच घेणें आवडत नाहीं, मग शस्त्राची गोष्ट कशाला ? (नावडे दंडु काठी । मग शस्त्राचे किरीटी बोलणें के ॥) पण तो पीडिताच्या अंगावरून हात फिरवतो व त्याची चिंता हस्तस्पर्शानें दूर करतो. त्याच्या या हस्तस्पर्शामुळें जो कृपेचा पाझर फुटतो, तसा चंद्रकिरणांपासूनहि फुटत नाहीं.

हे जे इंद्रियांचे व्यापार सांगितले ते मनाचेच व्यापार आहेत असें ज्ञानेश्वर म्हणतात. मनांत जर अहिंसा नसेल तर ती इंद्रियांत येणार नाहीं. मन हेंच इंद्रियांकडून व्यापार करवितें. पिकलेल्या फळाचा वास जसा आपोआप चहूंकडे पसरतो, त्याप्रमाणें मनांत अहिंसा स्थिर झाली म्हणजे ती इंद्रियाद्वारें प्रकट होते. "ज्यानें कायेनें, वाचेनें व मनानें हिंसेचा त्याग केला आहे तो पुरुष ज्ञानाचा विलासी, ज्ञानाचें वसतिस्थान आहे, एवढेंच नव्हें तर तो प्रत्यक्ष ज्ञान आहे." [जो जाण वेल्हाळ । ज्ञानाचे वेळाऊळ । हें असो निखिल । ज्ञानचि तो ॥]

अशा प्रकारचा अहिंसक हा खरोखर मुक्त पुरुषच होय. पण त्याला जगाशीं कांहींच कर्तव्य नसतें असें नाहीं. कारण १६ वे अध्यायांत अहिंसेचें विवरण करतांना ज्ञानेश्वर म्हणतात कायावाचामनानें जगाला सुख व्हावें या हेतूनें जें वर्तन करणें तेंच अहिंसेचें खरें लक्षण.

॥ आणि जगाचिये सुखोद्देशें । शरीरवाचा मानसें । राहाटणें तें अहिंसे । रूप जाण ॥

यापेक्षां गांधीवादाच्या परिपूर्णावस्थेची निराळी व्याख्या नाहीं.

समाप्त

103

923

त्र्यं. र. देवगिरीकर यांनीं लिहिलेलीं

कांहीं पुस्तकें

१	फेडरेशन व त्याचें भवितव्य	२–०–०
२	आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा इतिहास	१–०–०
३	फिलिपाईन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास	१–०–०
४	औद्योगिक हिंदुस्थान	१–०–०
५	रशियन राज्यक्रांतीचा इतिहास	०–६–०
६	आशियाच्या पारतंत्र्याचा इतिहास	१–०–०
७	वसाहतींचें स्वराज्य	१–४–०

चित्रशाळा प्रेस, पुणें.